म. प्रं. सं. ठाणे.
निषेध
3383



REFBK-0026166

प्रश्नशोध

केशव मेश्राम

संदर्भ निबंध
3363
२६१६६
२३।७।९०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, से न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे ादा वर्गणी भरावी लागले.

18 AUG 1990

8 SEP 1990

26 SEP 1990


6 OCT 1990

24 JUL 1991

(क्र. मा. पहा)
१००००-११-८९

प्रश्नशोध

केशव मेश्राम


REFBK-0026166



लोकवाङ्मय गृह

□ प्रश्नशोध
म / ३६४

आवृत्ती पहिली
डिसेंबर १९८९

© केशव मेश्राम

प्रकाशक । सुकुमार दामले
लोकवाङ्मय गृह लि.
भुपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

मुद्रक । प्रकाश विश्वासराव
न्यू एज् प्रिंटींग प्रेस
भुपेश गुप्ता भवन,
८५ सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

मूल्य । ५० रुपये

गुरुवर्य प्रा. रमेश तेंडुलकर

आणि


मित्रवर्य डॉ. सदा कऱ्हाडे

यांच्या मार्गदर्शक सहवासास—

अनुक्रमणिका

१.	मराठीचा वाङ्मयव्यवहार : काही विचार	१
२.	संतसाहित्य : एक दृष्टिक्षेप	८
३.	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविधांगी व्यक्तिमत्त्व	२२
४.	म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक तौलनिक अभ्यास	२७
५.	धर्मसंकल्पना आणि भारतीय मन	३३
६.	धर्मनिरपेक्षता : काही विचार	४०
७.	दलित समाजाचा तीन दशकांचा ताळेबंद	४७
८.	श्री. म. म्हणजेच महार माटे	५२
९.	मिष्किल प्रतिभेचा अज्ञात शाहीर : जानबाजी	५७
१०.	लोकशाहीर जानबाजीचा नाट्यरंग	७१
११.	संदेश देणारा ललित शाहीर : जानबा	८७
१२.	एक अज्ञात शाहीर : राजोबा	९६
१३	दंडारीचा कवनकार शाहीर राजोबा	१०१
१४.	गोविंदाग्रजांच्या तीन विशेष कविता	१०५
१५.	विंदा करंदीकरांच्या 'दांतापासून दांताकडे' या कवितेचे पुनर्मूल्यमापन	११२
१६.	वसंत बापट यांची कवितामालिका : मानसी	११८
१७.	पाडगावकरांचा कडक 'सलाम'	१२१
१८.	गजमल माळी यांचे चिंतनकाव्य : नागफणा आणि सूर्य	१२४

१९. नामदेव ढसाळ यांचा चौथा काव्यसंग्रह :
तुही इयत्ता कंची, तुही इयत्ता १३०
२०. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा'चे
विविधांगी मूल्यमापन १४०
२१. दया पवार यांची तेजस्वी
कविता : पाणी १४९
२२. सावंत यांचा प्रतीकलक्षी
आविष्कार : 'बैल' १५४
२३. राम मोरे यांची गीतरचना १५७



या पुस्तकाविषयी थोडेसे—

विविध अशा संकीर्ण विषयांना स्पर्श करणारा हा ग्रंथ आहे. मराठी साहित्याच्या वाङ्मयव्यवहाराकडे, सर्व लेखनप्रकारांकडे आणि संतांच्या साहित्याकडे नव्या वस्तुनिष्ठ भूमिकेतून पाहत असताना काही प्रश्न मनात उद्‌भवलेत. आरंभालाच त्यांची नोंद केली आहे.

ह्या वर्षात योगायोगाने म. फुले आणि डॉ. आंबेडकर नव्याने वादग्रस्त ठरले आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील वादळे याची साक्ष देतील. रामकृष्णविषयक रिडल्सने डॉ. आंबेडकर आणि डॉ. गांगलांच्या लेखनाने म. फुले हे दोन महामानव सततच माझ्या वाचनचिंतनाच्या केंद्रस्थानी आहेत.

धर्म, भारतीय मनाची जडणघडण आणि धर्मनिरपेक्षता याविषयी संयत थंडपणाने लिहिणे अगत्याचे होते. दलित समाज आणि दलित साहित्य—ज्याविषयी सहानुभूतीपासून तो आकस व्यक्त होण्यापर्यंत, पराकोटीची मतांतरे अनेक क्षेत्रातल्या कितीतरी विचारवंतांकडून व्यक्त होत असतात; त्या समाज व साहित्याचा एक धीट सांस्कृतिक आढावा घेतला आहे. त्यातील काही कलावंत वाङ्मयीन आस्वादास्तव निवडले आहेत. आणि त्यांच्याशीच निगडित असणाऱ्या बापूसाहेब माटे यांच्या व्यक्तिमत्त्वालाही धावता स्पर्श केला आहे.

विदर्भ विभागातील दोन अज्ञात शाहीर जानबा आणि त्यांचे गुरू राजोबा यांच्याविषयींचे स्वतंत्र संशोधन आणि लेखन याच ग्रंथात अधिकृतपणे येत आहे. पुढे यथावकाश त्यांच्यावर स्वतंत्र ग्रंथ येईलही. पण ह्यातील पाच लेख अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतीलच, असे मला वाटते.


एकोणीसशे वीसपासून तो आजच्या विविध वृत्तीप्रवृत्तींच्या कवी आणि कवितेविषयीचे नऊ लेख हा या लेखनाचा चौथा टप्पा आहे. गोविंदाग्रजांच्या 'तीन' विशेष कवितांविषयीचे माझे लेखन महाराष्ट्राबाहेरील अन्य विद्यापीठातील अभ्यासकांना मौलिक वाटले होते. गोविंदाग्रज ते नामदेव ढसाळ आणि कविवर्य वसंत बापट ते गीतकार राम मोरे असे विचारसूत्र या ग्रंथासाठी मनात बांधले होते.

माझे तरुण स्नेही प्रकाश विश्वासराव यांचे विशेष आभार मानतो. कारण नामांतरित प्रकाशन संस्थेतर्फे माझे नवे स्वतंत्र पुस्तक तब्बल सोळा वर्षांनंतर त्यांनी आत्मीयतेने प्रकाशित केले. सर्वच नियतकालिकांचे संपादक यातील लेखांच्या प्रसिद्धीस कारणीभूत आहेत. तरी 'धर्मभास्कर'चे संपादक, माझे सहकारी प्रा. अवधूतशास्त्री, 'आकंठ'चे श्री. रंगनाथ चोरमुले, 'अस्मितादर्श'चे डॉ. गंगाधर पानतावणे, 'कामगार'चे श्री. काशिनाथ माटल आणि 'आकाशवाणी'चे श्री. बबन काळे यांचा मी फार ऋणी आहे.

विद्यार्थी, रसिक आणि अभ्यासकांना त्याचप्रमाणे नव्यावर नजर ठेवून असणाऱ्या संशोधक विचारवंतांना, 'प्रश्नशोध' आवडेल असे मला वाटते.

२४. ११. १९८९

केशव मेश्राम
४ फुलराणी, साहित्य-सहवास
वान्द्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.



१. मराठीचा वाङ्मयव्यवहार : काही विचार

मराठीचा वाङ्मयव्यवहार हा विवक्षित रीतीनेच जाणारा प्रवाह आहे. त्याचे एक मोठे ठोस व ठाशीव रूप परंपरागत संस्कृत साहित्याचा आर्ष आदर्शांशी जोडले गेले आहे. त्यामुळे नायक-नायिका, त्यांचे वातावरण, त्यांचे कुटुंबजीवन, त्यातील ताण-तणाव, स्वप्ने व मनोभंग, यांची खोलात जाऊन छाननी केली, तर ही गोष्ट स्पष्ट होते.

दुसरा रंग आहे, तो अव्वल इंग्रजीच्या कालखंडात लाभलेल्या, एकांगी पडझडीतून आलेला आहे. मूल्यकल्पनांचा केंद्रबिंदू बदलण्याचा हा काळ होता. राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक संकल्पनांचा जो प्रभाव, तत्कालीन समाजाच्या कृतीउक्तीवर होता, त्यांच्यातच थोडेफार परिवर्तन होण्याचा हा काळ होता. लोकहितवादी, म. फुले, आगरकर, शाहू महाराज, वि. रा. शिंदे, कर्वे, डॉ. आंबेडकर वगैरेंची जी वैचारिक परंपरा आढळते, ती याच काळाचा परिणाम म्हणून सांगावी लागेल.

एलफिन्स्टनसाहेबांच्या व कॅ. जर्विस वगैरेंच्या धोरणातून आलेल्या, दक्षिणा प्रैज कमिटीच्या कार्यारंभापासूनच, समाजातला द्विवर्गी प्रकार, झपाट्याने बदलू लागला. बुद्धिजीवी अशा मध्यमवर्गीयांचा, सर्व वर्गांच्या आशाअपेक्षांना स्पर्श करणारा स्तर मान्यताप्राप्त ठरला. सर्वसंपन्न धनाढ्यांना आणि स्वप्नसंपन्न सामान्यजनांना या वर्गाने आपलेसे करण्याचा चंग बांधला. लेखनाच्या वाङ्मयविष्काराच्या साहाय्याने ही किमया शक्य झाली. आणि तेव्हापासूनच जीवनव्यवहाराच्या सर्व शाखोपशाखांशी वाङ्मयाचाही दृढसंबंध प्रस्थापित झाला. ह्या काळातील लेखनाने, असा ठसा उमटविला की त्या पलिकडे 'नवें' काही असण्याची शक्यताच नाही अशी एक समजूत करून दिली जाऊ लागली. मराठीच्या वाङ्मयव्यवहाराचे हेच चढते-वाढते शिखर होऊन बसले.

ह्या नव्याने आविष्कार स्वातंत्र्याचा मुक्त उपभोग घेणाऱ्या मध्यमवर्गीय

समाजघटकाकडूनच 'सदाशिवपेठ' तयार केली गेली. ह्या मध्यमवर्गाचे आणखी एक वैशिष्ट्य सांगता येईल की जसे तो एक वर्तुळ निर्माण करण्यास कारणीभूत होतो त्याच व्यवहारातील सांकेतिकतेवरूनही तोच लढायला सिद्ध होतो. ह्याच प्रक्रियेला टी. एस. इलियट यांनी वाङ्मयातील 'नवतेचा सिद्धांत' म्हणून प्रतिपादन केले आहे. श्री. गो. वि. करंदीकर यांनी मांडलेले, 'परंपरा आणि नवता' विषयक विचार याच दिशेने आलेले आढळतात. साहित्य व्यवहारात संकेत निर्माण होणे आणि तोडले जाणे हेच स्वाभाविक असते. म्हणून मध्यमवर्गातील नवताप्रेमी जागरूकांकडून होणारी ही तोडमोड अर्थपूर्ण आहे.

या प्रक्रियेलाही खूप मर्यादा आहेत. कारण परंपराच जी घडली आहे ती स्वतःला अचूक व अभिजात म्हणवणाऱ्या अत्यल्प वर्गाकडून. बौद्धिक आणि ग्रांथिक व्यवहारात कुशल असणाऱ्या या वर्गानेच तयार केले काव्यशास्त्र ह्यानेच लिहिले प्रकारोपप्रकारात साहित्य. त्यानेच लिहिला साहित्याचा इतिहास. त्यानेच बनविली समीक्षासूत्रे. त्यानेच ठरविलेल्या मूल्यकल्पनांवर आकारले गेले सांस्कृतिक जीवन. त्यातील अष्टभाव रससिद्धांत व त्याला पूरक ठरणारे विविध घटक. सर्व जीवनाला पालाण घालण्याची भाषा मूल्यतः ऐसपैसच होती. तिचा पैस मोठा होता. माणसांमध्ये असणारी पक्षपातीपणाची सर्व वैगुण्ये त्यामुळे याही व्यवस्थेत आली असणे स्वाभाविक आहे.

आपल्या कलानिर्मितीला आणि साहित्याविष्काराला सर्वस्व व अलौकिक मानणाऱ्या घटकाला, आपल्या समाजव्यवस्थेतील दोषांनीही, एक घटक म्हणून ग्रासित केले आहे. धर्म, वर्ण, जात–पोटजात, वंश, रक्तानात्यांच्या व आपलेपणाच्या व्यवस्था-व्यूहाने, हा निर्माताही घोडचूक करू शकतो, याचा विचार करण्याचीही कुणाला गरज भासली नाही. असे 'पाखंडी' अवाङ्मयीन विचार करणे, अडाणीपणाचे, प्रचारकीपणाचे, वावदूकपणाचे तथा चुकीचेच असे ठरवले जाऊ लागले. याचीही परंपरा निर्माण झाली.

इथे असाही एक प्रश्न उपस्थित करता येईल, प्रचार नसतो कुठे? किंवा नाही कुठे? रामायण, महाभारत, पोथ्या, पूजा, श्लोक, सुभाषिते, वाक्प्रचार, म्हणी, अन्योक्ती, श्लेष, अलंकार, वृत्ते, या सगळ्यांत, धर्मापासून तो आदर्शांबद्दल, किंवा पद्धतींपासून तो वर्तनापर्यंत, किंवा सूचितार्थापासून तो अक्षरगणमात्रांच्या शिडीपर्यंत प्रचारच नाही तर काय आहे? पण अनुकूल नसणारांना 'प्रतिकूल' ठरवून शब्दबहिष्कृत ठरविणे या न्यायनीतीचा येथे अवलंब केला गेला आहे.

त्यामुळे ही तडजोड कितीही स्वाभाविक असली तरी, ज्यांच्या जीवनाला, जीवनानुभवाला कधी साहित्य व्यवहारात यथार्थपणे चित्रित केलेलेच नाही, असा फारच मोठा वर्ग आहे, ही वस्तुस्थिती आहे. आणि त्यांच्या दृष्टीने पारंपरिकता आणि नवता, ही दोन्ही तत्त्वे अप्रस्तुत आहेत किंवा अव्याप्त आहेत. जीवनव्यवहारात असे एकांगी दर्शन घडू शकते. या अंतर्विरोधातूनच, अनेक नव्यांची शक्यता-संभाव्यता जन्माला येते.

ज्या पॉल सार्त यांनी, हा विचार नोंदला आहे.

'The history of a life, whatever it may is a story of frustration. The coefficient of adversity of things is such that it takes years of patience to obtain the most trifling result. ('L' Etre et le N'eant.)'

मराठीच्या साहित्यव्यवहारात महाराष्ट्रातला तळागाळातला माणूस, कधीही पूर्णांशाने व गांभीर्याने, चित्रित केला गेला नाही हा छोटासा सामान्य निष्कर्ष, मराठीचा खटालभर इतिहास, थंडपणे तपासला तर काढावा लागतो, ही चिंतेत पाडणारी बाब आहे.

आधुनिक कादंबरी, कथा, कविता, नाट्य, निबंध वगैरे प्रकारांना, रूप येईपर्यंत, विसाव्या शतकाची दोन दशके जावी लागली. ह्याच वाङ्मयप्रकारांना, नवी कथा, नवी कादंबरी, नवी कविता असे अभिधान प्राप्त होईपर्यंत आणखी तीन दशके सरकावी लागली. जानपद साहित्य, ग्रामीण साहित्य, प्रादेशिक लेखन, हे एकोणीसशे पन्नासनंतरच अधिक जोमाने होऊ लागले आणि दलित साहित्य एकोणीसशे साठ-पासष्टनंतर डोके वर काढू लागले. आदिवासी साहित्य, जे लोकसाहित्याच्या ढोबळ कक्षेत कोंबणे चुकीचे ठरेल, त्यांची तर वाङ्मयीन पद्धतशीर चळवळही अजूनपर्यंत उभीच झाली नाही, याचे कारण, आपल्या साहित्य विचारांच्या सदोष प्रणालीच्या अंगीकारात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात विकास आणि विचार खूप झाला. पण गुणवत्तापूर्ण, लक्षणीय साहित्य जे आले ते ह्या मध्यमवर्गीय जाणिवांच्या स्तरापलिकडे असणाऱ्या लेखकवर्गाकडून 'रणांगण', गाडगीळांची कथा, मर्ढेकरांची कथा-कविता यांचा काळ आणि 'सूड', शंकरराव खरातांची कथा आणि नामदेव ढसाळांची कविता यांचा काळ, ह्यांचा एकत्र विचार केल्यास, हे अधिक स्पष्ट व्हायला मदत होईल. हकिकत व जटायु, बलुतं, उपरा, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, हादेखील टप्पा आहेच.

मराठी लेखक-वाचकांची मनोवृत्ती, नाट्यात्म, ऐतिहासिक आणि रोमँटिक प्रवृत्तीत, विशेष रममाण होणारी, आहे. जीवनातील सरळ मध्यमप्रतीचा रोजचा अनुभव, म्हणूनच नाट्यात्म पद्धतीने, नाट्यमयतेच्या गुंफणीने आला की त्याला नवेपणाचे परिमाण येते. एका मुलाचे 'अ' मुलीवर प्रेम आहे. तिला त्याऐवजी 'ब' मुलगा आवडतो. मग 'क' पाटील, सावकार, श्रीमंत, 'अ'ला मागणी घालतो. आणि अशाच तऱ्हेच्या साखळ्या, हजारो वेळा उलटसुलट पद्धतीने आणि रंगाने रंगविल्या की, नवी कथा, नाटक, कादंबरी एकदम तयार होते. त्या तरुण-तरुणींचा धर्म, समाज, जात, भाषा भिन्न असली की, हाच मासला, मग क्रांतिकारक विषय बनतो. विवाह ठरतेवेळी सांस्कृतिक संघर्ष, विवाहोत्तर मानसिक संघर्ष आणि परिणाम अमक्या जातीतील 'पुरुष' हा व्यसनी, लंपट, संस्कारशून्य, शिवराळ असणारच. त्यामुळे आंतरजातीय विवाह असफलच होणार. हे कन्यादान गैरलागू झाले आहे. रसिकांच्या अशा प्रतिक्रिया पाहूनच नाटककाराला आपण केवढा विजय मिळविला, याचे समाधान दाढी खाजवीत मिरवता येते. घटनेच्या हमी नि हक्कांची ही पायमल्ली हा शिकलेला पांढरपेशा, असंस्कृत समाज मिरवतो. व त्यात भूषण मानतो. देशभर कायद्याच्या

तरतुदीच्या चिंध्या, आदिवासींच्या विटक्या लंगोटीप्रमाणे, लटकताना दिसतात, याचे कारण ही मनोवृत्तीची जडणघडण हेच आहे. व्यक्ती-घटितांच्या अन्वयानेही हे स्पष्ट होईल.

राजा दशरथ, हरिश्चंद्र, शिबी, राम-रावण, कृष्ण-बलराम, सुग्रीव-वाली हे सगळे राजे-राजपुत्र सत्ताधारी होते. काळ बदलला की, देशाचा प्रधानमंत्री, राज्याचा मुख्यमंत्री, महानगराचा महापौर, एखाद्या प्रादेशिक संघटनेचा एककल्ली गुरुजी वा प्रमुख, खेड्यातील पाटील, सावकार, बौद्धिक चातुर्य दाखवणारा जोशी, तेन्नालीराम, बिरबल, कुलकर्णी, इनामदारीची मलई गालावर मिरवणारे कोणकोणत्या कुळीचे सरदार, साखरसम्राट बागाईतदार, देशपांडे, देशमुख, सरनाईक, सहकारमहर्षी, ही यादी केवढीही मोठी करता येईल. यांनाच सत्तेची, शासनाची सर्व दारे सताड उघडी असतात. बंद दारे, पैसा पेरून, लाचलुचपत, वशिलेबाजी, पक्षपातीपणा यांनी उघडता येतात. काहींकडे आर्षकाळी आचरण, आदर्श, सुनीती व कर्तव्यदक्षता, इत्यादी गुण होतेही. पण यांचीच चरित्रे, कर्तुके, दिनक्रमे त्यांच्यावर अवलंबून असणारांकडून लिहिली जातात. फायदा पाहणारांकडून छापवली जातात. अद्‌भुताला, रंजनाला, चटकदार चमचमीतपणाला व प्रतिआव्हान दिले जाणार नाही, अशा आदर्शांचा शोध घेऊ पाहणाऱ्या सलामी मनोवृत्तीच्या वाचक-रसिकांकडून वाचली-आचारली जातात. याचीही एक स्वीकृत परंपरा उपलब्ध आहे.

मराठीतील पौराणिक-ऐतिहासिक लेखनाची निर्मिती आणि वाचकरसिकांची, त्याकडे वाढत्या प्रमाणात आकृष्ट होण्याची आजची स्थिती, ह्याच प्रवृत्तीची द्योतक आहे. "साहित्यव्यवहारात अमुक टप्प्याने ह्या ह्या पद्धतीची वा वाचन व्हावे, असा काही नियम असू शकतो का?" असा जर प्रश्न विचारला, तर त्याचे उत्तर 'नाही' असे आहे. पण वाढत्या वैज्ञानिक, बदलत्या आणि जेट युगाने जोडल्या गेलेल्या काळात, असे मागे मागे जाणे कितीसे सयुक्तिक आहे याचाही विचार होणे अगत्याचे आहे. याचे आणखीही एक कारण सांगता येईल. नाही असे नाही. ते म्हणजे, वाढत्या बदलत्या गतिमान विश्वचक्रात, हा मध्यमवर्गीय वाचक-रसिक माणूस, अधिकच भांबावून गेला आहे. वर्षानुवर्षे आणि योग्य म्हणून अंगीकारलेली अनेक मूल्ये, तो चूरचूर होताना आपल्या डोळ्यांनी पाहतो-अनुभवतो आहे. कोणते शाश्वत, कोणते आदर्श? यांचीच गल्लत होते आहे. सुखाची-समृद्धाची शोधप्रक्रिया अपुरीच आहे, हे त्याला आतून जाणवू लागले आहे. म्हणून तो संक्रमणाच्या काळात, आपल्या अश्मयुगीन श्रद्धा-प्रवृत्तीचे प्रदर्शन करण्यास प्रवृत्त होत आहे. अत्याधुनिक वस्त्रप्रावरणे परिधान करणारा बीयर, जीन वाईनचे घुटके घेत, सलोमी सामोसे खात स्वतःला सावरू पाहणारा, हा माणूस, मनातून फाटून फुटून गेला आहे. तो दैवतांपुढे रांगा लावतोय. वाढत्या श्रेणीने पूजा उत्सव-करतोय, नाक्याचौकीवरल्या देवदेवळाला वर्गणी देऊन, आश्रय देतोय. सुस्थित मध्यमवर्ग असा गोंधळून गेला आहे. त्या मध्यमवर्गाच्या ऱ्हासकालाची, नव्या बदलाची ही सुचिन्हे म्हणता येतील.

मध्यमवर्गाच्या ऱ्हासकाळातच अवर्गीय नगण्यांना ह्या वर्गात शिरकाव करून घेता

येईल. कारण वर्गावर्गामध्ये असलेली ही तफावत भरून येऊन सुसंवादी देवाणघेवाण शक्य होईल ही अपेक्षा चुकीची आहे. वर्गावर्गांचे एकीकरण शक्य नाही. पण त्यांचा संघर्ष तीव्रतर होत जाणे मात्र शक्य आहे. आणि हा संघर्ष नव्या सांस्कृतिक जीवनव्यवहाराची नांदी ठरणारा आहे. कुसुमावती देशपांडे यांनी यासंबंधीचे केलेले विवरण व भाष्य नमूद करता येईल. "बहुजनसमाजाच्या जीवनाकडे सहृदयतेच्या दृष्टीने पाहायला शिकले पाहिजे व ही जी प्रचंड शक्ती राष्ट्राच्या जीवनक्षेत्रात उतरणार आहे तिच्या मार्गदर्शनासाठी व विकासासाठी नवभारतातील सर्व कलांचा उपयोग केला पाहिजे. म्हणजे सुसंस्कृतता, कलाप्रेम, ज्ञानानंद, ह्या गोष्टी कोणत्याही एका वर्गासाठी राखून ठेवल्या जाणार नाहीत." (नवभारतातील कला आणि मध्यमवर्ग, पासंग दु. आ.)

या विवरणात मध्यमवर्गीय मनोवृत्तींच्या ज्या त्रुटीकडे मला लक्ष वेधायचे आहे, त्याचे रिंगण स्पष्ट झाले आहे. ह्या वर्गाने ही साहित्यिक शेती-अभिरुची क्लास, अभिजातता ह्या अभियानाखाली स्वतःसाठी राखून ठेवली होती, आहे. सहृदयतेच्या दृष्टीवर वरचष्मा असणाऱ्या अस्तित्वाने व इतक्या वर्षांच्या अधिकाराने मात केली आहे. त्यामुळे ती दृष्टी सदोष व सोयीस्कर झाली. अशा दृष्टीचे मार्गदर्शन वा नियमन बहुजनसमाजाच्या जीवनाच्या बहुमुखी प्रचंड शक्तीने, आता अमान्य केले आहे.

नाटकी आणि इतिहासप्रेमी प्रवृत्तीप्रमाणेच सगळ्याच आविष्कारांकडे रोमँटिक रीतीने पाहण्याची सवयही, याच कारणामुळे, येथील उपलब्ध रसिकदृष्टीला लागली आहे. त्याचे एक टोक रंजनाकडे, एक उद्बोधनवादी आदर्शपूजनाकडे लागलेले दिसते. त्यामुळे प्रत्येक वाङ्मयप्रकाराकडे आम्ही संमिश्र अशा तीनचार प्रवृत्तींच्या भिंगातूनच पाहायला शिकलो आहोत.

जे तथाकथित आदर्श, ग्रंथांत व ग्रंथांतर्गत परंपरापोषक व उपकारक व्यक्तिचरित्रात सापडतात, ते अपरिवर्तनक्षम मानूनच आपण त्यांच्या तुलनेने नव्या विसंवादी आविष्कारांचा विचार करू पाहतो.

आजपर्यंतच्या स्थिर व रूढ समाजव्यवस्थेला व ती टिकवून धरणाऱ्या धर्मसत्ता, अर्थसत्ता, बुद्धिसत्ता, नियमसत्ता असणाऱ्या वर्गांच्या, कृतीउक्तीच्या विरोधात तर हे नाही ना? तसे असेल तर ते बरोबर नाही. काहीतरी गल्लत गफलत झाली आहे, असे समजण्याच्या दृष्टीनेही आविष्कारांकडे पाहिले जाते.

समाजजीवनामध्ये व साहित्य व्यवहारामध्ये जे नवे येते, ते नवे आपल्याला हेरता आले. त्याच्या शक्तीस्तोत्राचा वेध घेता आला याचे थ्रिल अनुभवण्याचा, आपले गुरूपद अधिक घासून पुसून घेण्याचा रोमँटिक प्रकारही येथेच संभवतो. एक आनंददृष्टी, आदर्शदृष्टी, निश्चितधारणा ठरवून कशाहीकडे पाहणे, हेच अपुरे पडणारे प्रकरण ठरते, याकडे मग दुर्लक्ष होते. एक समीक्षक आय. ए. रिचर्डस यांनी याच गोष्टीवर बोट ठेवताना म्हटले आहे :

"The orientation of attention is wrong if we put the pleasure in the forefront"

तसेच मीमांसेच्या जबरदस्त फूटपट्ट्यात सर्व काही जखडून,जे अनेक रीतींनी जखडलेले आहेत वा होते, त्यांच्या लेखनाकडे दया-सहानुभूतीने, प्रोत्साहक मोठेपणाने व मनातून अनुदारपणाने, पाहण्याचीच वृत्ती आकारास आल्यास नवल नाही.

यांच ठिकाणी आणखी एका अंतर्विरोधाचा खुलासा करणे अगत्याचे होईल. एकीकडे शब्दप्रामाण्यवादी भूमिका घेऊनच नवा शब्दप्रामाण्यवाद गृहीत धरण्यात येतो. आणि चांगला वेगळा लेखक शेकडो सिद्धांतांना तुडवून नवनिर्मितीची क्षमता बाळगू शकतो असे म्हणता म्हणता, तो लेखक आपल्या विचारसरणीला पोषक व पूरक असणाऱ्या 'जातीचा' आहे का? हे देखील पाहिले जाते. म्हणजे शब्दप्रामाण्यामुळेच नव्या शब्दांना त्याज्य वा तुच्छ ठरवण्याची प्रवृत्ती संभवते. यामुळेच अनेक विचारवंतांनी, संतांनी, समाजसुधारकांनी अनेक रीतींनी लिहून सांगून आचरणही फारसे काही बदलले नाही, असे विचित्र आढळते. गांधीवादी आचार्य दादा धर्माधिकारी यांनी ही गोष्ट प्रजासत्ताकाच्या निर्मितीच्या वेळेला मुळीच आडपडदा न ठेवता सांगितली होती. "ज्या समाजाला जन्मगत भेदभाव असतात तो समाज इतरांच्या दृष्टीने निरुपद्रवी असला तरी त्याच्या ठिकाणी कार्पण्यदोष म्हणजे अंतःकरणाचा अनुदारपणा उत्पन्न होतो. त्यातून पावित्र्यवाद बोकाळतो. पावित्र्यवाद म्हणजे माणसाचा विटाळ मानण्याची वृत्ती आणि माणसाचा विटाळ मानणे म्हणजे असामाजिकता." (क्रांतिनिष्ठा पृ. १०१, सप्टें. १९४८) याच मताची नव्याने मांडणी करताना असे म्हणता येईल, की 'जे रूढ व्यवस्थेशी विसंवादी आहे ती गोष्ट अवाङ्मयीन' असे विधान करणारे व त्यांची वृत्ती वरवर निरुपद्रवी वाटली तरी, ती नुसती असामाजिक नसते, तर अमानुषी असते. अशा साहित्य-व्यवहारातल्या अमानुषांनी तुकाराम, ज्ञानेवर, म. गांधी, टॉलस्टॉय, दादा धर्माधिकारी अशा कित्येकांचा सातत्याने पराभव केला आहे.

मराठीच्या नव्या वाङ्मयविचारात कोणतेही अंग वा उपांग दुराग्रही किंवा असावध राहिले, तर न्यूनच निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. आपली देवसंकल्पना सामूहिकतेकडून व्यक्तिगत पातळीवर येत येत निर्वाच्य बनत आहे. आपली धर्मसंकल्पना आपल्या पारंपरिक धर्मसंकल्पनेपेक्षा घासून पुसून आटोपशीर होत आहे. देव आणि धर्मामधल्या मध्यस्थाबाबतच्या कल्पना बदलत आहेत. पुरोहित, पंडित, संस्कृतज्ज्ञ जोशी यापेक्षा विश्वसंकुलातल्या इतरेजनांची ह्या स्थानावर प्रतिष्ठापना केली जात आहे. जाती पुसट होत चालल्या आहेत. पोटजाती निकामी ठरत आहेत. वर्ण अस्थानी वाटतात. निराबाध-त्रिकालाबाधित सत्य म्हणून स्वीकारलेल्या, काळ्या दगडावरल्या तत्त्वज्ञान व सूत्रांच्या तळहातावरील रेखा, वेगाने मिटत आहेत. अशा वेळेस मराठीच्या साहित्य-समीक्षा आस्वादशास्त्राला व रसिकालाही तोल सावरून बदलले पाहिजे. नव्याचे अत्याधुनिक भान राखून, पुढल्या हाका, सावधपणे ऐकायला शिकले पाहिजे. जगभर हाच विचार रूढ होत असताना, आत्मघातकी आत्मतृप्ती भूमिका तर केली पाहिजे.

सर्व अवधान एकटवूनच नव्या साहित्याविष्काराला सामोरे जाण्याची पात्रता नव्याने कमवावी लागेल. एक अमेरिकन विचारवंत म्हणतातः

"The everyday life in business and society is a complicated affair to which no kind of mental activity is lacking.. There are actions which are purely intellectual, and others in which feeling predominates" (Appreciation : Painting, Poetry and Prose Leo Stein. Capt. 2 page-16)

बौद्धिक आणि भावनात्मक द्वंद्वाचा हा गुंता संथचित्त प्रवृत्तीने सोडविण्याचा दृष्टीने पाऊल टाकण्याची आता खरी वेळ आली आहे, असे मला वाटते, तरच साहित्य व्यवहार लौकिकानुगामी ठरणार. नव्या अर्थाने सुसंबद्ध वाटणार.

लौकिक व्यवहाराचे संवादी शब्दचित्र, साहित्यकृतीच्या द्वारे उमटायला हवे. लौकिक व्यवहार जर विसंवादी अनुभूतींवर आधारलेला असेल, तर विसंवादाच्या आविष्काराचा नवा सुसंवाद त्यातून प्रत्ययास येणार. आजच्या दलित साहित्यकृतीमध्ये अर्थपूर्ण वस्तुबोधाचा अनुभव शब्दबद्ध केला जात आहे. रूढ निकषांना त्यामुळेच त्यातले 'सौंदर्य' वा 'अर्थपूर्णता' बिचकावून टाकतात. एका विवक्षित पातळ्यांनी फक्त संसेद्य अनुभवाचीच आस्वादसमीक्षा व व्यवहार, आजपर्यंत ग्रथित केला गेला असल्याने हा शब्दव्यवहार विलक्षणसा वाटतो. स्वीकारार्ह म्हणताना, अनेक प्रश्नचिन्हे यासाठीच तो उभा करतो.

जीवनव्यवहाराच्या आणि साहित्यव्यवहाराच्या अनंत जटिलतेचा व समस्यांचा प्रत्यय दलित साहित्यात, काही ग्रामीण साहित्यात व उपलब्ध होणाऱ्या मोजक्या आदिवासी साहित्यात येतो आहे. तो तसा येणे आणि विद्यमान मूल्यकल्पना अचूक मानणारांचा गोंधळ उडणे, हीच याची निष्पत्ती आहे. पण हे आपले कुंठितत्व मान्य करून, या नव्या आविष्कारांचाच आणि शब्द-साहित्याचाच, गंभीरपणे विचार होण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यातून मराठीच्या साहित्यव्यवहाराचे व्यापक, समावेशक आणि अधिक अचूक साहित्यशास्त्र घडणार आहे.

मुक्त होऊ पाहणाराचा आवाज साखळदंड बाळगणारांनी दुर्लक्षिणे हे त्यांच्यावर स्वतःच्या सदसद्विवेकशीलतेवर आणि मानवतेवर अन्याय करणारे आणि अव्यवहार्य असे ठरणार आहे.

"I am condemned to exist always beyond my essence, beyond the affective and rational motives of my act : I condemned to be free."

हे ज्याँ पॉल सार्त यांचे उद्‌गार साहित्यक्षेत्रात येणाऱ्या नव्यांच्या लेखणीतून शतोगुणित होऊन, अनोखे प्रश्नचिन्ह उभे केल्याशिवाय राहणार नाहीत.

मराठीच्या साहित्यव्यवहाराने, विवक्षित मार्गाने जाण्याची आपली प्रवाहिता बदलून, कालोचित होण्याची आजमितीला नितांत आवश्यकता आहे.

(आकंठ : दिवाळी अंक १९८५)

२. संतसाहित्य : एक दृष्टिक्षेप

कोण्याही भारतीयांप्रमाणे मराठी माणूसही परंपरापूजक आहे. पिढ्यानपिढ्यांच्या श्रद्धा आणि अंधश्रद्धांची जपणूक करण्याची त्याची धारणा आहे. ग्रंथवचनांचा, थोरामोठ्यांच्या कृतीउक्तींचा आधार घेऊन, जगायला त्याला आवडते. पण काही नवे घडावे, चांगले, उदात्त घडावे, असेही त्याला वाटत असते. ह्या नवनिर्मितीसाठी मर्यादित चौकटीत राहून, बंड करायलाही या मराठी माणसाला आवडते. तो त्याचा स्वभावधर्मच बनला आहे.

मराठीतल्या संत-साहित्यातही या बंडाची बीजे दिसतात. सगळे ज्ञान, परमेश्वराची उपासना, पूजाअर्चा आणि प्रतीती, संस्कृत ग्रंथ, मंत्र सूत्रातूनच होऊ शकते, या संकेताविरुद्धच्या संकेतातूनच, मराठीतील ग्रंथसंपदेला फुलोरा आला. ज्यांना पारंपरिक अर्थाने, आपण संतकवी किंवा त्यांचे साहित्य असे म्हणतो, त्याखेरीज जे कवी आहेत, त्यांनीही भाषाभिमानातून, ह्या विद्रोही भावनेची जपणूक केलेली दिसते.

बाराव्या शतकातील आदिकवी मुकुंदराज तत्त्वज्ञ-गंभीरप्रवृत्ती असले, तरी त्यांचे भाषाप्रेम फार मोठे आहे. तत्कालीन पंडितांनी संस्कृताचे इतके स्तोम माजवले होते की, बहुसंख्य समाज अज्ञानी असंस्कृतच ठरावा. त्यातच अनेक देव-देवतांची पूजा प्रचलित होती. शैवमताभिमानी व वैष्णवपंथी यांच्यातून विस्तव जात नव्हता. कर्मकांडाला इतके अवास्तव महत्त्व प्राप्त झाले होते की, त्यातली तर्कसंगती संपून गेली होती.

यातूनच 'मनःपूतः समाचरेत् ।' अशी वृत्ती बळावत गेली. भक्तिभावना उदित झाली. 'भाव तेथे देव' असे वचन आहे आणि **'जितुका भोळा भाव । तो अज्ञानाचा स्वभाव ।'** असेही आहे. मुळातच सगळ्या दर्शनामध्ये एकवाक्यता व सुसूत्रता नाही. प्रत्येकाचा सत्यशोधाचा व ईश्वराकाराचा शोध निराळा आहे. दार्शनिकांमध्ये मतभेद आहेत. भाष्यकारांमध्ये, त्यांच्या समर्थनांमध्ये, ते समजून देण्या-घेण्यामध्येही भेदोपभेद आहेत. त्यामुळे आचरणातही विसंगती आढळते. कृतीउक्तीत विरोध आढळतो. जैन, बसवपूजक लिंगायत, स्मार्त, भागवत, महानुभाव, नाथपंथी,

सगुणोपासक, निर्गुणाची ध्यानधारणा करणारे, अशा अवघ्यांचे, इतके तुकडे तुकडे समाजभर विखुरलेले होते, की त्याला समाज तरी म्हणावे का, अशी अवस्था होती.

यादवराजांच्या काळातील सुबत्तेतही, सल्लागार पंडितांचे श्रेष्ठत्व तेवढे, उच्चासनावर विभूषित केले होते. आपल्या आयुष्याचे श्रेयस-प्रेयस शोधू पाहणारा, भाबडा माणूस, हे फक्त सगळे भांबावल्या डोळ्यांनी पाहात होता. कोणीतरी आपल्या व्यवहारभाषेतून गुरुमंत्र सांगावा, अशी अपेक्षा करीत होता. ही कामगिरी मुकुंदराजांनी पार पाडली. संस्कृतानुसारी वेदोक्ताचा, योगाभ्यासाचा अधिक्षेप करून, श्रीगुरुकृपेने राजयोगाचे सुख प्राप्त होते, अशी आशावादी विचारसरणी मुकुंदराजांनी सांगितली :

न पडे वेदशास्त्राचा पांगू ।
अभ्यासावा न लगे अष्टांगयोगु
जरि पाविजे राजयोगु । श्रीगुरुप्रसादे ॥

एकीकडे काही नवे, लोकोपयोगी करण्याची वृत्ती, तर दुसरीकडे परंपरेची चौकट सांभाळण्याचा खटाटोप, यात आरंभीच्या सगळ्या कवींना गुंतून पडावे लागते. गीतेचे अठरा अध्याय म्हणून 'विवेकसिंधू' व ज्ञानेश्वरीचीही उभारणी तशीच झाली आहे. चौकट जशीच्या तशी उचलली आहे.

ज्ञानेश्वरांनी अधिक खुलेपणाने, हे जनसंवाद सूत्र सांभाळले आहे. संवादप्रिय, उत्सवप्रिय व गोष्टीवेल्हाळ समाजाला आवडेल, असे नाट्यात्मक प्रसंग जाणीवपूर्वक उभे केले आहेत. बोलीभाषेतून सादर केलेले, हे खाजे; सर्वांना आवडेल, अशा रीतीने ज्ञानदेवांनी सादर केले आहे

गृहस्थाश्रमाचे ओझे । कपाळी आधीचि आहे सहजे ।
की तेचि संन्यासे वाढविजे । सरिसे पुढती ॥

अशी, मोक्षप्राप्तीसाठी संन्यास धारण केलाच पाहिजे, असे नाही. अशा भक्तांची ईश्वरही काळजी वाहतो, हे आश्वासनही ज्ञानदेव देतात.

एरव्ही तरी माझिया भक्ता । आणि संसाराची चिंता ।
काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ॥

संसाराच्या अक्षय भासाची आणि अज्ञानजन्य समजुतींचीही ज्ञानेश्वर सोप्या व्यवहारी दृष्टांताद्वारे आकर्षक मांडणी करतात.

हा संसारवृक्षु तैसा । मोडतु मांडतु सहसा
न देखौनि लोकु पिसा । अव्ययो मानी ॥

ज्ञानाची प्रतीती ही अनुभवांवर आधारलेली आहे, ही ज्ञानेश्वरांची ठाम खात्री आहे. ते सत्य जो त्या वाटेने मुळी विचलित न होता चालतो, तोच त्याचा अधिकारी होतो. बाकीच्यांना सांगूनही ते कळणारच नाही.

साचचि बोलाचे नव्हे हे शास्त्र । पैं संसारू जिणते हे शस्त्र ।
आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरे इये ॥

अशा तऱ्हेने, 'अवघाचि संसार सुखाचा करीन' या प्रांजल हेतूने ज्ञानेश्वरांनी, घुणघुण्यासारख्या वाजणाऱ्या घनांमध्ये व रुणझुणत वाहणाऱ्या वाऱ्यामध्ये, भवतारक कृष्णाच्या भेटीची असोशी चित्रित केली आहे. गुजगुजीत सावळ्या रूपाच्या अनुभवाने, वेडे होणाऱ्या मनाची ओढ शब्दबद्ध केली आहे. फुललेल्या मोगऱ्याच्या घमघमाटाने अवघे वातावरण भारून टाकून, पैलाडी कोकणाऱ्या कावळ्याचा शकुन सुस्पष्ट केला आहे.

ज्ञानेश्वरांच्या सोबतीने व त्यांच्यानंतरही, वारकरी पंथाची विजयपताका, सर्वदूर नेण्याची महत्त्वाची कामगिरी पार पाडली ती नामदेवांनी. नामदेवांचे कुटुंब फार मोठे होते. पण सगळ्या कुटुंबालाच विठ्ठलाच्या अभंगभक्तीने बांधून ठेवले होते.

नामदेव हे साध्या सरळ मराठी माणसाचे व मनाचे परिपूर्ण प्रतिनिधी आहेत. 'चमत्कार तेथे नमस्कार' करण्याची त्यांची वृत्ती आहे. संतमेळ्याचे रसपूर्ण गुणगान करणारी चरित्रपर आख्यानेही त्यांनी लिहिली आहेत. प्रल्हाद, श्रियाळ, ध्रुव, सुदामा यांवर आख्यानपर लेखन आहे. बाळक्रीडेचे अभंग व वात्सल्य रस आणि सख्यभक्तीने परिपूर्ण असणाऱ्या गौळणीही वेधक आहेत. तत्कालीन रूढीप्रमाणे द्व्यर्थी तत्त्वज्ञान व लोकशिक्षण देणारे रूपकात्मक अभंगही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

पतितपावन नाव ऐकुनि आलो तुझिया दारा
पतितपावन न होशी म्हणुनि जातो माघारा ॥

असा प्रेमकलह करीत, किंवा—

समर्थाचे बाळ पांघरी वाकळ ।
हासती सकळ । लाज कोणा ॥

असा रोखठोक सवाल विचारीत, अथवा—

थिल्लर ते नेणे सागराचा अंत
मुंगीस अग्नीत रीघ नाही ।
श्वान काय जाणे मेरूचे प्रमाण
कोसळल्या गगन न कळे त्यास ।

असा अधिक्षेपसूचक युक्तिवाद करीत, नामदेव आपल्या भावनेला अभिव्यक्त करतात. **'देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो'** ठेवणाऱ्या नामदेवांनी हिन्दी, व्रज, अवधी, मारवाडी, राजस्थानी व पंजाबी भाषेतही, मराठीची अविटवाणी पोचविली आहे. 'गुरु ग्रंथसाहेब' या शीख धर्मग्रंथात त्यांची एकसष्ट पदे समाविष्ट केली आहेत. प्रसन्न लेखनशैली, प्रासादिकता आणि सगुणपूजेतील आर्जवी भाव; या गुणांनी नामदेव आपला ठसा, भाविकांच्या हृदयावर कोरण्यात यशस्वी झाले आहेत.

ज्ञानदेव व नामदेवांच्यासमवेत महाराष्ट्राभरच्या अनेक संतांनी, अभंगाचा गजर उडवून दिलेला दिसतो. त्यावेळच्या वर्णाश्रमव्यवस्थेला किंवा जातीव्यवस्थेला डावलणे कुणालाच शक्य झाले नाही, तरी त्यातले वैय्यर्थ्य त्यांना पटले होते. गुणांनी आणि अधिकारांनी माणसाला वेगळी प्रतिष्ठा प्राप्त करून दाखविले. तरी त्यांना उच्चवर्णीय संतांइतकी संधी, त्या समाजात मिळाली असेल असा तर्कही करणे धाष्ट्र्याचे ठरावे.

आध्यात्मिक क्षेत्रात जातपात विसरून विठ्ठल गजरात पंढरी दुमदुमून सोडणारे ज्ञानदेव, नामदेव व त्यांच्यावेळचा गोतावळा, या दृष्टीने पाहता येईल. ज्ञानेश्वरांचे वडील बंधू व आध्यात्मिक गुरू श्रीनिवृत्तीनाथ, ज्यांना गहिनीनाथाने कृष्णभक्तीसाठी 'सोय' दाखविली, त्यांचे लेखन मर्यादित आहे, तरी त्यात संतृप्ती व आत्मविश्वास आहे. अद्वैताचा पुरस्कार, योगानुभावाचे आलेखन व कृष्णभक्ती हे त्यांच्या लेखनाचे सूत्र आहे. नामभक्तीचा पुरस्कार करणाऱ्या सोपानदेवांची, विरक्तीही विलक्षण आहे. 'विठ्ठल ब्रह्मांडी एक आहे,' हे ज्ञान ते गर्जून सांगतात. वैराग्याचा उपदेश करत असताना 'मन आधी मुंडी वासनेते खंडी' अशी मौलिक सूचनाही सोपानदेव करतात. मुक्ताबाईबद्दल अनेक कौतुकास्पद आख्यायिका वाङ्मयेतिहासकार देतात. फटकळ वृत्ती व तिखट जिभेच्या मुक्ताबाईचे 'ताटीचे अभंग' रसाळ आणि संयमाचे द्योतक आहेत. 'मुंगी उडाली आकाशी । तिने गिळिले सूर्याशी ।' यासारखी कूटरचनाही, तिच्या मनाच्या विलक्षणतेची ग्वाही देते. स्त्रीभाव, सरळसोटपणा आणि कार्यप्रवृत्त करण्याची हातोटी या घटकांनी, तिचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व, चांगलेच लक्षात राहते.

नामदेवांचे ज्ञानगुरू विसोबा खेचर, हे सराफीचा व्यापारउदीम करणारे होते. योगाभ्यासात ते वाकबगार होते. त्यांच्या ज्ञानमार्गाचा व भक्तिमार्गाचाही लौकिक होता. त्यांचे अभंग मोजके आहेत. फारसे रसपूर्ण नाहीत. बरेचसे, पिंड ब्रह्मांड स्वरूपविवरण करणारे, तात्त्विक आहेत. अंकांची–सांकेतिक आकड्यांचा उपयोग केलेल्या शंकराची स्तुती करणारा एक अभंग, 'मुळु वदनाचा । अंगुळु हाताचा' हा मात्र वैशिष्ट्यपूर्ण आहे.

संतमेळ्यात वयाच्या ज्येष्ठतेमुळे 'काका' या संबोधनाला पात्र असलेले गोरोबा व्यवसायाने कुंभार होते. नामदेवाच्या 'कच्च्या घटा' ची परीक्षा करून, गुरुमंत्र घेण्याचा व विसोबाला गुरू करण्याचा सल्लाही त्यांचाच. सतत संतसहवास अपेक्षिणारा हा संत, उत्कट भक्तिभावनेमुळे परिचित झाला आहे.

हो का दुराचारी विषयी आसक्त
संतकृपे त्वरित उद्धरती ॥

हा वारकरी पंथाचा विश्वास व 'जेवित्याची खूण वाढिताची जाणे' हा अनुभव ठासून पण आर्जवून कथन करून, 'जग हे शहाणे करणे बापा!' असा पोक्त उपदेशही त्यांनी केला आहे.

नामदेवांच्या घरी पडेल ते काम करणारी व त्यांच्याच आश्रयाने वाढणारी जनाबाई स्वतःचा 'दासी जनी' असा उल्लेख करते. स्त्री कवयित्रीमध्ये हिची कविता

काव्यगुणाने श्रेष्ठ अशी आहे. स्वतःच्या व्यथावेदनांना तिच्या अभंगरचनेमध्ये स्थान लाभले आहे. नित्याच्या जगण्यातील चढउतारांना व आपल्या अंतःस्थ भक्तिभावाला तिने एकात्म पद्धतीने चित्रित केले आहे.

माय मेली बाप गेला । आता सांभाळी विठ्ठला ।।

अशी, किंवा—

शूराचे ते शस्त्र कृपणाचे धन । विश्वासिल्या प्राण हाता न ये ।
गजमाथा मोती सर्वांचा तो मान । गेलियाही प्राण हाता न ये ।
सिंहाचे ते नख पतिव्रतेचे स्तन । गेलियाही प्राण हाता न ये ।
विराल्यावाचून देह अहंभाव । जनी म्हणे देव होता न ये ।।

अशी रोखठोक, प्रतीतीची; पण भावसंपन्न रचना तिने केली आहे. बोलीभाषेतले संकेत, शब्द, सामान्यसुलभ प्रसादगुण व स्त्री-श्रमिक, एकाकी, असहाय स्त्रीमनाची स्पंदने हे तिच्या सर्व लेखनाचे अनोखेपण आहे.

स्त्रीस्वभावात उखाळ्यापाखाळ्या काढणे, टोचून बोलणे हा शस्त्रासारखाच तीक्ष्ण भाग असतो. जनाबाईचा विठ्ठलाशी असा झगडाही मोठा हृदयंगम आहे.

अरे अरे विठ्या । मूळ मायेच्या करंट्या ।
तुझे गेले मढे । तुला पाहून काळ रडे ।

असे ती खडसावते किंवा, 'राग येऊन काय करिसी । तुझे बळ आम्हापाशी ।' असा युक्तिवाद करून त्यास निरुत्तर करते किंवा—
ऐसा येळकोट केला । जनी म्हणे विठो मेला ।। असे फर्मान काढणारी जनाईची कविता मोलमजुरी करणाऱ्या स्त्रियांचे मनोज्ञ भावांकन करते.

त्यांवेळच्या शिवोपासक भक्तांप्रमाणे एकान्तिक शिवपूजक असलेल्या नरहरी सोनार या संताची अभंगरचना त्याच्या मानसिक परिवर्तनाचा व व्यवसायाचा परिचय करून देते.

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार
देह बागेसरी जाणे । अंतरात्मा नाम सोने

असे पारंपरिक तत्त्वज्ञान यात अपरिहार्यपणे येतेच; पण मराठी मनाच्या दृश्यविरोधी घटकांची सुसंगत बांधणी करण्याची त्याची प्रवृत्तीही लक्षणीय वाटते.

सावळे सगुण साजिरे निर्गुण । पाहता आनंद पूर्ण मना होय ।
अलक्ष्य अपरंपार न कळे विचार । नरहरी सोनार ध्यात चित्ती ।

याच स्वभावगुणांची पखरण करणाऱ्या सावता माळी या संताचे अभंग त्याच्या आध्यात्मिक प्रवासाची भावकहाणी सादर करतात. सर्वपरिचित असलेला त्याचा

'कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।' अभंग आजही त्यातल्या साधेपणामुळे चटकन अवघ्यांना आवडतो व आठवतोही. नामशक्ती हे किती प्रभावी माध्यम आहे हे त्याच्या अभंगातील आत्मविश्वासावरून कळते.

नामाचिये बळे न भिऊ सर्वथा ।
कळिकाळाच्या माथा सोट करू ।
वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी ।
विठ्ठल गाऊनि नाचो रंगी ।।

असा भक्तिमार्गाचा गौरव आणि मोकळा-ढाकळा पुरस्कार सावता माळयानेच केला आहे.

सावता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा । तेणे मुक्ति द्वारा ओळंगती ।

नामदेवाचे शेजारी परिसा भागवत या संताच्या अभंगाकडे तत्कालीन उच्चवर्णियांची अन्यांकडे पाहण्याची वृत्ती कशी होती याचा नमुना म्हणून पाहता येईल.

अणुमाजी राम रेणुमाजी राम । तृणकाष्टी राम वर्ततसे ।

शेवटी नामदेवांच्या बावनकशी भक्तीने आणि अन्य मोठ्या संतांच्या नामदेव प्रशस्तीने त्याच्या मनोरचनेत फरक पडला.

मागे होत तो अवघेचि विसरलो ।
लोटांगणी आलो नामयासी ।।

अशी ग्वाही त्याने अखेरीस दिली आहे.

ह्या वाङ्मयेतिहासातील कथित "आध्यात्मिक लोकशाहीत" चोखामेळ्याचे व त्याच्या कुटुंबियांचे स्थान महत्त्वाचे आहे. वारकऱ्यांत सर्वश्रुत असलेला-वैष्णव संतपरंपरा सांगणारा 'विठ्ठल विठ्ठल गजरी अवघी दुमदुमली पंढरी' हा अभंग चोखामेळयाचा.

जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ।।
बहु भुकेला जालो । तुमच्या उष्ट्यासाठी आलो ।।

ह्या अभंगातील विपन्न दयनीय अवस्था अंतर्मुख करणारी आहे. वर्णाश्रम व जातीयव्यवस्थेवर प्रकाश टाकणारी आहे. त्याबद्दल "उच्छिष्टासाठी पाटी डोक्यावर घेऊन हिंडणारे वतनदार महार गावोगाव आहेत. त्यातले हे नव्हते ! पाटी कोणती? उच्छिष्ट कोणते? मागणाऱ्या कोणत्या अधिकाराचा व दाते केवढ्या योग्यतेचे ! हा विचार आणूनच हा अभंग लावायला पाहिजे! मनुष्य जे अन्न स्वतः खातो त्यातलाच अवशेष दुसऱ्याला देत असतो." (म. वा. इतिहास-ल. रा. पांगारकर-खंड १ ला-पृष्ठ ४६६) असे कितीही समर्थन केले व अर्थान्वय केले तरी दुःस्थितीचा अन्वयार्थ बदलत नाही, ही वस्तुस्थिती आहे. जेथे न्हावी केस कापत नसे, सावली चालत नसे तेथे, "देव चोखोबाचे

घरी जेवायला आले व त्यांनी त्याच्या बायकोचे बाळंतपण केले," इत्यादी गोष्टी कोणत्याही दृष्टीने पाहिल्या तरी पटत नाही.

जगमित्र नागा, जोगा परमानंद, सच्चिदानंद बाबा, कान्हू पाठक, व चांगदेव यांचेही अभंग आहेत. ह्या कालखंडातील या संतमंडळाचा भक्तिभाव, उदंड उत्साह, वातावरण भारून टाकण्याची आणि रित्या निराधार मनाला आतून मोठा आधार देण्याची क्षमता या अभंगवाणीत निश्चित आहे.

ज्ञानेश्वनंतरचा कालखंड आणि तत्कालीन राजकीय व नैसर्गिक उत्पातांचा प्रभाव एकमेकांमध्ये गुरफटून गेला आहे. कर्मठ वैदिकांना, परंपरापूजकांना आणि भेदोपभेदातच श्रेष्ठत्व सामावले आहे असे वाटणारांना अनेक हादरे बसले. उत्तरेकडून धडकणाऱ्या मुसलमानांच्या आक्रमक, सर्वस्वाही स्वाऱ्यांनी इ. स. १२९४ पासूनच महाराष्ट्रातील राजसत्ता हादरली. अल्लाउद्दिन खिलजी, मलिक कफूर, महंमद तुघ्लक यांनी राज्य बुडून सत्तांतर घडले. बहामनी राजवट सुरू झाली. विजयनगरच्या तुंगभद्रेकाठच्या राजवटीलाही संघर्षाला तोंड द्यावे लागले. तीही मोडकळीला आली. बहामनी राज्यातूनही आदिलशाही, कुतुबशाही, बेरिदशाही, इमादशाही व निजामशाही अशा विविध राजवटी साकारल्या. या काळात संतपरंपरा आणि साहित्य यांना शह बसल्यासारखा झाला. संत भानुदास हे या काळातील एक मोठे नाव. यांच्याच कुळात चक्रपाणी, सूर्यनारायण, एकनाथ महाराज झाले. आपले नैमित्तिक कामकाज सचोटीने व निष्ठेने करावे, भक्तिमार्गाची वाट चालावी व नामस्मरणावर विश्वास ठेवावा हे भानुदासांच्या आचरणाचे व अभंगाचे केंद्र आहे. देव कल्पनेचे त्यांनी केलेले विश्लेषण असे आहे—

दांभिकाचा देव प्रतिमा धातुंची
अज्ञानी जनांची निष्ठा तेथे ।
योगियांचा देव हातापायावीण
भक्तांचा सगुण विटेवरी ।।

दामाजी यांचीही काही अभंगवाणी अशाच आशयाची आढळते.

केशकर्तनाचे काम करणारा सेना सरधोपट मार्गाने जगणारा संतकवी. नामस्मरण आणि कीर्तनभक्तीवर याच्या अभंगवाणीचा पाया उभा आहे.

'आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक' असे आपल्या दैनंदिन कृत्याचे दृष्टान्त देणारा सेना, ह्या अभंगाच्या शेवटी 'चौवर्णा देऊनि हात । सेना राहिला निवांत' असा सर्ववर्णसमावेशकतेचा उल्लेख करतो. अर्थात न्हावी अस्पृश्यांचे केस मात्र कधीच कापत नसत, ही वस्तुस्थिती विसरता नये. कृष्णराधेच्या प्रीतीचे, खोड्यांचे अभंगही वेधक आहेत.

मंगळवेढ्याच्या श्यामा नायकिणीची मुलगी कान्होपात्रा हिचे चरित्र चटका लावणारे आहे. वेश्याव्यवसायही चिरंजीव करणाऱ्या संस्कृतीची दिवाळखोरी आहे. आपल्या सद्यःस्थितीचे निदान ती म्हणून कर्मसंचितावर सोपवते.

संचित माझे खोटे । मज असे ग्वाही ।
तुज बोल नाही । विठूराया ॥

भावभोळा लडिवाळ जिव्हाळा हे कान्होपात्रेच्या अभंगवाणीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले
मजलागी जाहाले तैसे देवा ॥

अशी आर्त विनवणी करणारी व

जीवाचे जिवलगे माझे कृष्णाई कान्हाई
सावळे डोळसे करुणा येऊ दे काही ॥

असा धावा करणारी अगतिक, भयव्याकुळ कान्होपात्रा चटका लावून जाते.

समाजाच्या सरमिसळीची व घुसळणीची ही प्रक्रिया त्यानंतरच्या काळात एकदम मंदावलेली दिसते. स्वयंमन्य पंडितांनी जन्मजात उच्चत्वाच्या आपल्या अत्याग्रहाने संतांनी प्रदीर्घ प्रयत्नाने केलेली ही चिंचोळी पायवाट बुजल्यासारखी झाली.

दत्तसंप्रदायाची या काळात चलती होती. श्रीपाद-वल्लभ, नृसिंह सरस्वती, सरस्वतीगंगाधर वगैरे बड्या बड्या नावांचा व 'गुरुचरित्र' नामक ग्रंथाच्या निर्मितीचा हाच कालखंड. वेदोक्त आचरणाचा आग्रह, स्त्री व स्त्रीधर्म-कर्तव्ये वगैरे विषयीच्या भन्नाट कल्पना, वर्णाभिमान, सकाम धर्म-कारण, ब्राह्मणस्तोम आणि चमत्कारांची रेलचेल असे, या वेळच्या लेखनाचे अजब रसायन आहे.

सव्वा लाख ओव्यांचा 'गीतार्णव' हा महाग्रंथ लिहिणारे दासोदिगंबर ऊर्फ दासोपंत आपल्या मराठीप्रेमाने मात्र लक्षात राहतात. 'भाषाचि केवळ भजती । ते मूर्ख की ना ॥' किंवा—

ययां संस्कृताचा अभिमानु
तेणेचि नाशिला हा जनु ।

असा फटकाही ते लगावतात. 'त्र्यंबकराज' या संत कवीच्या 'बालबोध' ग्रंथातील-

तुम्ही पुरस्कार हे वाणी । तै वाचा होईल ताम्रपर्णी ।
हे मोलातीत पिकेल खाणी । शब्दरत्नाची ॥

किंवा

तुम्ही बोला कृपाविंदे । ते वाचावल्ली पेलील दोंदे ।
रसनाडेखी पदे । पुष्पे येती ॥

पण त्यांच्या ज्ञानेश्वरांच्या पद्धतीच्या, श्रोतृविज्ञप्तीमुळे, हा कवीही लक्षणीय वाटतो.

महालिंगदास, शिवकल्याण, रमावल्लभदास, कृष्णदास मुद्‌गल हे तात्त्विक

विचार मांडणारे पंडिती वृत्तीचे कवी आहेत. त्यातही विष्णुदास नामा आपल्या रसाळतेमुळे ध्यानात राहतो. शृंगाराच्या अंगाने जाणारी त्याची काही गीतरचना लोक-संस्कृतीशी नाते जोडते.

एकनाथांचे कर्तृत्व व साहित्य त्यांच्या सर्वसमावेशक संतप्रवृत्तीवर प्रकाश टाकणारे आहे. एकनाथी भागवत, शुकाष्टक-टीका आणि रुक्मिणीस्वयंवर या ग्रंथातील काही उल्लेख फार बोलके आहेत. 'पितामहपिता भानुदास' किंवा 'वंदू भानुदास वैष्णवाचे कुळीं' हे उल्लेखही त्यांच्या कूळपरंपरेची जाणीव करून देतात.

नाथांचे गृहस्थजीवन 'अपूर्व' होते. भजनकीर्तन, अन्नदान, ज्ञानदान व लेखन-यज्ञ या दृष्टीनेही त्यांचे आयुष्य सफल झाले. ग्रंथरचना त्यांनी विपुल केली आहे. चतुःश्लोकी भागवत (ओ. १०३६), एकनाथी भागवत (ओ. २००००) रुक्मिणी स्वयंवर (ओ. १७११) भावार्थ रामायण (ओ. ४०००० पैकी २५००० ओ.) स्फुट ग्रंथ, आख्याने, कूटे, भारुडे, अभंग चरित्रे, आख्यानकाव्ये, अर्जदास्त, कृष्णलीला व कृष्णचरित्रावरील पदे, हमामा, काला, गोंधळ व जोहार अशा विविध रचनांनी नाथांची वाङ्मयसृष्टी गजबजलेली आहे. त्यांचे व्यक्तिगत वर्तनही असे होते की सर्वांत जास्त आख्यायिका त्यांच्याबाबतीतच आढळतात. त्या काळच्या समाजजीवनाची सर्व अंगे आणि बिंगे-व्यंगेही नाथांनी वेशीवर टांगली आहेत, संवादांची खुमारी, सौंदर्याचा आस्वाद, प्रेमभावनेतील ओढ, मनाचे विपरितत्त्व, उपदेशाचे जनरीतीतील महत्त्व, विद्वत्ता असूनही विनय, अधिकार असून क्षमाशीलता व उच्चवर्णीय ब्राह्मण असूनही माणुसकीचा आदर्श नाथवाणीत व कर्तृत्वात आढळतो. वर्णातीत वर्णाश्रमाचे हे अनोखे उदाहरण होय.

याच काळात शिवकल्याण, रमावल्लभदास, रामाजनार्दन, विठा रेणुकानंदन, मोरया गोसावी, जनी जनार्दन वगैरे अनेक कवी व संत झाले. आपल्या व्यावहारिक रोखठोक ज्ञानाबद्दल गिरणा नदीकाठचे चाळीसगावचे कवी महालिंगदास महत्त्वाचे ठरावेत. तसेच भोग आणि विरक्तीचा प्रत्यक्षानुभव सामान्यजनाप्रमाणे ग्रथित करणारा जुन्नरकर वैद्य, लोलिंबराज जोशी यांचीही कविता लौकिकाश्रयी आहे.

सतराव्या शतकातील दोन नामवंत व विख्यात संतकवींच्या चरित्रांचा व अभंग-ओव्यांचा आबालवृद्धांना परिचय आहेच. इतके हे दोन्ही संत, मराठी बाण्याचे, महाराष्ट्री वाणांचे व जोरकस प्रकटीकरणाचे प्रतिनिधी आहेत.

तुकाराम हा रांगडा पण अस्सल आत्मलेखन करणारा जबरा संत आहे. सामान्याचे सगळे भोगवटे व रंगढंग त्यांच्या वाट्याला आले आहेत. आईवडिलांच्या मायछत्राखाली बालपण गेले. त्या काळच्या रीतीरिवाजाप्रमाणे लग्नही झाले. पण मग प्रियजनांचे मृत्यू झाले. व्यापारउदिमाच्या धंद्यात खूट आली. दुष्काळाने कहर केला. भाऊ परांगदा झाला. पत्नीपुत्राचा वियोग झाला. चारही बाजूंनी आपत्ती-अपमानाचा वर्षाव झाला. उत्तमकुलोत्पन्न म्हणवणारांनी तर अमानुष वर्तनाचा कळस केला. भांबावल्या मनाला विठ्ठलभक्तीत दिलासा सापडला. पण तीही 'सूळावरील पोळी' च होती.

संसाराच्या संगे तापलो मी देवा
करिता या सेवा कुटुंबाची ॥

ह्यातूनच संतांची उत्तरे पाठ करण्याचा व शुद्ध चित्ताने ध्रुपद धरण्याचा परिपाठ केला. यातूनच—

यावरिया जाली कवित्वाची स्फूर्ती
पाय धरिले चित्ती विठोबाचे ॥

अशी अनन्यभक्ती आली. आपल्या अनिवार आसक्त स्वभावाचा खोडेलपणा ज्ञात होताच. म्हणून तर,

नष्टदुष्टपण कवणाचे वाणू
तयाहून अणु अधिक माझे ॥

असे तो स्वाभाविकपणे सांगतो.

मानवी मनाच्या मोहगुंत्यांचा त्यांना अनुभव होताच, म्हणून मनाला 'अंकुश' लावून 'प्रसन्न' केल्यावर, देवाच्या निर्गुणत्वावर आक्रमण न करता त्याला सगुणस्वरूपात बघता येते असा स्वानुभव तुकाराम ग्रथित करतो.

विधायक कार्यासाठी विध्वंसक वाणीचा 'शस्त्रा' सारखा लखलखीत वापर तुकारामाच्या अभंगात आढळतो. वेधक दृष्टांत, लोकजीवनातले भलेबुरे पण प्रांजल शब्द, उपरोध, पोटतिडीक, दंभस्फोटाचा आवेश, चिंतनपर प्रवृत्ती व मनमोकळेपणा या सर्व घटकांमुळे तुकारामाच्या सहजोद्‌गाराला सुभाषितांची अभंग-अक्षय झळाळी लाभली आहे. म्हणूनच तुकारामाची अभंगवाणी स्वतःचे असे सौंदर्यशास्त्र आणि काव्यशास्त्रही निर्माण करून गेली आहे. श्लीलाश्लील औचित्यनौचित्याच्या मर्यादांपेक्षा फार वेगळ्या पातळीवरून ती उड्डाण करते.

रामदासाला भोवतालच्या बदलत्या सर्वांगीण स्थितीचे चांगले भान असल्याचे, त्यांच्या लेखनावरून दिसते. गलितगात्र व हताश झालेल्या समाजात, क्षात्रधर्म जागवला पाहिजे, ही जाणीव; ह्या कवीने फुलवली. बाह्यजीवन कणखर झाल्यावरच आक्रमक बनता येते. त्यासाठी संघटना व लोकसंग्रह अत्यावश्यक आहे हे त्याने ओळखले होते. म्हणूनच—

'संसारी असोन अलिप्त म्हणे । हे तो फटकळ बोलणे'

असा प्रत्यय प्रकट होतो. आपल्या ब्राह्मणवर्गाचीही हा कवी हजेरी घेतो.

कशापासून काय झाले । ब्रह्मांड कोणे निर्मिले।
हे न कळताचि भुंकले । गाढव जैसे ॥

किंवा

विप्र सांडले आचार । क्षेत्री सांडिला विचार
ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासूनि भ्रष्टले ।।

अशा ठिकाणी रामदासांचा रोखठोकपणा प्रकट होतो.

आयुष्यभर रामदासाचे लेखन चालले होते. 'दासबोधा' खेरीजही करुणाष्टके, मनोबोध, सोळा लघुकाव्ये, चौदा ओवीशते, रामायणावरील रचना, आनंदवनभुवन, परचक्रनिरूपण, रामवरदायिनी, डफगाणे, स्तोत्र व गीतरचना असा व्यापक लेखनप्रपंच समर्थांनी केला आहे.

त्यांची शैली लढाऊ आहे, फटकळपणा व ओजोगुण हे तिचे वैशिष्ट्य आहे. वस्तुनिष्ठ प्रपंचविज्ञान, एखादे पालुपद, एखादी पुनरुक्ती, एखादे ठाम सूत्र सहजपणे घोळवीत लोकशिक्षकाची भूमिका समर्थ पार पाडतात. प्रयत्नपूजा, प्रत्येक जीवितोपयोगी घटकाबद्दलची तीव्र जिज्ञासा आणि मराठमोळी दांडगट शब्दकळा या गुणांनी रामदासाची रचना ध्यानात राहते.

काव्यशास्त्र व प्रयोजनांच्या निकषावर प्रचारी, हेतुपूर्ण कविता दुय्यम ठरत असेल तर हेच माप रामदासी कवितेला लावणे अपरिहार्य ठरते. आपल्या काळावर आपल्या कृतीउक्तीचा प्रभावी ठसा उमटवणारा हा संतकवी आहे.

दासपंचायतनातील जयरामस्वामी वडगावकर, रंगनाथस्वामी निगडीकर, केशवस्वामी भागानगरकर, आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर आणि रामीरामदास गंगाधरपंत ऊर्फ श्रेष्ठ यांचे काव्य; तात्त्विक व सत्यशोधनाच्या आत्मानुभूतीचे, चरित्रपर बाजाचे, स्वयंवरकाव्याच्या ठरीव पठडीचे, युक्तिवादस्वरूप व संवादमय स्वरूपाचे आहे. पण ते फारसे लक्षणीय नाही. त्याचप्रमाणे रामदासी संप्रदायातील कल्याणस्वामी, दिनकर गोसावी, गिरिधर, जगज्जीवन-जगन्नाथ यांचीही रचना आहे. वेणाबाई आणि बहिणाबाई या दोन स्त्रियांचे लेखन आणि अभंग मात्र मनाला स्पर्शून जाणारे आहेत. बहिणाबाई ही रामदासी परंपरेची की वारकरी ह्या प्रश्नाचीही आता सौ. शालिनी जावडेकर यांनी उकल केली आहे. अभंगरचना, पदे, आरत्या वगैरेसह जवळ जवळ सातशे तीस अभंगाचा गाथा सिद्ध केला गेला आहे.

'भला म्हणोनिया टाकिला विश्वास । भेटी ही सायास न देसी गा ।।'
'चंदनाचा संग जालिया निंबासी । चंदनत्व त्याशी ठसावले ।।'
'प्रपंच असत्य कळो आला जया । विषय हे तया नावडती ।।'

यासारख्या अनुभवसंपन्न पण कलापूर्ण अभंगांनी बहिणाबाई आठवणीत राहते. प्रेमाबाई या बालविधवेचीही पदरचना अत्यंत आकर्षक आहे. त्यांची

गडे हो कृष्ण गडी आपुला । यमुना डोही बुडाला ।।

हे पद, आणि

गडे हो कृष्ण गडी आपुला । राजा मथुरेचा झाला
देतसे निजपद प्रेमेला । राजा मथुरेचा झाला ॥

हे पद, ही फार रसाळ आहेत.

संत कवींच्या अशा आविष्कारावर जीवनाच्या धकाधकीत ही कविता सामान्याच्या हृदयात मुरली आणि संसारतापांमुळे जिरलीही. पंडितांची सुश्लीष्ट, अलंकारवैभवाने नटलेली विलासवती वाणी आणि शाहिरांची पोवाडा व लावणीची ठसकेबाज दृश्यकरणी, यांनी; रंजन उद्बोधनाची जागा घेतली. संतवाणीतील आत्मानुभूतीचा झुळझुळणारा अंतःस्थ झरा, ह्या खळखळणाऱ्या, शब्दसौंदर्य व नादसौंदर्यनि मुसमुसणाऱ्या रचनेने, झाकोळून ठेवला. प्रत्येक शतकाच्या वाटचालीत प्रत्ययकारी संतांची संख्या कमी कमी होत गेली. त्यांचे महाराष्ट्रातील समस्यांना होणारे आवाहन मर्यादित झाले, पण त्या त्या भागात काही संत किंवा संतप्रवृत्तीचे साधू उदयास आले. वारकरी पंथाच्या दिंड्यापताकांना नवनवीन अभंगांचा व पदांचा पुरवठा खंडित झाला. काही ठिकाणी स्थानिक साधुसंतांचा फार मोठा बोलबाला दिसतो.

साधू कसा असावा? रंजल्यागांजल्याशी त्याने कसे वागावे? हे जरी तुकोरामोक्तीत आलेले असले , तरी लोकांच्या भयगंडाचा, एकलेपणाच्या जाणिवेचा, त्यांच्या अंधःश्रद्धेचा, भावुकपणे चमत्काराची अपेक्षा करण्याच्या वृत्तीचा फायदा उठवणारे पोटभरू इतके वाढले की भगवद्भक्ती, आत्मानंद, अज्ञाताचा वेध घेणारे सच्चे संतही संशयशंकाच्या कोळिष्टकात गुरफटले गेले असतील.

अगदी नजिकच्या काळातही काही संतांच्या अभंगवाणीचा व वर्तनाचा सुगंध दरवळताना दिसतो. गोव्याकडील सोहिरोबानाथ, नायकरस्वामी, व्यंकट, दक्षिणेतील माधवस्वामी, दासानुदास, जैन परंपरेतील 'जिनसागर' यांची-

अठराही न्याती दादा येकठायी जेवतिल
कडू गोड श्रावक दादा मिसळ होईल

अशा तऱ्हेची रचना ध्यानात राहते.

ख्रिस्ती कवी फादर स्टीफन्स, मुसलमान कवी शेख महंमद, अलमखान, गरिब आबदुल याच्या 'रिवायती' उरण, दासगाव, कोकण वगैरे भागात प्रिय आहेत. विदर्भाकडील गुलाबराव महाराज ह्या जन्मांध कवीची मधुराभक्तीप्रधान अभंगवाणी काव्यदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यातही—

रडता रडता गुंजा झाले डोळे । न दिसे सावळे अजुनिय ॥

किंवा,

लवतो ग माझा उजवा लोचन । कोणता विगुण करील नेणो ।
न भेटता आशा, भेटलिया भय । दोहीकडे न ये सुखलेश ॥

ह्या अभंगातील आंधळ्या विरहिणीची सगुण सकामभक्ती गुंतवून ठेवते.

आधुनिक काळात साईबाबा, शेगावचे गजानन महाराज, गाडगेबाबा, मडकेबुवा, तुकडोजी महाराज इत्यादी संतमहंतांचाही जनसामान्यांमध्ये आदरपूर्ण दबदबा आहे.

महानुभावांना पारंपरिक अर्थाने 'संत' म्हटले जात नसले तरी समाजाच्या एकात्मतेसाठी त्यांनी प्रारंभकाळात सोसलेली झीज, स्त्री-शूद्रांच्या उन्नयनासाठी केलेले अथक प्रयत्न, मायमराठीचा मनःपूर्वक केलेला आग्रह, 'सामान्य परिवारू नागवू' नये म्हणून बाळगलेली जागरूक वृत्ती, 'चौवर्णी भिक्षा कीजे' यासारख्या नियमावलीपासून तो 'सकल भूतग्रामा अभयो देयावे' यासारख्या निर्बंधांचा किंवा अपेक्षांचा आणि त्यांच्या वाङ्मयीनही कामगिरीचा विचार केला तर, त्यांनाही 'संत' म्हणणेच योग्य ठरेल असे मला वाटते.

संतसाहित्यपरंपरेचा प्रवास हा प्रदीर्घ आहे. भाषेचे महत्त्व व श्रेष्ठत्व सांगत असताना संस्कृतच्या जोखडाविरुद्ध ते ठामपणे उभे राहिले. पण संस्कृत साहित्याच्या अभिजात वाङ्मयातील सर्व वेचक धन त्यांनी स्थलकाल परिस्थितीप्रमाणे मातृभाषेत संकल्पित केले.

समाजाचा गोष्टीवेल्हाळ बालावबोध स्वभाव, लोकप्रिय कथाकहाण्यांचा, पारंपरिक दृष्टान्तासोबत व्यावहारिक व परिचित उदाहरणांची चपखल पेरणी, 'जन हे शहाणे करणे बापा!' या उदात्त हेतूला, शुद्धाचरण, सोशीकता, अग्निपरीक्षेतून उतरूनही 'विश्व रागे जाले वन्ही । तरी संते सुखे पाणी' ही धारणा संताच्या महात्मतेला शाश्वताचा सोनवर्ख चढवून गेली.

'खावे प्यावे ल्यावे । जमाखर्च तुझ्या नावे ।' अशा विश्वासाला 'आम्हा गांजी जन । तरी का मेला नारायण ।' असा खमक्या सवाल होताच, पाण्याच्या सहजतेने संतांनी सामान्यांच्या घराघरात, आचरणात व ओठाअंतःकरणात प्रवेश केला. 'जीवा तळी अंथरिती अपुला जीव', या त्यांच्या भूमिकेला-

फेडित जगाचे व्यापताप । पोखित तिरिचे पादप ।
समुद्रा जाय आप । गंगेचे जैसे ॥

अशी विनयी विनम्रतेची जोड लाभली.

प्रत्येक समाजात आत्ममग्न अहंकारी व्यक्ती असतातच. अशा लोकांच्या संकुचित विचारसरणीमुळे व त्यांनी आणलेल्या विकल्पामुळे मूळचे शंभर नंबरी सोने अधिक उजळते. ज्ञानेश्वरापासून तो तुकाराम, गाडगेमहाराजापर्यंत सगळ्यांनीच निंदकांना नुसते धैर्यानेच तोंड दिले असे नाही तर त्यांना वाकवलेही. म्हणूनच तर, 'नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता' असा उद्‌गार उमटतो.

शब्दमाध्यम शस्त्रासारखे वापरण्याची किमया संतसाहित्यात विशेषेकरून प्रत्ययास येते. आपल्या घरच्या धनाचा व्यय कसा करावा याचेही या अव्यवहारी संतांना आंतरिक भान होते. 'शब्दे केली जडाजुडी । विठ्ठलापायी घातली बेडी' ही धमकही होती. म्हणूनच

'अभ्यासेनि प्रकट व्हावे । नाही तरी झाकोन असावे ।
प्रकट होवोनि नासावे । हे बरे नव्हे ॥

असे बजावण्याचा अधिकार त्यांना आपोआप प्राप्त होतो हा भक्तीचा द्वीप निराशलेल्या मनाला मार्गदर्शक होता. मोक्षमार्गाचे खाचखळगे दूर सारणारा होता. 'ऊस डोंगा असला तरी रस गोड आहे' ही अनुभूती प्रदान करणारा होता. 'उघडा घात आणि हित निश्चितपणे' दाखवणारा होता. त्यामुळे ह्या अनुभववाणीला संसूचक काव्याचे मर्म अवगत झाले आहे. क्षणभर देवाच्या द्वारी उभा राहणाराला चारी मुक्ती साधण्याचा हा गुरुमंत्र होता.

आम्ही संन्यासी संन्यासी
सदा राहू एकान्तेशी ।

अशा विरोधी वाटणाऱ्या रचनेतला एकात्मभाव म्हणूनच अविट आहे. हे प्रसादाचे ताट समोर आहे. नव्या काळात ह्या जुन्या संतसाहित्यातील आवश्यक तो भाग डोळसपणे उचलून घ्यायला हवा. एवढेच नव्हे तर त्याचा तारतम्याने अन्वयार्थाही लावायला हवा. ज्ञानेश्वरांनी याबाबत एक महामंत्र सांगितला आहे. तो आहे, 'अलौकिका नोहावे'. आणि लौकिकात जगणारांसोबत सगळे चढउतार, संतकवी व त्यांची बहुगुणी, बहुउद्देशी, मनोबोधी, उत्कट कविताही जगली आहे. म्हणूनच ती नुसतीच वाढली नाही, तर फोफावली आहे. सर्व चमत्कार-कथांची वर्णवर्चस्वाने किंवा अतीव प्रेमाने येणारी, समर्थनाची झूल, बाजूला सारूनही या कवितेकडे पाहणे शक्य होते. कारण तुकाराम म्हणतातच आहेत, 'तुका म्हणे झरा । मूळचाच आहे खरा' आणि त्यासाठी सामाजिक परिवर्तनक्रमाची लवचिक पट्टीही पोलादाप्रमाणे धारण करायला हवी. म्हणजे ही कविता खऱ्या अर्थाने मनाच्या बगिच्यात हरळी बनून कायम उरते.

"झरा लागला सुखाचा । तेथे मापारी कईचा ।" हा प्रत्यय आणून देणारे आणि 'आजि सोनियाचा दिनु । अमृताते वर्षे घनु' हे सांगणारे संतसाहित्य केवळ इतिहास राहात नाही तर ते अंजनरूप बनते. सर्व तऱ्हेच्या विषमतेची आणि शोषणाची तलवार म्हणून सामान्याच्या नगण्य आयुष्याला अर्थ प्रदान करते.

संत फार साधेसामान्य जगले वागले म्हणूनच ते असामान्य ठरून गेले, हाच संतसाहित्याचा व संतवाणीचा मोठा संदेश आहे असे म्हणता येईल.

(आकंठ : दिवाळी अंक १९८७)

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविधांगी व्यक्तिमत्त्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व विविधांगी आणि संपन्न असे आहे. वर्णव्यवस्थेच्या जातीव्यवस्थेच्या चटक्यांनी ते पोळून निघाले आहे. ग्रंथप्रामाण्य व ब्राह्मणश्रेष्ठत्व यांच्या फटकाऱ्यांनी ते विव्हळ झाले आहे. ज्ञानाने अग्रणी, विद्येने संपन्न, राजकारणाने सर्वव्यापी, पत्रकारितेने लढवय्ये आणि समाजसुधारणांच्या बाबतीत; मानवी व्यथावेदनांचा विसर न पडू देणाऱ्या, बाबासाहेबांच्या चरित्राचीही अल्प माहिती असणे अत्यावश्यक आहे.

१४ एप्रिल १८९१ रोजी महू येथे रामजी सकपाळांच्या घरात त्यांचा जन्म झाला. जातीय पायावर लष्कराची रचना झाल्याने महारा-चांभारांना पेन्शनीत जाणे भाग पडले. त्यामुळे रामजी सकपाळांनी दोन वर्षे सेवा पुरी करून दापोलीस आले. दापोलीजवळ असलेल्या आंबावडे गावचे म्हणून आंबावडेकर असे त्यांचे आडनाव होते. पण आंबेडकर नावाच्या एका प्रेमळ व मायाळू मास्तरांनी त्यांचे नाव आंबेडकर असे बदलले. लहानपणीचे नाव भिवा. पुढे भिवराव व नंतर ते भीमराव असे झाले. वडील कडक शिस्तीचे. कबीरपंथी. प्रार्थ-पूजा करणारे. मद्य व मांसाहारापासून मुक्त झालेले. अभंग-आर्या म्हणणारे. मुलाच्या वाचन-अभ्यासाची काळजी घेणारे. पोटाला चिमटा काढून पुस्तके विकत घेऊन देणारे. अशा संस्कारांनीच भीमरावांचे मन विद्याप्रेमी व ग्रंथवेडे घडल्यास नवल नाही.

संस्कृतच्या शिक्षकांनी अस्पृश्याला संस्कृत शिकवायला नकार दिला. म्हणून त्यांनी नाईलाजाने व दुःखाने पर्शियन घेतले होते. १९०७ साली भीमराव मॅट्रिक झाले. केळुस्कर मास्तरांनी श्रीमंत सयाजीराव महाराजांकडे कॉलेजशिक्षणासाठी मदत मागितली. गायकवाडांनी प्रश्न विचारून दरमहा रु. २५ ची स्कॉलरशीप दिली. ३ जाने. १९०८ ला ते मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात दाखल झाले.

बी. ए. झाल्यावर ते पुढे शिक्षणाच्या तरतुदीसाठी बडोद्याला आले. त्यावेळच्या प्रघाताप्रमाणे वयाच्या चौदाव्या वर्षी भिकू वलंगकराच्या रामीबाईबरोबर, ती नऊ

वर्षांची, लग्न झाले होते. बडोद्यास असतानाच त्यांचे वडील वारले. सयाजीराव गायकवाडांनी त्यांना अमेरिकेला उच्च शिक्षणास पाठविले. त्यांनी निर्धाराने व जिद्दीने अभ्यास सुरू केला. सोळा-सतरा तास अखंड वाचन. यातच लाला लजपतराय यांच्याशी भेट व स्नेह झाला. १९१७ ला 'भारतातील जाती' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला.

लंडनला त्यांना एम्. एस्सीला सरळ बसण्याची परवानगी मिळाली. काही काळ पत्रव्यवहार तडजोडी करून ते बडोदे सरकारच्या सेवेत आले. तेथे राहायला घर मिळेना. जहांगीर धनजीभाई हॉटेलवाला या पार्शी मित्राकडे राहू लागले. त्यांच्या हाताखालचे अधिकारी-शिपाई त्यांना तुच्छतेने वागवत. एक दिवस लाठ्याकाठ्या घेऊन चिथावलेले पार्शीच जहांगीरच्या घरावर चालून आले. बडोद्याचे राजे गायकवाडही बडोद्यात त्यांची राहण्याची व्यवस्था करू शकले नाहीत.

पुन्हा मुंबईला आले, बाबासाहेबांचे नातलग एक-एक कालवश होत होते. मुंबईच्या सिडनहॅम कॉलेजात प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. दोन वर्षे नोकरी करून पुढील शिक्षणासाठी ते लंडनला रवाना झाले. जेथे तेथे आडव्या येणाऱ्या व ज्ञानाची कदर न करणाऱ्या, जातीव्यवस्थेविरुद्धचा भीमसेनानी यांतूनच घडला. आयुष्यभर ते जात व तिला ढाल पुरवणाऱ्या सनातन अमानुष धर्मधारणाशी कडवा लढा देत राहिले. यामधूनच 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो, अर्थात ते माझ्या हातात नव्हते. परंतु हिंदू म्हणून मरणार नाही' ही दृढ भूमिका आकारास आली.

१९२० नंतर म्हणजे लो. टिळक यांच्या मृत्युनंतर खऱ्या अर्थाने म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या राजकारणात पदार्पण झाले. भूदासांचा व गुलामांचा दर्जा असलेल्या अस्पृश्यांना ज्यांच्या बाबतीत शिवाशिवीचा विटाळही मानला जातो त्यांना, हिंदू समाजाचा अविभाज्य भाग मानणे बाबासाहेबांना अमान्य होते. गांधीजीसोबतच्या संघर्षाला येथेच तोंड लागले. 'दलितांना हिंदू आपले मानतात ते त्यांचे हक्क लाटण्यासाठी व वर्चस्व टिकविण्यासाठी, मुसलमान त्यांचे वेगळे अस्तित्व नाकारतात. कारण त्यांना प्रतिस्पर्धी आल्यामुळे आपले हक्क कमी होतील, हे भय आहे. आणि सरकार त्यांच्यासाठी काहीच न करता, आपले अस्तित्व टिकविण्यासाठी, खोटी प्रतिमा उभी करून घोषणा देण्यासाठी; त्यांचा उपयोग करते. म्हणजेच दलितांना कोणीच मित्र नाही', हे बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले.

त्यांचे हे विश्लेषण गांधीजींना रुतले. त्यांच्या वयाचा, आपल्या महात्मेपदाचा व राजकीय मोठेपणाचा धाक दाखवून, ते बाबासाहेबांना कःपदार्थ मानत होते. पण राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि पुणे कराराने गांधीजींना माघार घेऊन, त्यांचे नेतृत्व मान्य करावे लागले. "ज्या देशात... कुत्र्या-मांजरांना जेवढ्या सवलती मिळतात तेवढ्या सवलतीही आम्हाला गुण्यागोविंदाने मिळत नाहीत; त्या भूमीला 'माझी जन्मभूमी' आणि त्या धर्माला माझा धर्म म्हणण्यास मीच काय, पण ज्याला माणुसकीची जाणीव आहे नि ज्याला स्वाभिमानाची चाड आहे असा कोणताच अस्पृश्य तयार होणार नाही."

गांधीजींनी ८ ऑक्टो. १९३१ ला संतापून आकांडतांडव केले आणि 'लंडन टाइम्स'ने

अग्रलेख लिहून, तेथल्या वास्तव्यात संसदपटू, पत्रकार, विचारवंत व ब्रिटन सम्राटांना इतक्या प्रभावीपणे पटवून दिले की भारतात व भारताबाहेर गांधीजींविरोधी व बाबासाहेबांना अनुकूल वातावरण निर्माण झाले.

यामुळे काँग्रेसपक्ष व गांधीजींचे अनुयायी बिथरले आणि त्यांनी बाबासाहेबांना देशद्रोही ठरवून काही दलित नेत्यांना एम. सी. राजा, पा. ना. राजभोज, पुढे काजरोळकर, जगजीवनराम, वगैरेंना बाबासाहेबांचे विरोधक म्हणून उभे केले. पुणे करारातून निष्पत्ती इतकीच झाली की, स्वतंत्र मतदारसंघाऐवजी, संयुक्त मतदारसंघ स्वीकारला गेला. म्हणजे बहुसंख्य स्पृश्य मान्य करतील, तो काँग्रेसाश्रयी अस्पृश्य उमेदवार निवडला जाण्याची शक्यता निर्माण झाली. डॉ. य. दि. फडके यांनी ह्याला 'स्पृश्यवर्गाच्या सावलीतले झाड' अशी अन्वर्थक व योग्य संज्ञा वापरली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, गांधीजींनी दलितांवर केलेल्या, या महान अन्यायाबद्दल व फसवणुकीबद्दल, "महात्मे आले नि गेले पण अस्पृश्य हे अस्पृश्यच राहिले," अशी तिखट पण सच्ची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. जागृत विचारवंतांची ही वेदना अत्यंत बोलकीही आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही ह्या देशातील शोषितांची अस्मिता आहे. अस्पृश्यांना मानवी व राजकीय हक्क मिळावेत म्हणून त्यांनी अविरत प्रयत्न केले. त्यांच्या पत्रकारितेमागेही हीच प्रेरणा कार्यरत आहे. लोकसंपर्क हीच लोकजागृतीची नाडी आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यांचे गुरू म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला 'दीनबंधू', 'दीनमित्र' ही वृत्तपत्रे साह्यकारी ठरली होती. पण अल्पजीवी ठरली होती. शाहू महाराजांनी दिलेल्या अर्थसाह्यातून 'मूकनायक' हे पहिले पाक्षिक ३१ जाने. १९२० रोजी प्रसिद्ध झाले. त्यानंतर 'बहिष्कृत भारत' ही बाबासाहेब यांची पुढची झेप होती. त्यांच्या तर्कशुद्ध रसरशीत व आर्जवी वाणीने आता मरगळलेली हतबल दलित मने जागृत होत होती. पण वृत्तपत्रांच्या इतिहासात 'मूकनायक'ला स्थान नव्हते.

'अस्पृश्योन्नती म्हणजे समाजक्रांती व ती साध्य करताना धर्मक्रांतीही करावी लागली तरी मी करीन;' असे 'बहिष्कृत हितकारिणी सभेत' ते बोलले होते. मनुस्मृतीदहन आणि 'महाडचा सत्याग्रह' ही त्यांची क्रियाशील झेप होती. हिंदूसमाज व्यवस्थेविरुद्धच्या सामूहिक लाव्हाचा हा खळाळ होता. मंदिरप्रवेश, पर्वती देवालयप्रवेश, नाशिक काळाराम मंदिरप्रवेश; ह्या अनेक चळवळींचे महाडचा संग्राम हे पहिले अमिट अक्षर होते. मानसिक गुलामगिरीविरुद्धचा हा उद्रेक होता. दोन वर्षे चाललेल्या 'बहिष्कृत भारत' मुखपत्राचे काम चोखपणे पार पाडले होते. मुंबई विधीमंडळात बाबासाहेबांचा प्रवेश झाला होता. शेतमजूर, स्त्रिया, असंघटित कामगार, अस्पृश्य, कामगार-मालक कलह, औद्योगिक वादंग, लोकसंख्या वाढ, पोलिसी मनोवृत्ती व अत्याचार इत्यादि गोष्टी बाबासाहेबांच्या विचारांचे व वक्तव्यांचे मुख्य लक्ष्य असे.

सर्वांगीण वैचारिक प्रबोधनाला आवाहन करणारे व्यक्तित्व असेच बाबासाहेबांचे वर्णन करावे लागेल. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हे त्यांचे जीवनाचे संदेश सूत्र

होते. त्यासाठी त्यांनी रात्रशाळा, शिक्षण वर्ग, शाळा व महाविद्यालये काढली. सिद्धार्थ आणि मिलिंद महाविद्यालये, ह्या त्यांच्याच वास्तुप्रतिमा होत. व्यक्तिगत सुखदुःखांकडे व लाभालोभाकडे न बघता त्यांची वैचारिक लढाई सतत चाललेली होती. येवले येथील १३ ऑक्टो. १९३५ च्या धर्मपरिषदेत त्यांनी (१) हिंदू देवदेवतांची पूजा न करणे, (२) हिंदूंचे सण साजरे न करणे, (३) हिंदू धर्ममंदिरात प्रवेश न करणे, असा तिसरा ठराव त्रिकलमी करून धर्मांतराची घोषणा केली होती. ३१ मे १९३६ ला अखिल मुंबई इलाखा महार परिषदेत लोकांच्या अनेकानेक प्रतिक्रियांवर येवल्याचीच घोषणा पुनरुक्त करीत म्हटले होते, "माणूस धर्माकरता नाही तर धर्म माणसाकरता आहे. माणुसकी प्राप्त करून घ्यायची असेल तर धर्मांतर करा!"

देव, धर्म, शास्त्रे, शास्त्री, नेते, त्यांची मनोवृत्ती व काँग्रेस याबाबत डॉ. आंबेडकर अनुभवाने उद्विग्न, उदास बनले होते. धर्मांतरच योग्य हाच त्यांना त्यावर उपाय वाटत होता, तोच त्यांनी नागपूरच्या धर्मचक्रपरिवर्तनाने प्रत्यक्षात आणला.

धर्मांतराचा निश्चय केल्यानंतर त्यांनी आपल्या ज्ञातिबांधवांचे व देशाचेच नव्हे तर पूर्वधर्मीय हिंदूबांधवांचेही हित लक्षात घेतले. समानता, शांतता, सहजीवन, सहिष्णुता व बौद्धिक तार्किकता यांना प्रमुख स्थान देणाऱ्या गौतम बुद्धाच्या बौद्ध धम्माचा त्यांनी स्वीकार केला. तो कर्मकांड मार्ग नसून आचरणमार्ग (धम्म) आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

जगातल्या कोणत्याही बॅरिस्टराने एवढी प्रदीर्घ नोटीस देऊन कृती केली नव्हती. येवले येथील १९३५ ला केलेली जाहीर घोषणा नागपूर मुक्कामी १४ ऑक्टो. १९५६ ला प्रत्यक्षात आणली. देशाच्या स्वातंत्र्याचे दशक भरत असताना आणि प्रजासत्ताक स्वतःच सिद्ध केलेल्या अद्वितीय 'घटने'नुसार राज्ययंत्रणा पाचसहा वर्षे कार्यप्रवण असताना हे करण्याची त्यांना पाळी आली हाच येथल्या लोकशाहीचा महान पराजय होता. इथल्या सनातन्यांचा व गतानुगतिक स्वार्थी चतुराचा अंतिम विजय होता. ज्याने हिंदू धर्म सोडण्याचे निश्चित केले होते त्याने दिलेली 'हिंदू कोड बिलासाठी'ची लढत अवर्णनीय होती. पंडित नेहरू व सरदार पटेल यांना २५ एप्रिल १९४८ चे लखनौमधील भाषण खटकलेच होते. ज्यात ते म्हणाले होते "यदि दलित वर्ग संगठित हो जाए तो नेहरू पटेल जैसी सरकार बना सकते है।" हिंदू कोड बिलातील स्त्री, तिचे वारसाचे हक्क, पोटगी, घटस्फोट, उत्तराधिकार वगैरेबद्दलचे विचार राजेंद्रप्रसादांनाही झोंबले. समस्त कट्टर हिंदूंच्या पुरुषप्रधान मनाची ती चीड होती. नेहरू काही करू शकले नाही व डॉ. बाबासाहेबांना १९५१ साली कायदेमंत्रीपदाचे त्यागपत्र द्यावे लागले. काँग्रेसच्या ह्या नकारात्मक पद्धतीने बाबासाहेब दुखावले होतेच; पण देवासारखे उभे राहणारे नेहरू भित्रेपणाने पलायनवादी झाले. याची बोच अधिक होती. त्यातच १९५२ व १९५४ च्या निवडणुकीत त्यांना पराभूत करण्यात काँग्रेसच्या व सरकारातील उच्चपदस्थानी अधिक रस घेतल्याने त्यांना 'बुद्धधर्म स्वीकार' हाच एक पर्याय उरला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनाचा व्याप मोठा आहे. विचार भारतातील

सामान्यांच्या प्रगतीचे स्वप्न डोळ्यांपुढे ठेवून केलेले असले तरी सर्वसमावेशक व प्रखर आहेत. त्यांचा 'ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार व आर्थिक गुंतवणूक' हा एम. ए. चा प्रबंध, 'जातिसंस्थेचा इतिहास' हे गांधीजींना दिलेले तिखट उत्तर किंवा बुद्ध धर्म व त्याच्या संबंधात लिहिलेली तीनचार पुस्तके या सगळ्यात त्यांच्या प्रचंड वाचनाची, विद्वत्तेची व व्यासंगाची कल्पना येते.

'रानडे, गांधी आणि जीना' यांचे बाबासाहेबांनी केलेले विश्लेषण, पाकिस्तान आणि फाळणीविषयक विचार, भाषावार राज्यरचना, हिंदू स्त्रीचे उन्नयन आणि अवमूल्यन, शूद्र पूर्वी कोण होते?', 'काँग्रेस आणि गांधींनी दलितांसाठी केले तरी काय?', 'रसेलच्या समाजपुनर्निर्माण विचारांबद्दल', 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' इत्यादी त्यांच्या ग्रंथांतून त्यांच्या ज्ञानार्जनाचा पल्ला किती विशाल होता आणि ते किती मूलभूत पद्धतीने विचारगाभ्याला स्पर्श करीत याचे प्रत्यंतर येते.

ज्ञान हा मानवी जीवनाचा पाया आहे अशी त्यांची धारणा होती. दारिद्र्याच्या उदात्तीकरणाला त्यांचा विरोध होता. संत-महंतांना खाऊन त्यांचे खत करणारी ही माती 'मजेशीर' आहे, याचे त्यांना भान होते. म्हणून दलितोद्धार हे त्यांनी आपले जीवितकार्य ठरवले. बहुसंख्य दलितेतर सवर्ण व दलित यांच्या बाबतीतला त्यांचा उच्चवर्णियांचा अनुभव चांगला नव्हता. मूळ प्रश्न पाणी घालून पातळ करणे व घोळत-चिघळत ठेवणे त्यांना मान्य नव्हते.

त्यांचे आदर्श भगवान गौतम बुद्ध, म. कबीर व म. फुले यांच्या कृतीउक्तींचा व वचनांचा त्यांनी वस्तुनिष्ठ अन्वयार्थ लावला होता. इथली मोठी, ज्ञानी, गुणी माणसेही मातीमोल ठरत असल्याचा क्लेशदायक अनुभव त्यांनीच त्यांच्या सामाजिक, राजकीय, वैचारिक, धार्मिक व सांस्कृतिक लढ्यात घेतला होता.

इंग्रजांचे शासन अनुभवताना चर्चिललाही त्यांनी ठणकवायला कमी केले नाही. स्वकियांच्या नाकर्तेपणामुळे म. गांधी, नेहरू, पटेल, राजेंद्रप्रसाद यांनाही ते विसरू शकले नाहीत. ह्या विराट देशात आचारविचारभिन्नता, अवतारी पुरुषांची किंवा तारकजन्माची वाट पाहण्याची इथली प्रवृत्ती, अनंत अंधश्रद्धा, आभाळभर अज्ञान, गाडाभर अहंगंड व ढीगभर न्यूनगंड, परंपरेचा पगडा, भाषिक अत्याग्रह, नागरिक गुणविकासाला न मिळणारी समान संधी, आपल्या हक्काबद्दलची अनास्था, मर्यादित संधी व सर्वस्वाही सवर्ण नोकरशाही, यांनी शोषला जाणार सामान्य माणूस, इथल्या प्रजातंत्रात खऱ्या अर्थाने स्वतंत्र; प्रज्ञाशील व गतीमान कसा बनणार? याच प्रश्नब्रह्माशी ते आयुष्यभर लढा देत राहिले.

डॉ. बाबासाहेबांच्या परिनिर्वाणाला ही तीन दशके होऊन गेली. त्यांची जन्मशताब्दीही तीन वर्षांवर येऊन ठेपली आहे. रक्त काढून घेतलेले इथले 'लोकराज्य' न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहिष्णुता यांची पद्धतशीर गठडी वळून लोकांनाच लोकराज्यातून उणे करील की काय असे वाटते.

(दृष्टिवेध : एप्रिल-मे १९८८)

४. म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक तौलनिक अभ्यास

कुठल्याही दोन स्वयंप्रज्ञ व्यक्तींची खऱ्या अर्थाने तुलना करण्यात काही औचित्य नसते. त्यांच्या कार्यामध्ये दिसणारे साम्य, त्यांनी निर्माण केलेली विचारशक्ती, त्यांनी उभ्या केलेल्या संस्था-संघटना, त्यांची कार्ये व मर्यादा आणि ह्या व्यक्तींना लाभलेला अनुयायी वर्ग, एकसारखा वाटत असला तरी तो भिन्नही असतो. त्या दोन व्यक्ती त्यांच्या काळाच्या संदर्भातच महात्मतेला पोचलेल्या असतात. किंवा काळाच्या तुलनेनेच कालातीतही सिद्ध होतात.

म. जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तींचेही कार्य भिन्न भिन्न काळात आकारले आहे. पण त्यांच्यामध्ये आढळणारी वैचारिक सुसूत्रता व प्रतिकूल-अनुकूल एकात्मता विलक्षण आहे. त्यामुळे त्यांचा तुलनात्मक अभ्यास सर्व सामाजिक कार्याच्या गतिप्रगतीचा आढावा असतो. भारतीय समाजजीवनातील धार्मिक चढउतारांचा तो आलेख असतो. त्यांच्या राजकीय आशाआकांक्षांचा तो मानदंड असतो. त्यांच्या कृतिशील पुरुषत्वाचा तो पुरावा असतो. आणि सबंध समाजाच्याच सांस्कृतिक शोधांची ती नांदी ठरू शकते.

म. फुले हे अव्वल इंग्रजांच्या काळातले सुधारक होते. इंग्रजी राज्य आल्यामुळे येथल्या विशिष्ट वर्णांची व वर्गियांची संकुचित स्वार्थी सत्ता संपुष्टात येणार, माणसांचे नष्टचर्य संपणार, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे लोकहितवादींप्रमाणेच ते इंग्रजी सत्तेचे स्वागतकर्ते झाले. समाजाची पुनर्रचना होण्याचा आता शुभारंभ होईल, असे त्यांना वाटले. पण कोणत्याही सत्ताधाऱ्यांप्रमाणे त्या देशातील सबळांचा, बुद्धिमंतांचा व त्यांच्या गुणावगुणांचा, कल पाहून बदलण्याचा किंवा धोरणे आखण्याचाच प्रघात येथे इंग्रजांनीही स्वीकारला होता. 'प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे' असे फुले यांचे मत होते. 'कनिष्ठ वर्गातील शिक्षकच नेमावेत' असा त्यांचा आग्रह होता. हंटर कमिशनला सूचना करताना, साक्ष देताना याची नोंद सापडते. परंतु इंग्रजांना शिक्षणाचा प्रसार वरिष्ठ थरात करायचा होता. पाश्चात्य विद्यांचा व त्यांच्या

संस्कृतीचा 'डोस' त्यांना दिला, की त्यांचे काम होणार होते. मा. स्टु. एलफिन्स्टनच्या उद्‌गारात याची ग्वाही पटते. कारण 'अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षण देऊन तयार केले तर त्यांना सरकारी कारभारात पदाधिकारी म्हणून नेमावे लागेल. त्यामुळे हिंदू लोक चिडून जातील. यामुळे सरकारला राज्यकारभार करणे अशक्य होईल. ह्या धोरणामुळे, म. फुले यांच्या शिफारसींचा, प्रत्यक्षात उपयोग झालाच नव्हता.

तत्कालीन सामाजिक स्थितीचा प्रत्यक्षानुभव म. फुले यांनी घेतला होता. पित्यापासून पोरवय पुरते न संपलेल्या बायकोस घेऊन, त्यांना वेगळे निघावे लागले होते. मित्राच्या लग्नात अपमान व मारझोड सहन करावी लागली. पुढे तर अनेकांशी धर्मविषयात मतभेद निर्माण झाल्याने, कर्मठ पुणेकर विरुद्ध फुले पतिपत्नी असे दृश्य कायम झाले. मारेकरीही घातले गेले आणि त्यांच्यातून ते निभावलेही. पण ईश्वराचे अस्तित्व फुल्यांनी कधीही नाकारले नाही. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे यांच्या प्रामाण्याला, त्यांनी कित्येक प्रश्न विचारले. त्यातील स्वीकृत सिद्धांतांना ठणकावून आव्हान दिले. पण 'निर्मिक' त्यांनी मान्य केला. सर्वसमावेशक 'सार्वजनिक सत्यधर्म' त्यांनी प्रतिपादन केला. कारण कोण्याही मध्यस्थाशिवाय परमेश्वर भेटायला हरकत नाही असे त्यांचे प्रांजल मत होते.

'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्थी ।।' असे ते नमूद करतात. धर्मसंशोधन व रूढ विचारांचे परिष्करण आणि नवा अन्वयार्थ लावण्याचे धारिष्ट्य, ह्यातच फुले यांचे द्रष्टेपण सामावलेले आहे. छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा, यातील शिवाजीचे राज्य व पेशव्यांचे राज्य, या भिन्न गोष्टी आहेत. रामदास हे लोकप्रीतीसाठी त्यांनी गुरू मानले होते. प्रत्यक्षात नाहीच; पोटासाठी सर्व सोंगे आणून पूजाअर्चा करणाऱ्या, 'ब्राह्मणाचे कसब' त्यांनी वेशीवर लटकावले, 'शेतकऱ्याचा आसूड' फटकारला, 'गुलामगिरी' परखडपणे वर्णिली, 'अखंड' व 'सत्सार' मधून जो 'इशारा' त्यांनी दिला; त्यात त्यांच्या व्यापक दृष्टीचा व कणखर व्यक्तिमत्त्वाचा गाभा प्रकट झाला आहे.

'स्त्री' व तिची स्थिती, हा फुले यांच्या चिंतनाचा, चळवळींचा व कृतीचा महत्त्वाचा विषय आहे. स्त्रीशिक्षण, बालविवाह, पुनर्विवाह, विधवाश्रम, बालकाश्रम, बालाजरठविवाह, बहुपत्निकत्व, पुत्रजन्माची कुलोद्धारक अभिलाषा, या त्यांच्या कार्याच्या महत्त्वाच्या दिशा म्हणाव्या लागतील.

शूद्रातिशूद्रांच्या मुलींसाठी शाळा सुरू करणारा पहिला भारतीय, असे म. फुले यांचे वर्णन करावे लागेल. स्त्रीशिक्षण, हा भारताच्या अवनतीवरला तोडगा मानणारा विचारवंत आणि त्यांच्या हक्कांबद्दल व स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल, आवेगपूर्ण कृती करणारा महापुरुष, असे त्यांना संबोधावे लागेल. शेतकरी कामगार व दलित-ब्राह्मणेतर यांच्या दुःखावर, दारिद्र्यावर व त्याला कारण होणाऱ्या स्थितींवर आणि बांडगुळांवर आघात करणारा पहिला सर्जक कुशल माळी, असे त्यांचे सार्थ वर्णन करावे लागेल.

हा देश जनसामान्यांचा. त्यांच्यात मूलगामी बदल झाल्यास व ते संस्कृतिसबल

झाल्यासच, ह्या देशाला मूल्य प्राप्त होणार, अशी त्यांची धारणा होती. वयाच्या वीस-एकविसाव्या वर्षी त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. आणि चाळीस वर्षे या एकाच ध्येयाने ते एकाकी लढत राहिले. त्या त्या काळातील तथाकथित ज्ञान्यांशी व विचारवंतांशी निडरपणे झुंजत राहिले.

'महार-मांग-चांभार हे या देशात फार असून ते अगदी नीचावस्थेत आहेत. हे पाहून ईश्वराच्या प्रेरणेने माझ्या मनात अशी प्रेरणा उत्पन्न झाली की अशांना सुशिक्षित करण्याविषयी काहीतरी उपाय योजावा.' मेजर कँडीच्या अध्यक्षतेखाली झालेल्या, सत्कारभाषणात त्यांचे मनोगत सुस्पष्टपणे सांगितले आहे.

मनुष्य हा केंद्रबिंदू मानून, त्याच्या व्यवसायात मानवधर्म असतो, असा कर्मवादाचा नवा अन्वयार्थ महात्मा फुले यांनी प्रसृत केला होता. विवाहसंस्था, तिचे महत्त्व व माहात्म्य आणि तिची वैगुण्ये, यावर त्यांनी प्रदीर्घ चिंतन केलेले होते. मानवाविषयी आस्था ठेवणारे त्यांच्या पद्धतीचे एक अनोखे आस्तिक, असे त्यांना म्हणावे लागेल. धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक व लेखनविषयक, अशा सर्व सांस्कृतिक चळवळींशी, फुल्यांचा अतूट असा संबंध होता. आपापल्या मतांचा प्रसार करण्यासाठी-जनसंवादासाठी, नियतकालिकाचे महत्त्व, त्यांनाही पटले होते. 'सत्सार'च्या अंकातही, याचे प्रत्यंतर येते.

इ. स. १८४८ ते १८९० या कालखंडातच नव्हे, तर पुढे येणाऱ्या अवघ्या भविष्यालाच जागृत करण्याचे, गतिमान करण्याचे, महत्कार्य त्यांनी केले. त्या काळातील दीनदुबळ्या जनसामान्यांचा प्रातिनिधिक आवाज म्हणजे फुल्यांचे आयुष्य. सुजाण मनुष्य भोवतालाची गरज समजावून घेऊन, मगच आपले कार्यक्षेत्र निवडतो. म. फुले यांनी निवडलेले क्षेत्र नुसते फुललेच नाही; तर महाराष्ट्राच्या परंपरावादी, कर्मठ व प्रतिगामी मातीत पेरण्यासाठी त्यांनीच नव्या विचारांचे चांगले बियाणे उपलब्ध करून दिले.

विवेकवादाचे व चिकित्सक वास्तवाचे जे नवे युग, पुढे निर्माण झालेले आढळते; त्याला कारण ठरलेल्या विचारवंतांच्या नामावलीत म. फुले आणि त्यांचे व्यापक कर्तृत्व, केवळ अलौकिक आणि अजोड आहे. असेच कृतज्ञतापूर्वक नोंदण्याखेरीज कुणालाच पुढे सरकणे शक्य होणार नाही.

म. फुले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैचारिक गुरू मानले होते. रावबहादूर बोले यांच्याही कार्यापासून त्यांनी प्रेरणा घेतली होती. त्यामुळे म. फुले यांच्या चळवळीचे रहस्य आंबेडकरांनी ओळखले होते. समतेच्या चळवळीला तत्त्वांपेक्षा प्रत्यक्ष कृतीचा व तिच्या फलनिष्पत्तीचा आधार असावा, हा त्यांचा आग्रह होता. म्हणूनच स्वतः अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राज्यशास्त्राचे व्यासंगी असूनही त्यांनी, कार्ल मार्क्सच्या विचारांना, भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात नाकारले होते. समतेच्या चळवळीला अग्रक्रम देताना तिला कालोचित स्वरूप त्यांनी दिले. शोषण करणाऱ्या, वर्ग, वर्ण, व्यवस्था व साम्राज्यसत्ता, ह्यांविषयी ते कडवे होते.

ज्ञान हा मानवी जीवनाचा पाया आहे, पण त्याचे परिष्करण करून घेतले पाहिजे,

अशी त्यांची धारणा होती. पण ज्ञानाबद्दलची पारंपरिक समजूत व पारंपरिकांनी सांगितलेले ज्ञान, त्यांना अनुपयुक्त वाटे. म्हणून धर्मतत्त्ववेष्टित नीतीतत्त्वांना त्यांचा विरोध होता. फुले आणि बाबासाहेब यांबाबत समआग्रही आहेत. दारिद्र्याचे उदात्तीकरण करणे व त्याला पावित्र्याची गोंडस गुलाली पुटे चढवणे, त्यांनी निग्रहाने व सातत्याने नाकारले. आपला समाज शिकल्याशिवाय तो उठून उभाच राहणार नाही, अशी त्यांची विचारसरणी होती. म. फुले यांच्याप्रमाणे त्यांनी कामगार-शेतकरी, पीडित असा तळागाळाचा वगैरे अकारण व्यापकतेचा डोलारा उभा केला नाही. कारण संत-महंतांना खाणारी ही भूमी आहे. दैवतीकरणाच्या नादाने निष्क्रियतेला जन्म देण्याची तिची प्रवृत्ती आहे, हे त्यांना त्यांच्या अभ्यासातून कळले होते. त्यामुळे ज्यांच्यावर निश्चित-पद्धतशीर अन्याय झाला आहे, त्या दलितांच्या बाजूने ते उभे राहिले. तेली-तांबोळीही शोषकांच्या प्रसादासाठी अन्याय करणारांच्याच बाजूने उभे राहतात. म्हणून दलितोद्धार हे जीवितकार्य त्यांनी निश्चित ठरवले होते. तेल्या-तांबोळ्यांच्या पुढारीपणापेक्षा 'दलितांचे बाबा' बनणे, त्यांना अगत्याचे वाटले. कारण त्यांचा अनुभव बहुसंख्य दलितेतर सवर्णांच्या बाबतीत फारसा चांगला नव्हताच. अनुभवातून-जळणेपणातून जे त्यांना मनोमन कळले होते; तेवढेच, ईप्सित त्यांनी निश्चित केले होते. तत्त्वांचा वा मानवतेचा, मूळ प्रश्न 'पचक' करणारा पायघोळ झगा, त्यामुळेच त्यांनी झुगारला. 'महात्म्यां'चे भूतकालीन अपयश म. फुले यांच्या बाबतीत, तर समकालीन म. गांधींच्या बाबतीत त्यांनी अनुभवले होते. त्यातूनच त्यांनी दलित समाजाला 'शिका, संघटित व्हा व चळवळी करा' असा कृतीमंत्र दिला.

वर्गवर्णरचना हे आदर्श गृहीतक धरून पुरुषसूक्ताचे पठण करणे व ते मानव्याला स्पर्श करणारे आहे, असे सांगणे, ही राजकीय हातचलाखी बाबासाहेबांना वाटे. मानवता दडपणारी व इतरांना गुलाम ठेवण्यासाठीच शस्त्र, शास्त्र, ऋचा, स्मृती, मंत्र व कर्मकांडांचे पालन करणारी हिंदू संस्कृती, ही खऱ्या अर्थाने सुसंस्कृतीच नव्हे, हेच त्यांनी सप्रमाण स्पष्ट केले आहे. वर्ण केव्हातरी गुणांवर अधिष्ठित असेलही, पण जाती ह्या धर्मावर अधिष्ठित आहेत. यांची साखळी तोडल्याखेरीज, ह्या देशाला 'राष्ट्र' संज्ञा प्राप्त होणे नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. 'जातिप्रेम हाच लोकशाहीवर, मूले कुठार ठरल्याखेरीज राहणार नाही', या त्यांच्या उक्तीचा प्रत्यय सध्या आपण अनुभवतोच आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तथाकथित आदर्शांची मोडतोड स्वाभाविक मानली. ब्रह्म, आत्मा, मायावाद, विश्वोत्पत्ती, ईश्वरी अस्तित्व ह्या गोष्टींचा याच दृष्टीने त्यांनी विचार केला. 'हिंदू समाज हे विषमतेचे माहेरघर आहे,' हा निष्कर्ष यामुळेच त्यांनी निश्चितपणे काढला. त्याची पुनर्रचना करण्याचा खटाटोप, हा जळक्या भाकरीतून पीठ काढून मांडे बनवण्याचा अट्टाहास ठरेल, अशी त्यांची खात्री पटली. यातूनच, 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही', ही प्रतिज्ञा साकारली.

स्त्रीविषयक बाबासाहेबांचे विचार उदात्त आणि मननीय आहेत. दलित स्त्री ही

हिंदुस्थानातील कारुण्याची व मूक सोशिकपणाची कमाल मर्यादा आहे, असे ते म्हणत असत. आपल्या पतीला श्रम करायला प्रवृत्त करा. त्याच्या व्यसनीपणावर अंकुश ठेवा. संततीच्या शिक्षणसवयीवर जागता पहारा ठेवा, असा त्यांचा संदेश आहे.

ज्या पददलित वर्गाच्या उन्नतीसाठी, त्यांनी आपले आयुष्य खर्चिलेच त्यांच्या मानसिक मशागतीचीही काळजी बाबासाहेबांनी घेतली. 'शूद्र पूर्वी कोण होते?' या त्यांच्या ग्रंथामध्ये त्यांनी इतिहासाच्या अनेक अर्धज्ञात दालनांना नवा अर्थ व झळाळी दिली. 'भारतातील जातीसंस्था, व्युत्पत्ती आणि यंत्रणा' या ग्रंथातही त्यांची प्रतिभा दिसून येते. कायद्याने जातीव्यवस्था संपली, पण प्रत्यक्षात काय? खेड्यापाड्यात, समाजाच्या प्रत्येक थरात, नोकरी, बढती, शिक्षणक्षेत्रात, जितका आत्यंतिक द्वेष करता येईल व ज्यांनी हजारो वर्षे शोषण केले, तेच सगळे शत्रू बनून, रक्त काढून घेतलेल्या लोकशाहीची, न्याय-समतेची, पद्धतशीर गठडी वळत आहेत. वर्गयुद्धाशिवाय किंवा आत्यंतिक रक्तपाताशिवाय सवर्ण मनातला हा विखार निघणेच अशक्य दिसते. आत्यंतिक आत्मविरोधी विधाने करण्यात कोणीही मागे नाही. 'जो हात कुत्र्याच्या स्पर्शाने विटाळत नाही तो हात आंबेडकरांसारख्या शुचिर्भूत विद्वानाच्या स्पर्शाने विटाळतो असे म्हणणारे बुद्धिभ्रंश झालेले होत,' असे सांगणारे सावरकर, 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर,' अशी भूमिका घेतात. हा इथल्या बुद्धिवादाचा व तार्किकतेचा दारुण पराभव आहे!

येथल्या दलित वर्गाच्या हक्कांसाठी आंबेडकरांनी अनेक लढे दिले. मंदिरप्रवेश, न्याय्य मागण्या, समान हक्क, राखीव जागा, उन्नतीचे बहुविध मार्ग, त्यांनी हाताळले. पण हा येथल्या बरड भूमीत शक्तीचा नाशच ठरल्याचा त्यांना अनुभव आला. रानडेयुग हे ज्ञानसंपन्न आणि तमोनाशक होते; तर गांधीयुग अर्धनग्नतेचे, दिखाव्याचे आणि तात्त्विक हेराफेरीचे आहे, असे त्यांनी सूचित केले ते यामुळेच.

परंतु लोकशाही समाजरजनेवर त्यांचा प्रगाढ विश्वास होता. उदार मतवादी दृष्टिकोण, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांनी ब्राह्मणांचा द्वेष केला नाही. ब्राह्मण्याचा द्वेष केला. फुल्यांमध्ये आणि बाबासाहेबांमध्ये हा फरक आढळतो. इतर अनेकांच्या सहकार्याला ते स्वागतशील होते. चवदार तळ्याच्या पाण्याच्या सत्याग्रहाच्या वेळेस, बाबासाहेबांनी आपल्या शंकेखोर कार्यकर्त्यांना दिलेले उत्तर, त्याचेच द्योतक आहे. सर्वांच्या सहकार्यानेच इथल्या अस्पृश्यतेला हादरे देणे शक्य आहे ह्या भावनेनेच ते वागले. धर्मांतर करतानाही भारतीय मनाच्या जडणीघडणीचा व देशहिताचा विचार त्यांनी मोलाचा मानला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे सामाजिक संतुलन व सामंजस्य कायम टिकले. भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व सांगतानाही, त्यांनी स्थानिक मनोवृत्तीचे विकसनशास्त्र व सामूहिक विकाससूत्रच महत्त्वाचे मानले होते.

मनुष्यनिर्मित अस्पृश्यतेच्या विरोधात फुले आणि आंबेडकर, माणसांसारखे ठाम उभे राहिले हेच त्यांचे महामानवत्व आहे. सोयी-सवडीप्रमाणे किंवा अन्य काही करायला, सरकारने अटकाव केला म्हणून, अस्पृश्येतवर काम करणाऱ्या वृत्तीचा, त्यामुळे त्यांना वारा लागला नाही.

महात्मा जोतीराव गोविंदराव फुले आणि डॉ. भीमराव रामजी ऊर्फ बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्या तुलनात्मक अभ्यासाचे आणखी एक सूत्र असे सांगता येईल की; 'माणूस आणि ध्येयप्रवणता (Man and Mission) त्यांनी ओळखली होती. पचवली होती.

परकीय जोखडाखाली असलेल्या देशाचे स्वातंत्र्य बाबासाहेबांनी पाहिले आणि त्याचे अपयशही अनुभवले. विशाल भूप्रदेश, नाना धर्मांचे लोक, सरंजामशाही समाजव्यवस्थेची सवय, अंधश्रद्धांचा पगडा, परंपराप्रियता, भाषिक आग्रह-दुराग्रह, विभाजित मानसिकता, समाजधारणेच्या पोषणाला कमी पडणारी अंगे, नागरिक गुणांच्या शिक्षणाची कमतरता, धंदा निवडण्याबाबतची मर्यादित संधी, लग्नबंधनांची भक्कम चौकट आणि हक्कांबद्दलची अनास्था आणि काही नसण्याचाच वृथा अभिमान, इत्यादि असंख्य घटकांनी, शतकानुशतके ग्रासलेल्या इथल्या मातीत, मातीमोल ठरलेल्यांना, 'माणूसमोल' ठरवण्याचा लढा, हा विलक्षण होता.

माणुसकीचा व मानवी मूल्य खऱ्या अर्थाने प्रस्थापित करणारांचा, अत्याधुनिक आणि वस्तुनिष्ठ इतिहास जर लिहिला गेला, तर म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ह्या दोन मर्दांची नावे ठळकपणाने नमूद करावीच लागतील यात शंका नाही.

(समाजसुधारक : विशेषांक १९८६)

५. धर्मसंकल्पना आणि भारतीय मन

धर्म ही मानवी आयुष्यातील अत्यावश्यक अशी गोष्ट आहे. जरी 'धर्म ही लोकांना गुंगवून ठेवणारी अफूची गोळी आहे,' अशीही विचारसरणी असली तरी धर्मप्रभावाने कार्यप्रवृत्त झालेला मनुष्यप्राणी धर्मशरण प्रवृत्तीचाच अवलंब करतो ही वस्तुस्थिती आहे. आतापर्यंतच्या इतिहासाची साक्ष काढली तर याच गोष्टीचा प्रत्यय येतो.

मानवाच्या सामाजिक आयुष्यप्रवासात एकेका मूल्याची प्राप्ती, त्याने बरीच किंमत मोजून केली आहे. मनुष्यवस्ती होण्यासाठी अन्न, पाणी, निवारा, वस्त्र यांची नितांत गरज असते. म्हणून तर कोणत्याही संस्कृतीची वाढ, नदीकाठाने पाण्याच्या आश्रयानेच झालेली दिसते. मिसर संस्कृती नाईल नदीकाठी बहरली. तैग्रिस आणि युफ्राटिस नदींच्या खोऱ्यात बॅबिलोनियन संस्कृतीची वाढ झाली. भारतात सिंधू नदीकाठावर तर चीनमध्ये यांगासक्यांग व हो हँग हो यांच्या तीरांवर तेथली संस्कृती पूर्णत्वास गेलेली दिसते.

ह्यातूनच जलदेवता, जलकन्या, आसरा, वरुणदेव, मेघराजा, समुद्रदेव ह्या संकेतांना रूप मिळत गेले. त्यांच्या ऋचा, प्रार्थना, सूक्ते, चमत्कार कथा यांची त्यामुळेच निर्मिती होत.

आरंभी सांगितलेल्या अन्नवस्त्रादी मानवी गरजा भागू लागल्या, की त्याला व्यक्तिगत कर्तव्याचे समाधान मिळते. त्याचे निसर्गदत्त एकटेपण भरून येते. स्वतःचे कार्य पार पाडीत असतानाच समाजासाठीही भोवतीच्या अन्य घटकांसाठीही, काही तरी केले पाहिजे, असे त्याला वाटू लागते. व्यक्तीची कर्तव्ये व हक्क यांचे सूत्र ठरत जाते. सर्व गोष्टींची पूर्तता होऊनही जाणवणारी पोकळी भरण्याचे विधायक मानसिक पर्याय शोधले जातात. धर्माचा उद्‌गम अशाच वेळी होतो. त्याचे फलित ठरते. त्याच्या प्रकटीकरणाचे माध्यम निश्चित होते. पूजाअर्चा, ध्यानधारणा, कर्मकांडांचे स्वरूप ठरत जाते. पण त्याच्या मर्यादारेषा धूसर असल्याने, योग्य कर्म व कर्मकांडांचे स्तोम ठरवणे अवघड होते. धर्माचे आचरणातील रूप मलिन बनते. ज्याच्या मनाला जे येईल तेच धर्मवर्तन असे

होत जाते. धर्म बघता बघता अफूची गोळी बनतो तो असा.

मानवी जीवन हा न संपणारा सुखाचा शोध असतो. काही सुखे शरीरास सुखावणारी असतात. खाणेपिणे, नाचणेगाणे, पोशाख सजणे. साहित्य, कला यांचा आस्वाद आणि त्या सगळयांना मिळणाऱ्या स्थैर्याची व विश्वासाची जोड यातून सुख आकारास येते. सुसंस्कृत जीवन हे सामाजिक जीवनामधूनच निर्माण होत असते. आपले प्रत्यक्षातले अस्तित्व ही आपली संस्कृती असते; तर आपण ज्या ज्या साधनातून आपली सुधारणा घडवतो त्यांचा वापर हे आपले आविष्काराचे सामर्थ्य असते. ह्या सगळ्यातच सुख संभवते. अर्थात सुख केवळ शरीराचाच गुणधर्म नसतो तर तो मनाचाही विषय असतो. धर्म ही मनाला सुखविणारी अशीच एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. जगाच्या महत्त्वाच्या धर्मसंज्ञांचा इतिहास पडताळून पाहिल्यास हे स्पष्ट होते.

इ. स. पूर्वी ५००० वर्षे इजिप्शियन धर्माचे अस्तित्व होते. त्यांची दैवते निसर्गप्रेरणेतून निर्माण केलेली होती. त्यांचे वैशिष्ट्य असे की मानवांच्या वृत्तीप्रवृत्तीत व दैवांच्या स्वभावधर्मात साम्य आढळते. ते माणसाप्रमाणे चुका करणारे, पश्चात्ताप करणारे होते. ह्या स्खलनशील प्रवृत्तीचा पगडा इजिप्शियन धर्मात दिसतो. नाईल नदीकाठावर वाढलेल्या या धर्माच्या अनेक कथा जगभर प्रसृत झालेल्या आहेत.

ॲसिरियन धर्म, बॅबिलोनियन धर्म हा इ. स. पूर्वी २२०० वर्षे अस्तित्वात होता. ह्या धर्मात अनेक देवदेवतांची व त्यांच्या पूजाविधीचा गर्दीगोंधळ आढळतो. सामान्य देवतांची व क्षुद्र देवतांची येथे एकच गर्दी दिसते. शकुन, अपशकुन, जादूटोणा, भविष्य यांच्या प्रभावाखाली हा धर्म पूर्णतः आलेला आढळतो. तैग्रिस आणि युफ्राटिस ह्या नद्यांच्या पट्ट्यामध्ये गाजलेल्या या धर्माचे इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे.

अनेक ईश्वरांचे अस्तित्व स्वीकारणारा, कित्येक अंशावतारांची कल्पना राबवणारा, रामायण-महाभारतासारखे कितीतरी आर्षग्रंथ असलेला ग्रीक धर्म हा धर्म होता. ह्यालाच रोमन धर्म असे नाव आहे. ट्युटॉनिक धर्म ही संज्ञाही याच धर्माला दिली जाते. स्कँडिनेव्हिक धर्म हे नावसुद्धा याच धर्माला दिले जाते. ग्रीक धर्म आणि संस्कृती हिंदू धर्माप्रमाणेच प्रसिद्ध आहे.

जपानमध्ये एक धर्म अस्तित्वात होता. त्याचे निर्माते अज्ञात आहेत. निसर्गाची प्रतीके व पंचमहाभूते ह्या धर्मातही देवदेवता म्हणून येतात. चंद्र, सूर्य, वारा, पाऊस, भूकंप, वादळ, समुद्र, महापूर यांच्याविषयीची भीतीची भावना व त्यांची स्तुती-प्रार्थनागीते यांचा पगडा ह्या धर्मात आढळतो. देवतांची संख्या जवळ जवळ आठ लक्ष इतकी असली तरी सूर्य ही प्रमुख देवता मानण्याकडे कल आढळतो.

हिंदू धर्म हा देखील पुराणकाळापासून चालत आलेला व अजून आपली पाळेमुळे खोल रोवून टिकून राहिलेला धर्म आहे. अनेक देवतांचे अस्तित्व व पूजा या धर्मात आहेत. ईश्वर एक मानण्याकडे रोख असला तरी अवतार अनेक मानले गेले आहेत. सर्व समावेशकता हे त्याचे एक महत्त्वाचे लक्षण आहे.

या पुराणधर्मांशिवाय महामानव झरतुष्ट्र, जेरेमिया, सिद्धार्थ गौतम, महावीर, येशू

ख्रिस्त आणि महमंद पैगंबर या धर्मवेत्त्यांनी अनुक्रमे पारशी, हिब्रू, बौद्ध, जैन, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांची प्रतिष्ठापना केली.

प्रत्येक धर्म हा मानवकल्याणाच्या उदात्त व व्यापक हेतूने जन्माला आलेला आहे. पण मानवाच्या अस्तित्वाला उभारी देणारा अंतःस्थ अहंकार, या ठिकाणी कार्यरत झालेला दिसतो. तुझ्यापेक्षा माझी विचारप्रणाली श्रेष्ठ, हे सिद्ध करण्यातच जीवनसाफल्य शोधण्याची प्रवृत्ती येथे आडवी येते.

धर्माचे प्रवर्तक धर्म विशद करून निघून गेलेले असतात. आणि अनुयायांना कळला, पटला, जमला, आचरला गेला तोच आणि तेवढाच तो, तो धर्म उरतो. ह्यामुळे जगभरच 'धर्म' हा शब्द शांती, समृद्धी व मानवकल्याण यांचा उद्घोष करणारी, महत्त्वाची गोष्ट; हे जसे मान्य केले जाते, त्याप्रमाणे धर्म म्हणजे अतिरेक स्फोटक व कर्मकांडात गुरफटलेली विलक्षण शक्ती, ही भीतीही मनातून डोकावत राहते.

माणसांच्या गुणदोषांचे, स्वभावधर्माचे नियमन व संचालन करण्यासाठी धर्म आपलासा होतो. पण त्यातील अनेक नाजुक बाबींचा नीट उलगडा, शतकानुशतके आणि पिढ्यानुपिढ्या न झाल्यामुळे, धर्माच्या नावानेच माणसे पेटून उठलेली दिसतात. एकमेकांना गिळण्यासाठी, टिपण्यासाठी आणि संपवण्यासाठी धर्मयुद्धाला प्रवृत्त होतात. हीच खरी शोकांतिका आहे. मूलतत्त्वे व बौद्धिक विचारसरणी राहते एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला बेताल झालेली, तोल सुटलेली माणसे, एकमेकांच्या विनाशाचा विडा उचलून, अटीतटीने परस्परांना भिडताना दिसतात. भारतीय कर्मकांडवादी मनही या गोष्टीला मुळीच अपवाद नाही.

धर्माच्या अंतरंगाचे दर्शन त्यातल्या तत्त्वाद्वारे घडते. बहिरंग तो पाळणारांच्या कृतीउक्तीतून अनुभवता येते. संस्कृती आणि वर्तन यातील विसंगती येथेच प्रत्ययाला येते. त्यामुळेच तर असे म्हटले जाते; "Our culture is what we are, our Civilization is what we use." जुन्या काळी ग्रीक साम्राज्यात नगरराज्यांना व नगरांना Polis (शहर) असे म्हणत, तर लॅटिन साम्राज्यात Civilas (नगर) असे म्हणत. यावरूनच Politics आणि Civilization हे शब्द, आमच्या परिचयाचे झाले आहेत.

धर्म ही प्रथम दर्जाची संस्था असते. म्हणून धर्माचरण करणारा, धर्मबंधने स्वीकारणारा व धर्मानुशासनाप्रमाणे वागणारा तो माणूस अशीही एक 'माणूस' शब्दाची व्याख्या केली जाते. पण मुळातच, माणूस अनेक गुणदोषांचा धनी असणारा व्रात्य प्राणी आहे. चांगल्या वाईटांच्या संकरातून तो घडतो. त्यांचा समूह किंवा समाजही अशा संमिश्रणातून घडत असतो. अतिशय शुद्ध आणि उदात्त हेतूने आरंभ झालेल्या गोष्टी, त्यामुळे विघातक किंवा भयावह बनलेल्या दिसतात. धर्मही यास अपवाद नाही.

कोणताही धर्म कालांतराने बदलत जातो. त्याचा गाभा तोच असतो. पण अन्वयार्थ आपले केंद्र बदलून अन्यत्र सरकतो. धर्म असा गढूळ झाला की, त्यात कर्मकांडांचे विचित्र स्तोम माजू लागते आणि सोंगाढोंगांची त्यात सतत भर पडत जाते. कोण्याही अल्पाधिकारी व्यक्तीने काहीही, मनाला येईल ते करावे, आणि हाच धर्म; अशी हाकाटी

करावी, असा प्रकार फोफावू लागतो. सामान्य जनांचा गोंधळ त्यामुळेच विशेष वाढतो.

धर्मातील बाह्यविधींचे व त्यांच्या तंत्रांचे प्राबल्य इतके वाढते, की मूळ काय होते याचा विचार करणेही तेथे पाखंडीपणाचे ठरावे. प्रत्येक विधी, घटना, त्यातील सूक्ष्मता याला असलेला गर्भितार्थ बदलतो आणि अवास्तव, अनावश्यक गोष्टींना, अतिशय महत्त्व मिळून धर्म अधिकच बदनाम होतो.

उदाहरणादाखल आपल्या समाजातील पूजाविधीबद्दल विचार करू या. आर्य हे उत्तरेकडील थंड प्रदेशाकडून भारतात आले. त्यांच्या हवामान वातावरणात, सूर्यदेवाचा अंश असणारी अग्नीदेवतेची उपासना, यज्ञाच्या विधीद्वारे प्रकट झाली. देवतांना बळी म्हणून रक्ताची आवश्यकता, कारण शरीरात थंड प्रदेशात उष्णता टिकवण्यासाठी मांसमद्यादी घटक अपरिहार्यच. अश्वमेध, वृषभमेध, अजमेध, कुक्कुटमेध, असे हे रक्ताचे व प्राण्यांचे आकार कमी होत गेले. वाढत्या व्यापात आणि पसाऱ्यात 'विधीं'ना प्रतीकात्मक अर्थ तेवढा उरणे हे देखील सुसंगतच वाटते. पुढे नारळ, लिंबू वगैरेंवर हा विधी बदलत गेला. त्यामुळे आधीच्या अतिभव्य, सर्वदर्शी घटकांपेक्षा, सूक्ष्म तरल पूजा व दैवत प्रतिष्ठापित होणे स्वाभाविकच ठरते. त्यामुळेच मोठाले विधी, मोठ्या प्रमाणात होमहवनांची व साधनांची उधळपट्टी हास्यास्पद व टीकास्पद ठरते.

भारतीय मन हे मानवी स्वभावधर्मानुसार दोलायमान अवस्थेचा अनुभव घेणारे मन आहे. संतांची आणि थोरामोठ्यांची शिकवणही, याच गोष्टींची जाणीव ठेवून केलेली आढळते. निर्गुण निराकार परमेश्वराचे गुणगान करताना त्याच्या सगुण रूपाचा रंग त्यामुळेच ते विसरत नाहीत. 'सगुण म्हणू की निर्गुण रे?' असा प्रश्न विचारीतच कुटुंबवत्सल, सुखदुःखांचा अनुभव घेणाऱ्या अशा देवतेचे माहात्म्य आवर्जून वर्णन करण्याची प्रवृत्ती दिसते.

कोणीतरी जगाचे संचालन करणारी एक अज्ञात सर्वशक्तिमान शक्ती असते. त्याला परमेश्वर, दैव, नियती, नशीब, कर्म, अशा संज्ञा देण्यात भारतीय मनाला, काही चूक वाटत नाही. विज्ञानाची व अत्याधुनिक प्रगत साधनांची कास धरणारे उच्च विद्याविभूषित डॉक्टर-तंत्रज्ञ-शास्त्रज्ञही; ह्या अज्ञात शक्तीचे अस्तित्व गृहीत धरताना आढळतात. याचे कारण भारतीय मनाची जडणघडणच तशी आहे असे म्हणता येईल.

दया, क्षमा, शांती हे गुण, चार आश्रम, धर्म, अर्थ काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ, यांच्या पाठीमागेही समाजघटकांची गरजच महत्त्वाची मानलेली आहे. आपल्या धर्मातील हिंदू धर्मातील दशावतारांच्या कल्पनेत मानवी उत्क्रांतीची संकल्पनाच कशी अनुस्यूत आहे हे पाहण्यासारखे आहे. सृष्टीचक्राची किंवा विश्वोत्पत्तीची कल्पना, या अवतार कल्पनेशी जुळतीमिळती आहे.

प्रथम सृष्टीत पृथ्वीवर उथळ महासागर निर्माण झाले आणि त्यात मत्स्यावतार. पहिला उत्क्रांत जीव. फक्त जलांमध्ये वावरणारा. त्यानंतर पाण्यात आणि जमिनीवर वावरणारा 'कासव' कच्छावतार. ह्या अवतारात भ्रमंतीला एक आणखी मिती प्राप्त झाली आहे. कच्छानंतर वराह. घनदाट अरण्यात वावरणारा. टकरा

देणारा, मुसंडी मारणारा, सुळयांचा उपयोग करणारा. दलदल, माती चिखलात व जंगलात भ्रमंती करणारा. सिंहासारखा शूर पण नराप्रमाणे भावभावना जोपासणारा. शत्रूला-भक्ष्याला फाडून खाणारा, कच्चे मांस व रक्त यांचा आस्वाद घेणारा, वन्यपुरुषांप्रमाणे वागणारा अधिक बदललेला असा समाजपुरुषच, या अवतारांच्याद्वारे गृहीत धरला आहे.

ह्या पहिल्या चार अवस्थांनंतर बऱ्याच काळाने, 'वामन' अवतार येतो. वामन म्हणजे ठेंगू, बुटका, छोटा अप्रगत माणूस. पण शरीरातील आकारात माणसाच्या पराक्रमाचे गणित बसत नाही. तेथे कार्य करते, माणसाची प्रखर इच्छाशक्ती आणि जिद्द. वामनावतारातले कार्य त्याचेच प्रत्यंतर म्हणून, स्वीकारण्याची श्रद्धाशील मनाची तयारी असते. परशुराम हा, बुद्धी व शक्ती यांचे एकात्म रूप आहे. 'अग्रतः चतुरो वेदः पृष्ठतः सशरं धनुः' असे त्याचे वर्णन केले जाते. जिभेवर चारही वेदांचे मंगलकारक मंत्र खेळत आहेत व पाठीला बाणांनी गच्च भरलेला भाता व धनुष्य लटकते आहे; अशा अवतारातील परशुराम, त्यामुळेच शीघ्रकोपी, संतापी व एककल्ली आहे. शापाने किंवा बाणाने अनिष्ट उच्छेदाची क्षमता, हेच त्याचे वैशिष्ट्य आहे. 'शापादपि शरादपि' या सूत्रामागचे मर्म हेच आहे. जीभ नुसती बोलणारी नव्हे, तर बोलेन ते आणि तसेच घडवणारी. व हात नुसते हूल देणारे नव्हेत, तर शासनाची क्षमता असणारे समर्थ असे. बुटक्या अप्रगत मानवाची ही प्रगती विशेषच आहे.

राम हा समाजाच्या आदर्शाची प्रतिकृती मानला जातो. प्रत्येकाने निष्ठेने वागणे, प्रजाहितार्थ जपणे, प्रेमाने प्रेम देणाऱ्यांच्या प्रेमाची कदर करणे, पत्नीवर जिवापाड प्रेम करणे आणि सत्यासाठी काहीही दिव्य करायला न कचरणे; अशा अनेक मूल्यांची मानवी प्रतिकृती म्हणजे राम, ही एक आदर्शभूत व्यवस्थाच. पण आदर्शाच्या शोधातच आयुष्याच्या तडजोडी असतात. अडचणी असतात. आदर्श तत्त्वांनी आयुष्य चालत नाही, हे त्याच्या गरजांप्रमाणे आणि तत्कालिक योग्यायोग्य संदर्भाप्रमाणे बदलत राहते हेच सत्य, कृष्णावतार सूचित करतो. पुरुषत्वाचा, रसिकत्वाचा, कलाकाराचा जनसामान्यात, पशुपक्ष्यांत, श्रेष्ठकनिष्ठात एकरूप होणारा, मानवांना प्रिय वाटणारा कृष्णावतार, त्यामुळेच महत्त्वाचा आहे. श्रीरामाच्या वेळचे आदर्श, हे कुटुंबसंस्थेचा व कुटुंबप्रमुखाचे आदेश शिरोधार्थ मानण्याचे होते, तर कृष्णाने कथन केलेली गीता, केलेले पराक्रम, शृंगार व लीला हे समूहाच्या व्यापक कल्याणाचे होते. कल्कीचा उधळणारा घोडा आणि बुद्धाचे आश्वासक शांतिस्मित; ही मानवी प्रगतीची पराकाष्ठेची अवस्था होय. उत्क्रांतीच्या प्रक्रियेची अवतारकल्पना ही प्रतिकृतीच होय.

ह्या अवतारांमध्ये मासा, कासव, वराह हे प्राणी पशू यांपासून, तो गर्दीत वावरणाऱ्या रामकृष्णापर्यंत किंवा ज्ञानप्राप्तीसाठी एकांत चिंतनात निमग्न होणाऱ्या बुद्धापर्यंत, सर्व अवस्थांचे उदात्तीकरण केले आहे. जगन्नियंत्यानेच निर्माण केलेल्या समग्र घटकांबद्दल रागलोभ न वाटता, समत्वभावनेने समजून घेण्याची ही प्रक्रिया आहे. ह्या विविधतेमध्ये एकात्मता व एकात्मदर्शनात वैविध्य याचे हे प्रतिकांकन आहे.

याच ठिकाणी आदर्शाचे पुढे विकृतिकरण घडत गेले. 'चातुर्वर्ण्य', त्यातून

जाती-पोटजातीची निर्मिती समाजाच्या आरंभकाळात तोल राखण्यास कारणीभूत ठरलीही असेल. तेव्हाची परिस्थिती, संदर्भ, घडामोडी, नैसर्गिक व अनैसर्गिक उत्पात, याचा खराखुरा इतिहास लुप्त झाला आहे. उरला, उरवला आहे तो सोयीचा, स्वमतप्रदर्शन करणाऱ्या, स्वार्थाधिष्ठित मतमतांतरांचा, विषमतेला, शोषणाला खतपाणी घालणारा, ग्रंथनिविष्ट इतिहास.

माणूस माणसाला भेटताना परमेश्वराची भेट झाली म्हणून कृतार्थ होणे, हा देखील धर्माचा आदेश आणि 'कर्मभ्रष्ट ब्राह्मण श्रेष्ठच' हा देखील धर्माचाच आदेश. वैषम्याची वार्ता नसलेल्याला माथा मुकुट करण्याची भाषाही धर्माचीच आणि ज्याने त्याने आहे तेथेच, आपापल्या पायरीनेच वागावे; ही देखील धर्माचीच आज्ञा. अशा गोंधळात धर्म म्हणजे काय? तो कशासाठी निर्माण केला गेला? त्याचे स्थान कसे व कितपत महत्त्वाचे? याचा गोंधळ आरंभापासून कधीही संपलाच नाही. तो निस्तरण्याचा, समजून घेऊन इतरांना समजून पटवून देण्याचा प्रयत्न झालाच नाही. पटल्यासारखे वाटूनही तो अंमलात आला नाही. त्यामुळे समग्र समाजाची हानी होते आहे. अशा हेकट व छाकट्या भंपकांना शिक्षा करून, वळण लावण्याचा प्रांजळ प्रयत्न झालाच नाही. त्यामुळेच असे म्हटले जाते, की, "हिंदूधर्मनि इतकी वर्षे टिकाव धरून देखील, त्यात व्हावी तशी प्रगती झाली नाही."

भारतीय मन त्यामुळे चटकन अस्थिर होते, भडकते. धर्माच्या टणत्काराने त्याची कानशिले तापू लागतात. रक्त उसळू लागते. सहजीवनाचे सर्वसमावेशकतेचे तत्त्व हळूहळू दुबळे होत जाते. माणसातले पशुत्व डोके वर काढते.

सर्व धर्मांच्या तत्त्वांचा गर्दीत जयजयकार करणारा येथला माणूस, मनातून भ्यालेला आहे. इतरांना आत्मसात करण्याची क्षमता कमी झाल्यामुळे इतरांचे येणे, त्याला आक्रमण वाटू लागले असावे. नवीनाबद्दल भय व भयाचा नाश असे हे चक्र आहे.

समाजपुरुषाला निरोगी आरोग्य लाभायचे असेल तर, धर्माचे वर्म नीट उमगून घेतले पाहिजे. जसे मानवी जीवनात चढउतार असतात, तसेच त्याच्या संस्कृतीत वैभवकारणे आणि ऱ्हासमुळे लपलेली असतात. धर्म ही मानवी मनाची मोठी सांस्कृतिक भूक आहे. त्या भुकेने स्वाहाकारी आगलोळाचे स्वरूप धारण करून, आत्मनाशास कारणीभूत होऊ नये, यासाठी जागृत राहण्याची गरज आहे. स्वतःकडे परकेपणाने पाहायला हवे आहे.

परंपरेतील हिणकस, कालबाह्य भाग गळून पडला की, परंपरेला नवीनतेचे रूप येते. धर्माचे आचरण हा समूहात्मक जीवनाचा मूलमंत्र ठरावयाचा असल्यास त्यातील अग्राह्यतेचा निचरा, ज्याने त्याने सुजाणपणेच केला पाहिजे. चेतनासोबत अचेतनाचे वास्तव्य असते. तसेच धर्मासोबत अधर्माची सावली असते. केस आणि नखे ह्या वाढणाऱ्या पण अचेतन गोष्टी, जशा कापून माणूस जगतो तसेच क्षुद्रशुल्लक गोष्टी दूर करायला हव्यात.

आजच्या काळात खऱ्या धर्माची ओळख पटवून घेण्याची कधी नव्हे एवढी गरज भारतीय माणसाला व मनाला आहे. काळाची पावले ओळखली पाहिजेत. पडघमचे

पडसाद समजून घेतले पाहिजेत. मग अफूचा अंमल जाईल आणि धर्म ही अंतर्मनाची प्रेरणा बनेल.

(कामगार : दिवाळी अंक १९८६)

६. धर्मनिरपेक्षता : काही विचार

माणूस हा प्राणीच आहे. आहार, निद्रा, भय आणि मैथुन, ह्या सगळ्या प्राण्यात आढळणाऱ्या व असणाऱ्या गोष्टी, त्याच्या आयुष्यालाही अत्यावश्यक असतात. पण माणसाला भाषेद्वारे व्यवहार करण्याचा बौद्धिक वारसा आणि अमूर्ताची व सूक्ष्माची साधना करण्याचे सांस्कृतिक धन लाभले आहे. त्याच्या अन्य सर्व निर्मितीत 'धर्म' ही महत्त्वाची उपलब्धी आहे.

भारताला फार मोठा धार्मिक व सांस्कृतिक असा वारसा लाभलेला आहे. किंबहुना आशियाच्या भूमीतच जगातल्या नामवंत धर्मवेत्त्यांनी जन्म घेतला. हे इतिहास-भूगोलाच्या आधारे सहज स्पष्ट करता येते. पण जेवढे मोठे घर किंवा संपत्ती तितकेच अंतर्गत कलह व विभाजन, हे देखील ध्यानात ठेवले पाहिजे.

देशाचे नाव भारतवर्ष, सिंधुस्थान, हिंदुस्थान हे खरे आहे. पण ह्या नावाने प्रदीर्घ वाटचाल करणाऱ्या या देशात, जे बहुसंख्य राज्यकर्ते आले, ते बाहेरचे. हजारो वर्षांच्या परंपरेला तितकीच वर्षे, अन्य राज्यकर्त्यांनीच ह्या भूमीचा लाभ घेतला, पतित्व भूषविले ही देखील वस्तुस्थिती आहे.

इस्लामधर्मीय राज्यकर्त्यांनी या देशाचे स्वामित्व भोगले. शिल्प, कला, संस्कृती, वैभव व समृद्धीची चढती आणि उतरती लाट, त्यांनी ह्या मातीवर आणली.

तसे राजपूत, शीख, जाट, मराठे आणि अन्य अनेक लोक, देशप्रेमाने सतत संघर्ष करीत राहिले. स्वतःला देशप्रेमी म्हणवत, एक दुसऱ्याला शह-काटशह तरी देत राहिले, किंवा एक दुसऱ्याशी सहकार्य न करता, एकेकटे आपली शक्ती अजमावीत राहिले. मुसलमानांची आणि हिंदूंची राज्ये व संस्थाने खालसा झाली. इंग्रज राज्यकर्त्यांनी सगळ्यांची स्थिती नगण्य करून सोडली.

इंग्रजांनी फोडा-झोडा नीतीचा अवलंब केला. दीडशे वर्षे राज्य केले. मनमानी लूट केली. अनेक मार्गांनी भरपूर शोषण केले. काही मूल्येही नव्याने येथे आणली. अगदी कठीण झाल्यावर व देश व्यवस्थित पोखरून, धर्मसंघर्षांची बीजे पूर्ण

पेरून झाल्यावर, ब्रिटिशांनी काढता पायही घेतला.

देशाला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. पण धार्मिक तीव्रतेवरच विभाजन झाले होते. त्यामुळे येथल्या बुद्धिमंतांचा आनंद निर्मळ नव्हता. जातीय दंगली उसळल्या, लोकांची अदलाबदल झाली. भाषावार प्रांतरचना, प्रगतीचे नाव सांगतच अस्तित्वात आली. इंग्रजांविरुद्ध लढलेल्या आणि चेतावलेल्या सगळ्या आंधळ्या शक्ती, एकमेकांविरुद्ध प्राणपणाने लढू लागल्या. म. गांधींचा बळी घेऊनही ही ज्वाला शमलीच नाही.

हिंदू, मुस्लिम ह्या दोन धर्मांच्या जोडीला ख्रिस्ती धर्म व सूत्रेही ह्या देशात आपला वर्चस्व गाजवू लागली. हिंदूधर्म हा समन्वयवादी, सर्वसमावेशक असा तत्त्वश्रेष्ठ धर्म आहे, तर इस्लाम हा व्यवहारवादी धर्म आहे. ख्रिस्ती धर्म हा आदर्शवादी धर्म आहे. प्रत्येक धर्माचे काही श्रेष्ठ मूल्य व बळ आहे. त्याचबरोबर अनुयायांच्या आचरणांतून आलेल्या काही त्रुटी व अडचणींच्या जागाही आहेत. हे सगळे कडबोळे आहे तसेच घेऊन ठेवून, लोकशाही व जनकल्याणकारी उद्दिष्टांकडे वाटचाल करणे अवघडच होते. कारण तत्त्वांची श्रीमंती सर्व धर्मांत आहे. 'प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणी ईश्वरी अस्तित्व असते. गरीबांची सेवा ही माणुसकी होय. ईश्वरी साक्षवचनाला जागणारा, नमाज पढणारा, जकात देणारा, व्रतस्थ जीवन व्यतीत करणारा, यात्रेला जाणारा (हाजी) माणूस सर्वश्रेष्ठ होय, पश्चात्तापाने माणूस अतिशुद्ध होतो,' अशा विचारश्रीमंत तत्त्वांची गर्दी सर्वत्र आढळते.

एखाद्याने वाटून अगतिक होऊन, व्यावहारिकतेपोटी कुठलाही धर्म स्वीकारला किंवा त्याला दिला, लादला गेला, तरी तो पूर्णतः तिथला घडत नाही. कडवेपणा ही पूर्ण आत्मसातीकरण करता न आल्यामुळे, आलेली काहीशी आपली मर्यादा झाकण्याचीही गोष्ट असते. त्यामुळेच मुसलमानांनी हजार वर्षे येथे राज्य केले. पण त्यांना जेमतेम पंचवीस टक्के लोकांना मुसलमान बनवता आले.

हिंदू आणि मुसलमान यांना वेगवेगळी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. त्यांच्या परंपरा व संस्कृतिसंचितात फरक आहे. आर्थिक व सामाजिक जीवनप्रणाली आणि आकांक्षा वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे समान आदर्श जोपासणारे एकमेव भारतीय राष्ट्र निर्माण करणे अशक्य ठरले. कुणाला हाकलूनही हा प्रश्न सुटत नाही किंवा सक्तीच्या भारतीयीकरणात हे बसणार नाही.

ऐतिहासिक पुरावे जर पाहिले तर मोठे अंतर्मुख करणारे निष्कर्ष सामोरे येतात.

'Silence the toungue that utters the word socialism.' असे एक वचन सापडते. तर बॅ. जीनांच्या सेक्रेटरी झरीना भट्टी यांनी भारतीय मुसलमानांचे काय? असा प्रश्न विचारला असताना त्यांनी 'मी त्यांना निकालात काढले आहे,' असे दिलेले एक उत्तर सापडते. 'इजिप्त इस्लामी राज्य घोषित करावे.' या मागणीला जनरल नजीब यांनी दिलेले उत्तर बी. के. दत्त यांनी नोंदले आहे. ते असे आहे की, "Religion is for the individual but country for all, cross and crescent will shine together in the Egyptian sky." ह्यातून धर्मसत्ताक राष्ट्र, हा नवस्वतंत्र भारताला

पर्याय नव्हता, ह्याच गोष्टीचा प्रामुख्याने पडताळा मिळतो.

देशाच्या फाळणीनेही राज्यकर्त्यांना काही गोष्टी शिकवल्या होत्या. आपापसातील मतभेद फाळणी झाल्यामुळे संपतात, असे नाही. धर्माच्या तत्त्वावर केलेली फाळणी ही टिकाऊ ठरणे कठीण असते. ज्या नेतृत्वाला सामान्य जनहितांची फिकीर नसते, ते नेतेपण ऱ्हासकारक ठरते. काही तात्कालिक गोष्टींचा निचरा होतो व आपापल्या स्वीकृत उद्दिष्टांच्या दिशेने प्रवास करणे सोयीचे होते.

येथल्या हिंदूंच्या बाबतीत, श्री. गिरीलाल जैन यांनी त्यांच्या 'Danger Signal' नावाच्या लेखात एक चांगला मुद्दा ठामपणे मांडला आहे. "हिंदूंनी धर्मसत्ताक राज्य कधीही केले नाही. त्यामुळे त्यांना तसे आता किंवा पुढेही कधी करता येणार नाही." म्हणजे परंपरेची व उपलब्ध इतिहासाची साक्ष काढली तर असे आढळते. एकाही हिंदू राज्याने हिंदू धर्माची उद्दिष्टे प्रमुख व शिरोधार्य मानून आपल्या समस्त प्रजाजनांशी; तशा तऱ्हेने कधीही व्यवहार केला नाही.

धर्मप्रधान राज्यप्रणाली स्वीकारताना आणखी एक अडचण होतीच. हिंदूंमध्ये शैव, वैष्णव, लिंगायत आणि अनेक दैवतभेद, श्रद्धाभेद आणि पोटभेद आहेत. मुसलमानांमध्येही शिया आणि सुन्नी म्हणजे महंमदाच्या वंशातले जे असतील त्याच्याकडे धर्मचालनाचा अधिकार असावा, असे मानणारे शिया व धर्मसंस्थेने नियुक्त केलेला कोणीही उत्तराधिकारी त्यास पात्र ठरतो, असे मानणारे सुन्नी; जैनांमध्ये श्वेतांबर व दिगंबर किंवा देरावासी आणि स्थानकवासी, तर बौद्धांमध्ये महायान आणि हीनयान व अन्य आणखी असे भेद तर आहेतच. याबाबतीत

'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां
नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम् ।

हे वचन सार्थ असते. त्यामुळे आमच्या देशात लोकशाहीच्या आधारासाठी नवे सूत्र व व्यापक अद्यावत शास्त्र धांडोळणे व प्रसृत करणे आवश्यक होते. त्यातूनच 'धर्मनिरपेक्षता' ह्या मूल्याचा आदर व स्वीकार करण्यात आला.

आपल्या भारतीय राज्यघटनेमध्ये समाविष्ट केलेले पंचविसावे कलम धर्मनिरपेक्षतेबाबतचा विचार करणारे आहे.

लोकशाहीच्या बळकटपणासाठी आणि अस्तित्वासाठी, सार्वजनिक सुव्यवस्थेला अग्रीम महत्त्व असते. आणि एक दुसऱ्यांशी व्यवहार करीत असताना, सर्वस्वीकारार्ह, मानवी जीवनाला अर्थपूर्ण करणाऱ्या नीतिमत्तेची आवश्यकता असते. लोकांचे जीवन आरोग्यसंपन्न असणे आणि प्रगतिपर गोष्टींचा विकास होत राहणे या घटकांना विशेष मोल असते. यांना कुठेही बाध न आणता सदसद्विवेकबुद्धी बाळगण्याचे समान स्वातंत्र्य; याला ही संज्ञा दिली आहे.

कोणत्याही धर्माचा मुक्तपणे स्वीकार करणे, त्याप्रमाणे आचार करण्याचा व त्या धर्ममतांचा वर उल्लेखलेली पथ्ये पाळीत प्रचार करण्याचा अधिकार, यात गृहीत धरला आहे.

धार्मिक आचरण ही सुटी किंवा अन्य बाबींपासून पूर्णतः वेगळी अशी गोष्ट नसते. मानवी जीवनातील सर्वच अंगोपांगे एक दुसऱ्याशी संलग्न असतात. इतकी की, एकाची दुसऱ्याशी फारकत करता येणे शक्य नसते. इतकेच नव्हे तर अशा एकात्म विविधांगी कृती-वर्तनालाच, आपण संस्कृती असे म्हणतो. कारण ते एक जीवनाचे अन्यांना प्रतीत होणारे वळण असते. त्यामुळेच धार्मिक आचरणांशी सुसंबद्ध असे आर्थिक, वित्तीय, राजकीय व इतर धर्मनिरपेक्ष घटकाचे नियंत्रण होणे आवश्यक असते. त्याच्या नियमन नियंत्रण करणाऱ्या कायद्यांची ह्यात नोंद व चर्चा केली आहे.

ह्या देशात बहुसंख्याक हिंदू आहेत. अल्पसंख्याकांना समजून घेणे म्हणजे बहुसंख्याकांकडे दुर्लक्ष करणे असे नसते. म्हणून समाजसुधारणा करणे, आणि सार्वजनिक संस्थात प्रवेश करण्यास प्रोत्साहित करणे; यासारख्या तरतुदी ह्या धर्मनिरपेक्षतेत येतात.

थोडक्यात असे म्हणता येईल, ह्या देशात लोकशाही राज्यात वावरणाऱ्या नागरिकाला आपले वर्तन आणि समाजहित यांचा समन्वय साधणारी एक प्रणाली हवी होती. ती नीतीविषयक प्रणालीच यात चर्चिली आहे. प्रत्येकाचे लौकिक जीवन विकसित होण्याच्या प्रक्रियेत, व्यापक सामाजिक कल्याणाला बाध येऊ नये. म्हणजे सामाजिक कल्याणाचे सूत्र शिरोधार्य मानून नैतिक अशा नव्या आदर्शांची व आचरणांची जी तरतूद आहे; तिलाच धर्मनिरपेक्षता असे म्हणता येईल.

त्यामुळेच आम्ही मानवी आयुष्याला सार्थ बनवणारे धर्ममूल्य स्वीकारले आहे. पण त्याचा संकुचित अर्थ मात्र बाजूला ठेवला आहे. अमुकच एक धर्म असा आग्रह सोडला आहे. प्रत्येक धर्मातील महन्मंगल व उदात्त घटकांची यथायोग्य बूज राखण्याची पराकाष्ठा केली आहे. ह्या देशाचा नागरिक हा कोणत्याही धर्माचा असला तरी त्याचे सार्वजनिक वर्तन व आचरण, त्याच्या नागरिकत्वाला 'मूल्य' प्राप्त करून देणारच; असा हा विचार आहे. म्हणून आमचा हा धर्मनिरपेक्षतेचा विचार, सर्वच धर्मियांना समजून घेण्याचा विचार आहे. तो धर्माच्या मर्यादित चौकटीच्या पलिकडे असल्यामुळेच धर्मातीत आहे. अलम नागरिक–अवामला, लोकांना समजून घेणारा आहे. तो दुनियावी आहे. त्यात धर्महीनता संभवत नाही. धर्माची अनुपस्थिती किंवा धर्मसंस्कारांकडे दुर्लक्ष, म्हणजे धर्मनिरपेक्षता नव्हे, किंवा एखाद्या विशिष्ट धर्माचे विशेषपण सांगणे म्हणजेही धर्मनिरपेक्षता नव्हे. धर्मशून्यता किंवा धर्महीनता लादणे म्हणजेही धर्मनिरपेक्षता नव्हे. वरवर विरोधी किंवा विसंगत वाटणाऱ्या या सूत्रात, सामाजिक प्रगती व श्रद्धावर्तन यांचे भान जागते ठेवले आहे. यालाच अलिकडे 'सर्वधर्म समभाव' अशीही पर्यायी संज्ञा उपयोजिली जाते.

धर्मनिरपेक्षतेचे आणखी काही विशेष सांगता येतील. प्रत्येक धार्मिक मूल्यांमध्ये व्यक्तिगत मनःशांतीची व मोक्षउद्धाराची आणि स्वर्गसुखप्राप्तीची संकल्पना गृहीत धरलेली असते. व्यक्तिगत बदलातूनच सामाजिक उन्नयन हे त्या पाठीमागले उदात्त तत्त्वही नाकारता येत नाही. पण माणूस हा आत्मरत, आत्मतृप्त प्राणी आहे. आपले समाधान, आपले कुटुंब जमेल त्या मार्गाने सुखीसमाधानी होणे, म्हणजेच पूर्णविराम;

अशी त्याची विचारसरणी बनते. असेच इतरांनी वागले पाहिजे, ही भूमिका यातून संभवते. पुढे हिचे आग्रहात रूपांतर होते. आग्रहाचे दुराग्रहात, पुढे सक्तीत आणि त्यापुढे हिंसाचारात; हा अहंकार संक्रमित होऊ शकतो.

सहिष्णुपणाचा कितीही आव आणला तरी ती आत्मतृप्त आणि भाबडी कल्पना आहे, हे दर्शनीच ध्यानात येते. म्हणून धर्मनिरपेक्षतेमध्ये सामूहिक संमिश्र व्यापक कल्याणाची तरतूद शोधण्याचा मूल्यगर्भ विचार एकवटलेला आहे.

मानवी संस्कृतीत ज्या उणिवा येतात त्या वस्तुतः मानवी स्वभावदोषांमुळे भरीस आलेल्याच उणिवा असतात. इतिहासावर लट्टू होत असताना तो भविष्याकडे पुरता डोळेझाक करतो. त्यामुळे वास्तवजीवन नाकारून इतिहासात व तत्कालीन संदर्भसूत्रात तो अडकून पडू शकतो.

प्रत्येक पिढी आपल्या कडूगोड जीवनानुभवांचे धन नव्या पिढीच्या हवाली करीत असते हे खरे आहे. पण एका पिढीचे तत्कालीन अनुभव, पुढच्या पिढीला तसेच येत नाहीत. एका धर्मातील पथ्यकारक व हितकारक सूत्रे, अन्य धर्मियांना किंवा तद्धर्मिय नव्या पिढीला, तशी वाटत नाहीत म्हणून बदलत्या वास्तवतेची प्रत्यक्ष स्थिती समजून देण्याघेण्याला ह्या नव्या मूल्याची गरज निर्माण होते.

समाजजीवन, समान संधी व समान उद्दिष्टे घेऊन वाटचाल करताना आपल्यापेक्षा, आपल्या उत्तम धर्मपूर्ण वागण्यापेक्षा किंवा आपल्या श्रद्धाआग्रहापेक्षा देश मोठा आहे, याची रुजवण धर्मनिरपेक्षता ह्या शब्दाने प्रामुख्याने करण्याचे लक्ष्य निश्चित ठरवले आहे. त्याची पूर्ती ह्या मूल्याच्या आत्मसातीकरणानेच होण्याची शक्यता आहे.

व्यक्तीजीवनात व धर्मजीवनात काही लाभ संकुचित दृष्टीचे व तात्कालिक असतात. त्यांच्या प्राप्तीसाठी भावनाधारित स्वार्थ कार्यप्रवण होतो. त्यावर मात करण्याची क्षमता, या नव्या मूल्यांकडून निश्चितच लाभू शकते.

कोणत्याही राष्ट्राला त्यातील समाजाला जी अवकळा प्राप्त होते त्याची कारणे दैवी नसतात. ती मनुष्यनिर्मितच असतात. आपल्या भौतिकतेशीच त्याचे सूत्र अडकलेले असते. त्यामुळे दैवी चमत्काराने किंवा युगात्म्याच्या अथवा युगपुरुषांच्या अवतारी आगमनाने, ती दूर होण्याची सुतराम शक्यता नसते. म्हणून नवी घडी, सुव्यवस्था व सुघटनाही मनुष्यनिर्मितच असते. याचा पक्का विश्वास या मूल्यानेच येऊ शकेल.

व्यापक, भक्कम व सर्वसमावेशक अशी ऐहिक वास्तवदर्शी उद्दिष्टे निश्चित झाली की, मने व बुद्धी नव्या मार्गाने प्रवास करू लागतील. ती मोकळी पोकळी उरणार नाही. आणि अशी वाटचाल सुरू झाली की, जुनी अतिरेकी आत्महननाची भाषाही मागे पडत जाईल.

ह्या खंडप्राय देशात जवळ जवळ चाळीस वर्षे लोकशाही रांगते आहे, याचे श्रेय त्यातील घटनेच्या चतुर निर्मितीला व त्यातील दूरदृष्टीलाही आहेत. पण लोकशाही वाढायला पाहिजे. इतरेजनांना दीपस्तंभ ठरेल, अशी तिच्यात शक्ती व क्षमता यायला पाहिजे असेल; तर प्रत्येकाला धर्मनिरपेक्षतेचा कठोर विवेकभाव शिकून घेतला पाहिजे.

व्यक्तिगत आचरणप्रणाली आणि सामाजिक व्यवहारपद्धती यात विवेकपूर्ण रीतीनेच, समन्वय शोधायला शिकले पाहिजे.

ही दृष्टी रुजविण्यासाठी सरकारनेही सतत बदलते, अतिलवचिक असे धोरण ठेवता नये. कारण अतिलवचिकतेमुळे त्यातला धाकदरारा च संपतो. क्वचितप्रसंगी मूळ उद्दिष्टाला गौण स्वरूप प्राप्त होते. एकमेकांच्या आचारविचारांबद्दल जागरूक व समंजस दृष्टी निश्चित असावी. त्यामुळे व्यक्ती, समाज, घटकराज्य व संघराज्य यांच्यात एक निश्चित तोल राखला जाईल. व्यक्तीचे भावनात्मक चढउतार, समाजाचे क्वचितप्रसंगी आंधळे उसळण, घटक राज्यांचा स्वतःच्या विकास, संस्कृती-श्रेष्ठतेबद्दलचा फुगारा आणि केंद्राचा, 'चलता है ठीक है।' असा कंटाळला सूर निघून जाईल. सगळ्यात समजूतदारपणा येईल. तो आला की उभय घटकांची एक दुसऱ्यांशी अंतर्गत जुळणी होत जाईल. विवेकाने समानता येईल. त्यामुळे निश्चित समतोल राखला जाईल. सहजीवनाची, सहअस्तित्वाची सोनेरी शक्यता साकारण्याचा क्षण जवळ येणे शक्य होईल.

विकसनशील देशाच्या अनेक नाजुक समस्या असतात. काही प्रश्न असे असतात की, त्यांची सोडवणूक करण्यासाठी लोकशाही राबवणाऱ्या देशाला, अंतर्गत पातळ्यांवर प्रचंड संघर्ष करावा लागतो. आपल्या देशात हेच चालले आहे. रोजगारांचे प्रश्न, समानसंधीचे प्रश्न, विषमतेमुळे नाकारलेल्या गोष्टींचे प्रश्न, त्यातील अडचणी, प्रदान केलेल्या राखीव जागा, स्पर्धेच्या काळात चिडचिडणारे प्रतीक्षा करणारे मन, त्यात उद्भवणाऱ्या अनेक सुष्टदुष्ट विकृती, या अवघ्यांचा निचरा होणे अगत्याचे आहे. तत्त्वे नेहमीच सुंदर असतात. पण माणूस व त्याचे वर्तन ओंगळ असू शकते. धर्मप्रेषित बरोबर असू शकतो, पण व्यक्ती अनेकविध चुकांची व दोषांची धनी असू शकते. गणित बरोबर असू शकते. पण सोडवू पहाणाऱ्याने चुकीची, विपर्यस्त पद्धती स्वीकारली असल्याची शक्यता गृहीत धरावी लागते. व्यक्तींचे हित व सामूहिक हित यात महदंतर असू शकते; याचे भान म्हणूनच ठेवले पाहिजे.

नव्या राज्यव्यवस्थेत अनेक जुन्या गोष्टींचे दारुण पराभव, प्रत्ययाला येत असतात. पाकिस्तानचे विघटन होऊन, बांगला देश अस्तित्वात आला. येथे घडलेल्या धर्ममतांचा पराभव खूप बोलका आहे. आजच्या नव्या काळात वावरणाऱ्या सुजाण, सुबुद्ध, संस्कारी नागरिकाने या सर्व गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत. त्यांचा यथोचित व कालोचित अन्वयार्थ लावायलाही शिकले पाहिजे. असा धडा जर आम्ही शिकणार, गिरवणार नसू तर मग आमचे असणे आणि चतुष्पादाचे अस्तित्व यात विशेष काही फरक आहे असे म्हणता येणार नाही.

कोणत्याही देशातला माणूस आपल्या चांगल्या किंवा वाईट कृतीचे समर्थन करीत असतो. ते करण्यासाठी तो अन्य देश, अन्य राष्ट्रे यांची योग्य ती उदाहरणे शोधीत असतो.

सोविएत रशियातही सत्तावन्न भाषा बोलल्या व शिकवल्या जातात. युक्रेनियन, उझ्बेक, कझाक, जॉर्जियन, अझरबैजान, लात्वियन, किर्गिज, आर्मेनियन, तुर्कमेन,

वगैरे पंधरा समान संघराज्ये त्यांच्यात आहेत. पण व्हेटो वापरणारी शक्ती म्हणून हे राष्ट्र उभे राहिले आहे. दुसऱ्या महायुद्धातून जपान ठाम उभे राहिले आहे, तर अमेरिकेसारख्या बलाढ्य देशात दोन तपांहून अधिक काळ, सातत्याने लढून विएतनाम प्रगती करतो आहे. अंतःस्थ कलहाला मूठमाती देणे जमले व समान ध्येय विवेकाने निश्चित केले, तरच हे शक्य होते. धर्मनिरपेक्षतेच्या बाबतीत असेच म्हणावे लागेल.

आजपर्यंत कटोरा घेऊन प्रत्येक मोठ्या राष्ट्राच्या दाराशी याचक म्हणून उभा राहणारा भारत आता जवळ जवळ एक समर्थ विकसित राष्ट्र म्हणून बदलतो आहे. तिसऱ्या जगाची शक्ती व नेतृत्व करतो आहे. अनेक चढउतारातही लोकशाहीचेच मूल्य सांभाळतो आहे ही काही मोठ्या देशांना व महासत्तांना खूपणारी बाब बनली आहे. त्यामुळे त्याच्या मुळातच पुन्हा कोणत्याही तऱ्हेने विभाजन विघटनाची पेरणी करणे शक्य आहे का? यादृष्टीने त्यांची खेळी चालू आहे. खलिस्तान, गुरखालँड, मिझोराम ही अशांततेची आताची केंद्रे या पोटशूळातून आली आहेत. काही राज्यकर्त्यांनी केलेल्या चुकांचाही हा थोड्या प्रमाणात पुरावा आहे. पण ते दुय्यम आहे.

ह्या महासत्ता सी. आय. ए., क्ल क्लस क्लॅन, किंवा कॅम्फर, वगैरेना पुढे करून, अनेक प्रकारे विकसित देशाला पोखरण्यात धन्यता मानतात. आपली शस्त्रे खपली, युद्धसामुग्रीला उठाव मिळाला, की भांडवल शाबूत भिकारी कायम, ही त्यांची वृत्ती आहे. प्रत्येक देशात काही आडमुठे स्वातंत्र्यवादी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी असतात. ते विचारवंत, तत्त्वज्ञ, मानवतावादी, समाजवादी कलावंत, लेखक वगैरे मोठी गोंडस नावे धारण करतात. आपल्या देशाला बदनाम करतात. शिष्यवृत्त्या मिळवतात. अशा नादानांची, विद्वानांची समाजवादी फौजही काही धर्मनिरपेक्षतेसारख्या मूल्यांची माती करायला तयार असतात. स्वतः त्याचे कट्टर समर्थक आहोत, असे भासवितच ते हे कृत्य पार पाडीत असतात.

जागरूक नागरिकाने यांचाही मुखवटा ध्यानात ठेवला पाहिजे. आपला सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक वारसा जोपासावयाचा असल्यास, धर्मनिरपेक्षता हे मूल्य नीट समजून घेऊन आचरणात आणले पाहिजे. येणाऱ्या भविष्यातले हे वास्तव भानच अस्तित्व अर्थपूर्ण करणार आहे.

(व्यासपीठ : दिवाळी अंक १९८६)

७. दलित समाजाचा तीन दशकांचा ताळेबंद

महाराष्ट्रात १४ ऑक्टो. १९५६ रोजी एक अभूतपूर्व घटना घडली. 'हिंदू म्हणून मी मरणार नाही' हे शब्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी खरे करून दाखविले. हिंदू धर्म व हिंदुत्ववाद्यांचा अन्याय्य, स्वयंतुष्ट व विषम वस्तुस्थितीचा त्याग केला. लक्षावधी अनुयायांसह झालेले हे डोळस धर्मांतर ही इतिहासाला हादरा देणारी गोष्ट होती.

धर्मचक्र परिवर्तनानंतर कात टाकलेल्या सजग झालेल्या दलित समाजाला डॉ. बाबासाहेबांचे नेतृत्व आणि मार्गदर्शन पुरते दोन महिनेही लाभले नाही. ६ डिसें. १९५६ रोजी त्यांचे महापरिनिर्वाण झाले. प्रगतीची पावले उचललेल्या समाजाला हा मोठाच मानसिक तडाखा होता. जुन्या परंपरा, देवबाण, दगडगोटे, कर्मकांड, चालीरीती फेकण्याचा जोश होता. पण नव्या धर्माचे नवेपण टप्प्याटप्प्याने व सातत्याने भरणा होत होत, पूर्ण होण्याची प्रक्रिया अपुरीच उरली. तीन दशके झाली आहेत. दलित समाजाची वाटचाल सार्थत्वाच्या स्वाभाविक मार्गाने चालू आहे का? याच प्रश्नाबद्दल हे प्रगट चिंतन आहे.

भारतीय राज्यघटना ही जागरूकतेने बनविलेली व राबवलेली आहे. राखीव जागांच्या भारत सरकारच्या स्वीकारामुळे अत्यल्प का होईना, पण संधी उपलब्ध झाली होती. जरी नोकरशाहीतला सोकावलेला ब्राह्मण-सारस्वतांचा वर्ग, अनेक तऱ्हेच्या कोलांट्या उड्या मारीत होता. नकारात्मक चतुर शक्कल लढवीत होता. आकड्यांची व कागदी बनवेगिरीची चालढकल करीत अडथळे उभा करीत, कुरण व स्वार्थ अबाधित राखण्याचा आटापिटा करीत होता. तरीही दलित समाजातला मोजका वर्ग आपला जीवनस्तर व आर्थिक स्तर बदलू लागला होता. पूर्वीची बलुतेदारी, वतने नेकी-निग्रहाने चालवणारा दलित ह्या नव्या जबाबदाऱ्याही कुशलतेने पेलत होता. बाकींच्याकडून जेवढ्या व ज्या तऱ्हेच्या बऱ्यावाईट गोष्टी घडत असतात त्या मानवी स्वभावगोष्टी तितक्याच त्यांच्याहीकडून घडत होत्या. पण ह्यामुळे ओरड व बोंब

मारण्याची होळीशिवाय सगळ्यांना खोड जडली होती. इंजिनियर, मेडिकल, मामलतदार, तहसीलदार, ऑफिसर, प्राध्यापक वगैरे क्षेत्रात जितके सर्व जातीजमाती व वर्णवर्गांचे लोक चांगले-वाईट वगैरे आहेत; तितकेच येथेही आहेत. पण हे स्वयंपूर्ण होणेच, अन्यांना धुळवडीचे निमित्त होते आहे. तरी सत्तर टक्के राखीव जागांचा कोटा भरून दिलेला नाही. नुसता 'बॅकलॉग' भरण्याचा जरी प्रांजल प्रयत्न केला, तर सरकारी क्षेत्रात, आणखी तीस वर्षे, ही सवलत ठेवण्याखेरीज हे होणे नाही.

बाबासाहेबांचे नेतृत्व पुणे करारापासून व गोलमेज परिषदेपासूनच ज्या अनेकांना पोटदुखी ठरले होते, त्यात म. गांधी होते. त्यांनी तथाकथित 'हरिजन सेवक संघ' काढून आंबेडकरांना शह देण्याचे धोरणी असे राजकारण केले. बाबू जगजीवनराम, राजभोज, तिरपुडे, काजरोळकर, पुढे भंडारे, तपासे, भोळे वगैरे लोकांनी विशेष लाभासाठी निष्ठाच्युती केली होतीच. सत्ताधारी पक्ष किंवा लोक यांच्यामार्फत विशेष लाभांचे गणित गिरवत, ते टिकून राहिले व पुढे नुसतेच राहिले.

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर भांबावलेल्या दलित समाजाला राजकीय व धार्मिक क्षेत्रात, एकमुखी अशा सर्वसमावेशक व्यापक नेतृत्वाची निकड होती. पण घरातला कर्ता पुरुष जावा व घर बसावे, असे रिपब्लिकन पक्षाचे व दलित समाजाचे झाले. अंतःस्थ धुसफूस चव्हाट्यावर आली. बाबासाहेबांचे शिलेदार मोकळे सुटले. प्रत्येकाचा पक्ष झाला. प्रांताप्रांताचे गट बनले, देशावरचे कोकणी व घाटावरले यांचे गट झाले. प्रांताचेच नव्हे तर, महार, मातंग, चांभार, ढोर यांचे व त्यांच्याही पोटजातींचे, स्वतंत्र गट व गटनेते बनत गेले.

अशा पडत्या काळातही १९६५ सालाप्रर्यंत रिपब्लिकन पक्ष महत्त्वाची भूमिका बजावत होता. सत्तेच्या आणि निवडणुकांच्या सहभागात, कितीतरी महत्त्वाचे लोक काँग्रेस पक्षात गेले. हेतू फक्त छोट्यामोठ्या पदांचा, कौटुंबिक स्वार्थाचा होता. बाहेरची भाषा व घोषणा तात्त्विक होत्या. पण सोय सत्तेमत्तेची होती. पहिल्या दशकात हे आवर्तन पूर्ण होऊन गेले. प्रथमग्रासे असा मक्षिकापात घडला.

दुसऱ्या दशकात आंबेडकरवादी तिसऱ्या पिढीचे संघटन आकारू लागले. तथाकथित ज्येष्ठांच्या लाथाळ्या व बजबजपुरीने जमेल तसे जनमताचे वारे वळवण्याचे प्रयत्न सुरू झाले.

सर्वश्री आवळे, खोब्रागडे, एन. शिवराज, कट्टी, गायकवाड, कांबळे, ठवरे, गवई, गाणार, कुंभारे या सगळ्यांच्या नेतृत्वावरची प्रतिक्रिया 'पँथर' नावाने उमटली होती.

तरुणांचा, संवेदक मनाच्या, कलावंत मनांचा समाजातील या अंतःस्थ लाथाळ्या व स्वयंतुष्ट प्रवृत्तीबद्दल जो खळबळता उद्रेक होता तो उकळायला लागला होता. ज्यांनी धीर द्यायचा तेच अन्यायकर्त्यांच्या किंवा त्यांना पोसणाऱ्या पाठीशी घालणारांच्या ताटाखालची मांजरे बनल्याचे दुःख व चीड फार मोठी होती. शब्दांनी सामाजिक समस्या सुटत नाही, हे देखील अनुभवाने शिकवले होते. 'पँथर'ची निर्मिती आणि चारपाच वर्षांचे विशेष कार्य त्यामुळेच घडले.

आपल्या ह्या देशात तात्त्विक बुद्धिमंतांची एक समाजवादी म्हणवणारी फळी आहे.

सर्व प्रश्नांना त्यांच्याकडे काही उत्तरे व उपाय असतात. कलाकवितांचे हे लोक भोक्ते असतात. कुठेही लढाऊ, चिडणारी, क्रियाशील माणसे निर्माण झाली की हे साधनसज्ज लोक आपले करतब दाखवतात. कोणाला ते पारितोषिक देववतात, कोणाला व्यापक मोठ्या कामाचे आमिष दाखवून निकामी करतात. काहींना फाउंडेशनमार्फत शिष्यवृत्त्या, अभ्यासवृत्त्या, सन्मान बहाल करतात. भल्या घरच्या मुलीबाळींशी त्यांची लग्नगाठही बांधतात. हे सगळे घडत असतात. हळुवारपणे त्यांना पोखरतात. जाहीर मुलाखती प्रसिद्ध करून गैरसमज निर्माण करतात. कोण्या तरी परक्या शक्तीने या समाजवादी प्रेषितांना पैसा, प्रतिष्ठा, चातुर्य संघटना व सर्वांशी स्नेहसंबंध यांचे कवच सहज उपलब्ध होते. हे विरोधक असले तरी शास्त्रे यांचे ऐकतात. त्यांच्या शक्तीने बरेच काही घडते. सगळ्या क्रांतिकारक व मूलगामी चळवळींचा विचका करण्यात भारतातल्या विचारवंतांना ईश्वरानेही (कुणाचा असलाच तर) गुरू बनवावे.

पँथर फुटली... इतकी की डझनभर 'पँथर' गट काम करताहेत. तसे कुणीच खऱ्या अर्थाने फार काही करतो असे नाही. आपापल्या गटाचे म्होरके म्हणवीत, सचिवालय, पोलीस चौक्या, जिल्हा-तालुका कचेऱ्या, काही नोकरी देणारी कार्यालये, सभा-संमेलने येथे मोर्चे रचतो. घोषणा देतो. स्वतःच्या व काहींच्या जगण्याची-आणि चांगले टेचात रंगतदार जगण्याची, अर्थपूर्ण सोय करण्याचे तंत्र, सगळ्यांनी आत्मसात केले आहे. कुणाचे ट्रक्स, बार, हॉटेल, मिनी बसेस, चाळी-झोपड्या, सोशल क्लब असल्याचे उघडे गुपित त्यामुळेच ठाऊक होते.

डॉ. बाबासाहेबांनी 'शिका' हा संदेश दिला होता. सिद्धार्थ व मिलिंद महाविद्यालये काढली होती. तीन दशकांच्या मानाने दलित समाजाच्या शिक्षणसंस्थांची संख्या अत्यल्प आहे. आता तर बहुसंख्य शिक्षणसंस्था आणि तेथले वातावरण शिक्षणाखेरीज बाकींच्याच गोष्टींना विशेष अनुकूल असल्याचे आढळते. नव्या शाळा व होस्टेल काढतानाही विद्यार्थीहित किंवा समाजहित गृहीत धरण्यापेक्षा आपला एक हातातला 'एक्का' असावा, सरकारी मेहेरबानीने जमिनीचा तुकडा पदरात पाडून घ्यावा, पुढे फारसे काही करू नये, फार तर रोकड देणारे काहीतरी करावे हीच वृत्ती बोकाळताना दिसते.

धर्मकारणाकडे तर नवदीक्षित वर्गाने व सगळ्यांनीच अक्षम्य दुर्लक्ष केलेले दिसते. एका विभागात सातआठ जयंत्या घडतात. एकदोन वर्षांपूर्वी बीड मुक्कामात एकमेकांना शह देऊ पाहणाऱ्या जयंत्या अनुभवल्या, हेच विचित्र सर्वत्र आहे.

वस्तुतः जुने देव-धर्म, व्रतवैकल्ये, तिथीवार पंचांग, सणउत्सव, रीतीभाती सोडल्या गेल्यानंतर बौद्ध धर्मास सुसंगत व बौद्ध तत्त्वज्ञानानुसार किंवा त्यास पूरक अशा चांगल्या गोष्टींची चोखंदळपणाने भर पडण्याची गरज होती. सवलतींचा-बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचा लाभ घेणारे पण स्वतःला 'हरिजन' म्हणवणारे जे जे आहेत, त्यांच्याशी सतत सुसंवाद व आर्जव आवश्यक होते. फुटून फुटून सगळ्यांनीच नष्ट होण्याचे, भविष्य, किंवा 'नगण्य' होण्याची अवस्था टाळण्यासाठी दूरदर्शी, नेतृत्वाची, प्रज्ञासूर्याची गरज

होती. पण ते घडलेच नाही. अनेक क्षेत्रांत काही कडव्या नवबौद्धांना, विशेषतः महार मंडळीना जाणीवपूर्वक दूर ठेवले जाते. सरकार-महाराष्ट्र सरकारही हीच रीती अवलंबताना दिसते. अल्पसंख्याकांना संधी देण्याचे औदार्य दाखवीत भेदराजनीतीचाच वापर करते. कार्यालयात ऑफिसर, डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, सरकारी वकील वगैरे नेमताना कडव्या बुद्धविचारी व आंबेडकरवादी लोकांचा पद्धतशीर दुस्वास करण्याचे सूत्र गेल्या दोन दशकात फोफावले आहे. मातंग, मागसवर्गीय यांची नवनवी मंडळे त्यांचेही डझनभर गट दलित समाज कधीकधीच संघटित होऊ नये, त्यांनी बलशाली होऊ नये ह्या अंतःस्थ हेतूनेच उगवलीत की काय असे म्हणावे लागते.

एकेकाळचे स्वतःखेरीज सगळ्यांना तुच्छ लेखणारे, आपणच ह्या देशाचे एकमेव सुपुत्र, निर्माते, हितकर्ते आहोत असे मानणारे 'प्रतिगामी'ही हीच खेळी खेळतात. कडव्या आंबेडकरवादी अनुयायांपेक्षा 'हरिजन' उद्धार व त्यांचे 'हिंदू अस्तित्व' त्यांना मोलाचे वाटते. 'संघ' कार्यकर्ते आता आदिवासी, चर्मकार वगैरे लोकांत, शहरात फेऱ्या मारताना दिसतात. आपले काहीही न सोडता, न बदलता समाजबदल व समानता कशी काय येणार? याचे उत्तर एकालाही देता येत नसले तरी घोषणा आहेत. अल्पसंख्याक, मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध, आंबेडकरानुयायी यांचा वाढता प्रभाव, सर्वधर्मसमभाव त्यांना कळणार नाही. धर्मातीत मूल्यांना मनातून मान्यताच नाही. पण त्यांच्यापेक्षा मी दलित समाजाला अधिक दोषी धरीन. आपले काम इतरांनी का, कसे, कोणत्याप्रकारे केले? हे प्रश्न विचारण्यापेक्षा दलित समाज व त्यातले विचारवंत, लेखक, कलावंत, नेते आणि शहाणे लोक आपल्या कर्तव्याला व भूमिकेला कमी पडले असेच मला म्हणावेसे वाटते. यात माझा स्वतःचाही समावेश मला खेदाने का होईना, करावाच लागेल.

'संघटित व्हा' या बाबासाहेबांच्या मंत्राची दलित समाजाला आठवणच राहिली नाही. त्यामुळे ज्यांनी ज्यांनी व ज्या ज्या वेळी सर्व घटक व गट यात एकोपा व्हावा असा प्रयत्न केला तो त्यामुळे व्यर्थ गेला. झुंडीच्या बळावर त्यांच्याही नावाने शंखध्वनी निनादला.

बाबासाहेबांचे कार्य व कर्तृत्व हा आता घोषणेचा व पोट भरण्याचा धंदा झाला आहे. त्यांच्या 'महाराष्ट्र ॲज ए लिंग्विस्टिक प्रॉव्हिन्स', 'फेडरेशन व्हर्सेस फ्रिडम', 'व्हॉट काँग्रेस अँड गांधी डन टू दि अनटचेबल्स', 'थॉटस् ऑन लिंग्विस्टिक स्टेट', आणि 'दि अनटचेबल्स' वगैरे ग्रंथांचे डोळस आकलन व आजच्या संदर्भात अर्थांतरण होण्याची निकड आहे.


जे मला आणि मलाच आंबेडकर आणि आंबेडकरवाद कळला असे शिरा ताणून सांगतात, बोलतात त्यांची ती जगण्याची सोय आहे. जर खरंच कळला असेल तर समंजसपणाने अवघ्यांच्या मतांची व मनांची जपणूक करीत तो समजावून देणे अगत्याचे आहे. आज तीन दशकांनंतर डॉ. बाबासाहेबांच्या तिसाव्या महापरिनिर्वाणदिनी बाबासाहेबांच्या सर्वसमावेशक, भव्य व सोशीक व्यक्तिमत्त्वाची प्रकर्षाने आठवण होते. त्यांच्या विचारांचा त्यांच्या समाजाने पराभव केला आहे. त्यांच्या आभाळभर मूर्तीला

त्यांनी छोटी करून सोडली आहे.

तीन दशकांचा हा दमवणारा विचार पुढल्या नगण्यत्वाच्या आणि विभाजनाच्या कल्पनेने अधिकच बोचतो. बाबासाहेबांनी, 'रिव्होल्युशन अँड काउंटर रिव्होल्यूशन इन एन्शन्ट इंडिया' ग्रंथ लिहिला. आताचा मॉडर्न किंवा करंट इंडियाच्या रिव्होल्युशन काउंटर रिव्होल्यूशनचा विचार करणारा कोणी येणार आहे का?

हताश बसण्यापेक्षा डोळ्यांत हिरव्या आशेचा अंकुर तेवढा जपावा.

(मुंबई तरुण भारत : ६ - १२ -१९८६)



८. श्री. म. म्हणजेच महार माटे

प्रा. श्रीपाद महादेव माटे हे बापूसाहेब या नावाने परिचित होते. वाणी व लेखणी ही त्यांची हत्यारे होती. भरघोस मिश्या, उंच कमावलेली प्रकृती, स्वतंत्र विचारसरणी आणि चिवट कष्टाळू स्वभाव यामुळे त्यांच्या स्वीकृत कार्यात त्यांचा लगेचच दबदबा निर्माण होत असे.

कुशल आणि व्यासंगी प्राध्यापक, प्रांजल कार्यकर्ते, समन्वयवादी विचारवंत, अस्पृश्यतेसाठी लोकक्षोभ आणि अपशब्द सहन करून काम करणारे क्रियावंत, लोकप्रिय वक्ते आणि कोणाशीही मतभेद झाले तरी मनाचा कौल मोठा मानणारे मनस्वी व्यक्तिमत्त्व, असे प्रा. माटे यांचे वर्णन करावे लागेल. त्यांच्या व्यक्तित्वाच्या अनेक पैलूंचा नीट परिचय होण्यासाठी आणि त्यांच्या लेखनाचा आवाका समजून घेण्यासाठी, त्यांचे अत्यल्प चरित्र समजून घेणेही अंगत्याचे ठरावे.

माट्यांचा जन्म २ सप्टें. १८८६ ला वऱ्हाडातील शिरपूर गावी झाला. वडील लवकरच दिवंगत झाल्याने सर्व भावंडांचा भार त्यांच्या आईने उचलला. प्रा. माट्यांना परिस्थितीने ओढघस्तीनेच शहाणपण दिले. आपण शिक्षण घेतलेच पाहिजे, ह्या जिद्दीने शिकवण्या व नोकरी करीत करीतच त्यांनी वाटचाल सुरूच ठेवली. १९०५ ला मॅट्रिक झाले. त्याकाळी अच्युत बळवंत कोल्हटकर यांचा 'देशसेवक' विख्यात झाला होता. त्याला बातमीपत्रे पाठवण्याचे काम माटे करीत असत. अवतीभोवती घडणाऱ्या अनेक घटनांतून काय आणि कसे वेचावे याचा वस्तुपाठच माटे यांना मिळत होता.

शि. म. परांजपे यांच्या विख्यात 'काळ' या वृत्तपत्रातही ते रशियन क्रांतीवर लेखन करीत होते. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधे नोकरी करीत असतानाच त्यांचा १९११ला विवाह झाला. पत्नीचे नाव लक्ष्मीबाई होते. आपण 'केसरी' या वृत्तपत्रात काम करावे अशी माटे यांची इच्छा होती. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्नही केले होते. पण ते शक्य झाले नाही. १९१२ ला बी. ए. व १९१५ साली इंग्रजी-मराठी हे विषय घेऊन ते

एम. ए. झाले. १९२० साली पुण्याच्या सर एस. पी. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून लागले. १९४५ सालापर्यंत म्हणजे निवृत्तीपर्यंत ते अत्यंत विद्यार्थीप्रिय व कार्यमग्न होते.

सतत चाळीस वर्षे त्यांनी अनेकविध विषयांवर जाहीर व्याख्याने दिली. १९१७ पासून पुण्यात अस्पृश्यांना शिक्षण देण्याचे व्रत त्यांनी स्वेच्छेने स्वीकारले. स्वतःच्या पद्धतीने १९३७ पर्यंत हे काम त्यांनी हिरीरीने केले. त्यांची मते पारंपरिक तरीही आधुनिक व मानवतावादी होती. त्यांनी आपल्या ह्या कार्याची कारणमीमांसा करताना असे म्हटले आहे... 'हिंदू समाजाच्या पोटात राहूनच म्हणजे निराळा पंथ न काढता हे काम केले पाहिजे असे मला वाटू लागले. व या कामाला साधुसंतांच्या वाङ्मयाचा व इतिहासाचा पाठपुरावा आपल्याला होईल असेही माझ्या ध्यानी आले. समाजाच्या पोटात राहूनच ढवळाढवळ केली म्हणजे जो सामाजिक प्रश्न सुटावयास हवा असतो तो खरोखरच सुटतो. समाज सुधारतो, समाजाच्या निरनिराळ्या थरात एक तऱ्हेची गोड फितुरी माजविता येते. हे धोरण ठरविण्यात मी बरा हुशारीने वागलो असे मला वाटते.' पुढे ही चळवळ त्यांनी द्रव्यसाधनाची सीमितता, शारीरिक थकवा, लोकांचे औदासीन्य व विरोध आणि पुढाऱ्यांशी मानसिक बेबनाव या कारणाने स्वतः होऊन बंद केली.

दुर्दैवाने समाजाला अस्पृश्यतेचा प्रश्न सुटावा असे वाटतच नसल्याने त्यांच्या विचाराआचारात स्वातंत्र्याच्या चाळीशीनंतरही काही बदल झाला नाही असाच उलटा अनुभव येतो आहे.

बापूसाहेब माटे हे ध्येयवेडे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या आयुष्याची काही मूल्ये त्यांनी ठरवली होती. परदेशी कापड न वापरण्याची त्यांची रीती होती. वकिलीचा व्यवसाय न करण्याचे त्यांचे सूत्र होते. सार्वजनिक कामे करताना वर्गणी मागावयाची नाही हा त्यांचा नियम होता. सरकारी नोकरी न करण्याची त्यांनी शपथ घेतली होती. शिकवण्या करूनच अस्पृश्यतानिवारण कार्यासाठी पैसा उभा करायचा. न पटणारे सांगायचे; मानायचे नाही. दुसऱ्यांच्या मतांचा बडेजाव व दबाव मिरवायचा नाही. कुटुंबाची आबाळ करायची नाही. स्वतंत्र चरितार्थ, उत्तम खाणेपिणे आणि स्वदेशी साखरेचा उपयोग; अशा काही गोष्टी त्यांनी कसोशीने पाळल्या.

सामाजिक कार्य करताना त्यांनी व्यवसायाची हेळसांड केली नाही किंवा डफरवून पाट्या टाकण्याची तडजोडही केली नाही. व्यासंग, लेखन, व्याख्याने, शिकवण्या, वर्ग चालवणे व अनेक विषयांचे जागते कुतूहल टिकविणे हा प्रा. माटे यांचा स्वभावच होता. वैचारिक निबंधांची व अंतर्मुख करणाऱ्या संशोधनपर ग्रंथांची परंपरा त्यामुळेच माटे अधिक उजळवू शकले. साठ वर्षांपूर्वी पुण्यास एका उच्चवर्णियाने कोणत्याही स्वार्थाशिवाय पदरमोड व दगदग करून अस्पृश्यवर्गासाठी शाळा चालवणे हा शुद्ध वेडेपणा ठरल्यास आश्चर्य वाटण्याचे कारणच नव्हते. स्वतंत्र मंदिर बांधण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची विल्हेवाट लागल्यावर त्यांनी चर्मकाराच्या वस्तीत आठ, मातंगाच्या वसाहतीत सहा, ढोर (चर्मकारांतील आणखी एक पोटजात) वाड्यात एक आणि

तेव्हाच्या महारवाड्यात चार शाळा अशा अठरा शाळा त्यांनी चालविल्या होत्या. दोन दशके हे काम ते अहमहमिकेने करीत होते. पुणेकरांच्या छिद्रान्वेषी जिभलीला अशी कामे करणारांना चितपट करण्यात जोर न चढता तर विशेष होते! समाजसुधारकांवरील सर्व आरोप प्रा. माटे यांच्याही वाट्यास आले. वाया गेलेला माणूस, चोरटे अस्पृश्यतानिवारण करणारे भिकारडे, महारांच्या घरी गोमांस खाणारे, व्यभिचार व जारकृत्यांसाठी मांगिणीशी रमणारे अशी अभिरुचीहीन व क्रूर आलोचना त्यांचीही केली गेली. अस्पृश्य माटे, महार माटेमास्तर ही उपाधी तर मोरपिसासारखी ह्या श्रीपादाने आयुष्यभर मिरवली.

'उपेक्षिताचे अंतरंग' आणि 'भावनांची मांडवी' हे माटे यांचे कथासंग्रह. त्यातील एकेक व्यक्तिरेखा-एकेक माणूस बाणासारखा गच्च रुतणारा असा आहे. बन्सीधर, पिऱ्या, सत्या, बेमट्या, तबा, रामवंशी-देवकाई ही माणसे मनातून हलत नाहीत इतकी वेधक व जिवंत आहेत. 'चित्रपट' या आत्मचरित्रात माट्यांच्या व्यक्तिगत आयुष्याबरोबरच अन्य घटक म्हणजे गाव, सामाजिक संकेत, रीतीभाती या सगळ्यांचे प्रत्ययकारी दर्शन घडते. केसरी प्रबोध, महाराष्ट्र सांवत्सरिक विज्ञानबोध, पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ, परशुराम चरित्र, अनामिका, रसवंतीची जन्मकथा, साहित्यधारा, विचारमंथन-या त्यांच्या लेखनात विद्वत्ता, स्वतंत्र अन्वयार्थ, मूलतत्त्वांचा शोध, अत्याधुनिक युक्तिवाद, आर्जवी भाषाशैली आणि स्वतःच्या मननचिंतनाची भक्कम बैठक यांचे विलोभनीय मिश्रण झाले आहे.

विचार हा शलाकेसारखा असतो. तो जगाच्या कानाकोपऱ्यातून कोणाहीकडून आला असला, तरी माटे यांना तो स्वीकारार्ह व पुनरुच्चारार्ह वाटतो. त्यामुळे प्रा. माटे यांच्या वैचारिक बैठकीत; रूसो, गटे, न्यूटन, वाल्टेयर, टॉलस्टाय, नेपोलियन, तैमूरलंग, मॅक्समुल्लर, हिंडेनबुर्ग, वॉशिंग्टन, टिळक, आगरकर, सावरकर, ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, ग्रे, बायरन, ल्यूथर, मिल्टन, सिसेरो, सीझर, कोलंबस, रामजोशी, भर्तृहरी, देवल, नॅन्सेन, पेरी, स्कॉट, पाश्चर, आर्यभट्ट व जगन्नाथ; अशा असंख्य नामवंतांची-विचारवंत, तत्त्वज्ञ, लढवय्ये, संशोधक, कवी, समाजशास्त्रज्ञ कलावंतांची स्वाभाविकपणे गर्दी उसळते.

प्रा. श्रीपाद महादेव माटे यांच्या उपलब्ध लेखनसंभारातूनहीं त्यांच्या मनाची जडणघडण कशी होती, याबद्दलचे निःष्कर्ष काढता येतात. माणसांच्या प्रयत्नवादाबद्दल व प्रगतीबद्दल त्यांना प्रगाढ विश्वास होता. साहित्य हे समाजजीवनाबाहेर संभवू शकतच नाही, अशी त्यांची धारणा होती. त्या काळातील सामाजिक बांधीलकीचे ते विश्वस्त होते. सर्व जातीजमातींच्या काटेरी व खडकाळ जीवनातील वाटा-आडवाटा त्यांनी मनस्वी सहानुभूतीने जाणून घेतल्या होत्या, त्यातल्या कार्यकारणभावाचेही त्यांना भान होते.

इहवादावर त्यांची भक्कम निष्ठा होती. प्रपंचवादाचा नेटका आणि नेमका अर्थ त्यांनी ओळखला होता. भूतदया पण कोरडी नव्हे, किंवा नुसतीच तात्त्विक पातळीवरची त्यांना अमान्य होती. प्रत्यक्ष कृतीने यथाशक्ती माणसांची व माणुसकीची

सेवा करण्याचे व्रत त्यांनी स्वीकारले होते. कोणत्याही धर्मातील धार्मिक अंधःश्रद्धा त्यांच्या त्वेषाला कारण होत असे. संताच्या साहित्याचे व कणवेचे तत्त्वज्ञान जरी त्यांनी मान्य केले होते तरी त्यांना भाबडेपणा व खुळचट भक्ती नामंजूर होती. इंग्रजी भाषा, वाङ्मय व मूल्यसंकल्पनांतून जरी त्यांची उदार अशी जीवनदृष्टी विकसित पावली होती, तरी भारतीयत्वाचा व मराठमोळेपणाचा त्यांना योग्य तो अभिमान होता.

त्यांनी 'विज्ञानबोधाच्या' प्रस्तावनेत व अस्पृश्यांच्या प्रश्नात सामाजिक विकासाबद्दलचे चिंतन मांडले आहे. जात हे हिंदू समाजाचे संमिश्र पण सांस्कृतिक विषमता निर्माण करणारे धर्ममूल्य आहे. एक व्यवस्थेची सुसूत्र व हजारो वर्षांची चौकट जातीच्या ह्या बळकटीला कारणीभूत ठरली आहे. तुकाराम तात्या पडवळ यांचा (१८६५) 'जातीभेद विवेकसार' , पं. सातवळेकरांचे स्पर्शास्पर्श (१९११) व काशिनाथशास्त्री लेले यांचे 'स्पर्शास्पर्शखंडन' (१९१२) त्याचप्रमाणे श्रीधरशास्त्री पाठक, विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेखनही त्यांनी बारकाईने वाचले असावे.

त्यांचा व्यासंग हा संदर्भ, दृष्टांत, युक्तिवाद, ग्रंथनिर्देश अशा रीतीचा नाही. किंवा एकाच सूत्राभोवती पिंगा घालत 'जितं मया' म्हणणाऱ्या स्वयंकेंद्रित रुक्ष स्वरूपाचाही नाही. स्वयंशोधित गोष्टीभोवती भाविकपणे व लाडिकपणे रुंजी घालण्याचीही त्यांची लकब नाही. अनुभवांच्या परीक्षणनलिकेत वस्तुनिष्ठ निष्कर्ष स्वीकारणाऱ्या विचारवंत समाजवैज्ञानिकाची सूक्ष्मता त्यांच्याकडे आहे. त्यामुळे त्यांचे लेखन ठाशीव पण आर्जवी, सहज पण मर्मस्पर्शी व मोजके पण धारदार उतरले आहे.

संस्कृती, प्रगती व कितीतरी गोष्टींचा माट्यांचा आग्रह त्यांच्या वैचारिक निबंधातून दिसतो. पण नवे विचार समजले म्हणजे जुन्यांचे ओझे वा दडपण एकाएकी टाकता येत नाही याची त्यांना जाणीव होती. त्यामुळेच 'भाग्य, नियती' हे शब्द त्यांच्या तोंडी नेहमी असत असे त्यांचे परिचित सांगतात. माझ्या अठरा वर्षांच्या सहकारी व स्नेही प्रा. शांता ज. शेळके या त्यांच्या आवडत्या विद्यार्थिनीपैकी एक. त्यांच्या मिष्कीलपणाचे व दैनंदिन व्यवहारातील दिलदारपणाचे किती तरी किस्से त्यांनी आत्मीयतेने सांगितले आहेत. एक आदर्श प्राध्यापक हा माटे यांचा लौकिक अखेरपर्यंत कायम होता. डॉ. म. पु. केंदुरकर यांनी तर त्यांचे वर्णन 'संवेदनशील जीवनभाष्यकार साहित्यिक' असे केले आहे. प्रा. शंकर वैद्य यांनी 'एक खबरदार पुरुष' अशा उपाधीने त्यांचा गौरव केला आहे. श्री. पु. गोखले त्यांना ज्ञानपिपासू निर्भीड शैलीकार असे म्हणतात. डॉ. गंगाधर पानतावणे 'प्रारंभकाळातील मनःपूर्वकता व आपल्या मर्यादांसह अस्पृश्यातील काही वर्गात त्यांनी जे कार्य केले ते नाकारता येत नाही,' अशी ग्वाही देतात. श्री. पु. भागवत त्यांच्या व्यक्त होणाऱ्या 'दृढ सामाजिक जाणीवेचे' आलेखन करतात.

आपल्या निबंधलेखनाने सामाजिक निदान करणारे, सामाजिक न्यूनांचा शोध घेत, त्याची कारणे शोधीत त्यावरील गंभीर भाष्य मोंदवणारे भाष्यकार, श्रद्धायुगाला शह देणाऱ्या बुद्धिवादाच्या पहाटेच्या लोकहितवादी, फुले, आगरकर, विष्णुबुवा व म. दयानंद यांच्यानंतरच्या पिढीतील खंदे कार्यकर्ते व आचारविचारात सुसंगतीचे सूत्र

पेलणारे आणि आयुष्याला खुजे करणाऱ्या गोष्टींची चीड बाळगणारे बापूसाहेब प्रा. श्री. म. माटे आपल्या प्रिय पत्नीचा व कन्या सुधा फडके आणि पुत्र डॉ. मधु यांचा अखेरचा निरोप घेऊन २५ डिसें. १९५७ रोजी दिवंगत झाले. त्यांच्या जन्मशताब्दीनंतरही त्यांचे कार्य व लेखन पाहताना-

"परंतु आज... परंतु भय्या... आला हा आला शब्दांचा शहाशिवाजी
हा आला अर्थाचा अधिराजा... रसरंगाचा राजेश्वर!"

असे मनमोहन नातू यांचे काव्योद्‌गार आंतरमनात निनादून उठतात.

(आकाशवाणी, मुंबई केंद्राच्या सौजन्याने. व्याख्यान : मार्च १९८८)

९. मिष्किल प्रतिभेचा अज्ञात शाहीर : जानबाजी

स्वातंत्र्याआधीचे दशक म्हणजे सत्ताधीश ब्रिटिशांच्या उग्र वर्तनाचा कालखंड म्हणावा लागेल. हिंदुस्थानावरील आपली पकड सैल होत असल्याचे त्यांनाही जाणवू लागले होते. त्यामुळे विविध निर्बंधाचे दडपण वाढत होते. आणि त्यामुळे भारतीय समाज हा तळागाळातून अनेक अंगांनी प्रकट होत होता शिक्षित, अल्पशिक्षित व अशिक्षित अशा गावकुसाबाहेरील बहुजनातही याची स्पंदने उमटत होती.

श्रमात आकंठ बुडालेला व दारूच्या घोटात व्यापसंतापांचा विसर पाडू पाहणाऱ्या समाजालाही करमणुकीची गरज असते. हे मनोविनोदन त्यांच्या रोजच्या धकाधकीच्या जीवनातले प्रश्न, त्यांना खळखळून हसवील आणि विचारप्रवणही करील, अशा बोलीभाषेत असल्यास, ते प्रभावी ठरल्याशिवाय राहत नाही.

वऱ्हाडातील नागपूर, हिंगणघाट, पुलगाव, बडनेरा व अकोला या गावांची व त्यात कापडगिरण्यात, जिनिंग फॅक्टरीत, तेलांच्या कारखान्यांत आणि अशाच अनेक आनुषंगिक छोट्यामोठ्या चरितार्थपोषक उद्योगांत राबणाऱ्या उपेक्षितांच्या आयुष्याचा आढावा या दृष्टीने मोठा उद्बोधक आहे. 'लोकनाट्य' हा शब्द जन्माला येण्याच्या आधीपासून वऱ्हाडातील महार जमातीत 'दंडार' हा प्रकार लोकप्रिय व प्रगल्भ अवस्थेत होता. ह्या 'दंडारी'मध्ये अनेक खेळ व नकला सादर केल्या जात. माझ्या लहानपणी काही 'दंडारी' पाहण्याची मलाही संधी मिळाली होती. ढोलकीचा दुमदुमणारा आवाज, गणगवळणीची बतावणी, नाचणाऱ्यांची पैजणांनी छुमकणारी भिरंगती पावले आणि कोणत्याही विशेष रंगरंगोटीशिवाय गर्दीने वेढलेल्या कलाकारांनी एकदम सुरू केलेली स्फोटक, हास्योत्पादक किंवा उपरोधपूर्ण पद्यबद्ध 'नाट्या'ला सुरुवात होत असे. हिंदीभाषिक प्रदेश, राजसत्ता तेथे असल्यामुळे वऱ्हाडी बोलीच्या जोडीला हिन्दीमध्येही 'दंडारी'चा खेळ रंगायचा आणि-रंगवून-दंग करून टाकायचा. अर्थ पुरता कळत नसे. पण एक दोहा त्यावेळी आम्ही सगळी लहान मुले म्हणत असू—

चार बासका मंडवा गढा है
बत्ती लगी है ग्यासकी ।
क्या भडवे, नाक लगाता?
नक्कल मेरे पास की! ॥

मराठवाडा साहित्य परिषदेने चालविलेल्या 'प्रतिष्ठान' या वाङ्मयीन मासिकात नव्या कवींच्या मूलप्रेरणा आदिंबाबतची एक प्रश्नावली पाठवून काही लेख छापले आहेत. डिसेंबर १९६६ च्या अंकात वरील ओळी मी उद्धृत केल्या आहेत, तेव्हापासून वऱ्हाडातील ह्या विविध विषयांवरील रसाळ व चुरचुरीत नकलांचा कर्ता कोण याचा मी प्रयत्न करीत होतो. माझे ज्येष्ठ चुलते राणोजी नारायण मेश्राम, वडील तानाजी नारायण मेश्राम, त्यांचे मित्र विश्राम बोरकर, बळीराम चिंधू उके, हनवत उके, मारोती आणि माझे एक दुसरे चुलत काका कान्होजी मेश्राम; वगैरे लोक ऐन तारुण्यात असताना, या नकला दंडारीत म्हणत असत. पैकी काही लोकांशी बोलण्याचा मला योग आला नाही. पण जेव्हा जेव्हा शक्य झाले तेव्हा काहीशी मी सतत चर्चा व संपर्क साधीत आलो. एवढ्या प्रचंड लेखननिर्मितीतील काही हस्तलिखिते हाती लागावीत म्हणून माझी धडपड होती. पुन्हा फक्त पन्नास साठ वर्षेच उलटली होती. पोटाच्या आणि संसाराच्या ओढघस्तीने गांजलेल्या, घरगुती व इतर अनेक प्रश्नांनी जेरीस आलेल्या व कित्येक छोट्यामोठ्या व्यसनांनी हल्लक झालेल्या या दंडारीतील अनेक कलाकारांपैकी, कोठे ना कोठे काही हस्तलिखिते उपलब्ध होतील असा विश्वास होता. राजोबा आणि जानबा शाहीर यांच्याबद्दल बोलताना, किंवा नकलेत शेवटी त्यांच्या नाममुद्रेचा उल्लेख होताना तर हा विश्वास अधिकच बळावत होता. चारेक वर्षांपूर्वी काही जीर्ण कागद मला मिळाले. त्यात हिंदी, मराठी मिळून जवळ जवळ शंभराच्यावर नकला, कथानके आहेत. एका ठिकाणी लेखनाचा स्पष्ट नामोल्लेखही आहे. सन एकोणीसशे बत्तीस असा. तुकडे पडणाऱ्या पण ठळक अक्षरातील या कागदावरून, मिळालेल्या लेखनांतून जानबा शाहीरांच्या प्रतिभेचा व व्यक्तिमत्त्वाचा परिचय घडवण्याचा हा पहिलाच व प्राथमिक प्रयत्न आहे.

जानबा शाहीराबद्दलची माहिती परिपूर्ण मिळाली नाही. काही तारखांच्या उपलब्ध नोंदीवरून त्यांच्याबद्दलची परिचयात्मक माहिती थोडक्यात अशी सांगता येईलः

जानबा शाहीरांचा मृत्यू ३ जानेवारी १९४३ रोजी झाला. त्यावेळी त्यांना साठ वर्षे झाली होती. त्यावरून इ. स. १८८३ च्या सुमाराचा त्यांचा जन्म झाला असावा. त्यांना दोन बायका होत्या. एकीचे नाव जनाबाई व दुसरी विठाबाई. त्यांना मुलगा मात्र नव्हता. फक्त एक मुलगी होती. जिचे लग्न अकोला शहरातील, देशमुख फाईल या वस्तीत केले होते.

जवळ जवळ तीनशेच्यावर नक्कला, नुक्के, कथानके, झगडे व लोकरंजनार्थ, लौकिक आयुष्यातील घडणाऱ्या अनेक छोट्यामोठ्या प्रसंगांवरील पद्यरचना त्यांनी केली आहे. पौराणिक कथानकांवर आधारलेल्या लेखनातही मूळ कथांची रंगत वाढविणारे

कल्पित प्रसंग त्यांनी घातले आहेत. लोककथांचा व आख्यायिकांचा कुठे कुठे आधार आहे, तरी काही ठिकाणी तो सुद्धा नाही. संत नामदेवाचे लग्न, गोरा कुंभार, चिलया आख्यान, ह्या हिंदी पद्यात हे जाणवते.

जानबा शाहीर मोहता मिलमध्ये कपडाखात्यात जोडी चालवायचे. सर्व श्रमिकांशी व परित्यक्ताशीच मिळून खाणेपिणे, उठणेबसणे असल्यामुळे त्या जीवनातले सगळे रंगढंग त्यांच्या लेखनास कारणीभूत ठरणे स्वाभाविक व अपरिहार्यच होते.

मनुष्याच्या सर्वसामान्य गरजांपैकी श्रमिक जीवनात आणि उच्चवर्णियांनी व धर्मकर्मने, तसेच सवर्णांनी नाकारलेल्यांच्या आयुष्यात, आहार व मैथुन ह्या दोन घटकांचे प्राबल्य अधिक असते. त्यामुळे खाण्याच्या आणि समागमाच्या प्रसंगातील कितीतरी बारकावे मोठ्या प्रमाणावर त्यांच्या लिखाणातून प्रकट होतात. दोन सवतींचे भांडण, मोठ्या बहिणीच्याच नवऱ्याशी वेडे चाळे करणारी तरुणी, त्यामुळे निर्माण झालेले चक्रीवादळ, खाण्याची चटक जिभेला असल्यामुळे त्याचे भोगात घडणारे पर्यवसान, गवळणीचे भांडण, लग्नाला उतावीळ झालेला नवरदेव, त्याच्या घरात व कुटुंबात घडलेले उपद्रवी अपशकुन, मेहुण्याची फजिती, गावपंचांपुढे उद्दामपणा करणाऱ्या घरघुशी बायका, शिंदळकी करणारे स्त्रीपुरुष-विविध व्यवसाय करणाऱ्यांच्या आयुष्यातील अनंत सुखदुःखाचे, विनोद-उपहासाचे; बीभत्स-कडवटपणाचे, कनवाळू क्रूरतेचे, बेपर्वा, सैलानिपणाचे कित्येक प्रसंग जानबा शाहीरांनी मोठ्या खुमासदार रीतीने रंगविले आहेत.

स्वातंत्र्य मिळण्याच्या आधी जरी ते मरण पावले तरी एकोणीसशे एकवीसपासून बदललेल्या राष्ट्रीय चळवळीचे व नेतृत्वाचेही जानबा शाहीरांना भान होते. १९४२ च्या चलेजाव चळवळीच्या संदर्भात त्यांनी म. गांधीजींवर एक नक्कल लिहिली होती. ती समग्र अद्याप मिळाली नाही. पण आकोला शहरातील माळीपुरा विभागात दंडारीचा कार्यक्रम चालू असताना लोकांनी आग्रह करून जानबा शाहीरांना ती नक्कल म्हणायला भाग पाडले होते. त्या नकलीचा आरंभ असा होताः

दाता दुनियाके गांधी महाराज
चरखा चलाके लेंगे स्वराज ।

तेव्हा या विषयावरील त्यांचे लेखन उपलब्ध व्हायला हवे आहे.

ढोलक तुणतुणे, (वऱ्हाडकडच्या महारी बोलीत चोंडकं असे म्हणतात.) सुरेल टिपेचा दमदार आवाज, अभिनय गतिमान करणारी खटकेबाज रचना, बोलीभाषेतील स्वरागम, स्वरविश्लेष, वर्णविपर्याय, पुरुषांनीच केलेल्या स्त्रीभूमिका, नाचणारा नाच्या आणि तीनही बाजूंनी लोकांच्या गर्दीनी वेढलेली 'दंडार' त्यामुळे खूप लोकप्रिय होती.

उपलब्ध हस्तलिखितांतील, 'नाऱ्याचे लग्न, नक्कल चंद्रभागेची व नक्कल सुंदरची'ही तीनही कथानके विवाहप्रसंगाशी निगडित आहेत. लेखनच इतके बोलके आहे की वऱ्हाडी महारी बोलीत असूनही आशय उलगडत जातो.

चार बासका मंडवा गढा है
बत्ती लगी है ग्यासकी ।
क्या भडवे, नाक लगाता?
नक्कल मेरे पास की! ।।

मराठवाडा साहित्य परिषदेने चालविलेल्या 'प्रतिष्ठान' या वाङ्मयीन मासिकात नव्या कवींच्या मूलप्रेरणा आदिंबाबतची एक प्रश्नावली पाठवून काही लेख छापले आहेत. डिसेंबर १९६६ च्या अंकात वरील ओळी मी उद्धृत केल्या आहेत, तेव्हापासून वऱ्हाडातील ह्या विविध विषयांवरील रसाळ व चुरचुरीत नकलांचा कर्ता कोण याचा मी प्रयत्न करीत होतो. माझे ज्येष्ठ चुलते राणोजी नारायण मेश्राम, वडील तानाजी नारायण मेश्राम, त्यांचे मित्र विश्राम बोरकर, बळीराम चिंधू उके, हनवत उके, मारोती आणि माझे एक दुसरे चुलत काका कान्होजी मेश्राम; वगैरे लोक ऐन तारुण्यात असताना, या नकला दंडारीत म्हणत असत. पैकी काही लोकांशी बोलण्याचा मला योग आला नाही. पण जेव्हा जेव्हा शक्य झाले तेव्हा काहीशी मी सतत चर्चा व संपर्क साधीत आलो. एवढ्या प्रचंड लेखननिर्मितीतील काही हस्तलिखिते हाती लागावीत म्हणून माझी धडपड होती. पुन्हा फक्त पन्नास साठ वर्षेच उलटली होती. पोटाच्या आणि संसाराच्या ओढघस्तीने गांजलेल्या, घरगुती व इतर अनेक प्रश्नांनी जेरीस आलेल्या व कित्येक छोट्यामोठ्या व्यसनांनी हल्लक झालेल्या या दंडारीतील अनेक कलाकारांपैकी, कोठे ना कोठे काही हस्तलिखिते उपलब्ध होतील असा विश्वास होता. राजोबा आणि जानबा शाहीर यांच्याबद्दल बोलताना, किंवा नकलेत शेवटी त्यांच्या नाममुद्रेचा उल्लेख होताना तर हा विश्वास अधिकच बळावत होता. चारेक वर्षांपूर्वी काही जीर्ण कागद मला मिळाले. त्यात हिंदी, मराठी मिळून जवळ जवळ शंभराच्यावर नकला, कथानके आहेत. एका ठिकाणी लेखनाचा स्पष्ट नामोल्लेखही आहे. सन एकोणीसशे बत्तीस असा. तुकडे पडणाऱ्या पण ठळक अक्षरातील या कागदावरून, मिळालेल्या लेखनांतून जानबा शाहीरांच्या प्रतिभेचा व व्यक्तिमत्त्वाचा परिचय घडवण्याचा हा पहिलाच व प्राथमिक प्रयत्न आहे.

जानबा शाहीराबद्दलची माहिती परिपूर्ण मिळाली नाही. काही तारखांच्या उपलब्ध नोंदीवरून त्यांच्याबद्दलची परिचयात्मक माहिती थोडक्यात अशी सांगता येईलः

जानबा शाहीरांचा मृत्यू ३ जानेवारी १९४३ रोजी झाला. त्यावेळी त्यांना साठ वर्षे झाली होती. त्यावरून इ. स. १८८३ च्या सुमाराचा त्यांचा जन्म झाला असावा. त्यांना दोन बायका होत्या. एकीचे नाव जनाबाई व दुसरी विठाबाई. त्यांना मुलगा मात्र नव्हता. फक्त एक मुलगी होती. जिचे लग्न अकोला शहरातील, देशमुख फाईल या वस्तीत केले होते.

जवळ जवळ तीनशेच्यावर नक्कला, नुक्ते, कथानके, झगडे व लोकरंजनार्थ, लौकिक आयुष्यातील घडणाऱ्या अनेक छोट्यामोठ्या प्रसंगांवरील पद्यरचना त्यांनी केली आहे. पौराणिक कथानकांवर आधारलेल्या लेखनातही मूळ कथांची रंगत वाढविणारे

कल्पित प्रसंग त्यांनी घातले आहेत. लोककथांचा व आख्यायिकांचा कुठे कुठे आधार आहे, तरी काही ठिकाणी तो सुद्धा नाही. संत नामदेवाचे लग्न, गोरा कुंभार, चिलया आख्यान, ह्या हिंदी पद्यात हे जाणवते.

जानबा शाहीर मोहता मिलमध्ये कपडाखात्यात जोडी चालवायचे. सर्व श्रमिकांशी व परित्यक्ताशीच मिळून खाणेपिणे, उठणेबसणे असल्यामुळे त्या जीवनातले सगळे रंगढंग त्यांच्या लेखनास कारणीभूत ठरणे स्वाभाविक व अपरिहार्यच होते.

मनुष्याच्या सर्वसामान्य गरजांपैकी श्रमिक जीवनात आणि उच्चवर्णियांनी व धर्मकर्मने, तसेच सवर्णांनी नाकारलेल्यांच्या आयुष्यात, आहार व मैथुन ह्या दोन घटकांचे प्राबल्य अधिक असते. त्यामुळे खाण्याच्या आणि समागमाच्या प्रसंगातील कितीतरी बारकावे मोठ्या प्रमाणावर त्यांच्या लिखाणातून प्रकट होतात. दोन सवतींचे भांडण, मोठ्या बहिणीच्याच नवऱ्याशी वेडे चाळे करणारी तरुणी, त्यामुळे निर्माण झालेले चक्रीवादळ, खाण्याची चटक जिभेला असल्यामुळे त्याचे भोगात घडणारे पर्यवसान, गवळणीचे भांडण, लग्नाला उतावीळ झालेला नवरदेव, त्याच्या घरात व कुटुंबात घडलेले उपद्रवी अपशकुन, मेहुण्याची फजिती, गावपंचांपुढे उद्दामपणा करणाऱ्या घरघुशी बायका, शिंदळकी करणारे स्त्रीपुरुष-विविध व्यवसाय करणाऱ्यांच्या आयुष्यातील अनंत सुखदुःखाचे, विनोद-उपहासाचे; बीभत्स-कडवटपणाचे, कनवाळू क्रूरतेचे, बेपर्वा, सैलानिपणाचे कित्येक प्रसंग जानबा शाहीरांनी मोठ्या खुमासदार रीतीने रंगविले आहेत.

स्वातंत्र्य मिळण्याच्या आधी जरी ते मरण पावले तरी एकोणीसशे एकवीसपासून बदललेल्या राष्ट्रीय चळवळीचे व नेतृत्वाचेही जानबा शाहीरांना भान होते. १९४२ च्या चलेजाव चळवळीच्या संदर्भात त्यांनी म. गांधीजींवर एक नक्कल लिहिली होती. ती समग्र अद्याप मिळाली नाही. पण आकोला शहरातील माळीपुरा विभागात दंडारीचा कार्यक्रम चालू असताना लोकांनी आग्रह करून जानबा शाहीरांना ती नक्कल म्हणायला भाग पाडले होते. त्या नकलीचा आरंभ असा होताः

दाता दुनियाके गांधी महाराज
चरखा चलाके लेंगे स्वराज ।

तेव्हा या विषयावरील त्यांचे लेखन उपलब्ध व्हायला हवे आहे.

ढोलक तुणतुणे, (वऱ्हाडकडच्या महारी बोलीत चोंडकं असे म्हणतात.) सुरेल टिपेचा दमदार आवाज, अभिनय गतिमान करणारी खटकेबाज रचना, बोलीभाषेतील स्वरागम, स्वरविश्लेष, वर्णविपर्याय, पुरुषांनीच केलेल्या स्त्रीभूमिका, नाचणारा नाच्या आणि तीनही बाजूंनी लोकांच्या गर्दीनी वेढलेली 'दंडार' त्यामुळे खूप लोकप्रिय होती.

उपलब्ध हस्तलिखितांतील, 'नाऱ्याचे लग्न, नक्कल चंद्रभागेची व नक्कल सुंदरची'ही तीनही कथानके विवाहप्रसंगाशी निगडित आहेत. लेखनच इतके बोलके आहे की वऱ्हाडी महारी बोलीत असूनही आशय उलगडत जातो.

जानबा शाहीराच्या लेखनात जाणवतो तो मिष्कीलपणा. अत्यंत खेळकर व खोडकर ढंगाने त्यांनी शब्दांची मांडणी केली आहे. सुंदरच्या नकलेतील लग्नाची तिथी शिमग्यात येणे, ऐन लग्नवेळी सुंदरने आपल्या 'मयतराकडे' जाणे, नवरा लग्नाच्या खुशीत दारूत तर्र असणे आणि सुंदरच्या आईने आपल्या नवऱ्याला उद्देशून-

जरा पोरीवर ठेवला नाही दाब
मुराट्याखराट्या तुझा खाना खराब
कोणता विचार करावा
नवरा येईल पर्णू...लग्न माझ्याशी लावा

असे त्राग्याने भडकून म्हणते तेव्हा तिच्या मनःस्थितीचा उलगडा होतो. अशा कितीतरी जागा त्यांच्या लेखनात सहज येतात. ह्या शाहीराचे सर्व लेखन उपलब्ध होऊन, ते ग्रंथगत झाले, तर मराठी साहित्यात, जानबाजी नकुजी डोंगरे हे नाव वैशिष्ट्यपूर्ण ठरेल असे मला वाटते.

नाऱ्याचे लग्न

पतीराया कानीमनी धरा- आता पोराचे लग्न करा ॥ धृ॥

नाऱ्या वाढून गेला हत्त्याच्यावाणी
पाहून येते माझ्या डोळ्याले पाणी
पोरंबारं हिणवती नाऱ्याले
हाणा याला म्हणती कुवांऱ्याले ॥ १॥

बापानं समजूत केली पोराची
रुपयाची कसणी बांधून हजाराची
सीधी लाईन धरली हे गाडीची
केली यानं तैयारी झाडीची ॥ २॥

कोदामेळीची पोरगी पाहेली एक
केली नाऱ्याची सगाइ-सोयरिक
समजदार हा ईव्हाई
कंका[१] -डाकीण होती इहीणबाई ॥ ३॥

तरणपुरण चारून केला मान
लड्डू जिलेबीले नाही काही वान[२]

करंज्या रोट्या पाची पकवान
जसा दिसे हलवायाचा दुकान
वळे[३] पयेले[४] पापळ[५] तीखट भजे
वाढण करता इहीनबाई लाजे ॥ ४ ॥

जेवला इवाई दोइ दोइ[६] हातानं
वाढू वाढू झाली इहीणीची घाण
पाणी पेलंनं घटघट
ढोरावाणी फुगले याचे पोट ॥ ५ ॥

रातभर चांगली झाली नरम
चार-चवघानं पक्की केली शरम[७]
जातो इवाई घे माझी रामराम
वैषाखच्या दुजीचा लग्नाचा नेम
लग्नाचा बार चालू ठेवा
जातो इवाई आपल्या गावा ॥ ६ ॥

नाऱ्याला बाप आपल्या गावी आला
त्याच्या इहीनीनं तंट्टा सुरू केला
"या नवऱ्याचा खानाखराबा झाला
लाडाची लेक देली दूरच्या देशाला
पोरगी देली लांब दूर
एका दारूच्या घोटावर" ॥ ७ ॥

दडदड करत आली लग्नाची तीथ
एका बाजूनं पडली घराची भीत[९]
खंडीभर बकऱ्या दबल्या मातीत
नाऱ्याची माय लावे कर्माले हात
याच्या नषीबात[१०] फेरा
आहे नाऱ्या जल्माचा बोहारा[११] ॥ ८ ॥

लागली हळद नाऱ्या झाला पिवळा
अंग्रेजी ताफा वाजे चवघडा
मांगाची सयनाइ[१२] वाजे बाकी[१३]
लागली नाऱ्याले हागीओकी ॥ ९ ॥

आणखी नाऱ्याले सुटला थरकाप
याच्या बापाले येते तीजाऱ्या[१४] ताप
नसती पीडा घरी आली
अवघी बेमारी सुरू झाली ॥ १० ॥

नाऱ्याच्या लग्नात खूब आबदानी[१५]
याची मामी करे घायबरल्यावाणी
याच्या माम्याचं फुटलं नाक
अवघ्या लोकाले झाला धाक ॥ ११ ॥

फुटला नाक वाहे रक्ताचा लोट
याच्या मायंचा दुखत होता पोट
पोट धरून जमिनीवर लोरे[१६]
याच्या चुलत्याचे फुटले डोरे[१७] ॥ १२ ॥

झाडीच्या रस्त्यानं तनघड्या[१८] खात
परणू गेला नाऱ्या झाडी परगान्यात
ह्या नवऱ्याची सासुरवाळी
जवळ आली कोदामेळी ॥ १३ ॥

वरातीच्या मागं धावला वाघोबा
वाघानं मारला नाऱ्याचा आजोबा
वाघ पाहेल्याबरोबर
हागमूत सुटली खरोखर ॥ १४ ॥

नाऱ्या खाते हा गव्हाची सोजी
लग्न लागले त्याचे इतवाऱ्या रोजी
बसले जेवाया रंगरंगाची भाजी
रडत होती देवा नाऱ्याची आजी
"आग लावा अशा लग्नाला
माझा बुळगा भरून गेला" ॥ १५ ॥

नाऱ्याची सासू पाण्याले गेली
ठोकर लागून दुमती[१९] पडली खाली
झाली देवा थंडगार
इच्या भावाले केली तार ॥ १६ ॥

मेली बकरी कोंबडी कारी[२०]
घायबरी झाली अणिक याची सारी[२१]
मांडवाचा तुटून पडला खंबा
तसा याचा सारा[२२] झाला लंबा ॥ १७॥

नाऱ्याचा सासरा रडे घरात
सार झाली याची फिरती वरात
अवघा झाला चकनाचूर
जसा वाहून गेला पूर ॥ १८॥

काही दिवस गेले होऊन
दोघा बापलेकाचं झालं भांडण
पक्की झाली सूत्तमसूती[२३]
नाऱ्याची अक्कल आहे कोती ॥ १९॥

माहे जुलैइ सन एकोनीसे बत्तीस
तारीख चवदा अखाडी एकादस
पाण्यानं लावली होती झळी[२४]
वाजे तालावर ढोलक-छळी
जानबाजी म्हणे झाला नाऱ्याचा नुक्ता[२५]
सहज केला मी पाणी पेता पेता
रामराम सभेच्या लोकाला
नाऱ्याचा नुक्ता खतम झाला ॥ २०॥

शब्दार्थ : (१) कैदाशीण (२) उणीव (३) वडे (४) मध्यम आकाराच्या जाड पुऱ्या (५) पापड (६) दोन्ही-दोन्ही (७) फजिती (८) धडधडत (९) भिंत (१०) नशीब (११) नतद्रष्ट (१२) शहनाई (१३) सुरेल (१४) मुदतीचा किंवा काळा (१५) समृद्धी (उपरोधाने) (१६) लोळे (१७) डोळे (१८) टक्केटोणपे (१९) पालथी (२०) काळी (२१) मेहुणी (२२) मेहुणा (२३) झोंबाझोंबी (२४) संततधार (२५) रचना, नाट्य.

नक्कल चंद्रभागेची

माझ्या चंद्रभागेला आहे गांजणूक मोठी ॥ धृ॥

इव्हाई[१] जवाई[२] गोवारी[३] गोंड
इहोण बोहारी डाकिण रांड,

मुलीला देनाही[४] सुपारीचे खांड
लुगड्याला सात गाठी...
माझ्या चंद्रभागेला आहे गांजणूक मोठी ।। १ ।।

ऐका स्वामी विचार माझा
बेगीन[५] पोरीच्या गावाला जा जा
चंद्रभागेला घेऊन ये जा
आणा दिवाळीच्यासाठी...
माझ्या चंद्रभागेला आहे गांजणूक मोठी ।। २ ।।

बाप लेकीच्या गावाले गेला
धमकी देऊन बोले इव्हायाला,
अवघे गांजता माझ्या मुलीला
गांजणूक कशासाठी...
माझ्या चंद्रभागेला आहे गांजणूक मोठी ।। ३ ।।

बरी इव्हाई नाही तुमची रीत
चंद्रभागेला दुख देता बहुत
तुम्ही शाहाणे असून घरात
रीती ही तुमची खोटी
माझ्या चंद्रभागेला आहे गांजणूक मोठी ।। ४ ।।

(कडी दुसरी)

खरं सांगा इव्हाई हो, पोरीला दुख कशाचे ।। धृ ।।
घरात भरला दाळदाणा बहु
मुंग वाटाणा पिकले गहू
सुनबाईला म्हणे हात नको लाऊ
खाय तांदूळ वासाचँ...
खरं सांगा इव्हाई हो, पोरीला दुख कशाचे ।। १ ।।

घरामंदी करे पाची परकार
पोरीला नाही जरा खाण्याचा धीर
पिवळी पिवळी दाळ भाताच्या वर
घेऊन तूप पैशाचे...
खरं सांगा इव्हाई हो, पोरीला दुख कशाचे ।। २ ।।

रेशमाचं लुगडं जरीची चोळी
इव्हाई बतलाव, बकवा बिनखाली,
तुमची अक्कल कोठे गेली?
ऐकून घेता लेकाचे!...
खरं सांगा इव्हाई हो, पोरीला दुख कशाचे ॥ ३॥

बाप लेकीला पुसे जाऊन
चंद्रभागा सांगे बहू आनंदानं;
'मला नाही कोण्या गोष्टीचं उणं!'
चुंबन घेऊन लेकीचे.
खरं सांगा इव्हाई हो, पोरीला दुख कशाचे ॥ ४॥

(कडी तिसरी)

माझी चंद्रभागा, रांडे! बहु आहे आनंदात ॥ धृ॥

इव्हायाला नाही कोण्या गोष्टीचं उणं
कोठे[६] भरले होते तुपासाखरेनं;
चांगला माझा केला मानदान
बरी आहे त्याची रीत...
माझी चंद्रभागा, रांडे! बहु आहे आनंदात ॥ १॥

नंदा जावा तिच्या अखत्यार[७]
माझी चंद्रभागा आहे मुखत्यार;
धंद्याकामाचा नाही तिला घोर[८]
बसून राहे घरात...
माझी चंद्रभागा, रांडे! बहु आहे आनंदात ॥ २॥

बरी आहे पोरगी आपल्या घरी
तुझ्याजवळ बदलाम[९] सांगता सारी,
कोणाची गोष्ट नका मानू खरी
नको ठेवू ध्यानात...
माझी चंद्रभागा, रांडे! बहु आहे आनंदात ॥ ३॥

चंद्रभागेचे ऐसे झाले हाल
कवी जानबाजीने केली नक्कल

शाहीरीत राजोबाची अक्कल
राणू जोडे सभेला हात
माझी चंद्रभागा, रांडे! बहु आहे आनंदात ॥ ४॥

शब्दार्थ : (१) व्याही (२) जावई (३) असंस्कृत जंगली टोळीवाले (४) देत नाही (५) त्वरेने (६) कोठारे (७) स्वाधीन (८) त्रास (९) बदनाम

नक्कल सुंदरची

सुंदर होती कुवारी, सोयरा आला आंगणात ॥ धृ॥

सुंदर मनाची होती हुशार
गोष्टी काढता पाहेला,[१] वर
तो बुडगा ज्यादा उंबर[२]
नाही आला वो मनात ।
सुंदर होती कुवारी, सोयरा आला आंगणात॥ १ ॥

सुंदर बापाशी बोले हळून
तू बुळग्याले देतं फांदून[३]
देशील तरी मी नाही नांदीन
हेच समज मनात ।
सुंदर होती कुवारी, सोयरा आला आंगणात ॥ २॥

पोरीचे बोल समजला बाप
सोयऱ्याले लावली भलतीच थाप
उठून गेले मग ते आपोआप
सुंदर मनी हासत ।
सुंदर होती कुवारी, सोयरा आला आंगणात ॥ ३॥

सुंदरच्या मनी दुसरा होता ख्याल[४]
म्हणून बापासी केले असे बोल
इचा मयतर होता रंगलाल
त्याच्यावर पूर्ण हेत[५] ।
सुंदर होती कुवारी, सोयरा आला आंगणात ॥ ४॥

(कडी दुसरी)

सुंदरचा मयतर सैलानी होता अलबेला ।। धृ ।।
एक दिवस गेला तो नदीवर
त्याच्या मागून हे गेली सुंदर
पाणी भरून बाया गेल्या दूर
बस्ली[६] हे गुंड[७] घासत
भरून पाण्याचा गुंड आली हासत ।। १ ।।

प्राणसख्या करत होता आंघोळ
येऊन उभी राहिली त्याच्या जवळ
तुझं माझं खूब जमलं जोळं[८]
तुसीन[९] हौस फेडीन
गुंडानं पाणी झोके हासून बोले प्रेमानं ।। २ ।।

प्राणसख्या जीव देईन तुमच्यासाठी
जसं मानालं मी नेईन शेवटी
भागवचन[१०] झाले नदीच्या काठी
तेव्हापासून सोळ बखत[११]
चित्त देऊन ऐका पुढं याची[१२] कैफत ।। ३ ।।

प्राणसख्याले पाहिल्याशिवाई
कधी सुंदर अन्न छेळत[१३] नाही
माहीत नव्हतं कोणासि काही
असे चाले वो सदा
या प्राणसख्यावर पूर्ण मान[१४] फिदा ।। ४ ।।

(कडी तिसरी)

प्राणसख्याशिवाई नाही गमत मला ।। धृ ।।
असं जीव वाटे राहू त्याच्यापाशी
नाही वाटंत लग्नाची खुशी
बारा महिणे झाले न्हाण आल्याशी ।। १ ।।

एक दिवस निजला तो भावजीच्या घरी
जाऊन मी बसलो त्याच्या शेजारी
एका बुढ्ढीनं मला पाहिलं तरी
पोरगं पाठवलं तिनं
मला प्राणसख्यानं खेतलं[१५] मांडीत दाबून ॥ २ ॥

प्राणसख्यानं धमकी देली त्यासी
गेला सांगत बुढीच्यापाशी
मीनं केली मनाची खुशी
निघुन आलो बाहेर
त्या बुढीच्यासंगं झाली मासीन[१६] तकरार ॥ ३ ॥

एक दिवशी झाली माझा हाऊस[१७]
मिलाची छूटी इतवार दिवस
पूर्णपोळया[१८] केला आंब्याचा रस
एका बाईच्या घरी
माझा प्राणसख्या खाऊन गेले बाजारी ॥ ४ ॥

(कडी चवथी)

सुंदरले मागाया आले परगावचे लोक ॥ धृ ॥

देण्याचा विचार ठयरला खरा
पोराचा बाप होता कुवारा
त्याचं पोरगं वर नाही बरा
सुंदर मुरडते नाक ।
सुंदरले मागाया आले परगावचे लोक ॥ १ ॥

सुंदरच्या बापानं सगाई केली
सुंदर पाटावर रुसून बसली
सगाई सोयरिक आनंदाची झाली
सुंदर करते शोक ।
सुंदरले मागाया आले परगावचे लोक ॥ २ ॥

रागानं सुंदर बोले बापाले
कधी काय सोयरा मिळत नोहेता तुले

फांदून देलास कुवाऱ्याच्या पोराले
नाही नांदणार आईकं ।
सुंदरले मागाया आले परगावचे लोक ॥ ३ ॥

बापानं पाहेली लग्नाची तीथ[१९]
सुंदरचं लग्न काढलं शिमग्यात
चांगली राहील हे सासूच्या येथं
राहील नवऱ्याचा धाक ।
सुंदरले मागाया आले परगावचे लोक ॥ ४ ॥

(कडी पाचवी)

उभा केला मंडप लग्नाचा सुंदरच्या घरी
सुंदरच्या आंगाले हळद होती
तरी गेली प्राणसख्याच्या येथी
तिला नाही मायबापाची भीती
बसली माय बोंबलत
कसं केल्यावो आता लग्न देऊन शिमग्यात ॥ १ ॥

सुंदरची माय खवळली खूब
जरा पोरीवर नाही ठेवला दाब
मुराट्या खराट्या[२०] तुझा खानाखराब
कोणता विचार करावा
नवरा येईल पर्णू लग्न माझ्याशी लावा ॥ २ ॥

सुंदरच्या यारानं कीव[२१] केली मग
आणून सोडली वाडीच्या मागं
मारलं बापानं... कोठी गेलं तीस सांग?
येईल नवरदेव आत
लग्न लावून तुझे जलम नाही आणत ॥ ३ ॥

आला नवरदेव लागले लगन
खाणंपिणं झालं खूब आनंदानं
सुंदरची वरात पारगावी नेऊन
लग्न खुशीचे झाले
कधी नाही नवऱ्याच्या संगं प्रेमानं बोले ॥ ४ ॥

सुंदरचा मयतर जतरा[२२] पाहून
गेला सुंदरच्या भेटी कारण
सुंदरच्या गावी होती नांगठान[२३]
झाली सुंदरची भेट
तुझ्यासाठी ये नारी चालून आलो झटपट ॥ ५ ॥

सुंदर नवऱ्याच्या येथून आल्यावर
काही दिवसानं धसली त्याचं घरं
खळखळा[२४] बोले पंचांसमोर[२५]
कधी नाही वो निधत
माझा जीव जरी गेला नाही याले सोडत ॥ ६ ॥

पंचालोकानं समज काढून बरी
आणून देली तिच्या बापाच्या घरी
विटाळ[२६] घेतला तिचा पंचानं भारी
झाली सुंदरची कथा,
इक्रम[२७] म्हणे... सुंदरच्या मनात ठरला होता ॥ ७ ॥

नवीन शाहीर मारोती झाला
सुंदरचा नुका[२८] सहज केला
जरासा विसारा[२९] विक्रमनं देला
गोविंदानं दावलं बोट
राजोबाच्या आशीर्वादानं आले नाही पोट[३०] ॥ ८ ॥

शब्दार्थ : (१) पाहिला (२) वय (३) फशी पाडणे (४) विचार (५) जीव (६) बसली (७) पितळी हंडा (८) जोडी (९) तुझ्या सोबत (१०) आणाभाका (११) आणीबाणीचा प्रसंग (?) (१२) कैफियत (१३) स्पर्श करणे (१४) मनःपूर्वक (१५) इशारा केला (१६) माझ्याशी (१७) मनोरथ इच्छा (१८) पुरणपोळ्या (१९) तिथी (२०) उन्मत्त चांडाळ (२१) किमया (२२) यात्रा (२३) ओसाड संकेत स्थळ (२४) बिनदिक्कत, स्पष्टपणे (२५) गावपंचायत (२६) प्रायश्चित (२७) विक्रम (बोरकर?) (२८) चुटका (२९) इशारा (३०) गर्भारपण.

(धर्मभास्कर : दिवाळी अंक १९७८)

१०. लोकशाहीर जानबाजींचा नाट्यरंग

मराठीमधील लावणी, लोककला व लोकनाट्याचे क्षेत्र असे आहे की, ज्यामध्ये खऱ्या अर्थाने समाजातील सर्व थर मनापासून आविष्कृत झाले आहेत. उच्चवर्णीय रामजोशी-प्रभाकर वगैरे शाहिरांपासून तो मुसलमान, जैन, मारवाडी, ढोर, चांभार, महार, मांगापर्यंत जेवढ्या जाती-पोटजाती, आपल्या व्यवस्थेने चिरंजीव केल्या आहेत; त्या सगळ्यांमधूनच कलावंत निर्माण झाले आहेत. राज्याश्रय, सरदाराश्रय व पंडितस्नेह लाभलेल्या शाहिरांना, ग्रंथरूपाने लोकांपुढे राहायला मिळाले. जेवढे शाहीर व त्यांचे लोकनाट्याविष्कारी काव्य आज आपल्या पुढे आहे ते प्रत्यक्षातील लेखनाच्या दहा टक्केही असेल की नाही याची शंका वाटते. आणि मुळातील खरेखुरे अज्ञात काही शोधण्यापेक्षा खूप लिहिलेल्या लोकांवरच पुनःपुन्हा लिहून संशोधक होण्याचा व डॉक्टरेट मिळवण्याचा पायंडा रूढ झाल्याकारणाने, मराठीतले हे शेकडो शाहीर पुढल्या अर्धशतकात पूर्णपणे कालवश होणार अशीच परिस्थिती सध्या आहे. जानबा-राजोबा आणि इतर काही लोक हे अशा अनेक अज्ञात अंधेरातील अनेकांपैकी काही शाहीर होत. त्यापैकी जानबा शाहीर ह्या अकोला-वऱ्हाड प्रांतातील एका कलावंताची ओळख करून देण्याचा स्थूल प्रयत्न केला आहे.

अगदी लहानपणी गावी चालणारा दंडार हा प्रकार खूप वेळा मला पाहायला मिळालेला आहे. इतकेच नव्हे तर माझे मोठे काका राणोजी नारायण मेश्राम, वडील तानाजी ना. मेश्राम, त्यांचे स्नेही बळीराम चिंधू उके, हनवंत उके, विक्रम बोरकर, मारोती तिरपुडे, माझ्या काकूंचे बंधू विश्राम रामटेके, माझे आणखी एक चुलते श्री. कानोजी मेश्राम वगैरे कितीतरी जाती-पोटजातीतले सगळे लोक ह्या दंडारीच्या नादाने धुंदीत जगल्याचे व जगतवागत असल्याचे मी पाहिले आहे. मला अनेक वेळा काकांकडून व वडिलांकडून ऐकल्यामुळे कित्येक नकला व त्यांच्या आरंभीचा तुकडा पाठ होता. "नाऱ्या बेटा तू झाला दिवाणा । हिंडून आलो मी परगाणा" किंवा "झगडा ऐका काऱ्यागोरीचा-दोघ्या वो नारीचा ।" अशी ओळ घोळवतच मी मॅट्रीकचा अभ्यास करीत

असे.

थोडे कळू लागल्यापासून विशेषतः बी. ए. झाल्यापासून (१९६०) ह्या नकला, रचना, पदे, झगडे लिखित रूपात एकत्र मिळाल्यास किती छान होईल असे सारखे वाटायचे. माझ्या घरच्या धाब्यावर अडगळीतल्या कुरतडलेल्या फुटक्या ढोलकीत, किंवा निकामी झालेल्या चोंडक्याच्या (तुणतुणे) बेचक्यात काही कागद मिळालेही होते. पण ठेवून दिल्यामुळे व झुरळ-कसरीमुळे त्यांची अवस्था अशी होती की त्या भुग्यातून काही असंबद्ध शब्दच माझ्या हातात आले. तेव्हापासून प्रत्येक वेळी अकोल्यास गेलो की वेळांत वेळ काढून ह्याचा मी शोध करीत होतो. माझ्या 'हकिकत'मध्ये ही खंत मी खालील शब्दांत मांडली आहे.

"कधी गॅसच्या बत्त्यांच्या प्रकाशात रात्री 'दंडार' होई. धर्मराजाचा भोळेपणा, दोन बायकांचा दादला, लग्नाला उतावळा झालेला नवरदेव, मेहुणीला बनवू पाहाणारा नवरोजी; अशा रूढ खेळांपासून तो कलगीतुऱ्याच्या सवाल-जवाबाच्या प्रकारापर्यन्त सगळे प्रकार ढोलकी-तुणतुण्याच्या साथीवर केले जात. हे होतानाही भरपूर प्यायल्यामुळे धर्मराजाचा झोक जात असे. दोन बायकांचा दादला रागावण्याऐवजी, खराच पेंगत असे. उतावळा नवरदेव संवाद विसरून 'नाच्या'च्याच भोवती घोटाळत राही. पण वस्तीतली माणसे त्यांना साथ देऊन प्रोत्साहित करायला विसरत नसत. शाळांतून शिकणारे आमच्यासारखे काही, आपल्या पालकांचे–नातलगांचे हे जाहीर धिंडवडे आणि त्याचेही कौतुक करणारे वेगळे रसिक पाहून चक्रावल्यासारखे बसून राहात." (हकिकत व जटायू–पृष्ठ २९)

मधल्या काळात माझे चुलते, काका, मारोती,, हनवत, विक्रम वगैरे लोक पासष्ट-सत्तरीपुढे जाऊन कालवशही झाले होते. मामांकडून व वडिलांकडून मिळणाऱ्या माहितीच्या व कळणाऱ्या आठवणींच्या आधारे मी अकोल्याच्या भेटीत सतत प्रयत्नशील राहायचा. अशाच धडपडीत जानबा शाहिराची नाममुद्रा असणाऱ्या हस्तलिखिताचे शे-दीडशे कागद मी प्राप्त करू शकलो. हिंदुस्थानी व महारी वऱ्हाडीतील जवळ जवळ ऐकशे पंधराच्यावर विविध विषयांवरल्या नकला यात आहेत. काही उपरोधिक, काही हास्योत्पादक, काही बीभत्स, काही कडक तर काही उच्च अभिरुचीच्या व कल्पकतेच्या अत्यंत तरल अशा ह्या लेखनातील काही नमुने मी येथे देत आहे.

शाहीर जानबाजी यांची जन्मतारीख उपलब्ध नाही. पण त्यांचा मृत्यू ३ जानेवारी १९४३ रोजी झाला. मरणकाळी त्यांना साठ वर्षे पूर्ण झाली होती त्यावरून इ. स. १८८३ च्या दरम्यान त्यांचा जन्म झाला असावा.

अकोल्याला मोहता मिलमध्ये कपडा खात्यात ते कामाला होते. मिलच्या चाळीत ते राहायचे. त्यांना दोन बायका होत्या. एकीचे नाव जनाबाई, दुसरीचे नाव विठाबाई असे होते. त्यांना मुलगा नव्हता. पण एक मुलगी होती. काही दिवसांनी चाळीतील जागा सोडून ते देशमुख फाईल येथे राहायला गेले. तेथेच त्यांनी आपल्या मुलीचे लग्न केले.

ऐकीव माहितीवरून त्यांच्या नकलांचे तीन मोठे बंद होते. ह्या वह्या त्यांच्या काही मित्रांनी वाचायला व लिहायला किंवा 'दंडार' सादर करायला म्हणून अनेक वेळा हाताळल्या आहेत. एकेका 'वही'त जवळपास लहानमोठ्या सव्वाशेच्यावर लावण्या, झगडे, पदे, व्यंगे, उपदेशपर, आध्यात्मिक, स्वराज्याच्या चळवळीवर, चरखा, सत्याग्रह, कलगीतुरा, सवाल-जवाब, कूटे, समस्या, अंकबांधणी, बाराखडी, गूढान्वय अशा तऱ्हेच्या लेखनात रस घेतलेला दिसतो.

त्यावेळच्या श्रमिक व परित्यक्त आयुष्याला प्रिय असणारी नारायण देवाची, बाहारदेवाची, माईच्या देवाची, महादेवाची, इनाईची, मारबतीची गाणीही त्यांनी रचली व काही अत्यंत छोटी आणा दोन आणेवाली प्रकाशनेही काढलीत.

दिसायला गोरेपान, रुबाबदार उंची, गोड गळा व शैलीदार गायन ह्यामुळे जानबा शाहीर अत्यंत उमद्या व्यक्तिमत्त्वाचे असे पुरुष होते ते पटते.

'चले जाव' चळवळीवरही त्यांनी लिहिलेल्या कवनाला 'दंडारीच्या' कार्यक्रमात अकोल्यातील माळीपुरा विभागात उत्स्फूर्त व धीट मागणी लोकांनी केली होती. तेव्हा त्यांनी लोकाग्रहास्तव माळीपुरा चौकात ती नक्कल म्हणून लोकांना मुग्ध केले होते.

गोंड, भिल्ल, कोरकू व गोवारी लोकांच्या लोककथांचा आणि कित्येक आख्यायिकांचा रंग आणि शब्दकला जानबा शाहिरांच्या कवनात आणि गायनात येते. पौराणिक कथा-कहाण्यांचे हे झालेले विलक्षणीकरण वेधक असल्यामुळे त्यांची संत नामदेवजीकी शादी, मुनिमकी करामत, करम और लक्ष्मी का झगडा, नारदजीकी धमाल, विठ्ठलभक्ती, चिलयाची नक्कल वगैरे रचना गंभीर विचार करायला भाग पाडणारी आणि काही नवे अन्वयार्थ सूचित करणारी आहे.

पाहुणचार, खाण्या-पिण्याचे पदार्थ, तऱ्हेतऱ्हेचे संकेत, घरघुशी स्त्रिया, सैलानी पुरुष, नदीकिनारी होणाऱ्या भेटीगाठी, सख्ख्या बहिणींचे झालेले सवतीसवतीचे नाते, खाण्याच्या व जिभेच्या चोचल्यापायी परधर्मी पुरुषाशी संबंध ठेवणाऱ्या स्त्रिया, दारिद्र्य व पतीचा रक्षकाचा दुबळेपणा, विहीण-व्याही, व्याहीव्याही, साळे-भाटवे (मेहुणे-दाजी) आणि लग्न, दिवाळी, सणवार, पाहुणचार, खादाडपणा, निलाजरेपणा आणि नलकंडपणा (कमरेचे डोक्याला गुंडाळण्याची दडपी प्रवृत्ती) व कितीतरी कुटुंबजीवनातील चढउतार जानबा शाहिरांनी सहजपणाने शब्दबद्ध केले आहेत. त्यांचा स्वतःचा आत्मविश्वास व त्यांच्या कवनाचे गायन करणारांनाही त्यांच्याबद्दलचा विश्वास अनेक नकलांतून प्रकट होतो.

वऱ्हाडीच्या अनेक लकबा जानबा शाहिरांच्या लेखनात स्वाभाविकपणे येतात. 'ळ' च्या ऐवजी 'र', स्त्रीनेही स्वतःचा प्रमाण मराठीत पुल्लिंगी वाटावा असा उल्लेख करणे, प्रश्नार्थक मग-अनुस्वारयुक्त 'मंग' असा वापरणे, भाटो, दाजी, इव्हाई यांच्यातील स्वाभाविक संवाद साकार करण्यासाठी बोलीचेच वाक्प्रचार वापरणे आणि तालासाठी व म्हणताना काही ऱ्हस्वदीर्घ किंवा विश्लेषयुक्त बदल होणे, हे देखील आढळते.

त्यांच्या पाच मिष्कील कवनांचे हे प्रथमदर्शन.

जानबा शाहिरांचे पूर्ण नाव जानोजी नकुजी डोंगरे असे होते. राजोबा नावाच्या

शाहिराला ते आपला गुरू मानीत.

१. झगडा दोघ्या गवळणीचा

दहीसाथीमधी विक्री करत बसल्या वो गवळणी ।
दह्यादुधाचे घेऊन शिरी माठ
करून आल्या अवघ्या गवळणी थाट
त्यांच्यामधी दोघ्या होत्या खऊट[१]
त्या बसल्या जवळ मिळून ।
दहीसाथीमधी विक्री करत बसल्या वो गवळणी ॥१॥

आमच्यापाशी चांगले दही दूध ताक
चक्क्याचं दही खोवा[२] आहे ठीक
दही दूध घेण्याशी येतात गिऱ्हाईक
चाखून पाहतात घेऊनी ।
दहीसाथीमधी विक्री करत बसल्या वो गवळणी ॥२॥

कोणी गिऱ्हाईक असे येतात बाई
आंबट म्हणून ते घेत बी नाही
फुकटाचे चाखून खातात दूध दही
ऐसे केले कितिकांनी ।
दहीसाथीमधी विक्री करत बसल्या वो गवळणी ॥३॥

काही गवळणींची विक्री होऊन
निघून गेल्या घरी माठ घेऊन
ह्या दोघ्या गवळणी तेथेच राहून
विक्री करत मागुनी ।
दहीसाथीमधी विक्री करत बसल्या वो गवळणी ॥४॥

(कडी दुसरी)

एक भटजीबोवा आले दही लोणी वो घेण्याला
पहिल्या गवळणीच्या बसून समोर
दुसरीकडं पाहून पादे दूर दूर
आला भटजीला कढीचा जोर
घेऊन लोण्याचा वास
भाव सांग खरोखर मी आलो जरूर घेण्यास ॥१॥

दुसरी गवळण उठली साध्या मनाची
भटजीला उठवला हात धरून दोन्ही
सत्य देतो ना पाहा माझं लोणी
भटजी उठला लोभानं
धावून पहेलीच गवळण धरले भटजीचे कान ।।२।।

माझ्यापाशी नव्हते का दही नि दूध
उठून गेले काय झाला अपराध
कशी भटजी तुमची कळीची बुद[३]
कान हालवे घाई... घाई
अरीरीरी भटजी म्हणे तू सोड ग बाई ।।३।।

दुसरी गौळण म्हणे का भटजीबोवा
माझ्यापासचा वाईट आहे काय खोवा
घेतले कानाशी म्हणून देतो शिव्या
धरली जोरानं शेंडी
भटजी म्हणे चुतळीचे पाडतो का माझी लेंडी ।।४।।

(कडी तिसरी)

दोघ्या भांडत उठल्या बांधला कमरेला शेव ।
एकमेकीचा झोटा[४] धरून
हालवू लागल्या मोठ्या जोरानं
भटजी लोणी खातो चोरून हातानं
दहीचा मारे फुर्का
का ग का ग नका भांडू दोघींचा देतो सार्का[५] ।।१।।

अधिक दोघींची खूब झाली झटापट
पटापट तुटली चोळीची गाठ
भटजी बोवानं गिळलं सटसट
मध्येच आडवा झाला
होता झाडाचा खुबा[६] त्याच्यात कास्टा अडकला ।।२।।

असा भटजीचा कास्टा होता ढिला
दोघींचा झगडा त्या कास्ट्यात झाला
उगामुगा भटजी उभा राहिला

धरला कास्टा म्हणून
एकमेकीला धरून ओढत त्याच्या कास्ट्यातून ॥३॥

झटका लागून कास्टा भटजीचा सुटला
मोठ्या जोरानं कल्ला[७] करून उठला
तवा झगडा त्या दोघींचा सुटला
बस्ल्या दुकानावर
विक्री करा खुशीने बोले जानबा शाहीर ॥४॥

शब्दार्थ : (१) खाष्ट, (२) खवा, (३) भांडणाची दुर्बुद्धी, (४) जटा, केस, (५) सारखा, (६) झाडाचे खोड, (७) ओरडा.

२. नक्कल उमाभीमाची

एका नारीचे नाव होते उमा
जात होती दादा मिलाच्या कामा
इच्या नवऱ्याचे नाव होते कालू
डोक्याले बांधे चालीस हात शालू
लंबे लंबे नखं जसे भालूचे भालू
झाडाच्यावानी उंचापुरा लंबा
जसा गरीबाच्या घरांचा खंबा ॥१॥

उमाची सासू खाते तमाखू
भीत रंगवली जशी थुकूथुकू
घर सारवलं इनं वोकूवोकू
दिवसभर लावे उमा काजरकुकू
तूपगूळ पोई[१] खाऊन झाली ताजी[२]
नवऱ्याले वाढे रोज कण्या-भाजी ॥२॥

या नारीच्या पायामधी तोळा
नाकाच्या नथणीले मारे आसोळा[३]
तोळयाच्या कमरीले करदोळा
रस्त्यानं चाले हे जसा रणगाडा
पानं खाऊन लाल लाल तोंड
करदोळयानं इची सुजली वं फेंड[४] ॥३॥

इच्या नवऱ्याची वस्ती खेड्याची
इथं खोली यानं घेतली भाड्याची
अक्कल हारवली या आंगणझाड्याची
नाटक आली होती हत्त्याघोड्याची[५]
उमा म्हणे आज पाहू नाटकऽऽ
चाल नवऱ्या! बंद होईल फाटकऽऽ ॥४॥

आडीज वाजता आली नाटक पाहून
डोळे लाल झाले हिचे उमद्यानं[६]
म्हशीच्यावाणी पसरली उताणी
झोप लागून गेली कुंभकर्णावाणी ॥५॥

पहिला पोंगाडा मिलाचा झाला
तसा चेव[७] इच्या नवऱ्याले आला
रात्री स्वप्नात दिसला मले डोंगा[८]
उठ गे उमे! झाला मिलाचा पोंगा ॥६॥

मोठ्या जुल्मानं जागी झाली उमी
गेली हागाया थाली घेऊन रिकामी
उशीर झाला म्हणून बसली रडत
हागोळी निघाली धावत पळत ॥७॥

उमी घराकडं आली पलटून
इच्या बहिणीचे आता ऐका गुण
इची बहीण रानहेल्याच्यावाणी
तिचा नवरा दिसे पिल्यांच्यावाणी ॥८॥

पैशावर भुलून गेला इचा बाप
इच्या कर्माला लावून दिली बाप[९]
हे भीमा होती जवानीच्या रूपात
जात सोडून इनं केली उपात[१०] ॥९॥

(कडी दुसरी)

भीमा कामिना[११] हे दिसे रूपवान
केला मयतर जातीचा मुसलमान ॥धृ॥

मुसूर मुसूर[१२] खाते मेवामिठाई
खाऊन बसली त्याची अवघी कमाई
लड्डू जिलेबी खाते ऐना[१३] माल
रुंद झाल्या फेंडा फुगले इचे गाल ॥१॥

इच्या पिवशीत[१४] अत्तेराची कुपी
कुटन[१५] होती सगी इची फुपी[१६]
खात होती सग्ग्या भाचीची भाड
लेकीच्यावाणी करे तिचा लाड ॥२॥

हे भीमा नार आहे चमकबिजली
मेवामिठाईनं फेंड इची सुजली
इचा सासरा होता आप्पलपोट्या
खरोखर नवरा इचा हांडीचाट्या[१७] ॥३॥

आला होता मुसलमानाचा सण
हे भीमा नार आली रजा घेऊन
हासु हासु सांगे त्या मयतराले
आज ये जा तुम्ही माझ्या घराले ॥४॥

पाहात होती भीमा मयतराची वाट
सहज फिरता फिरता आला झटपट
नरम गदेल्यावर केला बिछाना
आंगाडोगा[१८] झाला अवघा धिंगाणा ॥५॥

दिह्याच्या [१९] देवरी झाली लोंबाझोंब
अवघ्या गावात आली भीमाची बोंब
बोंब झाली... उठून पराली[२०]
दिसत नाही भीमा बेपत्ता झाली ॥६॥

वाशीमले जाण्याचा नेम केला होता
तीन दिवसांनी लागला भीमाचा पत्ता
खुशीनं जाईन मी नाही भेणार
खुशी बाईची मी नाही येणारऽऽ ॥७॥

गुरू राजोबा अलबेला कवी
जानबाजीनं हे झडती केली नवी
मारोती म्हणे तरी[२१] लावे नाक
नाक लावून भीमा पेते ताक। ॥८॥

शब्दार्थ : (१) पोळी, (२) घष्टपुष्ट, (३) झटका, (४) नितंब, (५) सर्कस-हत्ती-घोडे असलेली, (६) जाग्रण, (७) जाग, (८) शीड असलेली होडी, (९) पीडा, (१०) उत्पात, (११) कामिनी, (१२) चविष्टपणे, (१३) निवडक, (१४) पिशवी-चंची, (१५) कुंटीण, (१६) आत्या, (१७) कर्तृत्वहीन, (१८) अंगसंग, (१९) दिवसाढवळ्या, (२०) पळाली, (२१) रचना.

३. नक्कल बाळयाची

बाळयासाठी चंपीला देलं लहानपणात ।
चंपीच्या बापाने पाहुनी वर
लहानपणी बाळया दिसे सुंदर
गिजरे[१] डोळे त्याचे जैसा सोजर[२]
खेळे पोरी वो बारीत ।
बाळयासाठी चंपीला देलं लहानपणात ॥१॥

बाळयाची सोयरीक–सगाई केली
बाळयाच्या बापाले लै खुशी झाली
बाळयाच्या लग्नाची गडबड झाली
खुषी करीन लग्नात ।
बाळयासाठी चंपीला देलं लहानपणात ॥२॥

आता बाळयाचे निघाले लग्न
बाळयाचा बाप होता हावसून[३]
वरात काढून त्याची थाटाबाजानं
येऊन उभे मांडवात ।
बाळयासाठी चंपीला देलं लहानपणात ॥३॥

लागले लग्न चंपीचे बाळयाच्या संगं
घरी वरात आली बाळयाची मंग
सुटले कांकण ऐका बाळयाचे ढंग

सदा फिरे वो गावात ।
बाळयासाठी चंपीला देलं लहानपणात ।।४।।

(कडी दुसरी)

बाळया दावे बायकोला जवानपणाचे रंग ।।धृ।।

घडीच्या घडी लुगडं नेसावा
चोळी टाकून शेव खांद्यावर घेवा
कापसाचे थान उचे करावा
बायकोपुढे करून ढोंग ।
बाळया दावे बायकोला जवानपणाचे रंग ।।१।।

वाळयानं टाकून नाकात नथ
हाती सिकासल्ले[४] मटकावे[५] हात
दंडात कोपरबाया सरी गळयात
करते घडीचे सोंग ।
बाळया दावे बायकोला जवानपणाचे रंग ।।२।।

दळण दळे बाळयाची बायको लवकर
जाऊन बाळया तिच्याजवर[६]
जातं फिरवू वो लागे गरगर
गाणे गावे तिच्यासंगं ।
बाळया दावे बायकोला जवानपणाचे रंग ।।३।।

सदा हात ठेवून बाळा कमरेवरी
शिरावर ठेवून पाण्याच्या घागरी
दररोज बाळया पाणी आणतो तो घरी
जाऊन पोरींच्या मांग ।
बाळया दावे बायकोला जवानपणाचे रंग ।।४।।

(कडी तिसरी)

कसं करू मामाजी दैवं माझं हीन
लहानपणी माझे स्वयंवर केले
पैसा लावाया नाही तुम्ही भेले
माझा नवरा मासी बोले ना चाले

केले लग्न हौसेनं ।
कसं करू मामाजी दैवं माझं हीन ।।१।।

काय सांगू मामाजी तुमासी हाल
बिलकूल वाईट माझ्या नवऱ्याची चाल
काही नाही त्यांच्यात कांद्याचं फोल[७]
काय करू मी राहून ।
कसं करू मामाजी दैवं माझं हीन ।।२।।

कसे नशीब माझे झाले वाईट
नवऱ्याला नाही जीव कणीकीचं पीठ
बिलकूल नाही जशी जाण्याला वाट
द्यावे मला जी धाडून ।
कसं करू मामाजी दैवं माझं हीन ।।३।।

अवघं सासऱ्यानं समजलं मनात
नेऊन दिले तिच्या बापाच्या येथ
बळीराम-राणू असे बोले सभेत
ठेवून जानबाचा मान ।
कसं करू मामाजी दैव माझं हीन ।।४।।

शब्दार्थ : (१) घारे-निळे, (२) सोल्जर-गोरा, (३) उल्हासात, (४) वाक्या, अंगठ्या वगैरे, (५) डौलात हलवणे, (६) जवळ, (७) पौरुषहीन.

४. नक्कल हावशाची

हावशा होता जवान झालं बुडगीवर मन ।।धृ।।

घरची बायको आहे चांगली सुंदर
जरासा प्रेम नाही तिच्यावर
मुले-बाळं घेऊन राहे दूर दूर
बसते मनी झुरून ।।
हावशा होता जवान झालं बुडगीवर मन ।।१।।

लागला हावशाले बुडगीचा छंद
रात्रंदिवस राहे तो तिच्यात धुंद

घरात बसे कवाड करून बंद
म्हणे कोणी पाहीन ॥
हावशा होता जवान झालं बुडगीवर मन ॥२॥

बकऱ्याची कलेजी करून चटाका[१]
दारूचा घोट मग पिण्याला बाका[२]
ह्या दारूनं दिला बुडगीला झोका
जशी बनली जवान ॥
हावशा होता जवान झालं बुडगीवर मन ॥३॥

राहे रात्रभर बुडगीच्यापाशी
दावे जवानीची बुळगीले खुशी
बुडगी बोले मंग हावशाच्यापाशी
घ्यावे हाऊस[३] फेडून ॥
हावशा होता जवान झालं बुडगीवर मन ॥४॥

(कडी दुसरी)

हावशाच्या बायकोशी बुडगी भांडे दररोज ॥धृ॥

बुडगी आहे म्हणून हटतो का तुले
पाहून तुझा नवरा माझ्यावर भुले
जसं सांगीन तसं हुकुमानं चाले
काय होते गे तुझ्यानं
सबूर कर माझे सवती येऊन घरात बशीन ॥१॥

हावशाची बायको रागा भरमानी
किती बुडगीले बोलू जोरानी
तरी नाही गे तुले मक्रवानी[४]
जवान पाहून मन बसते
माझा नवरा गे बुडगे! तुले लेक्रावानी दिसते ॥२॥

नवऱ्याच्या समोर चांगली तुझी घेतो
काय करू मी आपल्या माराले भेतो
तुझ्यासाठी हरघडी माहेरा जातो
म्हणून मी झुरतो मनात
खातो अन्न पण गोड नाही लागत ॥३॥

अगे माझे सवती खरं तुझं झालं
ऐकून घे माझ्या बुडगीचे हाल
जवान काय माझ्यासमोर लागलं अशी बाई मी दिसतो
तुझ्या नवऱ्याच्या मनी कशी बाई मी बसतो ॥४॥

(कडी तिसरी)

मले सोडून बिचाऱ्या लागला बुळगीच्या छंदी ॥धृ॥

अशी काय तुले बुडगीची हाऊस
कैसं तुझं मन तिच्यावर खुश
बिलकूल नाही माझ्याकडे पाहास
विचार कर काही मनी
पसंत केलास बुडगीले दिसतेस मायेच्यावानी ॥१॥

बुडगीचं नाव तू घेणार कोण
तुले बुडगी पण मले जवान
मी समजतो आलं बुडगीला न्हाण
माझा मन खूब ठसला
तू गेली तर परवा नाही तिच्यात मन फस्ला ॥२॥

काय करू असं येते मनात
लेकराचा फासा माझ्या पायात
निघून गेलो असतो कोण्या गावात
मुलं-बाळं सोडून
माझे वनवासी लेकरं फिरतील ह्या बुळगीविण ॥३॥

म्हणून पाहिला मी पुढचा विचार
कवरीक[५] हे बुळगी मजा करणार?
याचा न्याय करंल जानबा शाहीर
बसल मनातला खुटका[६]
ज्याचा असंल हाल त्याले लागलं मनात चुटका[७] ॥४॥

शब्दार्थ : (१) चमचमीत, (२) रसिला, (३) इच्छा, (४) लाजलज्जा, (५) कुठपर्यंत, (६) खंत, (७) चुटपुट-आच.

५. झगडा दोघ्या बहिणींचा

एका गावी दोघ्या बहिणी गजरी, मालन ॥धृ॥
लहान बहीण गजरी लाडाची होती
जवानपणी मेला लग्नाचा पती
बहिणीच्या नवऱ्यावर बिघडली मती
म्हणे त्याले दाजी—बहिणीच्या नवऱ्यावर झाली खुशीनं राजी ॥१॥

गजरी निघाली भाटव्याचं[१] घर
मालन मनामधी झाली अंगार
गजरीले म्हणे माझ्या छातीवर
येऊन जशी गे तू बसली
एकाएकी माझ्या नवऱ्याचे घर का गे धसली ॥२॥

गजरी म्हणे माझ्या जिवाची खुशी
केली बाईनं जाय गे कोणापाशी
माझं तारुणपण दावतो दाजीशी
तू तं जरागे माथारी[२] म्हणून मला दाजीनं केलं तुया छातीवरी ॥३॥

लागलं दोघ्या बहिणींचं भांडण
येथून झगडा ऐका दोघींचे गुण
एका मायच्या सग्या पोरी असून
झालं सवतीचं नातं-मोठ्या बहिणीच्यापेक्षा लहान मोठी वो अजात ॥४॥

(कडी दुसरी)

दोघ्या बहिणींचं भांडण झालं नवऱ्याच्यासाठी ॥धृ॥
मोठ्या बहिणीले राग आला फार
धावून लाहानीच्या गेली आंगावर
मचली[३] दोघींची खूब झोटमार[३]
आल्या दोघीही भर दमात
होड[४] मचली दोघींची-नवरा जिंकून घे आत ॥१॥

पहली माझे सवती पिंगा खेळावा
जिनं जितलं तिनं नवऱ्याले घेवा
त्याच्यात नाही कोणाले हेवा

पिंगा अनावर खूब रंगा-कश्या गांडीवर पडल्या
वरतं झाल्या टांगा ॥२॥

मग खेळू लागल्या फुगड्यांचा खेळ
मोठी बहीण जसा पाण्याचा हेल[५]
फुगडी खेळता झाले जिवाचे हाल
मागून कासोटा सुटला—हे झाली भोलांडी नवरा हासून उठला ॥३॥

मग मोठीनं रचला पण[६]
थान धराधरी खेळू आपण
लाहानीपेक्षा लंबे मोठीचे थान
बात[७] सापडे हातात-लहान जोरानं हालवे
मोठी आली दमात ॥४॥

दुसऱ्या खेळाचा केला विचार
मागल्या ढुंगणाशी खेळू टक्कर
याच्यामधी जीत कोणाची हार
माहीत पडलं गे आता—दोघ्या राहून भोलांड्या
जोरानं ठोसा मारीता ॥५॥

जशी एडक्याची होते टक्कर
तशा दोघ्या खेळती बराबर
असा आहे त्याइच्या ढुंगणाले जोर
लाहणीची हिकमत सादली-मोठी पडली उताणी
टरकन जोऱ्यानं पादली ॥६॥

झाला आवाज नवरा आला धावत
दोघीले समजावून केले एकात
एकमेकीला नाही सोडत
तवा समजल्या मनी-एकामधी राहू लागल्या बहिणीच्यावानी ॥७॥

दोघ्या बहिणींची झाली नक्कल
तान्याकान्यानं हे केली अक्कल
खूप झाला दोघ्या बहिणींचा खेळ
हासती सभेचे लोक
ऐसे कवी जानबाजी झगडे बनवे हरएक ॥८॥

शब्दार्थ : (१) मोठ्या बहिणीचा नवरा, (२) वयस्कर, (३) भांडणाची वर्दळ झाली, (४) पैज लागली, (५) मडके, (६) वस्त्रशून्य उघडी, (७) लवकर.

(अस्मितादर्श : दिवाळी अंक १९७८)

११. संदेश देणारा दलित शाहीर : जानबा

वऱ्हाडातील मीलमध्ये कामगार म्हणून साच्यावर राबणाऱ्या, जिनिंग फॅक्टरी व इतर श्रमाची कामे करणाऱ्या स्त्रीपुरुषांना 'दंडार' या खेळाचे मोठे आकर्षण होते. त्या समाजातील छोट्या छोट्या आनंदाचे, भोवतीच्या रानावनात जगणाऱ्या गोंड, गोवारी भिल, कोरकू आदि वन्यपुत्रांच्या सहवासाचे व आसक्तीचे क्षण चित्रीत करणाऱ्या लावण्या शाहीर जानबाजींनी खूप लिहिल्या. ह्या नकलांमधून रोजच्या खाण्यापिण्याची भ्रान्त असणाऱ्या ह्या कष्टजीवी लोकांना विनोद, विसंगती आणि मानवी गरजा व मर्यादा यांचे कसे अचूक ज्ञान होते याचा पडताळा त्यांच्या लेखणीतून येतो.

आपल्या मनोविनोदनात भर म्हणून परवडेल त्या छोट्या छोट्या व्यसनांचा व छंदांचाही नक्कलीच्या निर्मितीला हातभार लागला आहे. ह्या ठिकाणी जुगाराचा छंद लागलेल्या जुगारी माणसांचे कौटुंबिक आणि वैयक्तिक आयुष्य कसे हास्यास्पद आणि दयनीय बनते त्यांचे मनोज्ञ दर्शन जानबाजींनी घडविले आहे.

दारू पिण्यासाठी कलालाच्या दुकानावर तसेच दारू विकणाऱ्या भट्टीवर व कलालाकडे कशी नाना निमित्ते काढून चकरा मारणाऱ्या भणंगाचे चित्र एकीकडून हसू आणते, तर दुसरीकडे विषण्ण करते.

दोघा व्याह्यांच्या दारू पिण्याचे, खाण्याचे, कपडे परत मिळविण्यासाठी कुत्राकुत्रीचे सोंग घेऊन भुंकून कपडे मिळवण्याचे त्याचे प्रयत्न अंतर्मुख करतात.

त्याचवेळी लैंगिक व शारीरिक उल्लेख या रचनातून प्रत्यही येतात. कारण लोकजीवनात अशा उल्लेखांना श्लीलाश्लील असा फारसा अर्थ नसतो. केवळ लंगोट्या लावून जेवायला बसलेल्या व्याहीबुवांचा 'झुमक्याचा घोस' विहीणबाईला दिसतो आणि तो खालीवर बघून शरमिंदा होऊन नीट जेवायला बसतो. दारूच्या नशेमध्ये भूक प्रचंड लागलेली असते. आणि तसे अर्धपोटी जगणारा वर्ग नेहमीच पोशाखी मध्यमवर्गापेक्षा अधिक आहार घेतो. पण भूक भागावी म्हणून विहीणबाईंनी

उल्हासाने व लगबगबीने जे काय उसनेपासने मागून पाहुणचाराने भोजन केले होते ते ती व्याहीबुवांना वाढते.

जेवण झाल्यावर ताट उचलताना विहीणबाईचाही कासोटा सुटतो. एकमेकांच्या फजितीची अशी फिटंफाट होते. जानबा हा आपल्या दंडारीच्या श्रोत्यांना व दर्शकांना ह्या व्यसनांच्या विदारकतेचा संदेश देताना दिसतो.

त्याच्या अनेक विषय व अनेक अलिप्त लेखनसामर्थ्याची साक्षी देणाऱ्या तीन नक्कला येथे जशाच्या तशा देत आहे.

नक्कल जुवाराची

एका जुवाराचे हाल घ्यावे ऐकून ।।धृ।।

पहिली हकिगत जुवाराची खरी ।
लागला त्याला छंद जुव्याचा भारी।
दोन दिवस नाही येवा घरी ।
एकटी बायको घरात ।
नाही बायकोची परवा जुवा खेळे दिवसरात्र ।।१।।

पल्ला जीतीमंधी हारी असून ।
गुंड,[१] ताट,[२] गळू,[३] ठेवले गाहान ।
बायकोची चोळी, लुगळं विकून ।
आणखी जुव्यात बैसला।
हारला अवघेही पैसे ।
जितनार जनात हासला।।२।।

आला हारून मनात केला विचार ।
नेसला होता उपरण्याचा धोतर ।
येऊन बायकोच्या समोर ।
धोतर नेसला फाटका ।
या जुव्याच्यासाठी विकला यानं धोतरपटका ।।३।।

विकला कोट कारा होता रंग ।
आणखी जातं, पाटं विकला तो मंग ।
लाखळाची पेटी विकला टरंग[४] ।
विकली हातातली छत्री ।
याची बायको पाहून झाली जसी कावरली कुत्री ।।४।।

घरातलं गेलं अवघं जातंपाटं ।
पाहून बायको मोळे कळाकळ बोटं ।
पिपे विकले नाही ठेवाले पीठ ।
कसा तकदीर माझा फुटला.
हा मुराट्यासारखा[६] नवरा नसीबात भेटला ॥५॥

करी बायको कल्ला[७] अवघ्या गावात ।
तरी भाळयाले[८] मख नाही येत ।
आणखी जाऊन बसला जुव्यात ।
खेळ खेळे झनामना[९]
हे चांदीचे रुपये जैसे वाजत छनाछना ॥६॥

गेला डाव म्हणून करते अरे बापा!
घरी येऊन बायकोला देते थापा ।
बायको म्हणे काय तुम्हाला नफा ।
जिनगानी गेली सारी।
कोणी लेकीचा लेक माझा येईल बोलवाले घरी ॥७॥

अव उगी राहे कल्ला करत कशाला ।
आता पाहे डाव आला एक मला ।
दे तुझे कळे सिका पाटल्या ।
छल्ला, फुलं मासऱ्या आणखी मुंदी ।
डाव येत्याबरोबर देतो सोळऊन आंधी ॥८॥

सिका, छल्ले घेऊन बसला जुव्यात ।
निजली होती बायको एकटी घरात ।
एका शेजाऱ्याच्या आलं मनात ।
जाऊन तिच्यापाशी निजला।
काही[१०] झोपी जागी होती गव्हाचा पानगा शिजला ॥९॥

घरातून शेजारी गेला निघून ।
आला तिचा नवरा थोड्या वेळानं ।
गळबळ करतो हातरुनावर येऊन ।
बायको रागानं उठली।
आताच आल्या होत्या तरी हाऊस नाही फिटली ॥१०॥

मी नाही आलो असंल दुसरा कोणी ।
अशी का सांगतं भांबावल्यावाणी ।
स्वप्न पडलं असंल विच्यार कर मनी ।
खरंच काय व असं झालं ।
झोपी होतीस का जागी कैसी पडली तुला भुल ॥११॥

जुव्याच्या नकलीचा झाला बयान ।
बळीराम[११] , राणू गावे[१२] तो अभीमन[१३] ।
हनवत[१४] मारोती[१५] बालक अंज्यान ।
विक्रम [१६] गोविंदा डोमा हासले ।
दुष्मनाच्या छातीवर तान्या[१७] , कान्या[१८] , संपत बसले ॥१२॥

शब्दार्थ : (१) हुंडा (२) ताट (३) तांब्या (४) टूंक (५) पिसाळलेली (६) कपाळकरंटा (७) ओरडा (८) लाज (९) चढाओढीने (१०) अर्धजागृत-अर्धनिद्रिस्त (११) बळीराम चिंधू डके (१२) राणू नारायण मेश्राम (१३) अभिमन रामटेके (१४) हनवत उके (१५) मारोती तिरपुडे (१६) विक्रम बोरकर (१७) तानाजी नारायण मेश्राम (१८) कान्होजी मुकाजी मेश्राम ह्या तिघांची माहिती अपुरी आहे.

दोघं दारूबाज इव्हाई

काय सांगू बाई नवरा दारूबाज ।
लळे[१] बायको नाहि कवळीची[२] लाज ॥धृ॥

घरामधी नाहि तीळभर अन ।
खायाले गेला भट्टीत घेऊन ।
बापच ऊस्ण[३] दारू पेऊन ।
कलाराले[४] कपडे देऊन ।
भट्टीतून झुकत हा येतो रोज[५] ॥१॥

खायला नसो परवा नोको जाना ।
संध्याकाळी त्याले पेवाले होना ।
बायको म्हणे सदा आनावो आना ।
समजत नाहि म्हणे दारूले म्हणा ।
दारूच्या पाइ ते बायको नाराज ॥२॥

इव्हाई माझा इजतीले येते ।
हरदम घेऊन त्याले भट्टीत जाते ।
दिवसभऱ्याची कीतीक दारू पीते ।
शरम नाहि आणिक डरकत[६] येते ।
लाऊन लंगोटी घरी आले आज ।।३।।

दोघं इव्हाई दारू पेऊन आले ।
घरामधी नव्हतं काहि खायाले ।
दारूच्या झोकान बायकोसी बोले ।
काय आहे घरी कमती खायापियाले ।
तुपातले बनव भजे गुलगुले ।
दारूसंग होना तरकारी तेज ।।४।

(कडी दुसरी)

बायको मने आना खर्चावले घरी ।
दारूपाई जीनगी बुळवली[७] सारी ।।धृ।।

घरामधी नाहि त्या मिरच्यामिट ।
उस्णं मागुन आनलो गवाचं पीट ।
कस्यान सयपाक मी करू चटपट ।
अनीक इंदनाची आली खटखट ।
हमेस मागत फिरतो मी घरोघरी ।।१।।

अनीक कुठून आणु तेल इंधन ।
दारीचं[८] चाटू[९] नेलं उंदरानं ।
घरात नाहि कांदे धने लसुन ।
घरोघरचं उस्णं आणतो जाऊन ।
सदा जलमाचा तू आहेस भिकारी ।।२।।

फुटकेटुटके घरात हेल[१०] ।
पानी पीवाचे होते टीनाचे टमरेल ।
इव्हाई पाहेते अवघे घरचे हाल ।
तरी येत नाही याले अक्कल ।
दारूसाठी करलं दुनियात चोरी ।।३।।

ऊस्णं मागून अवघं आणलो मी सारं ।
म्हणून संयपाक झाला लवकर ।
दोघं इव्हाई जेवले बरोबर ।
पीऊन होते अलममस्त[११] फार ।
तुपसाकर मांगे अनीक ठावावरी[१२] ॥४॥

(कडी तिसरी)

लंगोट्या गांडीले जेवाले बसले ।
इवायाचे केस इहीनीले दिस्ले।
इहीन म्हणे दादा तू जेव बरोबर
तुझ्या मांडीवर नाही पदर
तसा इव्हाई पाहे खालवर
लाजली इहीन मनी करते विचार
(इहिनीले दिसला काय झुमक्याचा घोर[१३])
इहिनीच्या बोलावर इव्हाई हास्ला ।
मांडी मारून सरकून जेवाले बस्ला ॥१॥

वाढू वाढू झाली इहीणीची घाण ।
वरच्यावर मागत होता पोळ्या वरन ।
चीचाच्या[१४] कळीचे फुरके[१५] मारून ।
घामाझोक इहीन गरमीनं ।
जेवले इवाइ ताट सरकवला उस्टा ।
उचलावाले गेली सुटला इहीनीचा कास्टा ॥२॥

सुटला कास्टा इहीन सरमेजून गेली ।
तवापासुन नाहि समोर आली ।
हे चालत्या दिवसापासून पळली ।
इवाया सामोर सरमतीची[१६] झाली ।
कोन्ही कोन्ही आता सरमून बोलते ।
इवायासमोर सेव पदरात चाल्ते ॥३॥

दोघा इवायानं विचार करून ।
तू होय कुत्री मी कुत्रं होऊन ।
लालच्या भट्टीवर चला जाऊन ।
कलारापासून कपडे घेऊन ।

कुत्रं कुत्री होऊन जोरात भुक्ले ।
कलारानं कपडे दोघाचे फेकले ॥४॥

खानेपीने झाले खुब पाहुणचार ।
इवायाले सार केलं लवकर ।
असा इवाइ नाहि होणार ।
झाली नकल ढोलक्या राहे हुशार ।
इवायाचा नूक्त अवघ्याले वटला ।
जानबा म्हणे शाहिर मनात कटला ॥५॥

शब्दार्थ : (१) रडे (२) कवडी (३) वाटेलं तसं (४) दारू (५) हरहंमेश (६) ढेकरा देत (७) बुडविली (८)डाळीचे (९) लाकडी पळी (१०) मडके (११) तर्र (१२) ताटावर (१३) घोस-गुच्छ (१४) चिंच (१५) कढी (१६) शरमिंदी

नक्कल गोंडणीची

झालीस जवान मला दिसत रूपात ।
तरी कूबल[१] मी गोंडाची जात ॥धृ॥

तू दिसत मला बरी । जसी इंद्राची परी ।
तुला घडतो सरी चाल माझ्या घरी ।
जबरदस्तीनं टाकीन तुझ्या गळयात॥१॥

खूब आहेस जवान । जसा नागवलचा पान ।
ठेवजो माझा मान । नको करू गुमान ।
एका रातीत तुला आणिन घरात॥२॥

तुझ्या नेसन्याचा थाट । मला दिसते गजघाट ।
लावीन तुझ्यासीन पाट । आली होतीस तुरीच्या तासात ।
तरी कूबल मी गोंडाची जात ॥३॥

(कडी दुसरी)

हट लेका गुलामा तुसीन काय हसतो ।
तुझ्यासारखे असे पोथारे[२] पुसतो । धृ ।
तू दिसत मला ढिला । जसा जंगलातला कोल्हा ।
हुके हुके करनेवाला । तुझ्यासारख्याच्या छातीवर बसतो ॥१॥

मी गोरी गोरी दिसतो । चवघा लोकात बसतो ।
भाळया तुले काय पुसतो । तुझ्यासारख्यासीन मी काय हसतो ॥२॥

तू कारा कारा गोंड । खात माणसाचे लेंड[३] ।
मागत मला खांड[४] । उघडी तुझी फेंड[५] ।
तू भाळया हलकट मी चौघात बसतो ।
तुझ्यासारखे असे पोथारे पुसतो ॥३॥

(कडी तिसरी)

ठुमकत रस्त्यानं नखरे करत चालते ।
हटकून आधी दारी[६] माझ्याशी बोलते ॥धृ॥

काय तुझ्या मनात । सांग माझ्या कानात ।
तुला नेईन वनात। जसी लिंबोनी मला रूपात दिसते ॥१॥

माझं नाव भिला । मी मलकापुरवाला ।
नको करजो कल्ला । मला पाहून हे रस्त्यात ठुमकते ।
हटकून आधी दारी माझ्याशी बोलते ॥२॥

झाली अर्धी रात । गेलो इच्या घरात ।
हे बसली दारात । धरला इचा हात ।
बसली होती माहालात । उगीमूगीच हासत[७] ॥३॥

(कडी चौथी)

धुंदी गोंडाची लागून गेली चंद्री[८] ।
बटा लावीन मी नावाची गजरी ॥धृ॥

मी ठेंगनीठुंगनी दिसतो । चवघा लोकांत बसतो ।
आज गोंडाशीनं हासतो । चला जाऊ भिला आपन पाहू गुजरी ॥१॥

भाऊ जानबा जवान । भाऊ सित्या लहान ।
ऐक माझं गानं । गोंडीन पाह्याला दिसत होती साजरी ॥२॥

शाहीराचे केले हाले । गोंड चौघात बोले ।
कसा जमवतो टोले[९] । गोंडीनं गोंडाच्या एक झाल्या नजरी ॥३॥

शब्दार्थ : (१) इब्लिस (२) पोतेरे (३) विष्ठा(४) सुपारी (५) मांडी (६)'नखरेवाली नार' ह्या अर्थाचे संबोधनात्मक विशेषण (७) हे क्रियापद असावे, कारण कागदाचा तुकडा उपलब्ध नाही (८) तंद्री-छंद (९) रचना-छंद.

(अस्मितादर्श : दिवाळी अंक १९८२)

१२. एक अज्ञात शाहीर : राजोबा

मराठी शाहीरी काव्य ही खरीखरी लोकाभिव्यक्ती आहे. सामान्यांच्या सुखदुःखाचे, रागालोभाचे, आहार-निद्रा, भय आणि मैथुनाचे सगळे रंग आणि बेरंग याच काव्यातून प्रामुख्याने प्रकटतात. तरी पण सर्व जातीजमातीमधील इतक्या असंख्य लोकांनी ह्या लावण्यांचा नाट्यरंग फुलवला आहे की तो मराठीस सगळा मिळाला तर मोहोंजोदारो संस्कृतीप्रमाणे वेगळ्या व अस्सल लोकजीवनाचा वेध घेता येईल.

अकोल्यास म्युनिसिपालिटीच्या शाळेत शिकत असताना अनेक दंडारी मी पाहिल्या आहेत. रासगर्ब्याच्या पद्धतीने वेगवान होणारा हा प्रकार अत्यंत खिळवून टाकणारा होता. ढोलकी, तुणतुणे, टाळ, नाच्या आणि खड्या पण रंगदार आवाजात गाणारे लोककलावंत असे दंडारीचे स्वरूप होते. त्यात अनेक कवनांतून जानबा आणि राजोबा ही नावे सतत ऐकायचा. जानबा शाहीराची काही हस्तलिखिते जवळ जवळ एकशे पंधरापेक्षा अधिक मला मिळू लागली. हिंदी व वऱ्हाडीत (महारी बोलीत) ती आहेत. त्यातून जानबा कवीही राजोबास आपला गुरू मानतात. जानबा शाहीराचे नाव जानबाजी नकुजी डोंगरे. ते ३ जानेवारी १९४३ रोजी मरण पावले, माझ्याजवळील हस्तलिखितात १९३४ ची एक नक्कल आहे. शेवटी स्पष्ट तिथीचा व काळाचा उल्लेख आहे.

जानबा शाहीराच्या कवनाचे विश्लेषण, अभ्यास व पृथक्करण करीत असतानाच काही ठिकाणी राजोबा शाहीराच्या मुद्रेचा स्पष्ट ठसा आढळला. जानबा शाहीर इ. स. १८८३ मध्ये जन्मले व वयाच्या साठाव्या वर्षी दिवंगत झाले. मोहता मिलमध्ये ते कपड्याची जोडी चालवायचे. त्यांची विवाहित मुलगी व तिचा वंश अकोल्यास देशमुख फाईल येथे आहे. तेव्हा राजोबा त्याच्याही आधीच्या काळातले असावेत. त्यांच्यापेक्षा पंधरावीस वर्षांनी तरी कमीतकमी मोठे असतील. राजोबाजी यांनी रचलेल्या दोन पूर्ण नक्कला येथे देत आहे. त्यातून चित्रदर्शी शब्दशैली आणि रसाविष्कार पद्धतीचा अनुभव रसिकांना आल्यावाचून राहणार नाही.

नक्कल बहीणभावाची

ऐका स्वामी विचार सांगतो तुम्हाला
बहु दिवसा माझा भाऊ पाहुणा आला
माझ्या बायकोनं पाहेल्याबराबर
धावत उठलि पाणी देलं लवकर
पाय धुवून साला हा आंगणात बसला
याच्या ढुंगणाले मग माकोडा[१] डसला ॥१॥

डसला माकोडा तो मोठा चमकला
आपल्या जिवाले साला माझा धोकला[२]
भळभळ जाऊन खंडाऱ्यात[३] वोकला
खोटं नाही सांगत नजरी न हेकला[४]
बहु दिवसा आलो म्हणे भाटोच्या[५] येती
कधी नाही झाल्या अशा जिवाच्या गती[६] ॥२॥

विका आपल्या गांडीचं धोतर
बाजारात जाऊन आणा साखर
माझा बंधु बहु नाही खाणार
आता भाऊ माझा नाही येणार
माझा बंधु आहे भोळ्या मनाचा
बहु दिवसा आला करा मान त्याचा ॥३॥

तुझा भाऊ जसा गोंडाच्यावानी
त्याला पाहून तू झालीस दिवानी
भावाले पाहून मोठी हरकली[७]
डोळ्यांचे काजर नाकाले ल्याली ॥४॥

तरकारी भाजी तूप आणतो लौकर
तरनापुरनाचा आज करजो परकार
करंज्या रोट्या गोडवाण[८] सार
जेवाले बसून आम्ही बराबर
तरनपुरन भात आणिक पिवळी रोटी
उघडी पडून वाढे भावाच्या ताटी ॥५॥

जेवला माझा सारा मग अकातल्यावाणी[९]
घटघट पेला मग घागरभर पाणी
गोळाच्या[१०] मारल्यान खूब सारा जेवला
फुगलं पोट म्हणून हागावाले धावला ॥६॥

तरणपुरण चारून खूब केला मान
हागू हागू केलन साल्यानं घाण
मोठ्या जुलमावर घडीभर तगला
नाही सुदरलं तर धोतरात हागला ॥७॥

माझा साला आहे शरमीचा मोठा
राजोबा शाहीर नाही गाण्यात तोटा
तान्या कान्या दोघं अज्याबी[११] पुतळे[१२]
जाऊन दुस्मानाच्या ठिकरीवर[१३] मुतले ॥८॥

शब्दार्थ : (१) मुंगळा (२) भयभीत झाला (३) पडकी उध्वस्त जागा (४) डोळे फिरवणे (५) मोठ्या बहीणीचा नवरा (६) हाल (७) आनंदित झाली (८) पदार्थ (९) अधाशाप्रमाणे (१०) गोड जेवणामुळे (११) अजब (१२) पुतळे-बहुरुपी (१३) मस्तकावर

बिड्यावाली व तिचा नवरा

इले[१] काही नाही म्हण्लो बिड्या बांधावले गेली ॥धृ॥

गावात होता बिड्यांचा कारखाना ।
त्याच्या बेजून आहे पोलिसठाणा ।
मास्तरी कामावर इचा मेहुणा ।
म्हणे त्याले दाजी-गोंडाच्या पोरावर मन झाले राजी ॥१॥

पानांचे पुडके कैची घेऊन ।
रातभर कातरत होती बिड्याचे पानं ।
रडे देवा इचं पोरगं तानं ।
मारे शिमग्याच्या बोंबा ।
तसा मारला नवऱ्यानं देवजी धसाळ्या[२] कोंबा[३] ॥२॥

पडली उताणी दात पडले बारा ।
दोन्ही पासरकळ्या[४] झाल्या चकनाचुरा ।

वरतून विंचू चावला इले भुरा ।
रडे बिचारी घरा ऽऽ त ।
जमा झाल्या आयाबाया एका लग्नाची वरात ॥३॥

नवऱ्याने मारली वैदुले हाक ।
मंतर बोलून वइदू मारे फुकट ।
सांग वो कुळंगे[५] जशी उपनली राख[६] ।
तरी काहीच नाही झालं ।
कशी लोटांगण घाले निघाली पाठीची सालं ॥४॥

अशी फजिती या बाईची झाली ।
जमा झाले गावचे तेली म्हाली ।
फिरता फिरता आला होता बंगाली ।
विंचू उतरला त्यानं ।
बंगाली दादावर गेली कामिन भुलून ॥५॥

(कडी दुसरी)

जात होता नारीचा नवरा जिनाच्या कामाला ।[७] ॥१॥

साता मणाची खांद्यावर लोत ।[८]
दाबा बगलीमधी सरकीचं पोतं ।[९]
एके दिवशी लागले याला भूत ।
सुटला याले बडबडा ।
याची नार म्हणे मारा, याच्या ढुंगणावर फडा[१०] ॥२॥

भूत पाहायला जमा झाला गाव ।
तू सांगून दे रे भुता आपले नाव ।
भूत म्हणे माझा नाही अन्न्याव[११] ।
माझी नाही रे चुकी ।
मासोळया[१२] भाताची सुगंध आली माझ्या नाकी ॥२॥

त्यावेळी होता बाराचा सुमार ।
घासावर घास घेतो वरच्यावर।
मले देत असता चिमूटभर ।
काय होतं याचं उणं? ।
मासोळया भातावर झालं होतं माझं मन ॥३॥


मले होना[१३] बकऱ्याचा कलेजा ।
त्याच्या वरतून दारू मोहाची पाजा ।
असा तडाखा भारी आहे माझा ।
तैयारी करा अवघी आज ।
मुरमुरे फुटाणे भजे आणिक पचखाज[१४] ॥४॥

बोन[१५] केला दहिभाताचा ।
वैदूनं रक्त देला हाताचा ।
थंडा कलेजा झाला भुताचा ।
भूत झाला थंडागार ।
याचा उतारा घेऊन चला गावाबाहेर ॥५॥

ढोलकवाल्या दे ढोलकीवर थाप ।
ऐकून शाहीराले सुटला थरकाप ।
झाला उताणा आली त्याले झोप ।
वरतुन टोचा एक भाला ।
राजोबा कवीनं चुटका[१६] वाचून देला ॥६॥

शब्दार्थ : (१) हिला-ह्या बाईला (२) देवजी धसाड्या ह्या लोककथेतील बलवान पुरुषासारखा (३) कोपरखळी (४) फासळ्या (५) कूळकलंकिनी (६) मंत्राने मारलेली राख भिरकावली (७) कापूस वेचण्याची जिनिंग मिल (८) ओझे (९) बडबड (१०) झाडू (११) चूक-अन्याय (१२) बारीक सुगंधी तांदूळ (१३) पाहिजे आहे (१४) पचखाजे–बदाम–दाणे वगैरे पदार्थ (१५) नैवेद्य (१६) रचनेतील नाट्यप्रसंग.

(सिंहगर्जना : दिवाळी अंक १९७८)



१३. दंडारीचा कवनकार शाहीर राजोबा

तमाशा व लोकनाट्य हे सर्वांच्या विशेष परिचयाचे शब्द आहेत. 'दंडार' हा अशाच तऱ्हेचा समूहनाट्याचा एक प्रकार आहे. वऱ्हाडातील महार मंडळीत धर्मान्तराआधी 'दंडारी' धूमधडाक्याने होत असत. अतिशय लोकप्रिय व प्रगल्भ स्वरूपात 'दंडार' लोकांचे रंजन आणि उद्बोधन करीत असे. ढोलकीचा थर्रावणारा नाद, साथीला गुंगवणारे तुणतुणे, गणगवळीणीची बतावणी आणि छुमके-पैंजणे बांधलेल्या नाचणाऱ्या नाच्याच्या चाळांची वेगवान लय इतकी वाढायची की वातावरण घुसळून निघायचे.

कलाकारांनी कसलीही रंगरंगोटी केलेली नसे. एखादी पौराणिक कथा, लोकजीवनामधला एखादा स्फोटक अगर करुण प्रसंग, हास्योत्पादक सोपी रचना आणि उपरोधिक कवन धारदार आवाजात सुरू व्हायचे. हातात दांडूएवढ्या लांबीच्या भरीव काठ्या घेतलेल्या आठदहा कलावंतांचे फेर धरून नृत्य सुरू व्हायचे. दांडूवर दांडू, काठीवर काठी ठेक्यात पडायची. वऱ्हाडी बोली व हिंदीमिश्रित भाषेत संवाद सुरू व्हायचे. गुजराथीमधील दांडिया रास किंवा रासगर्बा यांच्याजवळ जाणारी ही दंडार होती.

वरवर पाहिले तर 'दंडार' आणि 'दांडिया रास' यांच्या नावापासून तो प्रत्यक्षीकरणापर्यंत साम्य आढळते. पण 'दंडार' हा नृत्यप्रकार नसून ते 'उत्स्फूर्त पथनाट्य' म्हणता येईल. त्यात दंडारीच्या 'दांडियारासा'चे तेवढ्यापुरतेच साधर्म्य, बाकी सर्व लोकांच्या विशेषतः अवर्णियांच्या आयुष्यातले तेव्हाचे कडूगोड प्रसंग, मुलीचे लग्न, दारिद्र्य, सासरवास, कजागपणा, दोन बायकांच्या नवऱ्याची फटफजिती, भांडकुदळ सवती, बहिणी, विहिणी, व्याही, शिंदळपणा, भोळेपणा, पातिव्रत्य, खादाडपणा अशा सगळ्याच विषयांचे दंडारीच्या खेळात प्रमुख स्थान असे. हे लेखनही कोणा नामवत शाहिरांचे नव्हते. तर त्यांच्यासोबत जगणाऱ्या त्यांच्यातल्याच जानबाजी नकुजी डोंगरे व राजोबा वगैरे लोकप्रिय शाहिरांचे होते.

ह्या दंडारी मी स्वतः पाहिलेल्या आहेत. माझे वडील श्री. तानाजी नारायण मेश्राम,

माझे काका श्री. रानोजी नारायण मेश्राम आणि त्यांचे स्नेही विश्राम बोरकर, बळीराम चिंधू उके, हनवत उके, मारोती तिरपुडे, कान्होजी मेश्राम, माझे मामा श्री. विश्राम सोमा रामटेके वगैरे लोक ऐन तारुण्यात असताना माझ्या वयाच्या पाचसात वर्षांपासून तो बारातेरापर्यंत ह्या विविध नकला मी ऐकल्या होत्या.

१९६२-६३ पासून यातले काही हस्तलिखित कागद मला मिळतील काय म्हणून मी प्रयत्नात होतो. धर्मांतरानंतर तर हा प्रकारही मागे पडला. जुनी माणसे एकामागोमाग एक कालवश होत गेली.

जानबा शाहीर ३ जानेवारी १९४३ ला मरण पावले. साठपासष्ट वय झाले होते. त्यांचे गुरू राजोबा त्यांच्याही आधी निर्वतले होते. धर्मांतर झाले आणि ढोलक्या, तुणतुणे, चाळ मुके झाले. गावाचे शहरीकरण पूर्ण जरी नाही तरी बरेच झाले. लोकशाही काही प्रमाणात पूर्वाश्रमीच्या दलित वस्त्यांकडे वळली. आणि देवत्रिशूळमूर्तीप्रमाणे हे सगळे नष्ट झाले की काय असे वाटत असतानाच काही ढोलक्यांच्या पोकळीत जुने जीर्ण कागद सापडले. त्यांचे वाचन-संशोधन केल्यावर मी त्यावर काही लेखनही केले. त्या 'दंडारीं' मधील ही एक रचना येथे देत आहे. कवन आहे राजोबा नावाच्या शाहिराचे.

नक्कल राईची

लळ[१] केला राईचा भिकाऱ्याले देऊन ।
साजरी सुंदर आहे माझी राई ।
काही अन्याव करत नाही ।
लुच्चा भेटला माझा ईव्हाई ।
घात केला नेऊन ॥१॥

राहीचा नवरा कठुर[२] मोठा ।
जसा पाण्यातला कारा[३] गोटा ।
दिसते पाहावाला मोठा ।
काय देल्या पाहून ॥२॥

राहिची सासू आहे मोठी पाजी ।
खाऊ खाऊ खूब झाली ताजी[४] ।
माझी राही खाते अंबाळयाची भाजी ।
आत तरी आनून ध्यान ॥३॥

बारा वईलाचा आहे किरसान[५] ।
देवा दिपाले[६] आलो मागुन[७] ।

या साळयाची खबर घेईन ।
दहा पाच जोळे[८] मारीन ।।४।।

(कडी दुसरी)

काल माझ्या राईची अशी कशी बातमी आली ।
ठामठुम[९] भरला राजेस्वर[१०] ।
दोई थळयानं[११] पूर बरोबर ।
गवताचा भारा आहे डोकसीवर ।
पुरात वाहून गेली ।।१।।

तितक्यात एक सोकारी[१२] धावला ।
हाळहुळ[१३] पुरात लवला[१४] ।
पताळचा[१५] वाघोबा पोरीला पावला ।
जिवंत निघाली ।।२।।

कालची होती पोळयाची पाळवा[१६] ।
कोनी तरी देव झाली पोरीले आळवा[१७] ।
पताळच्या वाघोबाले फूल चळवा[१८] ।
होती नशिबाची भोली ।।३।।

वाचली राही म्हणून खुब झाला[१९] सुक[२०] ।
हरेक गोष्टीचा आहे पोरीला दुःख ।
मेली म्हणून झाला आम्हाला धाक ।
मनात समजून गेली ।।४।।

(कडी तिसरी)

कसं करू गे रांडे इव्हायाने फंद केला ।
माझ्या राहिले आनावाले जातो ।
आपल्या निध्याने[२१] मी चांगला पाहातो ।
पुरणाची पोळी माझ्या राहीला देतो । ऐसा बोले बायकोला ।।१।।

नवरा बायको दोघं पळली[२२] विच्यारी ।
आनावाले जातो पोरीच्या घरी ।
बाहेना[२३] सांगुन आनतो येथवरी ।
म्हणून लौकर निघाला ।।२।।

रामराम हो रामराम बसा इव्हाई ।
धुवा पाय तुम्ही नाही येणार कई ।
पहेले दाखवा सुंदर माझी राही ।
आलो म्हणे नेवाला ।। ३ ।।

पुळ[२४] दिवाळीचा सण आहे भारी ।
सदा ईव्हाई आहे तुमची न्याचारी ।
नेतो पोरीले मी आपल्या घरी ।
खर्च लागंल काही ।। ४ ।।

घेऊन आला घरी राहीचा बाप ।
आपल्या ईव्हायाले खुब देली थाप ।
आनुन दुसमानाले मांडवात कापा ।
राजोबानं हुकूम देला ।। ५ ।।

शब्दार्थ : (१) रडगाणे (२) कठोर (३) काळा दगड (४) लठ्ठ (५) सधन शेतकरी (६) सूर्यदेवाला (७) मागणे मागून (८) जोडे, खेटरे. (९) तुडुंब (१०) स्थानिक ओढ्याचे नाव (११) थडी, किनाऱ्याने (१२) रखवालदार (१३) बेलाशक (१४) उडी मारली (१५) पाताळाचा ग्रामदेव (१६) वद्य प्रतिपदा (१७) आडवा (१८) चढवा (१९) झाले (२०) सुख (२१) निगराणीने (२२) पडली (२३) बहाणा (२४) पुढे (२५) दारिद्र्य, अगतिकता.

(मराठी संशोधन पत्रिका : ऑक्टो.-नोव्हें.-डिसें. १९८२)

१४. गोविंदाग्रजांच्या तीन विशेष कविता

केशवपुत्राचा 'सच्चा महशूर चेला' असे स्वतःला म्हणविणाऱ्या गोविंदाग्रजांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व तिहेरी होते. नाट्याच्या क्षेत्रात राम गणेश गडकरी व विनोदाच्या प्रांतात बाळकराम ही मातब्बर नावे आहेत. पण गोविंदाग्रजांची पिंडाकृती ही काव्याशी अधिक एकात्म व एकरूप झालेली दिसते. त्यांच्या 'वाग्वैजयंती' ने रसिकांना प्रदीर्घ काळ आनंद दिला. त्यांच्या अफाट कल्पनाशक्तीचा, लवचिक शैलीचा आणि आर्त आविष्कृतीचा ठसा, कित्येकांच्या हृदयात अजूनही अबाधित असल्याचा चमत्कार कवितेबद्दलच आढळतो. समीक्षक, टीकाकार, अभ्यासक आणि रसिकांनी समग्र गडकऱ्यांची डोळस, व्यापक व विस्तृत विचक्षणा केली आहे. तरीही त्यांच्या 'तीन कविता' मला लक्षणीय, नव्याने विचार करण्यासारख्या अशा विशेष वाटतात.

ह्या कवितांचे दर्शनी रूप न्याहाळण्याआधी गडकऱ्यांच्या आणखी एका वैशिष्ट्याचा निर्देश केला पाहिजे. त्यांच्या समग्र 'बाळकराम'चे आलोकन केले, तर समाजजीवनातल्या अनेक व्यंगांकडे पाहण्याची अव्यंग दृष्टी त्यांच्याकडे होती. त्यामुळे लग्नव्यवस्थेपासून तो नाटक मंडळीपर्यंत व स्वयंपाकघरापासून तो व्यक्तिगत संकेत व स्वभावदोषापर्यंत, सर्वत्र त्यांनी लीलया संचार केलेला आहे.

अलौकिकाचा ध्यास बाळगणाऱ्या मानवाचे पाय लौकिकाच्या रिंगणात घट्ट अडकलेले असतात. काहीही नवे करण्याचा विचार मनात आला की, त्याच्या यशाच्या शंकेने मन चरकते. ही चुकचुकणारी 'मनातली पाल' अशुभ संकेत म्हणूनच लौकिकास परिचयाची आहे. केशवसुतांच्या 'हरप'ले श्रेयाचे काही सूर जसे ह्या कवितेत आहेत, तसेच 'कणा मोडला निश्चलतेचा पालीच्या आवाजाने' ह्या मर्ढेकरांच्या कवितेतही ह्या कवितेच्या अन्वयार्थाची सावली पडलेली मला जाणवते.

गोविंदाग्रजांना शब्दयोजनेचे पक्के पण कलात्मक भान आहे. त्यामुळे त्यांची 'मनातली पाल' ही कविता विशेष लक्षणीय झाली आहे.

कोणतेही 'काम' असे म्हणण्यापेक्षा 'कार्य' असे म्हटले की त्या कामाला अधिक महत्त्व प्राप्त होते. 'शुभकार्य' किंवा 'कार्यसिद्धीस नेण्यास' वगैरे शब्दप्रयोगाने मनात जागृत होणारी अर्थवलये अधिक व्यापक व संयुक्त असतात हे स्पष्ट आहे. म्हणून ध्रुवपदातील....'करिता कार्य । चुकचुके पाल ही वाया ।।' ह्या आरंभापासून कविता वेगळी होत गेली आहे. 'वाया' हा शब्दही खास ग्रामीण ढंगातील असल्यामुळे 'वायावीण' आयुष्य आणि कोणतेही महान कार्य आणि त्याचे मिथ्यात्वही कसे एकमेकांस लपेटून वापरते ह्याचाही बोध होतो.

भलते वारे क्षणैक भरले की जगात संभ्रमाचे तरंग पसरतात. पर्शियन कथासाहित्यात एक कथा अशी आहे की एका तज्ज्ञ ज्योतिषाने उद्या विशिष्ट वेळी इराणमध्ये 'वेड लावणारे वारे सुटेल' आणि सगळ्या 'अवाम'वर त्याचा प्रभाव पडेल असे भविष्य राजाला व प्रधानाला कथन केले. त्या दोघांनी कानात बोटे घालून व बांधून इतरांना वेड्याप्रमाणे वागू नका असे सांगितले. पण समस्त झपाटलेल्यांनी त्यांनाच वेडे ठरविण्याची पाळी आणल्यावर त्यांनाही त्यांच्यासारखे वेडेचार करावे लागले व आपला बचाव करावा लागला, अशा आशयाची कथा आहे. हे 'वेडे' वारे कधी सुटेल. सामान्य जीवनाला असामान्यत्व देणारा अद्‌भुत क्षण कधी येईल ते सांगता येत नाही. तो कधी कधीही येऊ शकतो. अगदी मध्यरात्री आला तर नंदलाला जन्माला येताना 'कारागृहिंची उघडति दारे' असे अजब घडून जाते आणि वेड्या ममतेला वाटणारी भीती वा शंकेची चुकचुकणारी पाल व्यर्थ ठरते.

ह्या छोट्या कवितेत मला गोविंदाग्रजांनी सूचित केलेल्या अनेक कथांची, कथानकांची व कथांशांची प्रामुख्याने आठवण होते. दुसऱ्या कडव्यातील 'सजीवतेची उकळी फुटते' ही ओळही विचारप्रवृत्त करणारी आहे. 'सजीवाला' नाही तर सजीवतेला उकळी फुटते. Love and devotion know no obstacles. असे एक इंग्रजी वचन आहे. मीरा आणि राधा ही सजीवाची दोन रूपे आहेत. राधेचा शृंगार हा लोकमानसात तर मीरेची प्रीती जाणकारांत विशेष परिचित आहे. आपल्या प्रियाविषयी पडेल ती किंमत देण्याची शक्ती आणि क्षमता 'नसली जनाची लाज' सुटवायाला कारणीभूत ठरते. हीच सजीवतेची उकळी. आपली प्रीती, ध्येय, आशा कधी फलद्रूप होत नाही म्हणून तडजोड पत्करणे हे निखळ सजीवत्व.

एकदा लौकिकाचा बंध झुगारून मीरेच्या अलौकित्वाची सूचना आली की मग परिभाषा येते अध्यात्माची. 'अहं ब्रह्मास्मि' किंवा 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः।' अशी आत्मजाणीव होऊ लागते आणि आपल्यातील पार्थिवाला जखडून ठेवणाऱ्या स्वार्थी भेकडपणाचा जीव घ्यायला आतूनच अंतःप्रेरणा होऊ लागते. मायेचा भेकडपणा. स्वार्थी वस्तुप्रेमाचा पडदा संपतो आणि शिवशक्ती समावेशनाला आरंभ होतो. मुकुंदराजाच्या 'विवेकसिंधू' ग्रंथातील प्रतीती आणि जागृत कुंडलिनीचा उलटसुलट प्रवास, अमर्याद शिवाची मर्यादित शक्ती व मायिक रूपातील अफाट अनंतत्व यांच्या सीमारेषांवर वावरणारी 'मी-तू'ची रस्सीखेच याचे वेधक चित्रण गोविंदाग्रज जवळ जवळ अध्यात्मकाव्यभाषेतच करतात. तिसऱ्या, चवथ्या, पाचव्या

व सहाव्या कडव्यांत हेच घडलेले दिसते.

सातव्या कडव्यात त्यांच्या काव्यगुरूच्या 'हरपले श्रेय' मधील निगूढ गीतींना चकचकीत लखलखीत रूपात दृग्गोचर होणारे सत्य पुनरावृत होते. आठव्यात 'जीवआत्मा संबंधा'तून क्षणात नाहीसे होणारे 'दिव्य भास' पुन्हा होत रहातात. तेथे कवींनी उपयोजिलेली ओळ "होतो सुखी सदा ज्या गांवी । पुन्हा आठवण त्याची व्हावी ।" आणि देहरूपीची 'कात' किंवा 'खोळी' अथवा 'नसती ब्याद' टाकून पुढच्या प्रवासाला निघण्याची प्रवृत्ती येथे शब्दबद्ध केली आहे. माणसाच्या उद्धाराची, त्याच्या परिवर्तनाची क्रांती-उत्क्रांतीची बीजे त्याच्यातच असतात; पण त्याला अवष्टंभ करणारी 'पाल' ही त्याच्याच मनाला चिकटलेली असते. इतरांशी लढताना इतर अनेक दृश्य शस्त्रांचा वा युक्त्या-प्रयुक्त्यांचा वापर करता येतो. पण 'जेव्हा उपजोनि संसारी । आपण आपुला वैरी' अशी अवस्था येते तेव्हा प्रभूलाच 'ही शंकाशोषिणी पाल मार आणि मला कार्यकर्तव्याला सिद्ध कर!' अशी प्रार्थना करण्यावाचून दुसरा उपायच नसतो.

वस्तुतः गोविंदाग्रज कल्पनाविलासात रमणारे कवी. भावकल्लोळात वाहून जाण्याची आणि रसिकांना तोच अनुभव प्रदान करण्याची त्यांची प्रवृत्ती; पण त्या कवितेत त्यांनी आध्यात्मिक परिभाषा व तिची वैचारिक लय मात्र अखेरपर्यंत सांभाळली आहे. ह्या 'मनातल्या पालीं'चे दहा कडव्यांतून केलेले चित्रण जीवदशेच्या दशावतारांचीच छोटी आवृत्ती मला वाटते.

ह्या कवितेच्या आरंभीची टीप संपल्यानंतर त्यांनी कवितेची रचनाबंदिशी सांगणारी चाल दिली आहे.

'कसे मी मारूं माझे? नवलाचे पाखरू?' ही पारंपरिक गीताची ओळ दिली आहे. ह्यातील 'पाखरू' एकनाथांच्या भारुडाची आठवण करून देते. आणि भारुड जसे लांबण वाटणारे द्व्यर्थी गीत असते तशीच ही कविताही दोन्ही किनाऱ्यावर अर्थ प्रक्षेपित करील अशी संयोजना गोविंदाग्रजांनी केली आहे. आणि म्हणूनच 'वाग्वैजयंती'मधील उपरोल्लेखित कविता मला नमूद करण्यासारखी व नव्याने पुनर्विचार करण्यासारखी वाटली आहे.

'वेडा' ही कविता गोविंदाग्रजांच्या विचारप्रतिभेचे अपत्य आहे. जीवनातील अनेक कूटांनी ते शंकित बनते. आपल्या मनःस्थितीचे प्रतिचित्र त्या 'कोड्यात' ते शोधू पहात आणि स्वतःशीच एक प्रकट प्रश्नचिंतन करीत. 'वेड आणि वेडेपण' ह्या संज्ञांचा शोध त्यांनी वेडा ह्या कवितेतून घेतलेला आढळतो.

त्याचे वेड कशांतुनी उपजले कोणास हे नाकळे
त्याचे त्यासही नाकळे, मज गमे देवाही ना ठाऊके!

ह्या ओळीत त्यांनी उपजले, नाकळे, गमे, ना ठाऊके ह्या क्रियारूपांची केलेली मांडणी लक्षपूर्वक पाहण्यासारखी आहे.

जगाच्या सगळ्या व्यापातापातून दूर गावाबाहेरच्या मोकळ्या ओसाड भयाण मैदानात विमनस्क हिंडणारा वेडा हा त्याचा वरवरचा वर्ण्यविषय आहे. पण त्याचे वेड, त्या

वेडाचे कारण, त्याचे मन आणि ओसाड मनात थैमान घालणारा अतार्किक क्षणार्धरूपेविरूप रेखित करणारा 'वायू' हा त्यांचा चिंतन विषय आहे. आणि 'वेड्या'कडे एकाग्र सहानुभूतीने कवी पहातो आहे. त्याला तो उपहासविषय वा हास्यविषय चुकूनही होऊ देत नाही. उलट, अंतर्मुख करणारा करुण महाभाग ते आपल्यापुढे रेखित करू पाहतात.

वेड्याचे मन कसे असेल? त्याच्या डोळ्यांपुढे, मनःचक्षूंपुढे उमटणारे रंग आपल्या जगातले असतील का? ते अपरिचित असले तरी नाकारण्यासारखे कवीला वाटत नाहीत. 'नवरंग' हा शब्द संसूचनाची शक्ती घेऊन आलेला दिसतो.

'वेडा' ही कविता तीन टप्प्यांत आविष्कृत झाली आहे. प्रत्येक भाग हा चौदा चौदा अशा 'सुनीत' पद्धतीने बांधला आहे. जीवनाच्या विपर्यस्त प्रवासात आशेपेक्षा निराशेचेच घोट जास्त वाट्यास येतात असा अनुभव, 'निराश प्रेमाचे शाहीर' म्हणून ओळखले जाणाऱ्या गोविंदाग्रजांनाही आला होता. म्हणूनच, 'कुणाला कशाचे वेड लागेल आणि त्याचा शेवट कशात होईल हे कोणी सांगावे,' अशा अनिश्चित प्रश्नार्थी टिपेनेच त्यांनी कवितेला सुरुवात केली आहे.

पहिल्या सुनीतावलीत वस्तुस्थिती निवेदन व चित्रण केल्यानंतर कवीने रसिकमनापुढे आणखी मोठा दृश्यफलक मांडला आहे. रुपेरी टिकली लावून दिग्वधूच अवतरावी, संध्येचे कुंकुम पसरलेले असावे आणि 'पश्चिम दिशा' फोडुनि यावी अशी आसमंतात एक 'तारा'-चांदणी लुकलुकू लागते. पश्चिम दिशेचे पटल, कवच, पडदा, वस्त्र, कंथी वगैरे काही न वापरता कवीने पश्चिम दिशा फोडून असा मुद्दाम शब्दप्रयोग केला आहे आणि 'बाहेरली' असा नवा, अनोखा पण अर्थपूर्ण नामधातूही त्यांनी जाणीवपूर्वक उपयोजिला आहे. तिला बघून खूण पटल्याने वेड्याने तिला 'हेरले' बघण्यापेक्षा 'हेरण्यामध्ये' हेत्वाभास आहे. आणि वर गोविंदाग्रजांच्या खास शैलीतील लकब आहे ती 'आशा प्रीति तसेच वेड असले यांनाच ती साधते!' असे एकाग्रतेचे ते चित्रण करतात. व ह्या वेड्याचे 'असले' वेड ह्या सर्वनामसाधित विशेषणाने त्यांचा कवितेच्या विस्ताराचा हेतूही स्पष्ट होतो. दुसऱ्या सुनीतवलयाचा शेवट आहे—

नैराश्यादि विकास तीव्र करिती हा खेळ ऐसा पहा—
आश्चर्ये बघती तयास थिजले डोळे दिशांचे दहा!

वेड्याच्या ओसाड मनातील विकाराला बाहेरलेल्या चांदणीने दिशा दिली. त्याच्या मनोविकाराच्या भरती-ओहोटीचा टिपेतील खेळ सुरू झाला. आणि हा सांकेतिक खेळ त्याच्या सर्व विकारांना घुसळून गेला. पुढे काय घडले म्हणून दशदिशांनी आपले डोळे आश्चर्यातिरेकाने विस्फारले.

मनाच्या मनात घडणारे एक दारुण 'नैराश्यनाट्य' गोविंदाग्रज गडकऱ्यांच्या नाट्यशैलीने कवितेतून पुढे रंगवू लागतात. आणि मैदानातल्या वेड्याला एक व्यक्तिमत्त्व लाभते. ही पर्सनॅलिटी उदात्त व समावेशक आहे. येथूनच अखेरच्या व

तिसऱ्या सुनीतचक्राला गती मिळते.

तोंडातच काहीतरी पुटपुटत या तारेचा वेध घेण्यासाठी निश्चयाने चालू लागलेला तो वेडा, त्या ध्यासापायी अथक पायपीट करू लागला. अनेक वर्षे दमछाक होऊनही त्याला दिलासा देणारे तारांगण त्याला लाभलेच नाही. आणि ह्या दमणुकीत पुढे तो वेडाच बेपत्ता झाला. ज्या तारेच्या रोखाने तो निघाला होता ती तारका अजूनही दिसते. पण ह्या वेड्याचे वेड मात्र नामशेष झाले आहे.

ह्या कथेच्या समारोपात गोविंदाग्रज पृच्छा करतात—

'काळाच्या उदरी कधी भटकता कोणा कुठेही कसा
वेडा सापडता, कथा मज पुढे झाले तयाचे कसे?
त्याचे वेड तरी कुणास मिळता द्या ते मला आणुनी
माझ्या जी मनिं चांदणी चमकते, जाईल ती मागुनि!'

अखेरच्या ओळीतून कविता कथनपर किंवा बोधपर न राहाता व्यक्तिगत पातळीवर उतरलेली दिसते. आणि कंसात कवितेच्या आरंभी 'कुणाला...कशाचे...कशात' आणि 'कोणी अशी' अनिश्चित सर्वनामे जी आली आहेत त्यांचा निश्चित संबंध कवीच्या व्यक्तिमनाशी व अनुभूतीशी आहे याचा खुलासा होतो.

'जे रम्य तेच' कवीच्या वेडाला कारणीभूत होते असे नसे; तर भव्योत्कट वेडही कवीच्या प्रतिभेला कसे प्रोत्साहित करते. साध्या दृश्यातूनही व विषयातून गोविंदाग्रजही कसा सर्वसमावेशक व स्वभाव आविष्कृत करणारा आशय काढतात याचा वस्तुपाठ म्हणून 'वेडा' ह्या सुनीतत्रयाकडे पाहता येईल.

गोविंदाग्रजांच्या ह्या कवितेचेही वाग्वैजयंतीत खास स्थान आहे असे मला म्हणूनच निर्देशित करावेसे वाटते.

'अभंग' वृत्त ही एक खास मराठी भाषेची लकब आहे. तुकारामांनी आपली अक्षय मुद्रा ह्या'वाणी'वर ठोकली आहे. हा अत्यंत सोपा वाटणारा पण अवघड असा रचनाप्रकार आहे. तुकारामाइतकाच समर्थ अभंग गोविंदाग्रज लिहू शकत होते, याचे प्रत्यंतर 'अनामिकाचे अभंग' या अभिधानाखाली लिहिलेल्या पंचावन्न अभंगावरून येते. पण अभंग ही भाववृत्ती आहे. आणि गोविंदाग्रज तर कथानकप्रधान कल्पनारम्य शब्दबंदिस्तीत अधिक मोकळे होणारे कवी असल्याने त्यांनी स्वतःच स्वतःला ह्या अशा रचनेपासून खुडून घेतलेले दिसते. पुढे एकदम नव्या कवितेच्या लाटेत बाळ सी. मर्ढेकरांनी पुन्हा अभंगाच्या अम्लान झळाळीचा पुनःप्रत्यय आणून दिला. मधुकर केचे यांच्या 'दिंडी गेली पुढे' मध्ये आणि 'ग्रेस' यांच्या आरंभीच्या लेखनामध्ये अभंगाचा अनोखा काव्यात्म अनुभव मिळतो.

वस्तुतः गोविंदाग्रजांना ह्या अभंगाच्या निर्मितीतून विशेष काही करावयाचे असावे असा निष्कर्ष काढता येतो. कारण एखाद्या महाकाव्याला, कथाकाव्याला, वा खंडकाव्याला आरंभ करताना, आशीर्वाद, वस्तुनिर्देश वा नमस्कार करावयाचा तो इष्टदेवतेला. अशा धोरणाने प्रथम मंगलाचरणाचे पाच अभंग त्यांनी लिहिले आहेत.

हरिहरैक्य आणि निर्गुणाचे ब्रह्मरूप असलेल्या श्रीरंग पांडुरंगाची त्यांनी आळवणी केली आहे. कवित्वाचा 'मीपणा' ज्याच्या भरंवशावर वहावयाचा त्यालाच आपल्या लेखनकामाठीचा अनोखा रंग गोविंदाग्रजांनी उकलून दाखविला आहे.

'साहित्याची कळा । झाली तिऱ्हाईत ।
शुद्धाशुद्धातीत । नाम तुझे ।।

ह्या निष्कर्षाप्रत कवी येऊन ठेपला आहे.

असंगाच्या संगा कृपावंत पांडुरंगाला थांबवून, 'माझ्यावरी मीच मांडीन फिर्याद । तुझ्यापाशी दाद मागावया ।।' ह्या तुकारामाच्या आत्मकलहाचा हा बाज आहे. 'युगाचे दुर्जन, आणि पश्चात्तापाने 'क्षणाचे सज्जन' होणाऱ्या सर्वकाळ 'चोर मनाच्या' माणसांच्या सावपणाचा हिशेब ते चोख मांडतात. कर्मसिद्धांतावर गोविंदाग्रजांची श्रद्धा व विश्वास आहे. 'ठेविले अनंते तैसेची राहावे' असाच हा भाव आहे. म्हणूनच एक चांगला पण सहज प्रश्नालंकार कवी उपयोजितो.

'इंद्राचंद्रा कर्मरेखा । तेथे माझी कोण लेखा ? ह्यातील 'लेखा' शब्द 'पाड-कोर' अशा श्लिष्टार्थी वापरला असावा असे जाणवते. पापाचेच अधिकारी असलेल्यांना कशाचा नेमधर्म आणि सहावा अभंग तर मोरोपंतांच्या संशयरत्नमालेची आठवण करून देतो. केकावलीतील आर्ततेचाही आठव होतो. हे सर्वश्रेष्ठ 'भीशी काय माझ्या पापा' असा प्रतिसवाल ते करतात. इतकेच नव्हे तर—

"धन्य धन्य माझे पाप । तुज आणिस आपोआप ।
माझ्या पातकाची रास । देव पाडील इरेस ।।"

असा सार्थ विरोधविश्वासही येथे आहे.

तुकाराम व नामदेवाच्या आर्त करुणेचे एकत्रिकरण आठव्या अभंगात झाले आहे.

'देवा तुझा माझा कारे वैराकार' ही तुकारामोक्ती आणि 'पतितपावन नाव ऐकूनि आलो तुझिया द्वारा' ही नामदेवांची वाणी यांचे पडसादच आठव्यात जाणवत असले तर नवव्याचा आरंभ आव्हानात्मक आहे.

'काय महिमा नामांकित । आज दाखवा प्रचीत ।
पूर्वी नाव झाले फार । नको त्याचा बडिवार ।।'

पाचव्यात जशा गोपगोपिका, यमुना, पुंडलिक, नामदेवाची गुरुकृपा, दामाजी व विठू महार अशा गोष्टी आहेत, तशाच अखेरच्यात कालयवन राक्षस, विष्णूमोहिनी व समुद्रमंथन, बळीराजा यांच्या कथा देऊन एक उलटा सवाल विठ्ठलाला केला आहे,

'परि येता पापे माझी । कुठे दडला देवजी?'

आणि

येथेच देवाजीने करुणा केली ।
'भाते पिकुनी पिवळी झाली'

ह्या मर्ढेकरांच्या ओळीचा स्रोत सापडतो.

गोविंदाग्रजांनी अभंगरचना अभंगपणे केली असती तर वाग्वैजयंतीपेक्षाही रसरशीत कविता हाताशी लागली असती व उरली असती असे मला राहून राहून वाटते.

गोविंदाग्रजांच्या 'मनांतली पाल', 'वेडा' आणि 'अनामिकाचे अभंग' ह्या तीन त्यामुळेच मला विशेष विचारार्ह कविता वाटल्या आहेत. त्यांच्याकडून दर्शनी जे हाताला लाभले आहे, त्यापेक्षा सुटलेले कितीतरी आहे याची मला जाणीव आहे. तर्कशुद्धतेच्या साखळ्या व पायऱ्या ओलांडून भावात्मक वेगाने पण वैचारिक रंगाच्या अंगाने ह्या कविता उफाळताना दिसतात.

केशवपुत्राच्या सच्च्या चेल्याचे वेगळेपण अशाच वेळेला पृथगात्मतेने प्रकट होते, हेच गोविंदाग्रजांचे शाश्वत वेगळेपण होय.

(धर्मभास्कर : मे-जून १९८४)

१५. विंदा करंदीकरांच्या 'दांतापासून दांताकडे' या कवितेचे पुनर्मूल्यमापन

एकोणीसशे पन्नास सालानंतर आणि विशेषतः मर्ढेकरांच्या अस्तानंतर मराठी कवितेच्या रूपाविष्कारात फार मोठा लक्षणीय बदल झाला. या अत्याधुनिक कवितेच्या प्रमुख मानकऱ्यांमध्ये श्री. गोविंद विनायक ऊर्फ कवी विंदा करंदीकर यांचा प्रामुख्याने निर्देश करावा लागेल.

'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र' व 'परंपरा आणि नवता' यासारख्या ग्रंथांची निर्मिती करणारे चोखंदळ समीक्षक, 'स्वेदगंगा', 'मृद्‌गंध', 'धृपद' आणि 'जातक', यासारखी प्रयोगप्रवण पण अस्सल आणि जीवनाच्या गतिमानतेचे भान ठेवून, सौंदर्याविष्कार करणारी पण चिंतनशीलतेचे आंतरिक गंभीर नाद जोपासणारी, कविता लिहिणारे प्रत्ययकारी कवी, पाश्चात्य नाटककार आणि आदिकवी मुकुंदराज यांचा नवा अन्वयार्थ लावणारे विधायक रसिक, व बालांच्या आणि किशोरांच्या विश्वात रमणारे, अल्लड-मिष्किल करंदीकर मराठी अत्याधुनिक कवितेचे मानदंड आहेत.

'दांतापासून दांताकडे' ही 'मृदगंध' या संग्रहातील उपान्त्य कविता आहे. २० ऑगस्ट १९५४ हा लेखनकाल कवितेखाली नोंदला गेला आहे.

मानवाच्या वाटचालीचा इतिहास अंतर्मुख होऊन पाहिला असता, संस्कृतीच्या प्रत्येक टप्प्यावर त्याचे शोषणच अधिक झालेले दिसते. विश्वातील ग्रीक संस्कृती, इजिप्सियन संस्कृती, चिनी संस्कृती व भारतीय संस्कृती यांचा आदिम इतिहास, प्रगतीपेक्षा परागतीलाच कवटाळणारा आढळतो. त्याने निर्माण केलेली वास्तुशिल्पे- ज्यामध्ये पिरॅमिड्स, चीनची अजस्र भिंत किंवा आश्चर्यकारक ताजमहाल यांचा समावेश होतो, यात सौंदर्यदर्शनाबरोबरच आत चिणल्या-चिरडल्या गेलेल्याच्या, हुंदक्यांचे निःशब्द स्वर कवीला सैरभैर करतात. सौंदर्य व विनाश यांची व्यामिश्रता कवीच्या प्रतीकात्मतेला, विरोधी प्रतिमांना, रचनाबंधांतर्गत नादानुनादांना गतिमान बनवते. भरडण्याचे, शोषण्याचे, त्याच त्या बंदिस्त परिघात राहूनही, येईल त्याचा,

चौथा-लगदा बनवण्याचे, सर्वस्वाहाकारी प्रतीक, 'दांत' या दृष्टीने चपखल व विलक्षण आहे. परंपरेच्या 'जीवो जीवस्य जीवनम्' या न्यायाचेही हे विदारक दर्शन आहे. वर्तमानात वावरणाऱ्या मानवाला भूतकाळाचे भयावह कबंध जसे भेडसावते तसे त्याचे भविष्याचेही स्वप्नोड्डान खुडून-खुरदून टाकते. ह्या वास्तवानेच शोषितांची नामरूपात्मक संज्ञासृष्टी निरर्थक ठरते. नामे-विशेषनामे व विशेषणेही अर्थशून्य बनतात. ह्यातूनच 'तू,' 'मी' व 'तो' ह्या सर्वनामांना अर्थाकार लाभतो.

'मी' चा 'तू' सोबत आणि 'तो' बरोबर संवाद चालू आहे. प्रत्येकाकडे काही ना काही सांगण्यासारखे आहे. प्रत्येकाच्या 'त्रिकालाबाधित' कथा आहेत. व्यथाही आहेत, अपेक्षाही आहेत व हताशाही आहेत. 'दांतापासून दांताकडे' ह्या कवितेमध्ये 'मी-तू-तो' या संज्ञा त्यामुळे अनेकरूपी बनल्या आहेत. अनेक वक्त्यांनी, अनेक श्रोत्यांनी एकाच वेळेला कितीतरी गोष्टी सांगाव्या म्हणजे जो असंबद्ध, अनागोंदी गोंधळाचा (केओस) कोलाहल होतो, त्यातूनच त्याच पद्धतीने कवितेची अभिव्यक्ती होत जाते. संस्कृतीतील शोषणाची व शोषितांच्या अगतिक भोगवट्यांची एकाच वेळी शांत–थंड–निर्विकार नेत्रांनी पाहिलेली कथा कवितेतून उलगडत जाते.

दांत भक्षणचर्वणाचे कार्य करतात. त्यामुळे एकीकडे पोषणही होते. दुसरीकडे संहारही होतो. आरंभीच्या वास्तवाच्या सहज निवेदनांचे सूत्र 'मी' च्या सोशीकतेने कथेत अनेक रंग भरते, 'तू' च्या स्वप्नाळू प्रवृत्तीतून प्रश्न प्रक्षेपित करते. 'मी' आपले दुसरे रूप पिळवणुकीचे सांकेतिक दृष्टिकोणातून वस्तुस्थितीचे प्रत्यक्षांकन करतो. कराल वास्तवाचे वजन पेलणारा 'तो' पुन्हा मूळ कथेमध्ये भर घालतो. त्याबरहुकूम आशयसूत्र बदलते. म्हणजे निवेदन, कथन, सांकेतिकता, स्वप्नाळूपणा, शोषण, प्रत्यक्षातले भाष्य, 'मी' चे रूप्यंतर, संवादांची व कथांची सरमिसळ पुन्हा निवेदन अशी आवर्तने या कवितेमध्ये एकदुसऱ्याशी मिसळत-छेदत पुढे पुढे सरकते.

'तू', 'मी' व 'तो' अशी दर्शनी तीन पात्रे यात असली तरी 'मी' हा दोनदा येतो. प्रत्येकाला काहीतरी भरपूर सांगायचे आहे. जे सांगितले आहे, त्यात इतके एवढे, स्फोटक रसायन पेरलेले आहे की, त्यातील प्रत्येकावर प्रदीर्घ भाष्य व टाचण टिपण केल्याशिवाय अर्थाजवळ पोचताच येऊ नये. शब्दार्थाचे बहिर्गत व आंतरिक कार्य एकाच वेळी वेगआवेग धारण करून अवतरते. पिरॅमिड-फिरोहा, स्फिक्झ, धडे, भूत, लूत, कन्फ्यूशिअस, झगा व त्यावरील कशिदा, पाठीवरील कुबड, बुद्ध, संस्कृतीचे ओठ, साय, तडकलेला इतिहास, यमुना, ताजमहाल, गोरामोरा कालिया, प्रेमसमाधी, दगडी गुलाब, 'ताजमहाल' चे कलणे, अंधाराचा काळा हत्ती, त्याच्या पायाखाली चिणलेले, दडलेले, सडणारे नरबळीचे प्रेत, रंगवाचक, गुणवाचक, ध्वनीवाचक संवेदना जागृत करणारी दाताबद्दलची विशेषण-विशेष्याची बाराखडी, त्यात केलेली अधिकोक्ती, द्विरुक्ती, पतंगाप्रमाणे विनाशज्योतीवर झेपावणारे 'मी-तू', रोजच्या रडगाण्याला न उरलेले रडण्याचेही बळ, सुवर्णरथातून पळून जाणारे 'आर्य सत्य, छातीवरले (लांच्छन) म्हणजेच चाकोरीची खूण, पुन्हा येणारी चोहोकडील मुक्या धडांची धिंड आणि 'हे असेच असणार!' अशी, 'यात नवीन काय घडे?' ही अगतिक प्रश्नांकित शरणागती, या

अवघ्याच घटकांवर आस्वाद घेणाऱ्या रसिकाला अर्थाची अनेक वलये स्पर्शून गेल्याशिवाय राहत नाहीत. उपयोजित समीक्षापद्धतीने या कवितेचा खालील रीतीने विचार मांडता येईल.

'दांतापासून दांताकडे' या कवितेच्या रचनाबंधाबद्दलही कविवर्य विदा करंदीकरांचे अनोखेपण दाखवता येते. समग्र कविता प्रश्न-संवाद-निवेदन-तपशील पुरवणारे प्राक्कालिन संदर्भ, सद्यःकालीन वि-संवाद व दाहक वास्तव अशा पायऱ्यापायऱ्याने प्रवाहित झाली आहे. दुसरे, तिसरे, चौथे कडवे रचनाबंधाच्या दृष्टीने एकसारखे आहेत. चौथे कडवे सगळ्यात मोठे म्हणजे बावीस ओळींचे आहे. पहिले एकोणीस ओळींचे तर मधली सतरा-सतरा ओळींची आहेत.

पहिले कडवे थोडे विस्ताराने विचारात घेऊ. कारण अशीच रचनापद्धती चढत्या श्रेणीने पुढे उपयोजिली गेली आहे. संस्कृती मानवासाठीच, पण तोच नगण्य होण्याची ही कथात्मकता.

(१)

आरंभीचा घटक—धृपद
तुझी माझी धाव आहे
दांतापासून दांताकडे

आजच्या चिरंतन शोषणप्रणालीचे हे पालुपद. युगंधरांनाही अनुत्तरित करणारी घणाघाती निवेदनाची सुरुवात आहे. चारही कडव्यांच्या अखेरीला हेच धृवपद त्याच त्या प्रत्ययाने परावर्तित होते आणि पर्यायाने नव्या कडव्याचे 'अक्कडकडवें' म्हणून भावनात्मक आंदोलनाला भिरभिरता वेग देते.

(२) 'मीं' हा द्व्यर्थी व अनेकार्थी भूमिका पार पाडतो. निवेदनातच प्रगतीचे बाह्यरूप व वस्तुस्थितीचे आंतररूप यातला विरोध मुखरित होतो. इजिप्तच्या राजघराण्याची थडगी म्हणजे पिरॅमिड होत. पण त्या काळच्या रीतीप्रमाणे राजकुलातील व्यक्तीचा मृत्यू म्हणजे प्रदीर्घ निद्रा मानली जाई. कधीतरी तो पूर्ववत सबल सक्षम होऊन कारभार करू लागेल हा त्यांचा (अंध)विश्वास. त्यासाठी नोकर-चाकर, सेविका स्त्रिया, कुत्री,अन्य प्राणी व वैभव वाढवणारे रत्ने-माणिके, सोने-नाणे त्यात गाडली जात असत. बाकीच्यांना मुद्दाम ठार करून पुरले जाई. त्यात मसाला भरून ठेवलेली टिकाऊ 'ममीं' सुद्धा ह्या कृत्याने खदखदत असावी. पण ह्या प्रघातात फरक नव्हता. हे वाचून-ऐकून, पहिल्या प्रगत इजिप्शियन संस्कृतीचा हा आघाती प्रहार माणसाची छातीच-संकटे झेलून जगण्याची उमेदच नष्टभ्रष्ट करून जातो.

(३) 'तूं' हा स्वप्नसृष्टीत वावरणाऱ्या मनाचा, अंतर्मनाचा प्रतीकात्मक आवाज आहे. काही संदर्भाचे विशेष तपशील त्याला आठवत राहतात. विधायक मंगलक्षणाची कल्पना करण्यात तो समाधान (लटके) शोधतो. ब्रह्मास्वादसहोदर अशा काव्यनंदाची महती गात प्रत्यक्षातल्या विपरिताकडे दुर्लक्ष करण्याचाच हा प्रकार आहे. ह्या प्रश्न-संवादालाच 'मीं' तिखट तिर्यक उत्तर मिळते. वर्तमानातल्या उदाहरणाने

स्वप्नाळू 'तू' ला गप्प बसवले जाते.

(४)

'पत्रावळीतले उष्टे अन्न
परवापर्यंत टिकेल काय?'

अशा कुणाच्याही तथाकथित आनंदाने आपल्या शोषणाची वेदना फार तर त्या दिवशी विसरता येईल. दुसऱ्या दिवशी जेमतेम तो पुरेल. त्यानंतर पुन्हा भयाण काळोखच. 'मी' ची दुसरी भूमिका. तटस्थ-अलिप्त पण वास्तवाशी साम्य राखणारी कवितेचा आशय अधिक तीव्र बनवण्यास साह्यकारी ठरते.

(५) 'तो'-वर्तमानातला अनुभव सांगत सुटतो. हा एकाचा आवाज सामान्य-श्रमजीवींचा प्रतिनिधी वाटतो. आपल्या नजरेत त्याला सगळेच अगतिक-हतबल दिसतात. पिरॅमिड जवळच्या दगडी अजस्र स्फिन्क्झखाली दडपलेले आढळतात. त्यामुळे तो अधिकच दडपला जातो. एकालाही अस्तित्वाचा आकार नसतो. प्रतिकाराची प्रेरणा नसते किंवा नसते दुसऱ्यांना प्रक्षुब्ध क्रांतिप्रवण करणारी किंकाळीही. म्हणजे बिनमस्तकाचा-नुसत्या कबंधांचाच-धडांचाच चौफेर संचार चाललेला. पण त्यांच्यातही दहशतीचे विषाणू खोलवर रुतले आहेत की त्यांचाही आवाज उमटत नाही.

(६) शेवटी प्रारंभीचे ध्रुवपद पुन्हा येते. निवेदनाचा एक आवर्त पूर्ण होतो. तो खात्री पटवत जातो, तर आपले आयुष्य हे असे चूर चूर होत पुरते भरडणाऱ्या जबड्यात अडकलेल्या घासासारखे लिबलिबीत कसे आहे ते.

पुढल्या कडव्यात हाच वेग याच तऱ्हेने धडाडत ठेवण्यात विंदा करंदीकरांनी मोठे यश मिळविले आहे.

दुसऱ्या कडव्यात चीनच्या अजस्र आश्चर्यकारक भिंतीचे कथन आहे. भिंत टिकावी, पाया मजबूत व्हावा म्हणून नरबळी देण्याचा प्रघात आहे आणि एवढ्या प्रचंड उभारणीत किती सामान्यांच्या पिढ्यांची माती झाली असेल? त्या प्रत्येक अतृप्ताचे पिशाच्च दगडादगडात वावरते आहे.

देशातील आपल्या शोषणाला विसरून मग एखादा प्रवासी उठतो. ही संस्कृती किती महान आहे. तिचे विणकाम, कशिदाकारी किती मौल्यवान आहे याची भाष्ये लिहितो. हादेखील पिळवणूक दडवून नवे तत्त्वनिवेदन (इंटरप्रीटेशन) देण्याचा म्हणजे पिळवणुकीचाच प्रकार होय. अशा भाकड विचाराने सम्यग्विचारी बुद्धीलाही कुबड आल्याशिवाय राहणार नाही. खरेच संस्कृती कोणाची, कोणासाठी असते? संस्कृती म्हणत भक्षणाचे दिखाऊ तत्त्वज्ञानच मांडले जाते. हेच सांगत-खरडत इतिहास घडतो. तोही तडकतो कवटीसारखा. दुसरे कडवे कवितेतले चैतन्य प्रक्षेपित करते.

यमुनेच्या काठावरला ताजमहाल हे भारतीय संस्कृतीचे जगद्विख्यात भूषण. ज्या पुराणकालात कृष्णलीला न्याहाळणारी यमुनानदी-कालिंदी-कृष्णजळाची कालियासहवासाची यमुनाच ताजमहालच्या वास्तूची पहिली साक्षी. मुमताज

महालच्या स्मृतीसाठी उभारलेले प्रेमचिन्ह. पण ती मेली, बरीच बाळंतपणे वारंवार झाल्याने. त्यामुळे 'गोरा-शुभ्र' संगमरवरी ताजमहाल 'गोरामोरा' चोरी सापडल्यासारखा निःशब्द उभा आहे. अंधार पोसवला जातो. राजेमहाराजांनी हत्ती पोसावा असे संस्कृती निर्माते अंधार पोसून सर्वांचे शोषण करतात. सबंध जगभर हीच प्रक्रिया चालू आहे. आता ताजमहालाचा शुभ्र संगमरवरही काळा पडत चालला. त्याचीही देखभाल लक्षावधी रुपये खर्च करून केली जाते. पण लक्षावधी चिरडल्या जाणाऱ्या, बळी जाणाऱ्या नरबळींच्या प्रेतांची दुर्गंधी, सर्व तथाकथित सौंदर्याचा परिसर व्यापून उरलेली आहे हे आजचे वास्तव आहे.

सगळी मानवजातच ह्या शोषणचक्रात अडकलेली आहे. पिळवणुकीचे, फसवणुकीचे, अमानुषतेचे अनेक छोटेमोठे प्रकार सर्वत्र चालू आहेत.

'दात' या प्रतीकाला रचनाबंधामुळे, कवितेतील अंतर्गत वेगवान लयीमुळे आणि ध्रुपद व अन्त्य अशा दुहेरी उपयोजनेमुळे पिळवणुकीतला पीळ एकात्म एकसंधपणे (ऑर्गानिक युनिटी) कवितेची आशयघनता वाढवण्यास मदत करतो. काळे-गोरे ह्या रंगप्रतिमा, किडके, सडके हे सादशब्द, आणि त्यानंतरची जून-कवळे ही विरोधी विशेषणे, त्यानंतर पिवळे-पिवळे ही रंगप्रतिमांची द्विरुक्ती, बोलके-मोने ही शब्दसाधिते आणि चांदीसोने ही प्रमाणके यांचीही विंदा करंदीकरांनी मोठी नाट्यपूर्ण मांडणी केली आहे. त्यांच्या निर्मितीक्षम अबोध मनाने प्रेरित केलेली ही रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. समग्र घटक, बारा पोटघटक धारण करून उभा राहिला आहे. बारा, तेरा ह्या संख्यांना मराठी-इंग्रजीत अशुभत्वाचा संकेत लाभलेला आहे.

ह्या कोसळत्या मानवतेच्या मरणघटकेला रडणाऱ्यांनाही उसंत नाही. हीच अपरिहार्य अटळ नियती होय. शोकात्माचा (ट्रॅजेडी) उगम ह्याच ठिकाणी दडलेला असतो.

'माणूस मिथ्या । सोने सत्य ।।' हे आजच्या व्यापारी संस्कृतीतले तत्त्व येथे प्रत्ययाला येते. प्रत्येकाची किंमत मोजता येते. 'अर्थस्य पुरुषो दासः' किंवा 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते ।' या वचनांचीही येथे आठवण होते. सोन्याने सत्याला पळवून लावले आहे, गिळंकृत केले आहे हीच तर मूल्यविचारांची माती आहे. माणसांसह माणुसकीचे मरण आहे.

दांतापासून दांताकडे या कवितेत करंदीकरांच्या सामर्थ्याचे समर्थपणाने दर्शन घडते. त्यांच्या कवितेला चिंतनशीलतेचा घाट लाभला आहे. मुक्तछंदाचा अवलंब करूनही विचार-भावांच्या समांतरतेचे व विचारनादाच्या (थॉट रिदम) तत्त्वाचे एक-दुसऱ्यावर त्यामुळे कलम केले गेले आहे. '...भूत आहे... लूत आहे, उसवेल काय फसवील काय? फडा आहे... खडा आहे, फुलतो आहे... कलतो आहे,' यासारखे प्रास, त्यामुळे सहजपणे आविष्कृत होतात. अन्त्ययमकांचे चांगले भान असल्याने कवितेची नादमयता वाढली आहे. आणि वृत्त किंवा जातीरचना यापासून पूर्ण मुक्त असलेली ही कविता वेदनेचे गाणे बनली आहे. व्यथासूक्त झाली आहे. शोषण होणाऱ्या माणसांचे व तो जोपासू पाहात असलेल्या माणुसकीचे, त्यातल्या मानवतेचे.

कवितेच्या अंतर्विरोधी शैलीमुळे व शोकात्म जाणिवांच्या विविध अर्थानुवर्ती

प्रभावितेमुळे 'दांतापासून दांताकडे' ही कविता रसिकमनातही पुन्हा पुन्हा झंकृत होत राहते हेच तिचे महान यश आहे.

(धर्मभास्कर : मार्च १९८८)

१६. वसंत बापट यांची कवितामालिका : मानसी

"मानसी हा कवितासंग्रह नव्हे. ही एक मालिका कविता आहे..... कोणताही नवा प्रयोग वगैरे करण्याचा हेतू मनात कधीच नव्हता. या सर्व कवितांचे स्फुरण अविच्छिन्न आणि एकबीज आहे, एवढेच," असे प्राक्कथन वसंत बापट यांनी 'मानसी' संग्रहाच्या सुरुवातीस केले आहे.

'मानसी' मध्ये एकच चिंतनविषय आहे स्त्री. स्त्रीची विविध रूपे, विभ्रम, तिचे देवांनाही अनाकलनीय असणारे अंतर्मन. ह्या 'स्त्री' ची ओळख पटवून घेताना सर्वार्थाने सर्वस्वाची बाजी लावावी लागते. सर्वशरण होऊन, परिपूर्ण पराभव पत्करून, तिच्या गगनव्यापी गहनगूढ अशा, व्यक्तिमत्त्वाच्या अंशांची, कणाकणाने अनुभवविश्वात मांडणी करावी लागते. ह्या श्रद्धेतूनच 'मानसी' आकारास आली आहे. मनाच्या एकांतात स्त्रीहृदयाची स्पंदने आणि आंदोलने जोजवीत 'मानसी' फुलवली आहे.

अशा हृदयाच्या शक्तीला समजून घेऊ पाहणाऱ्याच्या वाट्याला एक अटळ भागधेय असते. ते म्हणजे एक पाय 'तळयात एक मळयात.' एकरूपत्व किंवा मीलन एवढेच या नात्याचे अंतिम उत्तर नाही किंवा तो अखेरचाही टप्पा नाही. "अंधाराच्या पाठीमागे असेल देखील दोघांपुरते नवे आभाळ" (क्र. ३६) ह्या नव्या आभाळातले विश्व, भुते किंवा देव अथवा पाप आणि पुण्य यांच्या पलिकडे असते. ही आता अतीतता हेच ह्या नात्यांचे अखेरचे टोक असते.

'तशा सगळयाच कविता तुझ्यामुळे आणि तुझ्यासाठी.

अस्तित्वच जर तू भारलेले
तर काय नवल.
सगळेच शब्द तू गर्भारलेले.' (क्र. १)

सर्व शब्द, गाणी, हाका, टाहो, कैफियती 'स्त्री' च्या म्हणजेच आदिमायेच्या अस्तित्वशोधाचा आकान्त.

'अशा वेळी 'प्राजक्तफुलांना पायदळी चुरडू नका,' असा एक आणि एकमेव संदेश देण्यासाठी-

"माझ्या कबुलीजबाबांचा सूळ
मी नेतो ना माझ्या खांद्यावरून." (क्र. ३३)

असे कवी मनमोकळेपणाने स्वीकारतो.

स्त्री-पुरुष नात्यांकडे, त्या नात्याखेरीज अनेक वस्त्रगाळ चाळण्या लावून तपासण्याचीच येथली रीती आहे. रोखलेल्या बोटांची, वखवखलेल्या जिभांची, जगरहाटीच्या करवती दातांची भीती बाळगीतच, येथे प्रणयाला फुलावे लागते. ह्या मर्यादांची जाणीव ठेवूनच मनसुबे रचावे लागतात.

"संकल्पांच्या हातामध्ये हात गुंफून धावलो.... तरी सावली हाती आली नाही." (क्र. ९) त्यामुळेच कितीही वाटचाल केली तरी दमछाक झाल्यावर कळते, होतो पोचलो.

स्त्री-पुरुषांच्या नात्यातील हा पीळ अलगदपणे समजून देण्या-घेण्याचा हा बापटांचा प्रयत्न आहे. हे नाते मानसिक, भावनिक, शरीरपातळीवरचे तर आहेच, पण ते असेही आहे, ज्यापर्यंत शब्दांच्या शिड्या पोचू शकत नाहीत. त्यात आसक्ती आहेही आणि नाही. ही असोशी, हताशपणा, जिद्द, निग्रह, हळुवारपणा, काव्यात्मता असे ऐहिकाच्या पातळीवरील सर्व विश्व बापटांना 'मानसी' मध्ये शब्दांकित करायचे आहे. खूप अर्थाने ते त्यांना साधलेही.

ह्या एकबीज कविता 'छत्तीस' एकत्र वाचताना मात्र उत्कटता व काव्यात्मता बोथट होते आणि तिला व्याजनाट्यात्मकतेचे पाणी चढलेले वाटते. क्र. १० किंवा क्र. ७ या दृष्टीने पाहता येतील. दशोपनिषदांच्या दशा, भगवद्गीतेचे गंध, दर्शनाचे सहा पट्टे, चाळीशीच्या काचा म्हणजे योगवाशिष्ठ, मस्तकात पतंजलीचा अनाहत नाद, शब्दज्ञानाच्या खडावा, काव्यशास्त्राचा कमण्डलू आणि खांद्यावर शालजोडी असे एक सांगरूपक ते खेळवितात. पतंजली महाभाष्यकाराची ही बौद्धिक कसरत वाटते. ताशा मशिनगनसारखा, मंत्राक्षतांचे छरे (क्र. ७) हे देखील रूपकाच्या बटबटीत अंगानेच येते. प्रेमात आणि युद्धात सर्व क्षम्य असले तरी भावकवितेतील सहजस्फुरणात एवढे काटेकोर अलंकरण का? हे खटकते.

वसंत बापटांची शाहिरी शैलीकळा 'मानसी' त विशेषकरून प्रत्ययास येते. समजावणीची अंगाई, प्रकाशातला प्राण, वाढवयातले वेंधळेपण, पंचप्राण झालेले डोळे (क्र. २५), भितुर भितुर डोळे (क्र. २२), थुई थुई नाचणारे डोळे (क्र. २६) जसे डोळे, तसेच आकांत आणि आक्रोश, अनेक कवितात भेटतो. तर 'चुंफून' हा आवडता कविप्रयोग क्र. १२, मध्ये 'चुंफलेल्या लाल डोळ्यांचेच गुलाब, आणि क्र. (३१) मध्ये, 'रात्रभर चुंफून दुःखाचा विखार, येथे द्विरुक्त होतो. वासनेची वेदी, दुर्दम्य मरणवांच्छा, मिथुनबळी, दुखावल्या हृदयाचे घड्याळ,' असा शब्दांचा नटमोगरा फुलोर 'मानसी'त ठिकठिकाणी सापडतो. मानसीच्या नाजुक प्रकृतीला 'साज' मोठा वाटतो.

कवी वसंत बापट हे आधुनिक शाहिरी ढंगाने सनातन अप्रूपाईचा उलगडा करतात.

चारपाच कवितात त्यांच्या शाहिराने भावनेवर कुरघोडी केली आहे ही त्यांची मर्यादा.

पुरुषजन्माची झोप मोडणारी कोंडी आणि त्यांची सोडवणूक करण्याची ही बापटांची स्वतःची मनोजनित रीती आहे. म्हणूनच ते बजावतात—

हे पावसाळी उत्तररात्रीचे प्रहर
त्यांचा कहर तरी किती....
आधी झोप मोडतात
मग भलभलते भास,
फुलांचे वास....
आता स्वप्नही पडणार नसते
मग कुणी झोपावेच कशासाठी?

अशा नाजुक क्षणांवर सावध नजरेने जागता पहारा ठेवणाऱ्या कवीचा हा प्रकट मनःसंवाद, त्यातल्या काही मर्यादासह अंतर्मुख करणारा, तरल व काव्यात्म झाला आहे. 'मानसी' चे हे मोठे यश आहे. १९७७ च्या सरत्या महिन्यातला, म्हणूनच हा वेधक संग्रह आहे. कवीची इच्छा नसताना तो एक अभिनव प्रयोगही झाला आहे.

(मुंबई सकाळ : २२ जून १९८०)

१७. पाडगावकरांचा कडक 'सलाम'

श्री. मंगेश पाडगावकर यांचा 'सलाम' हा नवा अलिकडला कवितासंग्रह. त्यात एकेचाळीस कवितांचा समावेश आहे. १९७८ साली प्रसिद्ध झालेल्या विविध वाङ्मयप्रकारात, एक मौलिक व लक्षणीय लेखन, या दृष्टीने मला या संग्रहाचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो.

कवी मंगेश पाडगावकर हे नाव १९५० नंतर मराठी रसिकांपुढे आले. तांबे, बोरकर, कुसुमाग्रजांची ढंगदार कविपरंपरा पुढे चालविणारा चांगला कवी, अशी त्यांनी स्वतःची प्रतिमा निर्माण केली. 'धारानृत्य', 'जिप्सी' आणि 'छोरी' पर्यंत हाच ठसा होता. पुढे पाडगावकर गीतांकडे वळले. मीरेच्या अनुवादांनी त्यांना झपाटले. वात्रटिकांनी त्यांचा मिस्किलपणा संमेलनाची रंगत वाढवू लागला. बालगीतातूनही त्यांची प्रतिभा विकसित होऊ लागली. 'विदूषक' मध्ये उपहासात्मक व मानवी मनःस्वभावाच्या जटिलतेचा ते वेध घेऊ लागले.

इतक्या वेगवेगळ्या रूपांनी पाडगावकर आविष्कृत होऊ लागले की, भावकवीची त्यांची आरंभीची प्रतिमा बदलावी लागली. लिज्जत पापड आणि पाडगावकर असे एक विचित्र कलमही या प्रतिमांतराला काही प्रमाणात कारणीभूत झाले.

भावकविता लिहिणारा कलावंत हा सतत बदलणाऱ्या समाजाचाही एक डोळस घटक असतो. त्याला दीर्घकाळपर्यंत पूजनीय व उचित वाटणाऱ्या कल्पना-संकल्पना अनुभवान्ती तशा नाहीतच हे पटू लागते. कवी पाडगावकर यांनाही अशा विचित्र-विपरीत अनुभवांनी घुसळून काढले.

सत्तामत्ताधारांच्या हूडदांडगेपणामुळे मध्यमवर्गीय मूल्य जोपासणारा, सत्यंशिवंसुदराचे आदर्श अविकृतच राहतील अशा भाबडेपणाने जगणारा माणूस हुसकला गेल्याचे, विस्कटल्याचे विचित्र कविमनाने पाहिले. ह्या माणसाच्या पळापळीत आपलाही क्रम आहेच हे सत्य त्याला प्रत्ययाला आले आणि भावकवितेचा व भावकवीचा रूपाकार बदलणे अपरिहार्य ठरले. 'सलाम' हा संग्रह ह्या घुसळणीचेच

फलित आहे. आपल्या रक्ताच्या नव्या पिढीशी त्यांचा संवाद त्यामुळेच मला प्रतीकात्मक वाटतो. कारण ती मुले तशी प्रातिनिधिक आहेत. 'या तुमच्या दैवतांचे' मध्ये ते म्हणतात—

'चौतीस वर्षे पडले नव्हते
माझेही दुधाचे दात
नव्हती एकही अक्कलदाढ
माझ्याही भावड्या जबड्यात

सर्वत्र आणि सर्वच क्षेत्रात त्यांना विपरितता (Absurdily) जाणवू लागली. 'राजकीय आणि सांस्कृतिक' क्षेत्रातले प्रचंड 'फोरास रोड' खुणावू लागले, तेव्हा प्रांजलपणे कवीने रोखली 'माझी इवलीशी गंजलेली टाचणी.' जिला माणसांच्या प्रेमाचाच आधार होता.

भारतातील आणि महाराष्ट्रातील सद्यःस्थिती आणि तिचे मूल्यांकन हा 'सलाम'चा प्रेरणास्रोत आहे. नव्या वस्तुनिष्ठ, आत्मलक्षी पण आत्मविच्छेदी जाणीवेतून कवी आपल्या देशाकडे न्याहाळून-निरखून बघतोय. म्हातारी श्वापद, साक्षी, डमी, पॉलिटिक्स, प्रश्नोपनिषद आणि हिप्नॉटिस्ट ह्या प्रतीकात्मक कविता उपरोधाने ठासून भरलेल्या आहेत.

'भारतमाता,' पुरती वयात आलीच नाही ती जख्ख 'म्हातारी' झाली आहे. 'श्वापद' राष्ट्रभक्तीच्या कर्ण्यातून घोषणा देते. उंच इमारती व फोडेल झोपड्यांचे सनातन संघर्ष-क्षण पकडताना पाडगावकर म्हणतात—

'जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा?
जाब उंच प्रासादांचा मागणार केव्हा?
घोषणा केली होती. गुलाबांचे वेड असलेल्या लोकप्रिय नेत्याने
पण तसे काही झाले नाही. सगळीकडे स्वार्थी धतेचे किचाट.
इथे पडे सत्तेभोवती कडे भ्रष्टतेचे
काजळी दिव्याभवतीची झाडणार केव्हा?

कुंपणावरचे मुत्सद्दी याचे उत्तर देऊच शकत नाहीत. त्यांचे नवे सूत्र आहे 'सत्तेचे खाणार त्याला कुंपण देणार' याला 'साक्षी' सामान्यांचा कटु अनुभव. मेंढरांची गर्दी जमली की सैन्यासारखे वाटते. आपल्या गंडाला पोसत ही सेना पिसाट फुफाट्यात घोषणा देत सगळ्यांची माती करीत धावते. कवी विचारतो—

'सोसवेना एकही यांना
विरोधी शब्द साधा
आतुनी मारेकरी हे
संस्कृतीचे थोर त्राते.'

"मेंढरांचे काळ हे,
सेनापती हे भेकडांचे
सोसताना सत्य यांच्या
मनगटाचे शेण होते."

'सलाम' ह्या कवितेला विस्तार आणि तपशील पाडगावकरांच्या अशांत, अस्वस्थ मनःस्थितीचा आलेख आहे.

'देव, साहेब, पुरुषसिंह, पोपट, तुम्ही, राघोबा, रघुनाथ, पावणेआठ, उंदीर आणि एक जिंदाबाद कविता' या सर्व कविता वर्गविग्रह आणि दोन टोकांतील जीवनातला कडवट शेषभाग प्रतिमेच्या चिमटीनं नेमकेपणाने उचलतात. इथल्या आत्मतृप्तांना प्रत्येक दिवस उत्सवाचा वाटतो. पण कधीतरी ह्या भ्रमाला छेद जाईल. मूठभर बुद्धीवादी वेगळा सोयीचा अन्वयार्थ लावतीलही. 'उत्सव संपल्यावर'चे कवीचे भविष्य म्हणून परखड आहे. ते असे—

'बुद्धीवादी नव्या झोळ्या
घेऊन निघतील
राजरस्त्याच्या चौकाकडे
वैचारिक धोतरे सांभाळीत'

विद्यमान शोषित षंढ बनल्याची बोच कवीला जाणवते. उपलब्ध घटकांच्या स्वतःच्याही... कविता कला-संस्कृतीच्याही मर्यादा त्यास जाणवतात. नव्या पिढीची नवी शस्त्रे हेच त्यांचे उत्तर कवीला सुचते. 'तुमच्यासाठी' कवितेत ते म्हणतात—

'जो काळोखापासून पळतो
त्याच्यासाठी सूर्य नसतो
जो मृत्यूला भीतो
त्याच्यासाठी फुले उमलत नाहीत.'

पलायनवादी आजच्या युगाचे पाडगावकरांनी केलेले विच्छेदन 'सलाम'मध्ये आहे. आत्मरती सोडून नव्या तेजाकडे कवीही झेपावतो. त्यांची आत्मतयारी 'सूर्ययात्रा'मध्ये आहे-

'वळचणीत उबलेला पक्षी
एकदा तीर्थंकर आकाशात उडू दे!'

आणि म्हणून सूर्ययात्रेत सामील होणारा 'सलाम' आणि पाडगावकर मला १९७८ ची भरीव फलश्रुती वाटते.

(मुंबई सकाळ : २२ जून १९८०)

१८. गजमल माळी यांचे चिंतनकाव्य : 'नागफणा आणि सूर्य'

प्रा. गजमल माळी हे नाव मराठी कविता चोखंदळपणे वाचणारांना परिचित आहेच. 'गंधवेणा' हा त्यांचा कवितासंग्रह १९६१ मध्ये प्रसिद्ध झाला. गेली पंचवीस वर्षे काव्यलेखन व काव्यांगानेच अनुभव्य जीवनाचे मूलगामी चिंतन प्रा. माळी करीत आहेत.

त्यातूनच साकारलेली 'नागफणा आणि सूर्य' ही प्रदीर्घ चिंतनकविता. हे काव्य दोन हजार तीनशे अडुसष्ट ओळींचे आहे. पण असे असूनही रूढ अर्थाने त्याचा 'खंडकाव्य' ह्या सदरात समावेश करणे चूक ठरेल. ह्या कवितेचा आशय आणि आविष्कार हा एकसंध बीजातूनच प्रस्फुटित झाला आहे. उत्कट व प्रांजल भावाभिव्यक्तीने त्यातले शब्द चैतन्यमय झाले आहेत.

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले. काहीतरी भव्यदिव्य घडण्याची आसुसून वाट पाहणारे लोक, बिचारे पाहतच राहिले. बघता बघता डोळे शिणले. माना अवघडल्या. नवनव्या ओझ्यांनी आणि आश्वासनांनी ठुसठुसल्या. शिक्षणाची ज्योत झोपड्यात विझूविझू पेटली. एवढी जमेची बाजू. शिक्षणाने ही उजळून निघालेली नवजात मने, देशाच्या व आपल्यासह आपल्या पूर्वपिढ्यांच्या विकसनाचा ताळा जुळवू लागली. "जमाखर्च स्वातंत्र्याचा मागणार केव्हा?" असा मूक आक्रोश मनामनात निनादत होता. जातीधर्माच्या खुराड्यात देश नेहमीसारखाच जगत होता.

मराठवाड्याची भूमी. संतमहंतांच्या पावलांनी तुडवलेली. प्रतिष्ठान, आंबेजोगाई या गावांनी, गोदावरीच्या प्रवाहाने आपले वैशिष्ट्य जपणारी. विद्यापीठ नामांतराच्या प्रश्नाने, ह्या मातीतला सगळाच गाळ पिसाटून वर आला. जातीयवादाचे भोवरे, वंशश्रेष्ठता आणि स्वतःच्या अस्मितेच्या अचूकतेचा अवाजवी दुराग्रह यांनी हे पाणी पेटले. त्या आचेचे निमित्त ह्या कवितेचा जन्म.

कवि गजमल माळी ह्या उपसंहारात आपले स्थान शोधताहेत. हे स्थान आहे, सुसंस्कृतीची, माणुसकीची व समानतेची स्वप्ने पाहणाऱ्या माणसांचे. अजाण वयातले स्वप्नरंजन आणि जाण आलेल्या जडभार खांद्यांचा स्वप्नभंग, या दुबेळक्यातून प्रा. माळी

यांची 'नागफणा आणि सूर्य' ही कविता, चढतेवाढते स्वर घेऊन भक्कमपणे आकार घेत उभी राहते.

मराठवाड्याच्या उद्रेकाने भूतकाळातले सगळे गौरवशाली संदर्भ निकालात काढले आहेत. तेथे जे काही घडून गेले ते अभूतपूर्व आहे. सांडलेले रक्त, जळालेली घरे-माणसे, फुटलेल्या बांगड्या व कपाळे, पिचलेल्या बरगड्या व मने, भयभीत लोक आणि शासन राबवणारांची नादान ढिलाई. भांडवलशाहीला पोसणारे तथाकथित कुळीदार लोक, आत्मतृप्त स्वातंत्र्यसैनिक, प्रतिगामी बुद्धिवादी आणि हैद्राबाद लढ्यातील कातडीबचाऊ सावध पळपुटे, ह्या प्रत्यक्षाशी कवी दोनतीन दशकापासून परिचित आहे.

कवीला अभिप्रेत असलेली भव्य विकासाची झेप आणि वास्तवातले कडूचार अनुभव, या दुहेरी संघर्षातच त्यांच्या प्रतिभेला वेग लाभला आहे दृश्यादृश्य प्रतिगामी शक्तींच्या क्रौर्यकहाणीला भावरूप देणे, स्वतःच्या भावविश्वाची व श्रद्धामूल्यांची पुनर्रचना करणे आणि व्यापक वैश्विक संदर्भात, माणूस या नात्याने, स्वतःसह अवघ्यांचीच इष्टानिष्टता तपासणे असे तीन प्रमुख पदर 'नागफणा आणि सूर्य' कवितेचा कणा पेलून धरताना दिसतात.

श्री. गजमल माळी आपल्या कवितेची कुळी अशी सांगतात :

'ही जन्मली
हिच्या आतील खोलवरच्या कलावर,
नको आहे हिला तुमची चंद्रकिरणांची पखरण!
ही जन्मली : हिला जन्म हवा होता म्हणून.'

(पृष्ठ ३)

ही अपरिहार्यता या प्रदीर्घ कवितेने सार्थकी लावली आहे. म्हणूनच त्यांनी मराठी काव्यपरंपरेला एक वेगवान छेद दिला आहे. पूर्वकवींच्या ओळीतील प्रसिद्ध शब्दांच्या पेरणीतून, भास्करभट्ट बोरीकर, नरेन्द्र, ज्ञानेश्वर आणि प्रभाकर वगैरेंच्या म्हणजे संतकाव्य आणि शाहिरी काव्य यातल्या मर्यादा त्यांनी ओघात स्पष्ट केल्या आहेत. पंडिती कवींचा विचार अप्रस्तुत असल्याने कवीने त्यांना फाटाच दिला आहे. 'फुललेत या कवितेतून... मस्तवाल जीवनशून्य लावण्या.' (पृष्ठ १४)

आपल्या पारंपरिक झापडी संस्काराच्या दडपणातून बाहेर आल्यावर, कवीला एक नवी दृष्टी लाभली आहे. आपल्या बापाकडे, आईकडे, श्रम करणाऱ्या असंख्य भूमिपुत्रांकडे तो डोळ्याआतल्या डोळ्यांनी जेव्हा बघतो, तेव्हा तो म्हणतो-

'झाडाच्या झावळ्यातून मी पाहतो
माय, बाप, ऊन, शिवार, जित्राप आणि
शाळेतील कवितेतून भेटलेली रानपाखरं'

(पृष्ठ १२)

'नागफणा आणि सूर्य' या कवितेला हा आत्मप्रतीतीचा रंग अधिक गहराई देऊन गेला. ऋतूमागून ऋतू आणि वर्षामागून वर्षे गेली; पण कष्टकऱ्यांच्या आयुष्यात एकही टाका कमीजास्त पडला नाहीच. पुस्तकी मूल्ये आणि प्रत्यक्ष फरपट यातले महदंतर कवीचे मन कातर करीत राहते. शब्द बोलण्यातले, शिकण्यातले व पोशाखी आणि निःशब्द अफाट मेहनत यातल्या दुभंगल्या दरीने तो पूर्णतः बदलून जातो. ह्या नव्या निरीक्षणातल्या फलितात त्याला वेदनाकाव्याच्या ओळी सुचतात. काळोखात कण्हणारी मूक वेदना न फुटलेल्या जिवंत बाँबइतकी स्फोटक बनते. कवी बापाबद्दल म्हणतो-

'चांदण्याला महापूर
रानोरानी लाटा,
बाप माझा जाऊन बसे
दुष्काळाच्या काठा...' (पृष्ठ १९)

याच नव्या ज्ञानकिरणाने तो आईकडे बघतो आणि लिहितो-

'तिची स्वप्नं उडत उडत
नक्षत्रांशी भिडत...
दाणागोटा बांधून दोघे
रानाकडे वळत.' (पृष्ठ २०)

'निसर्ग' अशा वेळी रम्य का वाटणार?'भर उन्हात निथळणाऱ्या पळसासारख्या' बापाचे 'खारकेसारखे डोळे' बघताना निसर्गानुभवही उलटे सुलटे होतात. 'दुपार टळून जाते सबंध वाट वेटोळे करून' आणि 'डोळ्यात उतरते नागफणीसारखी.' इतक्या सहजतेने माळींनी लेखन केले, की 'बोलविता धनी...' किंवा 'नाही मी बोलत आपुलिया बळे' याचाच प्रत्यय त्यांना आलाच असावा. रसिकमनाला याची अनुभूती देणाऱ्या जागा या कवितेत अनेक ठिकाणी आहेत. प्रा. माळी आपल्या प्राक्कथनात म्हणतात-"ही कविता लिहून झाली, त्या दिवशी विलक्षण अनुभव आला. प्रदीर्घ आजारातून उठल्यावर जी विकलता येते ती वाट्याला आली. अस्वस्थता, असमाधान सारखं वाढत गेलं. ते तसं वाढू न देणं मला शक्य झालं नाही. अजून काहीं देणं आहे ही भावना मनात बळावत आहे." हे उचितच आहे.

'नागफणा आणि सूर्य' या कवितेचे सामर्थ्य हे आहे की, संवेदनाशील वाचकांच्या मनात, ती प्रश्नांच्या लडी ठासून भरते. हे प्रश्न कविहृदयातले जसे आहेत, तसे मानवी माणुसकीचे आहेत. 'इतिहास' याचे लेखन प्रांजलपणे कधीतरी कुणीतरी केले असणे कसे शक्य आहे? कवी विचारतो-

'इतिहास या देशाचा
अनाम दुर्बलांना विसरलेला.'

'कालविसंगत तेजाबी पाणी' शिंपडत येथे इतिहास जन्माला घातला गेला. देशाच्या आणि महाराष्ट्राच्या मातीवर चौखूर खिंकाळणारा काळ. आदिम पर्वापासून चालुक्य, शालिवाहन, गुप्त, मौर्य, यादवांपर्यंत. पृथ्वीजन्मापासून टप्प्याटप्प्याने पाय रोवणाऱ्या माणसांपैकी, इतिहास कोणासाठी तोंड उघडताना आढळतो?

संस्कृती आणि परंपरा, यावरील प्रश्नही असेच सणाणते आहेत.

'या देशात आहे खुनशी धनवंत संस्कृती.
दलितांच्या अब्रूदार बायांनाच
नागव्याने हिंडवणारी,
आहेत मातीवर श्वापदांची काळी पाऊलं
भगवे हुकमी ठसे उमटविणारी.'

(पृष्ठ ५५-५६)

'माणसाने चिखलातूनच सतत चालावे काय?' हा चिखल आहे वंश, प्रदेश, भाषा यांच्या अतिरिक्त अभिमानाचा आणि येथेच 'अस्मिता' या संज्ञेकडे कवी वळला आहे. इतक्या तन्मयतेने आणि विविध अंगांनी, त्यांनी 'अस्मिते'चे कवच उलगडले आहे की, संस्कृती व अस्मिता यावरील ते चिंतन अजोड आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. कोसंबी, डॉ. जाटव व प्र. रा. देशमुख यांच्या वैचारिक ताकदीचा आठव व्हावा, इतक्या प्रत्ययपूर्ण रीतीने कवीने ह्या घटकांची उकल केली आहे.... अस्मिता : हिमनगासारखी, अस्मिता : सुखी डाळिंब, अस्मिता : एक चंद्रफूल, माणिकपोवळ्यांच्या वृक्षराजीतून निघणारी स्वार्थी लोकांनी शोधलेली युवराज्ञी... (पृष्ठ ३४, ३५, ३६ व ३७). प्रा. माळींची चिंतनलय बेफाट आहे. ही आहे वैचारिकतेची काव्यात्म लय. तिच्यात काही ठिकाणी अभिनिवेश व त्वेष आहे. जो आहे तो ठाम आणि ठोस आहे. आणि त्या संदर्भात तो असणे श्रेयस्कर वाटावे, इतक्या बेमालूमपणे तो आला आहे. प्रा. माळी यांच्यातील कवीचे हे उत्तुंग यश आहे.

भुकेचे व मानवी व्यथांचे चिरंतन गाणे, या कवितेत कवीने छेडले आहे. सर्व प्रश्नांना एकाच वेळी भिडणारी ही ओजस्वी दलित कविता आहे.

मनाने सैरभैर झालेल्या पहिल्या पिढीतल्या संवेदक बुद्धिवंताचे, हे सहानुकंपी भिरभिरणे आहे. तो मायेने अवघ्याशी बोलतो. ही एक मुक्तसंवादी कविता आहे. माणसे कंगाल, दरिद्री असली म्हणून, त्यांच्यातील सर्व गरजा काय मातीमोल ठराव्यात? भूक हाच येथला सनातन प्रश्न आहे. बाकी सर्व प्रश्न बाद ठरावेत इतका तो वजनदार आहे.

'भुकेच्या वाटेने चालतात रे गरीबांचे
क्रान्तीचे आरक्त सूर्य
उमलतात त्यांच्या करपलेल्या ओठांवरही
प्रीतीचे कोवळे चंद्र.' (पृष्ठ ४२)

अशा लोकांच्या उन्नयनासाठी कोणाकडे काय योजना आहेत? त्यांच्याकडे आहे जाळ, त्यांची घरेदारे पेटवण्याचा. त्यांच्या स्वतःच्या पावलांवर उभे राहण्यासाठी केलेल्या स्थित्यंतराचा उपहास करण्याचा. त्यांच्या पूज्य श्रद्धाव्यक्तीच्या प्रतिमेवर गटारातले पाणी खेटराने अभिसिंचित करण्याचा पराक्रम करण्याचा. 'उद्याच्या नागरिकांचे' विदारक चित्र नेटकेपणाने प्रा. माळी रंगवितात. ही आहे आमच्या देशाची वस्तुस्थिती आणि कमाई...

'बापा रे, या देशात
मुलं तुकडे वेचतात
आणि पोटं भरतात
मुलं तुकडे तुकडे होतात
आणि पोटं भरतात
मुलं तुकडे वेचीत वेचीत
बेवारस कुत्र्यासारखं
भुकेनं गळून पडतात.'

(पृष्ठ ५१)

प्रा. गजमल माळी यांच्या 'नागफणा आणि सूर्य' या कवितेची भाषा लयबद्ध आहे. पण ती आहे वैचारिक लय. भावमूल्यांपेक्षा (Lyrical Value) ही विचारलय (Thought Value) तिच्या प्रदीर्घतेला आणि विषय-आशयाच्या आटोपाला साजेशी आहे. ग्रामजीवनसंकेत, कविसंकेत आणि वेगवती शैली यांचे एक वेगळे रसायन येथे घडले आहे. विशेषण-विशेष्यांच्या दुहेरी-तिहेरी किंवा चौपेडी बांधणीने कविता बांधेसूद व घाटदार झाली आहे. अनशान, बसकर, पर्णगळ, काळपक्षी, चंद्रवाटा, मनव्याकुळ, अथक, रक्तवांझ, असे शब्द जसे येतात; तसेच धुमील प्रदेश, स्वप्नवेधी संगीत, घारीसारखे अपवित्र दिवस, प्रवासी राजहंस, पिकाऊ माती, मुडक्या हाडाचे सापळे, पहाडी पंख, शाश्वत सुख, कापरा सूर, प्रलयकारी आकाश, सर्वस्वाही वणवा, सुदेही नारी व कल्याण स्वप्नप्रदेश-असे जोडरंगही सतत गुंगवीत ठेवतात.

औरंगाबाद शहरातून वाहात जाणाऱ्या खाम नदीच्या 'क्षीण प्रवाहाकाठी' बसून जरी हे लेखन झालेले आहे, तरी दुःखलाव्हारसाची तप्तता आणि आईची आर्द्रता कवीने शब्दांतून संयतरीतीने पेलली आहे. प्राचार्य जनार्दन वाघमारे यांच्या एकवीस पृष्ठांच्या प्रस्तावनेत, मराठवाड्यातील उद्रेकांच्या निमित्ताने मूलगामी प्रश्नांची मांडणी केली आहे. तो संदर्भ सोबतीला घेऊनच, या आस्वादाकडे वळणे घडणार असल्यामुळे, त्याची वेगळी चर्चा केलेली नाही.

येथल्या विभाजनवादी प्रक्रियेच्या प्रणालीप्रमाणे प्रा. गजमल माळी हे स्वतः दलित जातीतील नसल्याने दलित समाजाबद्दल त्यांनी का लिहावे? असेही विचारले जाणे शक्य आहे. काही तथाकथित 'दलित लेखक-कवीही' हा प्रश्न कुजबुजतात. मी एवढेच म्हणेन, ज्या आदिमअनादि दुःखांच्या डोळ्याला कवी माळी यांनी डोळा

भिडविला, तो 'सुबुद्धाचा' डोळा आहे. प्रा. माळी यांना त्याची जाणीव आहे. म्हणून तर ते ठाशीवपणे व आत्मविश्वासाने म्हणतात-

संपेल जीवन व्यक्तीचं, पिढ्यांचं
आहे रे जीवन अक्षय प्रवाही मानवाचं!

(पृष्ठ ८६)

ह्या अक्षय जीवनप्रवाहातले, हे पुढल्या अनेक पिढ्यांचे प्रेरक गाणे आहे. भ. मा. परसवाळे यांच्या अंतर्मुख करणाऱ्या मनःस्पर्शी चित्रांनी ते खूपच बोलके झाले आहे. इतिहास ठरणारी अनोखी प्रदीर्घ चिंतनकविता लिहिल्याबद्दल, नवा महाराष्ट्र माझ्यासारखाच त्यांचा कृतज्ञ असेल.

(नवभारत : ऑगस्ट १९८०)

१९. नामदेव ढसाळ यांचा चौथा काव्यसंग्रह : तुही इयत्ता कंची, तुही इयत्ता

सामाजिक बांधीलकीचा स्वीकार करणारे कृतिशील व्यक्तिमत्त्व व त्याचे लेखन यांचा मोकळेपणाने आस्वाद घेणे मराठी समीक्षेला अजून शक्य झाले नाही. अशा व्यक्तीच्या कृतींचा, समूहमाध्यमातून जाणवणाऱ्या बऱ्यावाईट घटितांचा व त्याच्यातील सूक्ष्मसंवेदक कलावंताचा विचित्र संकर झालेला असतो.

श्री. नामदेव ढसाळ यांच्या 'गोलपिठा' संग्रहाने मराठी कवितेला एक अस्पर्श-अनोखे क्षितीज सर्वार्थाने खुले करून दिले. सांकेतिक शब्दसारणीचे सर्व सांचे तोडून मोडून टाकले. ह्या दशकातील ताकदीचा जो अनुलंघ्य मानदंड होता. इतका की ढसाळांनाही त्यापुढे जाणे शक्य झाले नाही. त्यामुळेच 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले' आणि 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्रः प्रियदर्शनी' ह्या दोन पुस्तकांकडे फारसे चोखंदळ व चिकित्सक दृष्टीने पाहिले गेले नाही.

एक गोष्ट स्पष्ट आहे की, विवक्षित सामाजिक तत्त्वज्ञानाच्या पुरस्काराचा इतका ठळक गंडा बांधून वावरणे, मराठी काव्यरसिकाला त्याज्य वाटते. पण कलादृष्टीने ते सारे काव्यच, तिरस्काराचा टिळा लावून, टाकाऊ ठरवून निकालात काढणेही त्याज्यच ठरावे.

'तुही इयत्ता कंची, तुही इयत्ता' हा श्री. नामदेव ढसाळ यांचा नवा चवथा काव्यसंग्रह. एकावन्न कवितांच्या ह्या संग्रहात ढसाळांच्या सर्वगामी प्रवासाचे विविध समृद्ध रंग प्रकट झाले आहेत. स्वतःच्या अनोख्या ढंगाने आणि शैलीने उपरोक्त संग्रह, संस्मरणीय असाच झाला आहे.

श्री. नामदेव ढसाळ हे सामाजिक प्रश्नावर ज्या पोटतिडीकेने आक्रमकपणे पेटून उठतात त्याच्या अगदी उलट टोकाला जाऊन हळुवारपणे मानवी मनःकोशातील भावनांची जपणूकही ते करतात. शब्दांच्या कठोर लाठ्याकाठ्यांनी अन्याय करणाऱ्या घटकांवर तुटून पटतात. तसेच अंतर्मुख होऊन दुःख-कारणांचा बुद्धाच्या कणवेने शोध घेऊन, विधायक आशावादालाही पेरीत जातात.

ह्या संग्रहातील त्यांचे चिंतनविषय सर्वसमावेशक आहेत. स्वतःचे चित्रविचित्र विसंगत वागणे, आपल्या व आपल्या समाजावर लादल्या गेलेल्या सर्वांगीण गुलामी ओझ्याचे आदिकारण शोधणे, जग, माणसांची अतर्क्य मैफल, माणूस व त्यांचे चिरंतन विकारचक्र, शिव्याशाप आणि परवड, ऋतुचक्रांची पडझड, स्वातंत्र्य, मानवी मनाला पडणारे मुक्ततेचे संगमरवरी स्वप्न, त्यांच्या कस्पटासारख्या चिरडल्या जाणाऱ्या पण पुनःपुन्हा सजग होणाऱ्या भावना. एक दुसऱ्याशी, विचारसंसारातील गुंतागुंतीची नाती, छबुकल्या दारिद्र्यांची विरूपे आणि शरीर वासनांची व पोटाच्या कुरतडणाऱ्या भुकेची लळिते, ढसाळांना सैरभैर करून सोडतात. मग पुराने फुंफाटलेली गढूळगाळ नदी वेगाआवेगाने रोंरावत निघावी, असे शब्द त्यांना सुचतात. त्यांना वेग असतो बंदुकीच्या गोळीचा. त्यांची धार असते खंजिरासारखी तीक्ष्ण. पण ते सगळे घडत असतानाही ढसाळ वैचारिकतेच्या व भावनात्मकतेच्या किनाऱ्यांचे भान ठेवून असतात. आणि हेच त्यांच्यातील कवीचे मोठेपण आहे. कारण कार्यकर्त्यावर मात करून, शब्दांतला प्रचारगंज घासूनपुसून तो लख्ख निरामय करण्याचे काम, त्यांच्यातील कवी पार पाडीत असतो.

शब्द ही नामदेव ढसाळांच्या मनातील उसळती लाट आहे शब्दांच्या विविध विभ्रमांचा केशवसुतांपेक्षाही अधिक सुजाणपणे व धिटाईने त्यांनी विचार केला आहे. आपल्या प्रत्येक अनुभवात व पडझडीतही शब्दांची सोबत त्यांना प्रिय आहे. रक्त आणि दारूपेक्षाही. आपल्या सोबतच्या शब्दांना ते जनरल वॉर्डात विश्रांतीला बोलावतात-

हे शब्दांनो या ना इथे विश्रांतीला
पायांना चक्रे बांधून चिकार वणवण केलीत
जरा याही धडधडणाऱ्या हृदयाला पाहून घ्या ना
जरा याही धमणीचा रिदम ऐकून घ्या ना
जरा याही पुत्रवती वृक्षाच्या छायेत बसून घ्या ना
कदाचित तुमच्या वांझ गर्भाशयाला पालवी फुटेल.

(जनरल वॉर्ड)

आतापर्यंतचे शब्द स्पेशल वॉर्डातले होते. वेद, उपनिषदे, संतमहंतांनी व पोटभरू पंडितांनी त्यांची नसबंदी केली होती. माणुसकीचा, भूतमात्रांचा कोरडा गहिवर त्यांनी मढवला होता. त्यामुळे ते गावाबाहेरच्या गर्दीकडे व गावकुसाबाहेरच्या तृष्णार्ताकडे वळलेच नाहीत.

ही जाणीव ढसाळांना पोखरून काढते. सतत तळपत्या उन्हात पोळत्या अनवाणी पायांची आपली बापुडवाणी माणसे बघताना, त्यांच्या मनाची तगमग होते. आणि ते लिहितात—

शब्दांनी हरवून जायला हवंय
फक्त वेड्यांच्या जत्रेत

वेड्यांच्या
हा आमच्या नव्या जन्मठेपेचा दिवस.'

(या अखंड ग्रीष्मात)

प्रत्येक दिवस साधा असो, रजेचा असो की स्वातंत्र्याचा असो, तो घेऊन येतो अपेक्षाभंगाचा कडकडीत उन्हाळा. अशा आयुष्याच्या निरर्थक चौकटीला तरी अर्थ काय? म्हणून 'मौलाना भेंडीबाजार' या कवितेत ते म्हणतात-

'उगाच कशाला हवाय नुस्ताच शब्दांचा पाऊस
आयुष्याचे दरवाजे मोडत जाणारा.'

शब्दांच्या विविधांगी शक्तिक्षमतेचा ढसाळ सतत वेध घेत आहेत, असे त्यांच्या कवितांतून जाणवत रहाते.

हे दुनियेचे अंतरंग
हे दुनियेचे अंतर्विरोध हा धुमसणारा गदारोळ
ही निर्वस्त्र सोलून पडलेली अगतिक आयुष्ये
हे भारद्वाज महाकाव्यानंतरचे
हे रक्तवृक्ष थिजून गेलेले.

(मेंदूच आपल्या)

शब्दांची अशी अनेकपदरी झुंबड, कवीला अस्वस्थ करते

माणसांच्या
खचाखच अगतिक गर्दीची 'दंगल' त्यांना वाटते-
'दंगल' एक दर्दभरी कविता ऐकवून जाते माणसाला
आपण टाळया वाजवा
आणि वन्समोअर/ वन्समोअर

शब्द आणि कविता यांबद्दलची नामदेव ढसाळांची मनोगते खूप बोलकी, व्यापक व आशयसंपन्न अशीच आहेत. 'कविता' नावाच्या छोट्या कवितेत त्यांना रंग म्हणजे-

'मरणावर चढणारा
चतुरंग'

वाटतो. अजून मराठीची ओटी भरली गेलीच नाही अशी त्यांची धारणा आहे. म्हणून तर ते म्हणतात-

हे बहिणाबाईच्या बहिणाबाई
मरण्यापूर्वी एकदा तरी तुझे

गाणे ऐकवशील काय?
या रांडाव मराठी भाषेला
पुन्हा सवाष्ण होताना पहायचंय मला.'

(रमाबाई आंबेडकर)

भाषा सवाष्ण-समृद्ध व्हायची असेल, तर ती बोलणाऱ्या दीन-दलितांच्या जीवनमानात प्रगतिपर परिवर्तन घडले पाहिजे. पण त्यांची अवस्था अधिकच बिकट व त्रिशंकूसारखी झाली आहे. म्हणूनच नामदेव ढसाळ 'कसा विहरू' मध्ये-

धड पहाटेचा उदय होत नाही
धड पाखरे निवांत झोपी जात नाहीत
कंच्या शहाण्यांनी लिहून ठेवलीय
ही लोफर मेलडी.

शब्दांचे हे निरर्थकत्व, आपल्यासाठी व आपल्या आप्तेष्टांसाठी अनुभवल्यामुळे ढसाळ क्रुद्धविद्ध होतात. त्यांच्यातला गर्दीत वावरणारा कार्यकर्ता व कार्यकर्त्याच्या मनात राहणारा कलावंत यांच्यात रस्सीखेच सुरू होते आणि त्याच द्वंद्वांतून—

या एकाकीपणाच्या अंगाईसाठी
कुठले शब्द वापरू
कुठले शब्द. (लंगर)

असा प्रश्न त्यांच्या मनात उद्भवतो. आपल्यासमवेत अनेकांच्या स्वप्नांच्या जखमा सांभाळीत चंद्रप्रकाश प्राणात पेरून या कवीची ही मनस्वी वाटचाल चाललेली दिसते. ही शब्दलाट अशा अनेक रीतीने त्यांच्या मनाच्या कातळाला या संग्रहात धडका देताना दिसते.

प्रापंचिक कुटुंबवत्सल माणूस आणि न्यायासाठी उपलब्ध असलेल्या शक्तिसाधनांनी लढा उभारणाऱ्या पँथरमध्ये वावरणारा नेता ह्या दोन रूपांची ओढाताण त्यांच्या आरंभीच्या कवितांत दिसते. 'छबुकलं दारिद्र्य' खेळवताना पितृहृदय व मातृवात्सल्याचा समन्वय त्यांच्यात झालेला दिसतो. दोन्ही पातळ्यांवर ही कविता मनाला भिडत जाते. स्वतःच्या अपत्याकडे पाहणारा पिता आणि यातनेलाच अर्भकाचे प्रतीक मानून केलेली जोजवणूक या कवितेत दिसते.

'नेत्राचा दिवा हाताचा पाळणा करता आला नाही तुम्हाला
तरी म्हणा ना तुम्ही
पडू झडू माल वाढू....

किंवा-

बाळाला जपून उचला भावबंदांनो
ते अंगावर सू करील बरं का
आपल्या यातनांचं छबकुलं दारिद्र्य.

'ल्हानुल्याची प्रार्थना' या कवितेतही त्यांच्यातील समजूतदार वात्सल्याचा प्रत्यय येतो.

'अल्पायुषी चंद्रप्रकाश,' 'सैतानाबद्दल,' 'अजून थोडा वेळ,' आठवण, मावळतीचे गाणे, ज्वर, आरशाबद्दल 'लंगर,' आणि 'आयना' या कवितांतून नामदेव ढसाळांचे एक अनोखे ऋजू रूप आठवते.

सतत गर्दीच्या जल्लोषात आणि माणसांच्या गोंगाटात वावरणाऱ्या ढसाळांच्या अंतरंगातील एक कोपरा किती हळवा, तरल आणि एकाकी आहे याचे प्रत्यंतर त्यांच्या, 'गोची,' 'जनरल वॉर्ड,' 'दंगल,' 'मेंदूच आपल्या,' 'सजनखोर जर्दाळू,' 'पाचगणी,' 'माझ्या दफनविधीची गोष्ट,' या कवितांतून येते.

हॉस्पिटलच्या खाटेवर जवळजवळ अज्ञात मृत्यूप्रदेशातून फेरफटका मारून आलेल्या त्यांच्या मनातले सर्व रंगतरंग या कवितात उमटले आहेत:

ह्या कपड्यात फारच
चोरासारखे वाटते

हा 'पाचगणी' या कवितेचा आरंभच त्यांच्या मनोवेदनेचे ओळख पटवतो; तर 'माझ्या दफनविधीची गोष्ट' या कवितेचा समारोप—


'फक्त आठवणीत राहील
तुमच्या मैलामैलाच्या दगडावर
मुतत जाणारे
एक गावठी कुतरे'

ह्या ओळीतील अलिप्त अशा आविष्करणामुळे अविस्मरणीय ठरला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा नामदेव ढसाळ यांचा मूळ शक्तिस्रोत आहे. केंद्रमाध्यमातूनच त्यांच्या लढ्यासाठी त्यांनी स्फूर्ती, हुरूप आणि हिंमत घेतली आहे. व्यवहारात आणि जीवनकलहात माणूस म्हणून काही स्वाभाविक तडजोडी त्यांनी केल्या असतील. पण राजकीय जीवनाचे तेही एक महत्त्वाचे अविभाज्य अंग असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर कविता होणे हा त्या त्या वर्षाचा एक संकेत त्यांनी मानला आहे. आंबेडकर १९७८, १९७९, १९८० आणि आंबेडकर १९८१ या कविता व 'रमाबाई आंबेडकर' ही कविता या दृष्टिकोणातून वाचली तर ढसाळांच्या वैचारिक बांधीलकीचे स्वरूप खूप स्पष्टपणे ध्यानात येते. आंबेडकर १९७८ या कवितेचा आरंभ आणि अंत इंग्रजी कॅपिटल अक्षरांनी त्यांनी केला आहे.

'EQUALITY FOR ALL
OR
DEATH FOR ALL'

कारण हे जागतिक विश्वसत्य बुद्धाच्या आर्यसत्याइतकेच त्यांना ठासून मांडायचे आहे.



हा देश नुसताच
एरंडासारखा वाढत राहिला
त्याच्या फालतू विद्रूप पानावर
आपण अकारण लट्टू झालो.

हे उमगल्यामुळे डॉ. आंबेडकरांशी संवाद साधताना ढसाळ सहजपणे लिहून जातात.

'दहशतीपेक्षा तुझा विश्वास होता जागृतीवर
तुझा जागृतीचा आधार होता अभ्यास-सेवा'
ईश्वराची तू केलीस शवचिकित्सा
सटवीचं कापलंस नाक
केलेस नकटं....

आणि काहीही दुर्बोध यापुढे न लिहिता पुन्हा आरंभीच्या इंग्रजी ओळींची सार्थ पुनरुक्ती करून ही कविता संपते.

आपला, आपल्या चळवळ्या लोकांचा निग्रहपूर्वक शोध घेणे हे ढसाळांच्या चिंतनाचेच एक अंग आहे. 'त्यांनी वरून पाणी वाढलं, पडवीबाहेर बसवलं, विठोबाच्या दर्शनाला वंचित केलं, हे सगळं जुनं झालं आहे. नव आहे ते इतकंच की,

जमाना सर्व तुझाच आहे
तरीही तुझे लोक दुःखी आहेत.
फकीराला पंतप्रधान होता येतं इथं
परंतु मांगाभंग्याला नाही.

(आंबेडकर-८०)

कंठाला लंगोट्या बांधून डिंग्या मारणाऱ्या संधिसाधू अनुयायांना-आपल्याच स्वबांधवांना ते कठोरपणे फटकारतात. देशाच्या सध्याच्या स्थितीचे विदारक दर्शनही घडवितात.

हा भाकरीचा जाहीरनामा
हा संसदेचा रंडीखाना
ही देश नावाची आई
राजरोस निजते कुबेराच्या
सोबत काळ होत चालला आहे कर्मठ....

(आंबेडकर-७९)

आंबेडकर ८१ ह्या कवितेत त्यांनी एक दुर्दम्य विश्वास व्यक्त केला आहे :

स्वप्नांचे पडदे टरकावून सिंहनादात सामील व्हायला
सज्ज आम्ही/आता भीती कोणाच्या बापाची?

'रमाबाई आंबेडकर' ही तर सर्वांची आई. तिचे स्मरण व शब्दचित्र ढसाळांनी अतिशय मनःपूर्वकतेने रेखाटले आहे.

अष्टौप्रहर ती भटीण सरस्वती साहेबांच्या मागे असे!
सवतीमत्सर तुला करताच आला नाही का ग?

किंवा

'डबकं....चाळीतल्या राजहंसांना
दगडी कोळशांच्या धुराची
तू लागू दिली नाहीस झळ
तुझ्या मुक्या मनाची गाणी
कल्कीचा घोडा ह्या कलियुगात घेऊन फिरतो आहे
मराठी भाषेची ऐसीतैसी करत.

आणि ह्या अशा आत्मीय भावनातूनच, आत्यंतिक सलगीतूनच त्यांच्या भाषेला पडणारे पिळे आणि पैलू दृग्गोचर होतात. दर्शनी कधीकधी ते अस्वस्थ करतात. अप्रस्तुत वाटणारे लिहिल्याचा भास निर्माण करतात.

'कामाठीपुरा,' 'पिला हाऊसचा मृत्यू,' संत फॉकलंड रोड व 'मौलाना भेंडीबाजार' ह्या चार कविता या संग्रहातील उत्कट व उत्कष्ट कविता म्हणून नमूद करता येतील. ज्या अमानुष व अपमानुषी परिसरात नामदेव ढसाळांनी आपले आयुष्य घालविले. वडिलांचा खाटिकाचा व्यवसाय असल्यामुळे खाण्यापिण्याच्या रंगाढंगात बुडालेल्या अनेक छंदीफंदी माणसांचा, त्यांच्या रागालोभाचा, उद्रेक-उत्स्फोटाचा ढसाळांना उपजतच संस्कार घडत गेला.

मुंबईतल्या ह्या बदनाम वस्त्या. संस्कृतीच्या दिवाळखोरीच्या वाहत्या जखमा. माणुसकीला व स्त्रीत्वाला डागणारा चरचरीत चटका. तसे ह्या वस्त्यांचे व विषयांचे सूतोवाच 'गोलपिठा' मध्येही आहे. पण येथे ढसाळांनी काव्यात्मक उंची गाठली आहे. ह्या वस्त्यात कधीच व काहीच सुरक्षित-नसलेल्यांनी फेकून झोकून दिलेल्या आयुष्याच्या कवड्यारेवड्यांचा-घाम-रेत-रक्ताचा चोवीस तास भन्नाट जुगार चाललेला असतो. 'कामाठीपुरा' एखाद्या चित्रकाराच्या सृजनात्मक कौशल्याने ढसाळ उभा करतात तो असा-

कॅलेंडरला हेपलून
कित्येक शतकांचा उपदंश देहावर मढवून
निशाचर सळिंदर पहुडला इथे.'

जीवनाचे बेरंग कवीची जीभ कडूजहर करतात. कोणत्याही कसल्याही विषाची चव घेण्यासाठी रांगा लावणारे येथले खप्पड स्त्रीपुरुष कवीला क्लान्त करतात.

शब्दासारखे इथे मरण देखील आले आहे भरून.

बस्स! थोड्या वेळात इथे सरी कोसळू लागतील, आणि अशा कामाठीपुऱ्याची 'चिखलातलं कमळ' होण्याची कवी आसुसून वाट बघतो आहे. पिलाहाऊस ढसाळांना आपल्यासारख्या अनेकांच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक अविभाज्य भाग वाटतो.

'आजपर्यंत आमच्यासारखाच जगलास तू तिसरा चौथा दर्जा' 'भेंडीबाजार' आणि फॉकलंड रोड ह्या कवितांना त्यांनी लावलेल्या 'मौलाना' व 'संत' ह्या उपाध्या, तुकारामाचा आणि नेकरहिम अल्लाचा संदर्भ अशा दुहेरीतिहेरी अर्थवलयांतून त्यातला विखार व उपरोध उकळणाऱ्या लोखंडाच्या रसासारखा ढसाळांनी शब्दबद्ध केला आहे. त्यातला आवेग व त्वेष इतका आहे की शब्दाआधी अर्थ हत्पटलावर दाणकन आदळतो, सुन्न करून सोडतो. मर्ढेकरांच्या कवितेतील उपऱ्या सहानुभूतीचे किंवा नारायण सुर्वे यांच्या 'पाणी घे' मधल्या टिचकी मारणाऱ्या सावध भावनेचे कुंपण ढसाळ आपल्या स्वयंसिद्ध सामर्थ्याने लीलया ओलांडतात. नुस्ते त्या वस्तीत ते रसिकाला नेत नाहीत तर साऱ्याच शिड्यापायऱ्या उतरवून तळागाळाच्या तळघरात नेऊन सोडतात. मधाचे पोळे फुटावे असे रंगबेरंग टिपणारे त्यांचे शब्द टपटपतात.

'दंगल' ही एक प्रत्ययकारी कविता. प्रत्यक्ष चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्याला आकस्मिकपणे कोणत्या आक्रिताला सामोरे जावे लागेल त्याचा नेम नसतो. लहानशा प्रतीकात्मक निषेध मोर्चातून उसळते प्रचंड दंगल. पण ही अंतर्मुख करते. खूप खूप काही शिकवून जाते, शिकण्याची इच्छा असलेल्या सहानुकंपी माणसाला.

स्वातंत्र्य आणि मुक्तीची उन्मुक्त स्तोत्रे आपल्या स्वतःच्या ढंगाने ढसाळांनी गायिल्ली आहेत. तुकारामापेक्षाही कितीतरी पटीच्या आवेशाने, ते स्वातंत्र्याला बजावतातः

किती ठेवावा तुझ्या
इब्लीस सर्जनावर विश्वास
आम्ही जंगली माणसं
दगडानं बोचा पुसतो नि दगड फेकून देतो
या नागरी संस्कृतीत
त्यांनी खुशाल फासावा तुला शेंदूर
चढवून घ्यावं त्यांच्या लेकीबाळांनी तुला उरावर
खरंच रे, आता आम्ही फार थकलोत.

पण याही अपंग अवस्थेत 'इराखत' करण्याची, शस्त्रक्रिया उरकण्याची व नियोगाची एकच संधी मागण्याची, अदम्य आकांक्षा ते मुखरीत करतात.

'गुलाबी आयाळीचा घोडा' म्हणजे स्वातंत्र्य. ते छान असतं समुद्रासारखं,

यांच्या चौफेर वावरानं फुलात भरतो प्राण
दुःखी आयुष्यात वारा वाजवतो बासरी

मौसमाचा होऊन जातो मोर
आणि अश्रूंचे मोती.

एका आत्मविभोर तंद्रीत श्री. नामदेव ढसाळ स्वातंत्र्याचे उन्मुख गीत गातात. 'तुम्ही' या कवितेमध्येही असाच सळसळता सर्पोद्दाम आवेग आहे. वस्तुतः सर्जनशीलता, समानता, संवेदकता, समजूतदारपणा व सच्चाई ही स्वातंत्र्याची अपेक्षित अपत्ये. पण ढसाळ दलित जीवनाला आलेल्या उलट्या अनुभवांचे चित्रीकरण करतात. आणि तारस्वरात पण आत्मविश्वासाने इशारा देतात.-

तुमच्या पुराणकथांच्या बाजिंद्या कोकशास्त्राची
आम्हाला किळस यायला लागतीय पुन्हापुन्हा!

ढसाळांच्यातील कलावंत, हा शंभर नंबरी कसदार आहे, त्वेष, उपरोध, अगतिकता, पिसाटपणा, आक्रमकता, वात्सल्य, अलवारपणा, दैन्य, दारिद्र्य, पिचलेपण व आकांक्षा या सगळ्यांचे रसायन, त्यांच्यात एकरसले आहे. त्यामुळे त्यांच्या शब्दांना सुभाषितांचे सहजरूपही लाभलेले दिसते. वानगीदाखल-

मरणापूर्वी माणूस असतो खरा
बाकी नुसती धूळ आणि धुराळा

किंवा

आयुष्य नाही हे वांग्याचे भरीत
कोण असे आहेत ते त्यांची वस्त्रे
दारिद्र्याच्या पावसाने भिजली नाहीत.

ह्या ओळी पाहता येतील....मादरी जुबान, कत्तलखोर, क्षुद्र गोष्ट, व कसा विहरू, या कवितांतील उपरोध जातिवंत आहे. कुरणे, म्हशी, पावसाचे गाणे, निळू फुले....या कवितातील लोकगीतांची लय, उखाण्याचा आवाज आणि शब्दविशिष्टत्व लक्षणीय आहे.

यम-यमीच्या कथेचा ते सहज उल्लेख करतात, चल रे भोपळ्या, येग गाई गोठ्यामंदी, थुई थुई नाच माझ्या अंगणात मोरा, सुसरीण बाय तुझी पाठ मऊ, मुंबई नगरी बडी बाका, पैल तो गे काऊ....खळ्यात मळ्यात ढोर गवार शुद्ध नारी, सब ताडनके अधिकारी, सज रही गली मेरी मा सुनहरी कोठी मे, अशा कितीतरी नादगीतप्रधान मुखड्याची ते आशयसमृद्धीसाठी स्वाभाविकपणे उपयोजना करतात.

त्यांचे दुहेरी, तिहेरी किंवा विशेष शब्दप्रयोजनही कविता समृद्ध करण्यास हातभार लावतात. आणि हे उपजतच त्यांच्या प्रतिभेला भावले आहे. जात्यावर बसल्यावर ओवी सुचावी असे शब्दांमागून शब्द ते अभिजातपणे पेरीत जातात. अॅक्युरेट कनी, तन्मयी मंथन, कृपेची पाभर, अजनबी पेरणी, खूरहीन घोडा, दुःखाची व्हायोलीन, लोफर

मेलडी, उत्तुंग रासक्रीडा, चाळझोक बुलडे, कंदमुळे लज्जागौरी, दुडु दुडु मंझील, पावलाची जर्द रुमझुम, उफराटला पिसाची खैरीबांडी कोंबडी, पेटून उठलेलं बैरागी झाड, सूर्यकृपेचे दीर्घ दुखणे, निर्ढावलेले निर्मनुष्य अंतःकरणाचे दगलबाज, पुष्टालेली अभिजात ढुंगणे, सोवळ्या अंगरख्याची बाजिंदी लुगडी, अशी कितीतरी उदाहरणे या संग्रहात सहज दिसून येतात.

श्री. नामदेव ढसाळ यांच्या आणखी एका वैशिष्ट्याचा निर्देश केला पाहिजे, आणि ते म्हणजे, त्यांचा शेलका शिवराळपणा व गुंगविणारी ग्राम्य लय. ते त्यांच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचे स्वाभाविक अंग आहे. लिंगयोनीवाचक शब्दांनी कोंडलेल्या उद्रेकाला, अनावर संतापाला वाट करून देणे हा त्यांचा प्रकृतीधर्मच आहे. जास्तीत जास्त राग, चीड, अवहेलना, अपमान करायचा तर तशाच जबऱ्या शब्दगोट्यांचा ते भन्नाट मारा करतात. आणि तो इतका अचूक असतो की लक्ष छिन्नभिन्न व्हावे आणि मनही हलकेमोकळे व्हावे. वऱ्हाडी ढगांचे संमेलन ही एक या दृष्टीने मात्र फसलेली, भट्टी बिघडलेली कविता आहे. हा एकच अपवाद नोंदावा लागतो.

श्री. नामदेव ढसाळांच्या कवितेचा आलेख चैतन्यमय व रसरशीत ठेवण्याचे कार्य त्यांच्या पुणेरी महारी बोलीतील शब्दविशेषांनी केले आहे. डेग डिंग्या, बोंडशी, रांड, इराखत, चौव्हाडडी, संदल, हेपलून उटपटांग लबडब लथ, नस्तर, बिंदचाटे, ढाबळी ह्या शब्दांची शक्ती येथे द्विगुणित झालेली दिसते.

तुही इयत्ता कंची, तुही इयत्ता ही शीर्षकनामाची अखेरची कविता ज्ञानामानापा ून वंचित असलेल्याच्या बेढंग्या जीवाचे कोडे त्यांनी शिक्षित सुसंस्कृतांपुढे घातले आहे. आहार-निद्रा-भय-मैथुनाच्या पशुवत पातळीवर जगणारा वर्गच, ढसाळांच्या तोंडून, संस्कृतीसंपन्नांना उलटा प्रश्न करीत आहे. यांच्या वैफल्याचे, विपन्नतेचे, कदान्नभक्षणाचे व शिवराळपणाचे कारण कोण व काय, हे सांग? सांगता येत नसेल तर तू शिकलास ते काय? कसे? कुणापासून? कशासाठी? या प्रश्नांची उत्तरे मराठीला मागणारा, एक अद्वितीय मानदंड ढसाळांनी निर्माण केला आहे. तिला चैतन्याचे व सौभाग्याचे लेणे चढविले आहे. त्यांच्या, 'तुही इयत्ता कंची' ह्या संग्रहातील त्यांच्या कविता वाचताना, 'पिला हाऊसचा मृत्यू' नावाच्या कवितेतील ओळीच मला उद्धृत कराव्याशा वाटतात.

....तुझ्या आयुष्याला पेलून धरणारी ही तीव्रतर साडेसाती
आज मलाही आनंद होतोय की तू तिच्याही पुढे
निघून जाऊ शकतोस.

मलाही असंच म्हणायचं आहे, ह्या संग्रहाबद्दल!

(पूर्वा : फेब्रुवारी १९८२)

२०. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' चे विविधांगी मूल्यमापन

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही विशेष गोष्टी, भारतीय समाजात, पर्यायाने महाराष्ट्रातही घडल्या. लोकशाही संकल्पनेप्रमाणे शिक्षणाचा लाभ बहुजनसमाजाला मिळाला. स्वतःकडे पाहण्याची एक ज्ञानदृष्टी लाभली. यातूनच आतापर्यंतचे साहित्यातील सामान्यांचे जीवनचित्रण आणि प्रत्यक्ष त्यांचे जीवन यातील कृतकतेचे आकलन झाले. आपल्या स्वतःच्या आयुष्याचे आपणच चित्रण करावे ही प्रेरणा निर्माण झाली.

लेखनस्वातंत्र्य ही लोकशाहीने दिलेली महत्त्वाची उपलब्धी होय. लेखनाच्या सहाय्याने आपल्या विचारविकारांचे आणि सर्व बऱ्यावाईट अनुभवांचे आविष्करण करता येते. कलाभिव्यक्तीमध्ये आत्मदर्शन अत्यंत महत्त्वाचे व मौलिक मानले जाते.

मराठी भाषेच्या दृष्टीने विचार केला तर 'आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने कळसास पोचला आहे.

आमच्या आजच्या आयुष्याला, जरी तोचतोपणाचा शाप असला, यांत्रिकतेने व मुर्दाड संवेदनांनी. जरी, आयुष्य झाकोळले गेले असले; तरीही आस्वाद्य आणि निवेदनयोग्य असेही काहीतरी असतेच.

आत्मचरित्र हा सर्वांत सोपा वाटणारा पण सर्वांत अवघड असा वाङ्मयप्रकार आहे. कारण आयुष्यातल्या सांगण्याजोग्या आणि लपवण्यासारख्या गोष्टी स्वेच्छेने येथेच सांगण्याची गरज असते. त्या गोष्टी सांगत असताना, मुद्दाम खोटेपणाचा आसरा न घेणे आणि आपल्याशी संबंधित असलेल्या कोण्याही व्यक्तीची बदनामी होणार नाही याचीही काळजी घेणे अग्रक्रमाचे ठरते. आत्मसन्मानाचे गौरवास्पद प्रसंगही फार चढत्यावाढत्या स्वरूपात न सांगणे; इतरेजनांची सभ्यतेला सोडून सामाजिक अडचण होणार नाही याची काळजी घेणे आणि व्यक्तिगत पातळीवरही किंवा स्त्रीपुरुषातील अनेक सुप्तगुप्त नात्यांच्या भावचित्रणात व्यावहारिक व्यवधान न ढळू देणे, अशा कितीतरी गोष्टींचे आत्मपर लेखन करणाराला भान ठेवावे लागते. म्हणून तो अवघड असा वाङ्मयीन लेखनप्रकार मानला जातो. श्री. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या ग्रंथाचे या दृष्टीनेच

मूल्यांकन करावयाचे आहे.

आत्मपर लेखन हा नुसता स्वानुभवकथनाचा प्रकार असा कधीही नसतो. अभिव्यक्तीचा तो केवळ एक बाजही नसतो. तर तो एका चोखंदळ अशा सर्वसंचारी मनाने घेतलेला वेध असतो. लिहिणारी व्यक्ती मग स्वतः कितीही गळ्याभर गाळात फसलेली असू दे. त्या व्यक्तीने स्वतःच्या आणि समाजाच्या संबंधांचा अर्थ आणि अन्वयार्थ, प्रामाणिकपणाने पण तरी सुजाण समंजसतेने रंगविण्याची त्यात गरज असते.

बाकीच्या वाङ्मयप्रकारात अनेक बारकावे असतात. त्यांच्यात एक बहिर्गत शिस्त चटकन डोळ्यात भरते. विविध प्रकारोपप्रकार आणि त्यांचे केवढे तरी सोपस्कार पार पाडावे लागतात. नाटक-एकांकिकासारखे भाग तर संमिश्र कलांच्या सदरात गणले जातात. त्यामुळे ते अधिक जटिलही वाटतात. आत्मचरित्रात प्रत्येकाचा मनमुक्त संचाराविष्कार असतो. एकाचा दुसऱ्याशी दर्शनी ताळमेळ नसतो. तरी त्याचीही शिस्त असली, समाजसंकेतांची धूसर चौकट असली तरी पक्के शास्त्र मात्र नसते.

येथेच तर अधिक तोल सावरण्याची शक्यता निर्माण होते. शास्त्र नसल्याने, काटेकोर शिस्तीचा अभाव असल्यानेच, आत्मचरित्रलेखन शस्त्राप्रमाणे धारदार व लखलखीत होण्याची शक्यता वाढते.

मराठीत काही ठळकपणाने आठवणारी आत्मपर लेखनाची पुस्तके आहेत. अगदी 'माझा प्रवास' किंवा 'माझे रामायण' यांच्यापर्यंत मागे गेलेच पाहिजे असे नाही. पण लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतिचित्रे', आचार्य अत्रे यांचे 'कऱ्हेचे पाणी', आनंद साधले यांचे 'मातीची चूल', हंसा वाडकर यांचे 'सांगत्ये ऐका' या पुस्तकांचा निर्देश करता येईल. याशिवाय स्नेहांकिता, अजून चालतोचि वाट, हे तो प्रचीतीचे बोलणे, मीच हे सांगितलं पाहिजे या ग्रंथांचासुद्धा उल्लेख करता येईल. नंतरच्या काळातील, 'बलुतं', 'मु. पो. देवाचे गोठणे', 'अक्करमाशी', 'फांजर', 'गावकी', 'तराळ अंतराळ', 'काट्यावरली पोटं', 'आठवणींचे पक्षी', 'उचल्या', 'जीर्ण आमुचं' व 'माझ्या जीवनाची चित्तरकथा' किंवा 'मला उध्वस्त व्हायचंय', अशी कितीतरी लक्ष्यवेधी 'आत्मचरित्रे' मराठीत आली आहेत.

'दलित साहित्य' या संज्ञेला प्रतिष्ठा लाभल्यानंतर आणि त्यांतील ग्रंथनिर्मितीने आपली अपरिहार्यता व पृथगात्मकता सुव्यक्त केल्यानंतर निर्मितीला व आस्वादाला एकदम वेग प्राप्त झालेला दिसतो.

याच प्रकाराला जवळ असणारे आणि आपल्या सहजतेने आणि अनोखेपणाने सर्व थरांतील वाचकांना खिळवून ठेवणारे महत्त्वाचे पुस्तक म्हणजे श्री. लक्ष्मण माने यांचा 'उपरा' हा आत्मपर ग्रंथ होय.

आपल्या देशातील सामाजिक विषमतेचा आलेख 'उपरा' या पुस्तकात आला आहे. वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था ह्या जोडव्यवस्थांनी इथल्या माणसांची जी दुरवस्था केली आहे याची ही आणखी एक करुण कहाणी आहे. ज्यांना दलित-अस्पृश्य म्हटले-मानले जाते, त्यांना किमान गाववस्त्या आणि घरंदारं तरी असतात. पण वन्यजमाती व भटक्या जातीजमातींची स्थिती त्याहूनही वाईट आहे. जमेल तेथे

निघतील तितके दिवस काढायचे. नवा ऋतू बदलत्या सुगीत तीदेखील गावशीव सोडायची.

'कैकाडी' ही भटकी जमात त्यापैकीच एक आहे. त्या जमातीचा दिनक्रम-आयुष्यक्रम 'उपरा'मध्ये लक्ष्मण माने यांनी चितारला आहे. पर्यायाने आपले सुस्थिर होण्यापर्यंतचे व आपल्या रक्तानात्यांच्या आणि अन्य माणसांचे जीवन, मुक्काम आणि पायपीट, पाल आणि प्रवास यातील ताणलेपणा त्यांनी 'उपरा'मध्ये शब्दांकित केला आहे. ते लिहितात-

'कैकाडी काम कुणी मागायचं नाही. कोरचतकूर भाकरीसाठी या कुळवाड्यांची मरनाची वझी वाहायचा. बैलं पानी पाज, कुनाच्या कुपाच्या काठ्या लाव, कुनाची गंज लाव, कुनाचं इंज्यान गाडीत चढव-आसलं धंदं करायचा.'

आयुष्याला जगण्याला खास काही उद्देशच नाही. जन्माला आलो म्हणून मरेस्तोवर जगायचे ही, अन्य भटक्या जमातीसारखी सर्व कैकाड्यांची परवड चाललेली. कपाशीच्या पिकाला पाणी पाज, औषधं मार, अशी मिळतील पडतील ती कामे, त्या त्या गावात त्या त्या मुक्कामाला करायची, एरव्ही चावळं कापीत. काही काही बनवीत आयुष्य ओढणारे हे गरीब बापडे कैकाडी, पदरी भरपूर पोरवडा, काही त्यांच्यासारखीच सोशीक व गरीब गाढवे, थोड्याशा कोंबड्या, एकदोन कुत्री आणि बायकाकुटुंब घेऊन अंधारवेळी काट्यागोट्यातून चालत निघायचे. कुठल्याही गावच्या हागणंदारीत काही दिवस मुक्काम ठोकायचा, बायका भांगलान्-दूपलान् सारवान करायच्या. मजुरी पैशात मिळायची नाही. 'वटाभर मिर्च्या, कणसं, शेंगा, कालवाण-असं, जे असलं ते.' (पृष्ठ ४०) मजुरी म्हणून स्वीकारायचं. त्याचेही मोठे उपकार वाटायचे. आक्रित वाटायचे आणि आलेला दिवस ढकलायचा. कुठेतरी कधी घरं असलीच तर ती सतत बंद. त्यांच्या दाराला कुलूप. त्यावर माती थापलेली. शेणगोळा डकवलेला आणि ही माणसं आपले अख्खे विंचवाचे बिऱ्हाड, कधी आपल्या, कधी गाढवांच्या पाठीवर टाकून हिंडायची.

गाढवांच्या कंठाळ्यात असेल नसेल तेवढे सामानसुमान लादल्यामुळे ती पार ओझ्याने वाकलेली, डोंगरदऱ्यांतून जाताना जीव घायकुतीला आलेला असायचा. गाढवाच्या पाठीच्या 'कनाठ्या'ने बसल्याजागी आग होऊन ठणकेपर्यंत दुखायला लागायचे. अंधार-उजेडाचा, उंचसखल जागेचा व काट्याफाट्यांचा विचार न करता सतत पायपीट चालूच असायची. जगण्याच्या धबडग्यात एखादी लहानशी जरी चूक अगर आगळिक झाली तर गावातले सगळे लोक मारझोड करायचे. बायकांवर, मुलींवर बलात्काराच्या-जबरीच्या प्रकारालाही कैकाडी बायकांना सज्ज राहावे लागे.

श्री. लक्ष्मण माने ज्या वेगवान पद्धतीने आपली जीवनकथा सादर करतात त्यात विद्यमान सुस्थिर समाजाला अनंत प्रश्न सापडतील. त्या प्रश्नांची उत्तरे देणे म्हणजे आपल्याच नालायकीचा-कुकर्माचा पाढा वाचण्याचे धाडस अंगी असावे लागेल. 'शारदी'वरला बलात्कार (पृष्ठ २१), बाभळीचे फोक कापले म्हणून आईची धिंड (पृष्ठ ३६), मारुतीमामाची देखणी बायको पारुमामीवरील विटाळशी असतानाही

झालेला बलात्कार (पृष्ठ ५२), नवऱ्याला ताप भरला म्हणून रात्री बाहेर गेलेल्या 'पिंगळा' जमातीच्या स्त्रीवर शिंदळकीचा आरोप (पृष्ठ ५५), गजरा आणि इठू न्हावी, तिची सून व टग्या पाटील (पृष्ठ ६६), कैकाडी-वडारी जोडपे (पृष्ठ ९४), अशा 'स्त्री'वरील, सरसकट अन्यायाची चित्रणे; ही संस्कृतीच्या विकृत वस्त्याची देणगी आहे.

स्वतः कैकाडीही आपल्या परंपरेने लादलेल्या, अनंत अंधश्रद्धांनी आणि भयगंडांनी पिचले आहेत. धर्मभावनेच्या पगड्याने त्यांची घुरती गठडी वळली आहे. खायला पोटभर अन्न नाही. ल्यायला अंगभर नवं धडकं वस्त्र नाही, शिक्षणाचा विचार नाही, असला तरी शक्यताच नाही. पण देवदेवस्की, तऱ्हेतऱ्हेच्या देवांचे अंगात वारे येणे, शिवाशिव-विटाळाचांडाळांची, बाटवाबाटवीची उतरंड घट्ट आवळून बसलेली, कारण सर्व नगण्यांनाही उच्चवर्णियांकडून या दूषित वारशाचा वसा प्राप्त झालेला. ह्या परंपरेची जपणूकही कैकाडी मंडळी प्राणपणाने करतात. त्यासाठी वर्षभराच्या मेहनतीचा पैसा फुंकून टाकतात. हे कमी पडले, कमी वाटले म्हणून नव्याने कर्ज काढतात, त्यातून नैवेद्याला दारू, गुन्ना म्हणजे पोसलेले डुक्कर घ्यायची. जत्रेत, देवीच्या समोर आणि भुताखेतांच्या शांतकीसाठी सामूहिक हत्या व्हायची. नैवेद्याच्या त्या मांसाची चव घेत घेत पुन्हा कैकाडी पुढल्या कुठल्यातरी मुक्कामाला सुटायचे. त्या भटकंतीच्या परवडीचे अतिशय ओघवते आणि चित्रदर्शी लेखन, लक्ष्मण माने यांच्या 'उपरा'च्या यशाला, कारणीभूत झाले आहे.

अज्ञान व अंधश्रद्धांचा पगडा इतका जबरदस्त आहे की, 'वडिलांनी एकाच मांडवात दोन्ही छोट्या बहिणींची लग्नं आधीच उरकून टाकली आहेत. त्यामुळेच हे लिहिण्याचे धाडस करू शकलो असेन काय?' असा आपला लेखनप्रपंच, मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून तपासताना श्री. लक्ष्मण माने यांनी कयास सांगितला आहे. कारण घरावर व माणसांवर जातवाल्यांनी आणि गावकी-भावकीने बहिष्कार घातला की सगळे, सगळ्यांचेच आयुष्य नासून जायचे. हे बदलायचे असेल तर या समाजाला शिक्षण दिले गेलेच पाहिजे हाच एक इलाज दिसतो. लक्ष्मण माने यांनी आपल्या शिकण्याचे केलेले शब्दांकन प्रभावी आहे.

अशा घरदार, लंगोटी, पाटीपुस्तक नसलेल्या मुलाला शाळेत पाठवण्याचा मास्तर सल्ला देतात. शाळेत घालायला बापाची तयारी पण लक्ष्मण विंचू चावल्यागत झालेला. लेकाची बाजू घेणाऱ्या आईलाही बापाकडून वळ येईस्तो मार पडतो. प्रत्यक्षात शाळेत मास्तर शिकवत नाहीत. वर्गात आत बसूही देत नाहीत. केसांचे जंजाळ शिप्तर झालेले. नाकातून शेंबडाच्या तारा, अंगावर मळाची पुटे आणि शाळेतल्या बाकीच्या पोरांनी पँट व सदऱ्याचे काम पार पाडणारा मळका सदरा सारखा वर करून किंवा बसल्यावर टवाळी करून जीव अगदी नकोसा केलेला; अशा आत्मचित्रात (Self-Portrait) लक्ष्मण माने यांनी भरलेले रंग मराठी साहित्यात नवे व अनोखे आहेत. अशा गाढवजगण्यातही आपल्या पोराने शिकले पाहिजे, कागद वाचायला येणारा मास्तर बनलेच पाहिजे, ह्या ध्यासासाठी जीव पाखडणाऱ्या वडिलांचे व्यक्तिचित्रही फार नेमके उतरले आहे.

परंपरेच्या चरकात हा नशिबाचा भोग म्हणून पिळून निघणारा, अज्ञानात खितपत पडलेला, कष्टाला मागेपुढे न बघणारा, नशादारूच्या घोटात ज्याला कैकाडी 'काळळं' म्हणतात-बुडणारा, बायकोला बडव बडव बडवणारा, पण तिच्या वळावर फुंकर मारणारा-हळद लावणारा, गावकऱ्यांनी मारहाण केली तर तिला आपले फाटके खमीस घालणारा, कधी तिच्या अंगाशी झटणारा, पोरावर डाफरणारा, त्याच्या साखरपुडा तोडण्याचा, परजातीत लग्न करण्याच्या निर्णयाने पार खचून गेलेला, मास्तर प्राचार्यांना भेटायला आल्यावर अवघडून बसणारा हा पिता-'बा', हा 'कैकाडी'-कोरवी जमातीचा तर प्रतिनिधी आहेच; पण या स्वतंत्र देशातल्या लक्षावधी नगण्य-सामान्याचाही जिवंत नमुना आहे. श्री. लक्ष्मण माने यांच्या आत्मचरित्र लेखनाची आणि यशस्वी कलाकृतीची ही मोठीच पावती म्हणावी लागेल.

सातवी परीक्षेपर्यंत आपण काठावर पास होत आल्याचे ते जितक्या स्वाभाविकपणे सांगतात तितक्याच सहजतेने, 'मी सातवीला नापास झालो होतो, पण फॉर्म परीक्षेला पास झालो होतो. म्हणून आठवीला जाता येत होतं.' वडील म्हणाले, 'लक्षा! आता शाळाबिळा बास झाली. आपलं घरपरपंच बग. पोटापुरतं झालं.' पण सांगवीच्या शाळेतली भानगड कानावर येताच त्राग्याने ते म्हणतात, 'का आई घालायची ती घाला. आमाला नीट माणसावानी जगू द्या. तुमी आन् तुमचं नसीब. कसं व्हईल तसं वागा.' (पृष्ठ ८१, दु. आ.)

आपल्या मॅट्रिकच्या शिक्षणाचं आणि पुढच्या आयुष्याचं वर्णन लेखकाने द्विस्तरीय पद्धतीने चित्रित केले आहे. आपल्या पत्नीच्या-शशीच्या समंजसपणाचे, तिच्या शिलाई, पिशव्या डकवणे, उपास काढणे, सासूसासऱ्याच्या अनाकलनीय शिव्याशापांना सोशीकपणे सहन करणे, सरकारी कार्यालयातील फुकटपगारखाऊ लोक, आंतरजातीय विवाहाला सरकारी मदत देण्यात दाखवलेली अक्षम्य नालायकी व नाकर्तेपणा, सगळीकडचे शाळा चालवणारे पोटभरू शाळासंचालक आणि बाबाजी-माताजी, जातीभेद, समाजवादी पक्षातील काही निष्ठावंत, कृतिशूर कार्यकर्ते, स्वतः घेतलेले प्रायश्चित्त, जातीसाठी दुसऱ्या लग्नाचा फार्स-या साऱ्या प्रसंगांना शिक्षित मनाच्या अगतिक शरणतेचा जो अंतःस्रोत लाभला आहे, तो 'उपरा'ला संस्मरणीय करणारा आहे.

'उपरा'चे वेगळेपण म्हणजे त्यातील व्यक्तिदर्शने आणि स्थलचित्रणे होत. महाराष्ट्रातल्या, देशकोकणातल्या छोट्या छोट्या वाड्या व गावे, जी कदाचित तालुक्याच्या नकाशात असली तरच फार झाले अशी. कैकाड्यांच्या भ्रमंतीत लक्ष गावापासून गावांचे असले तरी पोटापोरवड्यासाठी, गाढवशिंगरासाठी, यात्राभावकीसाठी, भांडणभावकीसाठी अनेक मुक्काम पडायचे. ती सगळी चिंटीपिंटी स्थळे-गावे, तिथल्या अक्षुण्ण मानवसमूहाचे व्यंगरंगासहित केलेले नेमके चित्रण, जत्रातीर्थाचे, बळीनैवैद्याचे, कज्जाखटल्याचे, रुसव्याफुगव्यांचे, मुलांच्या भांडण-कलागतीचे, गावकऱ्यांच्या आगाऊ-अडेलतट्टूपणाचे, पोलीस-पाटलांच्या बरेवाईटांचे आणि मानापमानाच्या शोकान्त पर्यवसानाचे, लेखकाने केलेले बंदिस्त

शब्दांकन वेगवान, नाट्यमय आणि दृश्यमाध्यमस्पर्शी उतरले आहे.

'स्त्री' व्यक्तिचित्रणे करण्यात श्री. लक्ष्मण माने यांना आद्य कथानिवेदक हरी नारायण आपटे यांचे आधुनिक रूप लाभले असे म्हणण्याइतक्या त्या सूक्ष्म, अल्पाक्षरी व प्रत्ययकारी रीतीने उभ्या केल्या आहेत. उदाहरणादाखल त्यांची 'आईंच पाहाता येईल. एकच छोटे वाक्य लेखक लिहून गेला आहे :

'आई कधी हसलेली मी पाहिली नाही.' (पृष्ठ २९) स्त्रीच्या समग्र आयुष्यात चेहऱ्यावर हास्याची रेषादेखील कधी न उमटणे, यातली वेदना किती भयानक असेल याची कल्पनाच केलेली बरी. शहरी ग्रंथप्रेमी ज्याला फक्त पुस्तकी आणि उडत्या शब्दांचे विश्व तेवढे ज्ञात आहे, त्याला हे कल्पनेनेही कळेल का याची शंका वाटते.

समी, लाली, पुष्पी, किसना आणि लक्षा एवढ्या पाच मुलांची आई असलेल्या आपल्या बायकोला आसूडफोकाने सपासप बडवणारा बाप, दारूच्या नशेमुळे आणि बाहेरच्या अवहेलनेमुळे त्याच्यातला जागा झालेला राक्षस आणि त्याचा मार खाणारी आई बघूनच, 'आता साळंतनं पळायचं नाही' हा धडा व निश्चय 'लक्षा' करतो. आपल्या भावाच्या बायकोला पारूवहिनींना नेहमी आंघोळ करण्याबद्दल, केस विंचरण्याबद्दल टोकणारी ही आई, जेव्हा बलात्काराने ती भ्रष्ट होते, रडते, करुणा भाकते, विनवते, पण त्याकडे ती कानाडोळा करते. त्याप्रसंगी ती कठोर वाटली तरी, ती; तिच्यावर झालेल्या जीवनसंस्कारांचीच अपरिहार्य परिणती वाटते.

ही स्त्री इतकी कनवाळू व भाबडी आहे की, पाटलाच्या मुलीला-रत्नाच्या आयुष्याची वाट लागल्यावर, तिला अतीव दुःख होते. तिनं वाढलेलं शिळंपाकं, दिलेल्या मिरच्या गवारी यांची आठवण काढून, 'घरचं माणूस गेलं' तशी ती रडते. भाबडेपणाने तिला एका प्रश्नाचे उत्तर मिळत नाही म्हणून उघड विचारते, 'तिच्याबरूबर लगीन कुणीच का क्येलं न्हाय? आपल्यात तर एक एक बाय किती बी नवरं करती? एका नवऱ्यानं सोडून दिली, तर ती पुन्हा दुसऱ्या नवऱ्यास्नं उठून पयल्या नवऱ्याकडं नांदती, हे कसं?'(पृष्ठ १०२)

हा प्रश्न स्वतः 'बिनभिकार' म्हणवणाऱ्या ह्या बाईने, सुसंस्कृत, शिक्षित व खाऊनपिऊन सुखी असणाऱ्या अवघ्या पांढरपेशांनाच विचारला आहे असे मला वाटते. नुसती आपली आई-बहीण किंवा कैकाडी स्त्रीच नव्हे तर समग्र स्त्रीजातीवर अन्याय करणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीलाच शब्दांच्या धारेवर धरले आहे.

लेखक म्हणून लक्ष्मण माने यांच्या लेखणीचा आवाकाही फार मोठा व सूक्ष्मदर्शी असा आहे. त्यांच्या कुटुंबातल्या मानवी नात्यांचा तर ते वेध घेतातच. पण आपल्या परिवारातील राधी व भागी ह्या गाढविणी, त्यांची शिंगरं, आपल्या चुलत्याची 'पालवी' नावाची भित्री कुत्री, बळी द्यायला घेतलेले बोकड-बकरे, कापलेले कोंबडे, यांचाही; अत्यंत समर्थपणाने त्यांच्या लेखणीने, परिचय घडविला आहे.

आत्मचरित्रात आपल्यावर झालेल्या बऱ्यावाईट संस्कारांच्या श्लील-अश्लीलतेचा, त्यातील इष्टानिष्टतेचा व एकंदर अवघ्याच उघड्याझाकल्याचा निर्वाळा, निवाडा लेखकाला स्वतःच्या आंतरिक बळावरच करावयाचा असतो. हे स्वतःच स्वतःला

न्यायालयात वादीफिर्यादी बनवून खेचण्याचे काम श्री. लक्ष्मण माने यांना त्यांच्या जगण्याने, सामाजिक चळवळीने, त्यांच्या समाजरत मनोरचनेने आणि तथाकथित संस्कृतीसंपन्नांनी सातत्याने दिलेल्या उपरेपणाच्या वागण्याने त्यांनी लीलया पार पाडले आहे.

वस्तुतः अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि रोजगार ह्या मानवी जीवनातील अतीव महत्त्वाच्या गोष्टी आहेत. त्यातल्या आजच्या लोकशाहीत विमुक्तांना, भटक्यांना, दलित, शोषित आणि वन्यजमातीतल्या बहुजनांना खरेच किती मिळतात? हा भविष्यालाच गर्भार ठेवणारा प्रश्न आहे. ह्या न प्राप्तीच्या अशा नकारात्मक ताण्याबाण्यातूनच, 'उपरा' हा ग्रंथ गोफणगुंड्यासारखा उसळताना दिसतो. त्यातल्या भाषेत व सगळ्याच शैलीसूत्रात, ह्याच नकारांचे निनाद; नवनवी विरूपे-विद्रूपे घेऊन सक्षमतेने उभे राहिलेले आढळतात.

जत्रेत देवीजवळ गोळा होणाऱ्या सगळ्या भटक्या भिकारांनाही एक मर्यादा आहे. कैकाडी, कोरवी, वडारी, कोल्हाटी, गोंधळी, माकडवाली, गोसावी, मांगगारुडी, वैदू आणि कितीतरी अठरापगड जाती-पोटजाती यांचे स्थान ठरलेले आहे. ह्या फिरस्त्यांची भाषा आमच्या बोलीभाषांना आणि मराठी भाषेला ग्रंथगत करण्यासारखी वाटते की नाही? या प्रश्नापेक्षा तिची मनाची पकड घेण्याची ताकद थक्क करून सोडते.

'उपरा'मधील भाषा आणि शब्दविशेष हे त्यांचे स्वतंत्र प्रकरण आहे. एक अभ्यासविषयक आहे. ही भाषाशैली त्या ग्रंथाचे आगळेवेगळे भूषण आहे. प्रमाणभाषा, बोलीभाषा, अपभाषा यांचा घोळ, त्यातील शुद्धाशुद्धतेचे निकष याबद्दल कुणी काहीही निष्कर्ष नोंदवो. पण कैकाडी बोली आणि भटक्यांच्या जीवनातील वेदनेची कळ आणि शब्दकळा मात्र अत्यंत ओघवत्या रीतीने या पुस्तकाने शब्दबद्ध करून भावाकार बनविली आहे. मराठी भाषेच्या व बोलीच्या व्यापक पसाऱ्याला, प्रत्येक जातीपोटजातीच्या पडझडीला भाषा श्रीमंत आणि समृद्ध करायला किती वाव आहे, हा प्रश्न रसिकांना अंतर्मुख केल्याशिवाय राहणार नाही.

व्हकांड्या, गडांगण, इरड, कनाठा, कंठाळी, गारतोळ, खड्डळ, खत्री, सुला, तिदळकी, क्यांड, जोजू, आखाळ्या, गुंडब्याल, खापरी, गुन्ना, टोटरं, काळळं, संदूक, लिवगुंड, उज्ज, ओक, उरसांड-पत्तक कांदवणी, तलंगा-अशा कितीतरी शब्दांना त्यांचे स्वतःचे वजन व वेगळेपण आहे.

वाक्प्रचार आणि शब्दप्रयोगही अतिशय भावदर्शी आणि प्रभावी असे आहेत. लेखकाच्या कानावर पडलेल्या आणि मनावर बिंबलेल्या अनेक म्हणींनीही, 'उपरा' हे आत्मचरित्र समृद्ध आहे... गडी घोरात आला, बायनं कंबर काढली, कालर ताठ खिशात न्हाय झाट, शिक्यावर दही, आन् दैवात नाही! दुसऱ्याच्या म्हातारीसाठी आपुन का म्हून मिशा उतरवा? लालीला दुकं झालं अन् चुळून चुळून लाल केल्यं, निमित्त कैकाड्याचं भांडण गावाचं, जातीचं ना गोतीचं, आना सख्या म्हारणीचं, धरती माय ठावं देईना आन् आभाळा हात पोचंना, देणं कुसळाचं झवणं मुसळाचं, याशिवाय मीठ चोळणे, वापला येणे, खाजवून खिरापत, डुकराचे मूत पिणे आणि कितीतरी

वरवर ग्राम्य वाटणाऱ्या शिव्या आणि लिंगवाचक शब्द यांचा एकत्र विचार केला असता भाषेचे खरे कार्य मन मोकळे करून भावसुसंगती साधत अर्थाभिव्यक्ती करणे हेच आहे, हे सर्वार्थाने पटते.

'दलित साहित्य' या संज्ञेच्या अनुषंगानेही 'उपरा'कडे पाहणे अगत्याचे ठरावे. आपल्या-'मुक्कामावरून' या संज्ञेच्या प्रास्ताविकात त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. दलित साहित्यात डोळसपणाने ज्या गोष्टीला नकार दिला आहे; त्यात देव, धर्म, पुरोहित, कर्मकांड, अवतारकल्पना, पापपुण्य, पूर्वजन्म, पुनर्जन्म, नशीब-दैव, भोगवटा वगैरे गोष्टी महत्त्वाच्या आहेत. माणसाने माणसांचे शोषण करण्यासाठी त्याला दुःखाच्या तुरुंगात गच्च जखडून ठेवण्यासाठी केलेले अज्ञानाचे अतूट अक्षय पिंजरेच आहेत. आणि ह्यातून बाहेर पडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी व मानवस्पर्शी विचारांचा स्वीकार आणि त्याचाच डोळस आविष्कार असे सांगता येईल.

श्री. लक्ष्मण माने यांना जातीचे अनेक चटके बसले आहेत. जागा न मिळण्यापासून तो मार खाण्यापर्यंतच्या प्रसंगांतून त्यांनी वाटचाल केली आहे. दलितांना स्वतःची हाडकी, हाडवळा, डोक्यावर छप्पर तरी असते ही वस्तुस्थितीही त्यांना आणि सगळ्यांना ठाऊक आहे. जात तोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यातले यशापयशही त्यांनी अनुभवले आहे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांचे प्रेरणास्थान नाही. तसा 'या मुक्कामावरून'-यातील दुसऱ्याच परिच्छेदात त्यांनी, 'साताऱ्यात आम्ही दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला चालवतो' असा स्पष्ट उल्लेख केला आहे. पृष्ठ एकशे सदतीसवर 'सभापतीला भेटावं म्हटलं तर ते पोटाचा घेरं सावरीत फोनवर बोलत होते. डॉ. आंबेडकरांच्या नावानं जिंदाबाद... नुसती फालतूगिरी होती.' किंवा त्याच पानावर 'पण हे सभापती काही डॉ. आंबेडकर नव्हते तर त्यांना पान्हा फुटेल' असे वाक्य आहे. ह्या तीनच ठिकाणी, त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख केला आहे. आणि तो प्रेरक नसला, तरी आदरार्थी आहे, हे निर्विवाद आहे.

प्रत्यक्षात सर्व असणाऱ्या महारांना, कैकाडीही परंपरेने अस्पृश्यच मानतात. आपल्या बायकोला 'लवकर आवर' अशी घाई करताना, मानेचे वडील म्हणतात,-'अग उरक म्हार आडवा येईल.' (पृष्ठ ९) अप्पाच्या मुलीच्या लग्नाच्या भेटीगाठीत 'शशी व लक्ष्मण' या जोडप्याची उलटतपासणी केली जाते. अप्पा 'पोरगी मराठा आहे' असं ऐकल्यावर विचारतो, 'ती कशावरून मराठा हाय? म्हाराची का नसंल?' आणि ग्रंथाच्या समारोपाच्या परिच्छेदात लेखक लिहितात, 'आता जो जातीचा ठिपका पुशीन म्हणत होतो, तो गडद झाला होता. मनातून उदास झालो होतो.' या लेखनातही लेखकाचे नकारसूत्र, दलित साहित्य नकारसूत्रांच्या सोबत जाणारे आहे, हेच सूचित करते. म्हणून 'उपरा' हे युवक क्रांती दल आणि समाजवादी विचारसरणीमध्ये बळ लाभलेल्या, धर्मांतराची वाट न पत्करणाऱ्या, पण आधुनिक विचारांच्या नकाशांचे भान असणाऱ्या, लेखकाची समर्थ कलाकृती आहे, असे म्हणावे लागेल.

त्यांच्या शैलीदार लेखनाच्या काही उदाहरणांतूनही ही गोष्ट, अधिक स्पष्ट व्हावी.

दोनच वानगीदाखल पाहाता येतील-

'अनेक प्रश्न समोर फेर धरीत आणि स्वप्नाळूपणे त्यांची उत्तरं शोधीत होतो. पाप, पुण्य, पुनर्जन्माचे फळ, नशीब-साऱ्यांच्या आयांवर पांडुरंग चढवावा असं वाटे. पण रंडकीच्या तळतळाटासारखं हात चोळण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हतो.' (पृष्ठ १३८)

'सारा गाव झोपला होता. अंधार सारीकडं दाटला होता. मध्येच कुत्री केंकाटत होती. आमच्या बिराडात हागनदारीत देव आला होता. त्यानं अंगारा दिला.' (पृष्ठ १५) वरील उदाहरणातील उपरोधिक दाहकता आणि खणखणीतपणा स्पष्टच आहे.

पृष्ठ एकशे सदतीसवरील पहिला परिच्छेद ज्यावर, 'सरकार असतं कुठं? मुंबई आणि दिल्लीत ना?' त्यावर 'बॉम्ब' टाकून ही खरूज हटवण्याची 'आयडिया' मनोविश्लेषणाच्या पद्धतीने श्री. लक्ष्मण माने यांनी मांडली आहे आणि 'रिझर्व्हेशनबद्दल कुणी बोललं की, नरडीचा घोट घ्यावं असं वाटायचं' या उद्‌गारात आणि त्यांच्या 'साडेतीन टक्क्यांची संस्कृती' ह्या जाहीर सिद्धांतात त्यांच्या अस्सल निष्ठांचेही दर्शन घडते.

'उपरा' या आत्मपर लेखनात स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची अलिप्तपणाने-गमतीदारपणे टवाळी करण्याची खास पद्धती लेखकाला पूर्ण वश आहे, याचेही प्रत्यंतर येते. त्यांनी केलेला आरंभीचा स्वतःचाच उल्लेख-'त्यात माझा अवतार म्हणजे उकिरड्यावरच्या कुत्र्यासारखा.' (पृष्ठ ३) किंवा संसारातील अनुभवांनी आलेले शशी व स्वतःची, विरोधी विसंवादी-चित्रण हे अतिशय लक्षणीय झाले आहे.

'कैकाडी' या उपेक्षित भटक्या जमातीच्या समूहाच्या जीवनव्यथेला एक न पुसला जाणारा अक्षरशब्द पुरविण्याचे काम श्री. लक्ष्मण माने यांनी मराठीत प्रथम केले आहे. 'उपरा' हे अन्वर्थक तेजाबी शीर्षक धारण करणाऱ्या या ग्रंथाने, लेखकाच्या पहिल्याच पुस्तकाने आपली सामाजिक बांधीलकी जाहीरही केली आहे आणि पारही पाडली आहे. मराठीच्या आत्मचरित्रात अत्यंत मोलाची भर या पुस्तकाने; गुणात्मक व कलात्मकदृष्ट्याही पडली आहे; हेच त्याचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. समाजमनाच्या 'बंद दरवाज्या' वरील बुलंद धडक म्हणजे 'उपरा' होय.

(टीप : संदर्भ पृष्ठांक–१९८२ च्या द्वितीय आवृत्तीतील आहेत.)

(सोविएत मित्र : दिवाळी अंक १९८८)

२१. दया पवार यांची तेजस्वी कविता : 'पाणी'

विद्रोही साहित्याच्या सर्वांगीण विकासात श्री. दया पवार यांचे स्वतःचे असे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. 'बलुतं' हे अनोखे आत्मकथन, त्यावरील पत्रप्रतिक्रियांचा प्रवास, 'कोंडवाडा' हा कवितासंग्रह, 'चावडी' हे मिष्कील ललित गद्य आणि 'विटाळ' हा कथासंग्रह असे मोजके पण सकस साहित्य श्री. दया पवार यांनी लिहिले आहे.

'बलुतं' ह्या आत्मचरित्राने जरी ते मराठी रसिकविश्वाला ज्ञात असले, तरी कविता हा दया पवारांचा पहिल्या प्रेमाचा प्रांत आहे. त्यांची कविता संयत, जीवनसंघर्षस्पर्शी आणि प्रसादगुणयुक्त अशी आहे. 'कोंडवाडा'नंतर आणि आत्मलेखन सातासमुद्रापलिकडे गाजल्यानंतर, त्यावर 'बलात्कार' सारखा बोलपट निर्माण झाल्यानंतर, दया पवार नव्या वळणाने, अधिक साधेपणाने पण सखोल सूचकतेने काव्यलेखन करू लागले. 'किर्लोस्कर'च्या अंकात प्रसिद्ध झालेली आणि मुंबई विद्यापीठाच्या वेच्यात समाविष्ट केली गेलेली. 'पाणी कुठवर आलं ग बाई?' ही कविता त्यापैकी एक लक्षणीय कविता आहे.

देशात स्वातंत्र्य आले. घटनेच्या अंमलाने प्रजासत्ताक अवतरले. मानवी हक्क लिखित रूपात मांडले गेले. पण प्रत्यक्षात दूरदूरच्या आडवळणात जगणाऱ्या आणि शहरातही मनात जातपात, वर्णश्रेष्ठत्व, विशेष हक्काधिकार जोपासणाऱ्यांनी त्याचे नेमके काय केले? हा प्रश्न अनुत्तरितच उरला आहे.

असे म्हणतात की, पाणी नेहमी समपातळी गाठते. Water seeks it's own level. तेव्हा माणुसकीच्या मूल्यांचा उद्‌घोष करणाऱ्या या स्वतंत्र भारतात 'पाणी' सर्वांना सर्वत्र मुक्तपणे खुले झाले आहे का? की अजूनही सवर्णांच्या, धनदांडग्यांच्या दारात, मळ्यात, मोटेवर, खळ्याजवळ बापडी माणसे, बापुडवाण्या दलित स्त्रिया, 'पाणी वाढा वो माय', 'पाणी दे रे दादा!' अशी विनवणी करताहेत? हे लोकव्यवस्थेचे पाणी कुठवर कुठपर्यंत आले आहे? कवितेच्या शीर्षकातच कवीने विचार-लय (Thought value) पेरलेली आहे. कविता 'पाणी' शीर्षकाची असली तरी ती तेजाबी व जळजळीत आशय घेऊन

अवतरली आहे.

कडक उन्हाळ्याच्या दिवसात अनेक भागांत पाण्याची तीव्र टंचाई सर्वांनाच जाणवू लागते. पण दलित वर्गाला, ज्याला पाणवठ्यावर पाण्याचा हक्क नाही, कागदोपत्री असला तरी तो कुणी मानत नाही, त्यांना मानमाणुसकीने पाणीही प्राप्त होत नाही, अशा घरातली स्त्री पाण्याच्या मागणीसाठी, थोडक्यात म्हणजे, भिकेसाठी पाटलीणबाईच्या मळ्याबारवावर.

लयी उन्हाचा कहर
तापलेल्या तव्यावर
लाही फुटे भरभर
तसा जीव खालीवर

असे मागणे मागणाऱ्या स्त्रीच्या व्यक्तिरेखाटनात त्यांनी संवादलय साधली आहे. लाह्या फोडताना तापलेला तवा, वर्णाश्रमाच्या अमानुष प्रथेमुळे गळ्यात पडलेला कायमचा शोष आणि इतक्या विनवण्या करून, हातापाया पडूनही मडक्यात पाणी वाढलं जाणार की नाही? या पूर्वानुभवाधारित शंकेमुळे जीव अधिकच व्याकुळ झाला आहे.

आपल्याला जे लाभले नाही त्याबद्दलचा द्वेष किंवा राग याचा लवलेशही या मागण्यात नाही. तर भूतदयेला, अनुकंपेला, सहानुभूतीला आवाहन केले आहे. वाक्यावाक्यात बहरलेला हिर्वागार मळा, खतपाणी आणि निगराणी यामुळे पोसले गेलेले पीक हे उच्चवर्णियाला प्राप्त झालेल्या वैभवाचे द्योतक आहे. ह्या दोन ओळीतही संवादी सूर आला आहे. पण पुढच्या दोन ओळींनी-

घरी माझा तान्हा खुळा
त्याचा सुकला ग गळा

कवितेला कारुण्याचे गडद परिमाण पात्र झाले आहे. घरात थेंबभरही पाणी न उरल्याने, कुठून दूध आणून देण्याइतपत आर्थिक सुबत्ता तर दलितवर्गाला लाभू दिलीच नव्हती. ह्या माऊलीचे हृदय भरून आले आहे. स्वच्छ पाणी द्यावे म्हटले तर गाडगी मडकी रिकामी झालेली. त्या तहानलेल्या तान्हुल्याला, 'आत्ता आन्तो पाणी' असे सांगून आलेली ही माता, कितीतरी वेळापासून ओठंगून, अवघडून उभीच आहे. तिकडे तहानेने खुळावलेल्या पोराने रडून रडून शेवटी अगतिकपणे काय केले असेल, काय झाले असेल, ह्या चिंतेने ती कळंजून गेली आहे.

पहिल्या व दुसऱ्या कडव्यांचा एकात्म विचार केला तर त्यातील कडक उन्हाचे शुष्क वातावरण आणि हिर्वाकंच बहरलेला मळा आणि पाण्यासाठी तसेच पाण्याने त्रस्त झालेली पण अपत्याच्या काळजीचे प्रेममय पाणी मात्र हृदयात जलथल जोपासणारी माता, ह्या अभिव्यक्तीत दुहेरी विरोध लयीची उपयोजना झालेली आढळते.

स्त्रीला असलेली दागदागिन्यांची आवड व नजर त्यातून प्रकट होणारी सौंदर्यदृष्टी आणि सर्वंकष सुखवैभवाच्या चित्र-वर्षावात संतृप्त सुखावलेली पाणी देणारी स्त्री ह्या

दोन्ही स्त्रियांची सहज रेखाटलेली तरल भावचित्रे दया पवार यांच्या काव्यात्म आंतरिक सच्चेपणाचा प्रत्यय देणारी आहेत.

नितळ निर्मल पाण्यामध्ये पडलेले पाटलिणीच्या पायातील 'मासोळी' या अलंकाराचे प्रतिबिंब, आणि त्या पाण्यात तरंगणाऱ्या मासोळ्या (ज्या खायला मिळाल्या तर ह्या नुसत्या कल्पनेने तोंडात पाणी जमते) यांनी बारवातल्या मळ्याच्या रुंद मोठ्या विहिरीच्या पाण्यात सतत चैतन्य खेळते आहे. तरंग उमटताहेत.

दया पवार यांनी ह्या तिसऱ्या कडव्यात पाणी मागणाऱ्या अस्पृश्य स्त्रीच्या तोंडी जगरहाटीही वदवली आहे. आताच हे सुख, हे नाचणारे, थरथरणारे जलतरंग तुझ्या आनंदाचा डंका किनाऱ्यावर पोचवताहेत. नहाता-धुताना, मळा शिंपताना कितीतरी पाणी तू वापरले आहेस. मला पाणी द्यायची गोष्ट, माझ्यासाठी हे पाणी कुठपर्यंत आले ते सांगशील का? आणि तरंग किंवा जलवलय कसे व कितीही असले तरी तेही फुटतातच.

मोठाली धरणे देशात बांधली जातात. मोठमोठ्या योजना साकार होतात. त्यांवर काम करणारे श्रमिक-मजूर-बिगारी आमच्याचपैकी असतात. किती जणांचा घाम हे असे पाणी अडवण्यासाठी, विहीर, तलाव, धरणे उभारण्या-खोदण्या-बांधण्यासाठी सांडलेला असतो. पण पाणी लागले रे लागले की आमचे अस्तित्व संपते. आतडे पिळवटून आणि नसाशिरा उसवून आणलेल्या त्या पाण्यावर, ज्या धरणाच्या ओलितात घरेदारे बुडाली त्याचा आमचा हक्कच नसावा म्हणजे काय?

कवीने पारंपरिक परिचित प्रतीक उपयोजिले आहे. हे वैभव, श्रीमंती, दिमाख, तोरा कधीच कुणाचा कायमचा टिकत नाही. चौदा चौकड्यांचे राज्य असलेल्या आणि सोन्याची लंकानगरी असलेल्या रावणाचेही राज्य लयाला गेले. जुलमी सत्ता, विषमता, आत्मतृप्त हुकूमशहा कधीही टिकत नाही हाच काळाचा धडा आहे. केशवसुतांच्या कशाची पर्वा न करणाऱ्या, मुर्वत न बाळगणाऱ्या निसर्गप्रतिमेची येथे सहजपणे आठवण होते.

'बाई ग! मी केव्हाची पाणी मागते आहे. वैभव भोग; पण अन्यांना तुच्छ लेखू नको. उतू नको, माजू नको, माणुसकीचा घेतला वसा टाकू नको. अशा आभाळाला लाथा मारण्याइतका उन्मत्तपणा कधी करू नये. स्वतःच्या सुखस्नानसमाधीतून बाहेर येऊन मला पाणी वाढण्याचे काम कर.' संवादलय आणि विरोध लय यांच्या जोडीने कवितेच्या रचनांगात अंतर्भूत झालेली समतोल लयही अत्यंत समर्थपणे कवीने गुंफली आहे.

'पाणी कुठवर आलं ग बाई' या कवितेचा समारोप, या कवितेतील प्रतीक्षा, कातरता व उत्कटता चढत्यावाढत्या वेगआवेगाने रसिकमनात प्रक्षेपित करणारा आहे.

व्यवहारात लोकांच्या दुधाला भाव असतो. तुझ्या तर पाण्याला आमच्या लेखी मोठेच मोल आहे. जोपर्यंत मी आणि माझ्यासारखे अनेक ज्ञातअज्ञात विस्थापितांना, अडल्यानाडल्या, पिडल्यापिळल्या जाणारांना त्याची गरज आहे तोपर्यंत तू अशीच तिढेपणाने ताठ्याने वागणार आहेस का? तुझ्या ह्या नितळशंख पाण्यावर माझी सावली

पडण्याने ते नासणार नक्कीच नाही. दूध फुटते, फाटते, नासते. पण पाणी देण्याने विटाळचांडाळ, जातपात, श्रेष्ठकनिष्ठ या कवंडाळाचा काही तोटा होणार नाही. मला तू पाणी वाढणार होतीस. ते घेऊन मी घरी जाणार आहे. बाळाला देणार आहे. तो तहानेने अदमेला झाला आहे. ह्या तुझ्या पाणी देण्याचे कुठपर्यंत आले? बाई, एकदाची बोल ना, सांग ना?

एका अर्थाने हा दोन स्त्रियांचा संवाद आहे. पण त्यातले दुसरीचे उत्तर किंवा कृती काहीही घडलेली नाही. त्यामुळे या कवितेतील भावनात्मक विरोध, विभिन्न लयींची सरमिसळ करीत कवीने सुस्पष्ट केला आहे. नकाराच्या कराल कात्रीत जगणारांनी होकार स्वीकाराचे लाभ; स्वार्थाने, धर्मकर्माच्या, पापपुण्याच्या आश्रयाने जगणारांना हा पाण्याचा खडा सवाल केला आहे. हा आपोनारायण जर कोंडून बांधून राहणार असेल तर लोकशाहीचा दिखाऊ डोलारा कोसळल्याशिवाय राहणार नाही हेच कवीला सूचित करावयाचे आहे.

अंतर्मुख करणारी अर्थसंपृक्त पण स्फोटक आशयाची कविता असे ह्या कवितेबद्दल निश्चितपणे म्हणावे लागते.

पाणी कुठवर आलं ग बाई

पाणी कुठवर आलं ग बाई
लयी उन्हाचा कहर
तापलेल्या तव्यावर
लाही फुटे भरभर
तसा जीव खालीवर
पाणी कुठवर आलं ग बाई

तुझा हिर्वागार मळा
वाफ्यावाफ्यानं पोसला
घरी माझा तान्हा खुळा
त्याचा सुकला ग गळा
पाणी कुठवर आलं ग बाई

तुझ्या पायाची मासोळी
बारवात तरंगली
पाण्यावरच्या रेघोट्या
तू ग आनंदात न्हाली
पाणी कुठवर आलं ग बाई

घाम आमुचा सांडला
ह्या पाण्याच्या ग पायी
आले हाताला ग फोड
शिर शिर उसवली
पाणी कुठवर आलं ग बाई

चौदा चौकडीचं राज
समदं गेलं पाताळाला
अशी उतूमातू नको
तुझ्या लाथा आभाळाला
पाणी कुठवर आलं ग बाई

तुझ्या बारवाचं पाणी
जशी दुधाची ग सायी
माझ्या सावली ग पायी
ते ग नासणार नाही
पाणी कुठवर आलं ग बाई

२२. सावंत यांचा प्रतीकलक्षी आविष्कार : 'बैल'

कवी वसंत सावंत यांनी 'कविता' याच वाङ्मयप्रकाराची उपासना आणि आराधना सातत्याने केली आहे. तसे व्यावसायिक क्षेत्रात प्राध्यापक म्हणून वावरताना त्यांनी डॉक्टरेट वेगळ्या विषयावर प्राप्त केली. पण कविता हा त्यांचा पहिला विशुद्ध व आत्मपर उद्‌गार आहे.

निसर्गाच्या विविध विभ्रमातून त्यांची काव्यरूपे साकारतात. गंध-रस-रूप-स्वरांचा साज लेवून त्यांची कविता आस्वादाच्या संमिश्र पातळयांना एकाच वेळी स्पर्श करीत आहे. शब्दरूपातून ती दिसतेही आणि शब्दापारचे अर्थ लावून दशांगुळे उरल्याने धूसर आणि स्वप्नाभासासारखी, छायाप्रकाशाच्या खेळासारखीही ती उरते.

'बैल' ही कविता मानवातील सृजनात्मक, युयुत्सु शक्तीचे प्रतीक आहे. पाश्चात्य देशात ज्याप्रमाणे शक्तीचे मानक अश्वशक्ती (Horse Power) मानले जाते त्याचप्रमाणे भारतीय संकल्पनेमध्ये 'वृषभ', 'बैल' हे क्षमतेचे, पुरुषार्थाचे प्रतीक मानले जाते.

सह्याद्रीचा अवघा कमित्र बेलाग कातळच ही धुमसणारी शक्ती डुरकाळून सांगणारा आहे. ज्या ज्या वेळेस सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्याकडे कवीची नजर जाते त्यावेळेस त्याला जाणवतो तो मस्तीचा कलंदरपणे कोसळणारा प्रपात. ही जाणीव 'गिरीशिखरे वनमालाही दरीदरी घुमवीत येई' यापेक्षा वेगळी आहे. हा बैल धडक देण्यासाठी - झुंजीसाठी सिद्ध झालेला वाटतो. त्याची शिंगे तीक्ष्ण रोखलेली, रंग झळाळणारा मातीचा गेरूवा मस्तीला आल्यानंतर सरळ सरळ आव्हानाचे आवाहन करणारा.

कोकणच्या मातीत माणसांच्या स्वभावाचा, जगण्या-वागण्यातला जो पीळ आहे, त्याची रक्तामांसाची जडणघडण अशी झाली आहे की तो आपला झुंजार बाणा लपवू शकत नाही. लपू इच्छितही नाही.

आरंभीच्या शब्दांतून उभी केलेली प्रतिमा समतोल लयीची पेरणी करीत कवीने अधिक गतिमान केली आहे.

मस्तीला आलेला खळीला आलेला बैल त्याच्या डोळ्यात ती झिंग नशेसारखी तरळताना दिसते. मस्तकाला टक्कर देण्याची अनावर लालसा पेलवत नाही.

चौखूर उधळणे, उभे आकाश, उग्र मस्तक, वज्राचे बेगुमान पाणी, डोक्यावर चंद्राचा कलश, कराल दाढा ह्या सगळ्या शब्दरचनेमध्ये कवी वसंत सावंत यांनी निर्माण केलेल्या या शक्तीप्रतिमेला अधिकाधिक सघनता आणि भक्कमपणा आणून दिला आहे. उत्कट प्रेमाच्या अनिवार असीम भावनेपासून तो वासनेच्या रतिक्रीडेच्या प्रमाथी स्वाभाविकतेपर्यंत मानवी मनामध्ये दडलेल्या समस्त सुप्तगुप्त पण योग्य वातावरणात आणि स्थलकालबद्ध चौकटीत अभिव्यक्त होणाऱ्या नैसर्गिक वृत्तीपर्यंत सगळे निसर्गचक्र त्यांनी तोलून धरले आहे.

निर्मितीच्या-सृजनाच्या ह्या स्वाभाविक ऊर्मीला लुसलुसशीत कोवळे आयते काही चालत नाही,भावतही नाही. त्या धबधब्यासारख्या आवेगाचे चित्र 'मातीशी मस्ती' या शब्दरचनेतून प्रकटते.

'माती' शरीराला-वासनादेहाला वापरला जाणारा पारंपरिक शब्द. माती असशी मातीस मिळशी आत्म्याला ते लागू नसे. इथपासून तो तत्त्वज्ञानातील 'घट' सिद्धांतार्यंतच्या सगळ्या संकल्पना या ठिकाणी स्मरत राहतात. मातीशी मस्ती-मीलन घडल्यानंतर मात्र त्या संगमाने एक तृप्ती आकारते.

प्रेम आणि काम भावनेची ही दोन रूपे एकाच नाण्याच्या दोन बाजूसारखी प्रकट झाली आहेत. हा प्रमाथी पुराचा लोंढा वाहून गेला की प्रवृत्ती बदलते. समाधानाची सुखाची जाणीव चाल अदबशीर बनवते.

निर्मितीच्या क्षणी कविमनातले हे द्वंद्व चांगले मांडले गेले आहे. 'रिमझिमणे' या नादानुकारी शब्दाने पाऊस, संगीत याचा तोल साधला गेला आहे.

पाऊस पडल्यावर भूमीतील कोंब स्वाभाविकपणे अंकुरावे तशी, मनातील; ही सह्याद्रीच्या निसर्गाने प्रक्षेपित केलेली निर्मितीक्षम अनावर ओढ जीवनानुभवाचे विविध रंग निर्मात्याला शिकवते. त्याला 'मस्ती' देते. कलंदरपणा देते. अनावर करते. संघर्षोत्सुक-मीलनोत्सुक बनवते.

शब्दाने एक दुसऱ्यावर मात करीत, छेद देत आणि संयोग पावत एक स्वच्छ खळखळ करणारा प्रवाह निर्माण व्हावा अशी ह्या कवितेतील भावप्रवाहाची समतोल सुसंगती साधली गेली आहे.

कळूनही, कळल्यासारखा, वाटूनही अनाकलनीय वाटणारा निसर्ग व त्याचे विभ्रम आणि मानवी मनातील भावभावनांचा, प्रेमाक्षोभाचा, वासनाविकाराचा लोंढा ह्या प्रतीकाद्वारे कवी वसंत सावंत यांनी शब्दबद्ध केला आहे.

बैल

सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून
डुरकत फिरणारा एक कलंदर बैल
उभ्या शिंगांचा
कोल्या रंगाचा
मस्तीला आलेला
घळणीच्या लाल मातींत खळणीस येणारा
चौखूर उधळतो आहे माझ्या रक्ताच्या कणाकणांवर!
उभे आकाश पितात
त्याचे नशाबाज डोळे
लसलसत उग्र मस्तकी
वज्राचे बेगुमान पाणी
डोईवर चंद्रमा फलकता
कराल दाढांना पुरत नाही
हिरवे लुसलुशीत गवत
त्याची मातीशी मस्ती
मातीच होते मस्ती त्याच्या संगमात
हुस्कारत प्रणव... ॐ कार...
वशिंड घोळवित बाहुबल अजमावणारी त्याची खानदानी चाल
आदब;
रिमझिमत असते या मनात
बैल : पिढ्यापिढ्यांचा पोशिंदा माझ्या
शक्तीचा सम्राट
माझ्या रक्तामधून, शब्दांमधून
उसळत राहते रोज
एक अनाम शक्तीची लाट

२३. राम मोरे यांची गीतरचना

'माझे मित्र, माझे परिचित श्री. – !' हे असे शब्द किती फसवे आणि तकलादू असतात, याचा अनुभव मला श्री. राम मोरे यांच्या गीतांचा-काव्याचा आस्वाद घेताना आला. जवळ जवळ बाराचौदा वर्षांपासून श्री. राम मोरे माझ्या परिचयाचे आहेत. फसवणारे वाक्य ते हेच. कारण माझ्या परिचयाचे असलेले हे स्नेही मला कितीतरी अपरिचितही आहेत.

कितीतरी वेळा श्री. मोरे यांच्याशी माझ्या भेटीगाठी व गप्पाटप्पाही झाल्या. पण वयाच्या दुसऱ्या वर्षी वडील आणि तिसऱ्या वर्षी त्यांनी वडील व आई गमावली हे ते कधी बोललेच नव्हते. बाकीच्या नातलगांनी तीन वर्षांच्या ह्या पोरक्या पोराची उस्तवारी व जबाबदारी नाकारली. मग वाट्याला आले धुळ्याचे अनाथ बालकाश्रम. त्या संस्थेलाही ह्या मुलाच्या वाढत्या भुकेचे, कपडालत्त्यांचे, शिक्षण-सांभाळण्याचे ओझे पेलेना. म्हणून 'कोर्टकमिट' डेस्टिट्यूट असे ठरवून त्यांची धुळ्याच्याच 'रिमांड होम' संस्थेत पाठवणी केली. हे देखील श्री. मोरे मजकडे कधीच बोलले नाहीत.

बालपणीचा हा काळ गेला बालगुन्हेगारांच्या सहवासात. फक्त त्यातूनही त्यांना शिक्षण घेता आले. तेथून मग एकदम मुंबईतील चेंबूरच्या, 'विशेष देखभाल वसतिगृहामध्ये' त्यांची रवानगी झाली. त्यांच्यावर होणारा सर्व तऱ्हेचा खर्च संस्था मांडून ठेवायची. नोकरी मिळाल्यावर ही कर्जफेड करायची होती. आयुष्याने जगण्याची संधी दिली, धडा शिकवला कर्जफेडीचा, हे सुद्धा मला ठाऊक नव्हते.

समाज कल्याण खात्यात त्यांनी नाव नोंदवून ठेवले. एकदीड वर्षे अनुभवासाठी विनामूल्य खर्डेघाशी केली. विनावेतन काम करतानाच एका गेलेल्या कारकुनाच्या जागेवर नियुक्ती झाली. अर्थबळ लाभले. झालेल्या बांधलेल्या कर्जाची सोय झाली. धडपडून जागा मिळवून त्यांनी चेंबूरच्या 'आफ्टर केअर हॉस्टेल' मधून सुटका करून घेतली. सहासात वर्षे तेथे नोकरी झाल्यावर त्यांनी तेथूनही मुक्तता करून घेतली व रिझर्व बँकेत ते लागले. हा मधला परवडीचा टप्पा मला श्री. राम मोरे कधीही बोलले

नाहीत. मला परिचयाचे होते ते अर्थशास्त्राचे पदवीधर, गीतरचना-काव्यरचना करणारे, संगीतकारांच्या व गायक-गायिकांच्या कोंडाळ्यात रमणारे, लेखन करणाऱ्या माझ्यासारख्याकडे येऊन त्याबद्दल उत्साहाने बोलणारे श्री. राम मोरे. पण तरीही ते मला अपरिचित होते. म्हणून मला काही शब्द तकलादू वाटतात. अंतर्मुख करतात.

श्री. राम मोरे यांच्या गीतसंगीताच्या वाटेने जाणाऱ्या ह्या कवितातही त्यांच्या विकट अनुभवांचे कंगोरे एकजीव झालेले आहेत. साऱ्याच भावनांच्या आविष्कारात हा एक आंतरप्रवाह सतत वाहताना आढळतो. समुद्रातून वाहणाऱ्या थंड-उष्ण पाण्याच्या ओघासारखी ही प्रक्रिया मला वाटते. त्यांच्या सात कवितांतील काही अवतरणे त्या दृष्टीने किती बोलकी आहेतः

साऱ्या सुन्न वाटा
पायी स्मृतींचा निखारा
रिता उरे ओटा
सरे नात्यांचा पसारा

(सांत्वन)

हात सारे ओंजळीचे याचनांची लोचने
फेकिल्या पत्रावळींचे जन्मी आले वेचणे
बालके निष्पाप त्यांच्या ओठि नाही अन्नपाणी
पेटवी रे पेटवी तू ईश्वरा ही सारि धरणी!

(पेटवी रे पेटवी)

नाही कामधंदा नाही घरदार
देह झाला भार माझा मला

(वसा)

दुःख येथे खूप आहे सूख केवळ भास आहे
जन्मणाऱ्या जीवनाला वेदनेने शाप आहे.

(दुःख येथे खूप आहे)

या बेघर आयुष्याचा नुसताच वाहिला भार
पाचोळा होऊनी जगलो घेऊनी कुशी अंधार
मी काय कुणाला देऊ हा जन्मच सगळा वांझ
द्या निरोप मजला जनहो मी दूर निघालो आज.

(निरोप)

साहलीत संकटे नि यातना किती
तोल जावा त्या क्षणीही पाळली नीती
आज लाज सोडूनी जगास विसरलो

दोस्त हो मी मैफलीत आज प्यायलो.

(मी आज प्यायलो)

या जगातील जन्म माझा हाच मज अपघात आहे
मी राहावे रिक्त माझ्या संचिताचे सूत्र आहे
सावरिता तोल सारा नेत्री झाला प्राण गोळा
का असा ओठास माझ्या रोज भिडला वीष-प्याला

(हाल हे पाहून माझे)

ऐन बाल्यात आणि शैशव तारुण्यातच हे अनिकेतत्व श्री. राम मोरे यांच्या रक्ताश्वासात भिनले असल्यामुळे त्याची प्रतिक्रिया स्वप्नरंजनात आणि धुंद सफल-विफल प्रीतीच्या, नात्यांच्या, गुंतवणुकीच्या प्रतीक्षा, हुरहूर, ओढ, वैफल्य; यांची; गीते आणि गझलात स्वाभाविकपणे झालेली आढळते. वास्तवाने डावललेले स्वप्न शब्दांच्या मांडवाखाली रंगवण्याची जिद्द कविमनात उदित झाली. कर्ज मागणाऱ्या शैशवाने जाणत्या वयात रसगीतांची लयलूट करण्याचे ठरविले आणि त्यातूनच श्री. राम मोरे यांचा संगीत व नादवेडा पिंड घडत गेला.

एकाकी आणि एकट्या जीवाला नादमय गीताची व भावपूर्ण कवितांची साथच प्रेरणादायी ठरत असते. श्री. राम मोरे यांचा गोड गळा आणि चांगले पाठांतर ह्यामुळे अनाथ बालकाश्रमात आणि रिमांड होममध्ये गाण्याचे काम हटकून त्यांच्यावर पडत असे. पुढे गळा फुटला पण भावपूर्ण कवितांचे व पदांचे विश्व त्यांच्या संगती-सोबतीला उरले. मोरे यांच्या कवितेत नाजुक आणि हृद्य रीतीने प्रकट होतो तो स्त्रीभाव. मुळातच स्त्रीमन विलक्षण. उत्कटता आणि सर्वस्व देण्याच्या ओढीने घडवले गेलेले. पण प्रतारणेचा, वंचनेचा, फसवणुकीचा हिंदोळा ह्या स्त्रीमनाची वाताहत करतो. आधार मागणाऱ्या मनाला मिळते चिरवेदनेची जीवघेणी कळ आणि त्यातूनच श्री. राम मोरे यांच्या नायिकाप्रधान गीतांना आकार लाभतो.

माणसाच्या आशा-आकांक्षेचे आणि तरल नाजुक भावांचे प्रतीक म्हणजे स्त्री. तिच्या मनाची स्पंदने चित्रित करताना कवीला 'माणूस' का आणि कशासाठी धडपडतो. याचा अनोखा प्रत्यय येतो तो असा शब्दबद्ध झालेला दिसतोः

जे जे असेल अज्ञात
घेता करुनिया ज्ञात
पाठीवरी हवा मात्र
कुणा प्रेमळाचा हात.

हा प्रेमळ हात पाठीवरून फिरावा म्हणून पायपीट करायची असते. वाटचाल करायची असते. वाट तोडता तोडता वेदना पचवायची असते. कवीच्या प्रत्यक्षातल्या दाहक अनुभवाला काव्यात्म रूप अशा आविष्कारात वश झालेले आढळते.

मुक्काम ना तरीही मी चालतोच आहे
काचेवरी दवांचा नसतो जसा शहारा
लोकात मी तरीही मजला कुठे न थारा.

ह्या प्रवासात मन हळवे बनते. स्त्रीभाव धारण करते आणि श्री. राम मोरे यांची गीतरचना एकदम झळाळून निघते. सखीभावाची-स्त्रीमनाची स्थित्यंतरे त्यामुळेच प्रभावी उमटली आहेत.

सोप्या स्वाभाविक बोलभाषेच्या उपयोजनेमुळे त्यांच्या पदाला विशेष अर्थसघनता प्राप्त होते. सतत प्रिय व्यक्तीच्या चिंतनात रमणाऱ्या तिचे उद्‌गार—

आजकाल हे असे होतसे कसे कसे
बंद बंद लोचनी रोज रोज तू दिसे!
(रोज रोज तू दिसे)

असे न उमटते तरच नवल. पण असे कुणाला रोज ध्यानी-मनी-स्वप्नी ठेवण्याचे बेभान भान तिने ठेवले तरी तो त्यास जागला पाहिजे. कसोटीला उतरला पाहिजे. निष्ठा एकतर्फी असली तर मग-

वाग तू विपरित मी पण प्रीत केवळ जाणते
प्रेमिकाच्या प्रीतीला व्यवहार मी ना मानते.
(इमान)

असा विपरीत अनुभव येणे अपरिहार्य ठरते. कारण आयुष्य तत्त्वाने चालत नाही, व्यवहाराने, गरजेने आणि तात्कालिक परिवर्तनाने वळणे वळसे घेत निघते. त्यामुळे अशा केवळ 'प्रीत जाणणाऱ्या' मनाला फटका बसतो असफल जगण्याचा. विफल कडवट पराभवाचा. ओठात थबकते फक्त हताशपणाची जाणीव. ती देखील कवी नेटक्या रूपात आविष्कृत करतो—

अंध होऊ नये गंध वाढू नये
पत्थराशी कधी प्रीत जोडू नये
विस्मरू मी कशा ओठी रुजलास तू.
(हाय गेलास तू)

पण ह्या वंचनेचीच शतशत गीते बनतात. भळभळणाऱ्या हृदयातून, काळवंडलेल्या भावांच्या मुशीतून अम्लान भावाची कळीबंद कळकळ उसळया घेऊ लागते. प्रीतीच्या नदीलाही दोनच तर किनारे असतात. एक साफल्याचा तर दुसरा फसवणुकीचा. म्हणजे तसा जगरहाटीचा. काही काळ मिळालेल्या सहवाससुखाच्या रोमांचाच्या कळया देहाभोवती लपेटूनच असतात. त्या क्षणाच्या साफल्यालाही चिरंतनत्व येते.

फूलपाखरू सुखाचे असू दे असेच ओठी
आजन्म राहू दे रे सजणा तुझीच प्रीती.

(जगणे तुझ्याचसाठी)

श्री. राम मोरे जितक्या समर्थपणे स्त्रीभावांना गीताकार देतात तीच क्षमता त्यांच्या 'नायकभाव' प्रधान पदातही दिसते. तिचे नुसते अस्तित्व त्याच्या आयुष्याचे परिमाणच बदलून टाकायला कारणीभूत ठरते. त्याचे आडदांड-राकट जगणे-वागणे अलवार करते. त्याच्या केसाळ छातीतून मोहमयी शुभ्रतेची कारंजी उसळतात. प्रत्येक दिवस त्याला नवनवा उत्सव वाटतो.

जळात श्रावणसरी तशी तू
रुजलीस माझ्या घरी

किंवा

अनंत हा काळोख त्यावरी दिवसांचे काजवे. (वेदी)

हा अनुभव नित्याचा होतो. कधी तर तिच्या मनातले काही काहीच कळत नाही. आतल्याआत नुसती चरफड चालू असते. तिला पाहिल्याने आयुष्य वेडेपिसे होते. घमघमून निघते-

होकारही मिळेना इन्कारही कळेना
हे वेड लागलेले पुरतेपणी सुटेना
.. .. ..
तुझ्या या गौर कायेचा जरा मी हुंगतो गजरा

(होकारही मिळेना)

ह्या रस्सीखेचीत प्राण पणाला लागतात. सगळ्या शक्ती निकामी बनतात. स्वतःच्या असहायतेला कवीने गीतबद्ध करताना शब्दांना प्रभावीरीतीने वाकवलेले आहे-

आज भासते तुझ्यावाचुनी सकळ कळांसह झालो दुर्बल
कळे न मजला तुझ्याचपुढती हातांची का झाली ओंजळ.

(दुर्बळ)

ह्या अस्तित्व-विलयाचे अपरिहार्य परिणाम म्हणजे कधी कधी मिळणारा ताटातुटीचा अटळ शाप. मग उरतो केवळ निरोप देण्याचा उपचार. कोरडा. हरल्याविना माधार घेण्याचा व्यथादायी प्रयोग.

काय बोलू तुला बोल ओठातला
जा सुखाने सखी दुःख माझे मला.

(जा सुखाने)

श्री. राम मोरे यांच्या प्रेमगीतांचा रंग असा धुंद आहे. कुंद आहे. आणि तो मंद सौम्य असल्यामुळे काव्यात्म व लोभस झाला आहे.

श्री. राम मोरे हे संवेदनाक्षम व डोळस कलावंत आहेत. त्यामुळे सभोवताली घडणाऱ्या सर्व परिवर्तनांना ते आपल्या पदांमध्ये टिपून आत्मसात करतात. आपल्या देशातले राजकारण, दैन्य, दारिद्र्य, आश्वासने, अपेक्षाभंग, हलाखी आणि असामान्य देशात अपमानुष व अपमानित रखडणारा सामान्य माणूस त्यामुळे त्यांच्याही प्रेमाचा-गीतांचा विषय बनतो. त्याच्या अनेक रूपा-विरूपात स्वतःसहित अनेकांचा लिलाव ते पाहतातः फुटक्या आरशातल्या कंगोऱ्याचिपोऱ्यात दिसणारे छिन्नविच्छिन्न अस्तित्व चित्रीत करतात. काही ओळीतला त्यांचा आवेग वानगीदाखल पाहता येईल.

देशात सोनियाच्या चिरफाड आज उरली
उदयास यावयाची बर्बाद वस्ती झाली
प्रत्येक जात धर्म पलिताच पेटलेला
कोलाहलात येथे माणूस मात्र मेला!

(माणूस मात्र मेला)

ऐकुनि दातृत्व त्यांचे देणगी मागितली
आज त्यांच्या दानतीने मी पुरा नागावलो.

(सत्य काही बोललो)

गुंड त्यांचे, झुंड त्यांची, चावडीवर तेच आता
मूर्ख त्यांच्या घोषणा पण थोर त्यांचे नाव झाले!

(चोरट्यांचे राज्य आले)

माणसे नाहीत ही तर भोवती सारी भुते
मर्तिकाचे पिंडदेखील अंगी यांच्या लागते
लाजविकल्या लंपटांनी या जगाला नाशिले
होऊनी बदमाष म्हणुनी मी जरासे पाप केले

(मी जरासे पाप केले)

मोरे यांच्या गीतांचा, पदांचा आणि काव्याचा प्रवास असा अनेकविषयस्पर्शी आहे. सर्व भावभावना आणि मानवी जीवनातले अवघेच बरे वाईट सूक्ष्म-स्पष्ट चढउतार त्यांच्या काव्याची वीण घट्ट बांधताना दिसतात. पण प्रामुख्याने मला लोभस वाटतो तो मोरे यांच्या पदातील समंजस आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा तरल मोहक आंतरगुण. जीवनाने दिलेल्या विचित्र दानवाटपाने त्यांचे समग्र व्यक्तिमत्त्व बदलून गेले आहे. घटणाऱ्या प्रत्येक घटिताला मनातल्या मनात छानून गुणगुणत गीतपरिवेष्टित करण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे.

'भाकरीच्या चाकरीवर' पुरी जिंदगी विकली जात असल्याच्या अनुभवाने श्री. राम मोरे यांच्यामधील कलाकार हादरून जरी 'हे जिणे बेकार आहे' असे सांगत असला तरी त्यांची सोशीक समंजस वृत्तीच त्यांच्या ह्या संग्रहास कवचकुंडलाचे बळ देणारी ठरली आहे. आपल्या दुःखाचे कवीने भांडवल केले असते तर मला प्रास्ताविकाच्या आरंभी अंतर्मुख प्रांजल कथन करण्याची गरजच भासली नसती. 'जोगवा' ह्या काव्यात हीच सम त्यांनी साधली आहे–

माझे दुःख गावकरी
घर वेशीचा उतारा
डफ खुंटिला टांगावा
तसा गहाण चेहरा

अशा गहाण टांगलेल्या मुद्रेवरले 'भाव' गीतरंगाच्या संततधारेत पकडणे ही अवघड गोष्ट श्री. राम मोरे यांना साधली आहे. वस्तुतः त्यांच्या पदयात्रेत त्यांनी कितीतरी धुंदफुंद लावण्याही लिहिल्या आहेत. कित्येक शृंगारगीते व भक्तिगीतेही रचिली आहेत. ती देखील रोशन सातारकर, उषा मंगेशकर, सुमन कल्याणपूर, सुरेश वाडकर, उत्तरा केळकर, अरुण दाते, अजित कडकडे, भूपेंद्र सिंग, जयवंत कुलकर्णी यांच्यासारख्या समर्थ कलावंतांच्या स्वराने गाजलीही आहेत. पण एखाददुसरी लावणी, भक्तिरचना, गीत याचीच त्यांनी ह्या संकलनात निवड केली आहे. कित्येक पदे तर चांगली गाजून 'हिट' व लोकप्रियही झाली आहेत. पण त्यांना निग्रहाने दूर ठेवण्यात श्री. राम मोरे यांच्या वृत्तीचा प्रत्यय येतो. त्यांचे हे सौम्य, समंजस व्यक्तिमत्त्व फार आकर्षक आहे. धडधडाट, खडखडाट किंवा आदळआपट न करता अभिव्यक्त होण्याचा त्यांचा अंगभूत गुणच त्यांच्या पुढच्या वाटचालीतल्या यशाला कारणीभूत ठरणार आहे यात मला शंका वाटत नाही. मराठीत गीतकार–पदरचनाकार उदंड आहेत. पण ग. दि. माडगूळकर, पी. सावळाराम, जगदीश खेबूडकर, सुरेश भट, शांता शेळके यांच्या प्रसन्न दिलदार गीतांची परंपरा आपल्या ताकदीने व गुणवैशिष्ट्याने पुढे नेणारा हा कलावंत आहे यात मुळीच अतिशयोक्ती नाही. आपल्या ईप्सिताकडे टप्प्याटप्प्याने सरकणाऱ्या श्री. राम मोरेंची रचना आणि हे संकलन म्हणूनच लक्षवेधी ठरणार आहे.

अतिशय नाजुक भाव तितक्याच हळुवार वृत्तीने व शब्दांनी रेखित करण्याची कवीची शक्ती लक्षणीय आहे.

माळुनि हार डोई रानातल्या फुलांचा
ल्याली वसुंधरा ही अभिसार चांदण्यांचा
मधुवंतीचा सुवास वाऱ्यावरी तरंगे
बिलगुनिया धरेला आकाश गूज सांगे

(या झोपल्या जगात)

ह्या अभिसाराचे हे अम्लान अक्षय चांदणे रसिक मनातही एकसारखे उमलत राहील. कारण

श्री. मोरे यांची मागणी अगदी साधीसुधी आहे. एका क्षणाच्या प्रेमसंगीताने मोहरणारे हे मन आहे. त्याची मर्यादित अपेक्षा व सौम्य व्यक्तिमत्त्वच त्यांच्यातील अमर्याद क्षमतेची ओळख पटवून देते. ह्या वेड्या वेडात ते भारावून म्हणतात-

संपदा लाभो करी वा दैन्य कोरांटीपरी
तृप्त मी होईन नाथा दो करांच्या कोटरी

(रे क्षणांच्या संगतीने)

जसे हा गीतकार भारावतो तसे तो भाष्यही करतो. तडकावतोही. सर्वस्पर्शी प्रतिभेचा तो स्वाभाविक उद्रेकच असतो. ह्या महान मोठ्या देशातल्या छाकट्या माणसांच्या अनेक लबाड्यांनी आणि लांड्याकृत्यांनी ते उद्विग्न होतात. शब्दांचा भोवरा सरसरत उठतो-

माणूस माणसांचा मानी जिथे विटाळ
त्या वांझ संस्कृतीला नाही भविष्य नाही.

(मज मान्य नाही नाही)

पण हे असे अपवादक्षणाने घडते.

सभोवतीच्या निसर्गप्रक्रियांचा, फूलचांदण्याचा, प्रवाह-समुद्रांचा, पक्षी-प्राण्यांचा, रत्नशिंपल्यांचा आणि अंधारउजेडाचा सुखदुःखाचा खेळ हाच श्री. राम मोरे यांना अधिक आकृष्ट करतो. हे अत्यंत परिचित व पारंपरिक घटक असूनही त्यातल्या नावीन्याला अजूनही काजळी धरलेली नाही. कारण कवीच्या वेधक, विवेचक, विश्लेषक दृष्टीने त्या घटकांचे रूपस्वरूपच बदलून टाकले आहे. त्यामुळे मोरे यांच्या या–'धृवपद' संग्रहाचा व त्यातील निवडक सुश्लिष्ट रचनावलीचा विचार करताना त्यांचे पुढचे यश सुस्पष्टपणे जाणवते आणि पहाटेचे गाणे गाणाऱ्या ह्या कवीला मनापासून दाद द्यावीशी वाटते. सुखदुःखाचे बहाणे ओटीत वेचणाऱ्या ह्या कवीचे हे आनंदाविष्कारी धन रसिकवाचकांच्या मनाच्या ओट्याओट्यावर सांडावे अशी मी सदिच्छा व्यक्त करतो. मी त्यांच्याच शब्दांत इतकेच म्हणेन—

काचबंद पाणी तसा जन्म साचलेला
सुखदुःखाचा मीच ओटीत वेचिला.


(पहाटेचे गाणे)

ही पहाट सगळ्यांच्याच वाट्याला निश्चितपणे येवो. 'येवो पहाट वाटेला, येवो सोबतीला तारे; अवघडल्या क्षणाला, भेटावेत राम मोरे !' सध्या इतकेच पुरे !

(प्रस्तावना : पहाटगाणे, १९८५)

परिशिष्ट

शाहीर जानबाजी नकुजी डोंगरे यांच्या हस्ताक्षराचा एक नमुना



नाच्याचे लग्न (न. ८३)

पली राया कानीं मनीं धरा=आता पोराचें लग्न करा=पृ=नाच्या नाचून गेला हत्याच्या दर्नी=चाटून येते माझा डोळ्यांतले पाणी=पोरगा रिहणती नाच्याले=हाना या मातंग कुलन्यातले=१=बापान सांगून नेलो पोराची=दृष्यान्ची लग्नणी मांडून हजारा चौ=सीरी तरुन घाली हे गालीची=केली यान तेयारी झाडाची=२=बोदा मेळ्यान्ते पोरगी पाहेली एक=केली ना त्याची संमाद सोयरीक=समजदार हा झाडू=नंबा उभी न होना इहीण नाई=३=लरन घुरन चावून केला मान=झाडू जीले बीले नाहीं कांहि मान=म्हजश रोया पाची पलवान=जसा हिसें हातवाचा दुकान=नवे पंपेते पायल नीरखू भजें=चरण करता इहीन लाइ लाजे=४=जेवला झाइ दोइ दोइ हातान=मधुरातु झाली इहीणीची पान पाणी पेलन घटघट=डोराचली फुगले मनें घरट=५=


प्रश्नशोध

(विविध विषयस्पर्शी समीक्षा व संशोधन)

[प्रथम प्रकाशन ऋणनिर्देश]

१. मराठीचा वाङ्मयव्यवहार : काही विचार—आकंठ, दिवाळी अंक, १९८५.
२. संत साहित्य : एक दृष्टिक्षेप—आकंठ, दिवाळी अंक, १९८७.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविधांगी व्यक्तिमत्व—साप्ताहिक दृष्टिवेध, एप्रिल-मे १९८८.
४. म. फुले व डॉ. आंबेडकर : एक तौलनिक अभ्यास—समाजसुधारक विशेषांक, १९८६.
५. धर्मसंकल्पना आणि भारतीय मन—कामगार, दिवाळी अंक, १९८६.
६. धर्मनिरपेक्षता : काही विचार—व्यासपीठ, दिवाळी अंक, १९८६.
७. दलित समाजाचा तीन दशकांचा ताळेबंद—मुंबई तरुण भारत, ६ डिसें. १९८६.
८. श्री. म. म्हणजे महार माटे—व्याख्यान, आकाशवाणी, मुंबई, १९८८.
९. मिष्किल प्रतिभेचा अज्ञात शाहीर : जानबा—धर्मभास्कर, दिवाळी अंक, १९७८.
१०. लोकशाहीर जानबाजींचा नाट्यरंग—अस्मितादर्श, दिवाळी अंक, १९७८.
११. संदेश देणारा दलित शाहीर : जानबा—अस्मितादर्श, दिवाळी अंक, १९८२.
१२. एक अज्ञात शाहीर : राजोबा—सिंहगर्जना, दिवाळी अंक, १९७८.
१३. दंडारीचा कवनकार शाहीर राजोबा—मराठी संशोधन पत्रिका (ऑ. नो. डि. १९८२)
१४. गोविंदाग्रजांच्या 'तीन' विशेष कविता—धर्मभास्कर, गडकरी विशेषांक मे-जून १९८४.
१५. करंदीकरांच्या 'दांतापासून दांताकडे'चे पुनर्मूल्यमापन—धर्मभास्कर, मार्च १९८८.
१६. वसंत बापट यांची कवितामालिका 'मानसी'—मुंबई सकाळ (१२ जून १९८०)

१७. पाडगावकरांचा कडक 'सलाम'—मुंबई सकाळ (१२ जून १९८०)
१८. गजमल माळी यांचे चिंतनकाव्य 'नागफणा आणि सूर्य'—नवभारत, ऑगस्ट १९८०.
१९. तुही इयत्ता कंची? –ढसाळांचा प्रश्न—प्रस्तावना-प्रसिद्धी : पूर्वा, फेब्रु. १९८२.
२०. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा'चे विविधांगी मूल्यमापन—आकाशवाणी, मुंबई, भाषण व सोविएत मित्र,दिवाळी १९८८.
२१. दया पवार यांची तेजाबी कविता 'पाणी'—आकाशवाणी, मुंबई, भाषण (१६ फेब्रु. १९८९)
२२. वसंत सावंत यांचा प्रतीकलक्ष्मी आविष्कार'बैल'—आकाशवाणी, मुंबई, भाषण (१६ फेब्रु. १९८९)
२३. राम मोरे यांची गीतरचना 'पहाटगाणे'—'पहाटगाणे' संग्रहाची प्रस्तावना.



REFBK-0026166

प्रा. केशव मेश्राम :
पारितोषिके व विशेष उपलब्धी

(१) **हकिकत आणि जटायू** (कादंबरी)

- १९७२ चा महाराष्ट्र शासनाचा ह. ना. आपटे प्रथम पुरस्कार.
- जर्मनीतील हायडेलवर्ग विद्यापीठात अनुवादित स्वरूपात अभ्यासार्थ.

(२) **पोखरण** (कादंबरी)

- १९८० चा महाराष्ट्र शासनातर्फे विशेष पुरस्कार.

(३) **उत्खनन** (कवितासंग्रह)

- १९७७ चे महाराष्ट्र सरकारचे कवी केशवसुत प्रथम पारितोषिक.

(४) **पत्रावळ** (कथासंग्रह)

- १९८१ चा महाराष्ट्र शासनाचा विशेष पुरस्कार.

(५) **धगाडा** (कथासंग्रह)

- १९८५ चा महाराष्ट्र शासनाचा दिवाकर कृष्ण प्रथम पुरस्कार.
- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा रू. ५,००० चा निवडक पुरस्कार.

(६) **विद्रोही कविता** (संपादित कवितासंग्रह)

बी. ए. आणि एम. ए. च्या परीक्षावर्गांना—नागपूर विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, सागर विद्यापीठ, विक्रम विद्यापीठ, होळकर विद्यापीठ, धारवाड विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ येथे क्रमिक पुस्तक म्हणून नियुक्त.

लोकवाङ्मय गृह

नवी ललित प्रकाशने

प्रकाशित झाली

१. **डॉग व्हॅन (कथासंग्रह)**
राजा राजवाडे ❑

२. **तीन अर्वाचीन कवी : मार्क्सवादी दृष्टिक्षेप**
स. त्र्यं. कुल्ली ❑

३. **अण्णा भाऊ साठे (बालजीवनमाला)**
बाबुराव गुरव ❑

४. **एका स्पृश्याची डायरी (कादंबरी)**
डॉ. सदा कऱ्हाडे ❑

५. **पाब्लो नेरुदाच्या आठवणी**
अनु : सुधाकर बोरकर ❑

६. **तिरकस आणि चौकस (ललीत लेख)**
दिलीप पुरुषोत्तम चित्रे ❑

७. **प्रश्नशोध (समीक्षा)**
प्रा. केशव मेश्राम ❑

८. **साहित्यमुद्रा (समीक्षा)**
उषा मा. देशमुख ❑

९. **गुरुदत्त (चित्रपट दिग्दर्शकाची कहाणी)**
भाऊ पाध्ये ❑

लोकवाङ्मय गृह
भुपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५